# लोकराज्य

एप्रिल-२०१२/ किंमत ₹१०



# या झोपडीत माझ्या

राजास जी महाली, सौख्ये कधी मिळाली
ती सर्व प्राप्त झाली, या झोपडीत माझ्या

महाली मऊ बिछाने, कंदील शामदाने
आम्हा जमीन माने, या झोपडीत माझ्या

भुमीवरी पडावे, तान्यांकडे पहावे
प्रभुनाम नित्य गावे, या झोपडीत माझ्या

स्वामीत्व तेथ त्याचे, तैसेचि येथ माझे
माझा हुकूम गाजे, या झोपडीत माझ्या

महालापुढे शिपायी, शस्त्री सुसज्ज राही
दरकार तीहि नाही, या झोपडीत माझ्या

.जाता तया महाला,'मत जाव' शब्द आला
भीती न यावयाला, या झोपडीत माझ्या

महालात चोर गेले, चोरूनि द्रव्ये नेले
ऐसे कधी न झाले, या झोपडीत माझ्या

पहारे आणि  तिजोऱ्या, त्यातुनी होति चोऱ्या
दारास नाहि दोऱ्या, या झोपडीत माझ्या

महाली सुखे कुणा ही? चिंता सदैव राही
झोपेत रात्र जाई, या झोपडीत माझ्या

येता तरी सुखे या, जाता तरी सुखे जा
कोणावरी न बोझा, या झोपडीत माझ्या


चित्तात अन्य रामा, शब्दी उदंड प्रेमा
येती कधी न कामा, या झोपडीत माझ्या

पाहोनी सौख्य माझे, देवेंद्र तोहि लाजे
शांती सदा विराजे, या झोपडीत माझ्या

वाडे, महाल, राने, केले अनंत ज्याने
तो राहतो सुखाने, या झोपडीत माझ्या

'तुकड्या' मती स्फुरावी, पायी तुझ्या रमावी
मूर्ती तुझी रहावी, या झोपडीत माझ्या

- राष्ट्रसंत तुकडोजी महाराज



वर्ष ६४ वे | अंक १ | एप्रिल २०१२

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

# लोकराज्य

| | |
|---|---|
| मुख्य संपादक | प्रमोद त्र्यं. नलावडे |
| व्यवस्थापकीय संपादक | प्रल्हाद जाधव |
| संपादक | सुरेश वांदिले |
| कार्यकारी संपादक | डॉ. संभाजी खराट |
| उपसंपादक | किरण केंद्रे |
| विशेष साहाय्य | डॉ. सुरेखा मुळे |
| प्रशासन व वितरण अधिकारी | दिगंबर पालवे |
| साहाय्यक वितरण अधिकारी | विलास बोडके |
| साहाय्य | दिनेश सुर्वे<br>प्रशांत जाधव |
| मुखपृष्ठ | श्रावण गुरव |
| मांडणी, सजावट | संदीप पवार<br>सुहास सावंत |
| मुद्रण | एच. टी. मीडिया लि. दिघे, ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई |

**संपादकीय पत्ता**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
रूम नं. ३३, तळ मजला, मंत्रालय, मुंबई-३२.
संपादकीय संपर्क : ०२२-२२८८२८८८

**e-mail :** lokrajya@dgipr.maharashtra.gov.in

ई-लोकराज्यसाठी
**Website :** http://dgipr.maharashtra.gov.in

वर्गणीदार व तक्रार निवारणासाठी संपर्क - ०२२-२२०२१५३०
वितरण संपर्क - ०२२-२२०२३९५७

**e-mail :** lokvitran@dgipr.maharashtra.gov.in

# अंतरंग


| | | |
|---|---|---|
| झळाळती ग्रामोन्नतीच्या ज्योती | संपादकीय | ५ |
| माझ्या स्वप्नातील आदर्श गाव | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज | ६ |
| ग्रामविकासाची गुढी | मा. राज्यपाल | ७ |
| ग्रामविकासाची नवी मांडणी | मुख्यमंत्री | ८ |
| ग्रामविकास हाच समृद्धीचा आधार | उपमुख्यमंत्री | १० |
| ग्रामविकासाची पायाभरणी | यशवंतराव चव्हाण | १२ |
| आपलं गाव - आपलं सरकार | जयंत पाटील | १४ |
| गाव बदलत आहे | सतेज पाटील | १७ |
| आपला विकास आपल्या हाती | सुधीर ठाकरे | १८ |
| गाव तोचि देव! | हेमंत देसाई | २१ |
| आर्थिक घडी | अर्थसंकल्पातून... | २४ |
| 'यशवंत' महाराष्ट्र | डॉ. सुरेखा मुळे | २७ |
| विकासामागील 'ऊर्जा' | दिलीप चावरे | ३१ |
| शाश्वत विकास | संकलित | ३३ |
| गाव करी ते राव न करी | अनोख्या यशकथा | ३५ |
| विकासाची सिद्धी | अभय मोकाशी | ३९ |
| उजळणाऱ्या वाटा... | पोपटराव पवार | ४० |
| रोजगार हमीची मुद्रा! | डॉ. श्रीकर परदेशी | ४२ |
| सुदृढ महाराष्ट्राची पायाभरणी | संकलित | ४५ |
| आमची ग्रामसभा | डॉ. संभाजी खराट | ४८ |
| गावातलं पाणी गावात | कुमार खेडकर | ५० |
| नवनिर्माणाचे आधारस्तंभ | डॉ. मल्लीनाथ कलशेट्टी | ५१ |
| पर्यावरण जपणारा बायोगॅस | किरण केंद्रे | ५२ |
| आरोग्यातून संपन्नतेकडे | अजय जाधव | ५३ |
| मने जोडणारे रस्ते | दीपक मोरे | ५४ |
| गावच्या कारभारणी | जगदीश त्र्यं. मोरे | ५६ |
| हक्काचा निवारा | संकलित | ५८ |
| 'सरस' महालक्ष्मी | डॉ. नरेश गीते | ५९ |
| बचतगटाची किमया | संकलित | ६० |
| वारीमधील प्रबोधनाचं वारं | व. दा. राठोड | ६१ |
| विकासासाठी 'संग्राम' | एकनाथ मोरे | ६२ |
| आमचे गाव... आम्ही कारभारी | अरुण समुद्रे | ६४ |
| तंटामुक्त शैलीचा अपूर्व अविष्कार | प्रा. गजानन वाघ | ६५ |
| जीवन आणि जीवदान | अमृता नीलकंठ पाटील | ६६ |


**'लोकराज्य'मधील लेखांचे पुनर्मुद्रण केल्यास आम्हाला आनंदच होईल...**

वार्षिक वर्गणी - वरिष्ठ साहाय्यक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरेक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई-४०००२१ या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वटणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा.(प्रती अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००/-)

*या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.


## लोकाभिरुचीचे संवर्धन

'लोकराज्य' हे जसे राज्य सरकारची धोरणे व कार्यक्रम लोकांना सांगणारे नियतकालिक आहे तसेच ते महाराष्ट्राची संस्कृती, साहित्य आणि परंपरा यांची आठवण करून देणारे नियतकालिकही आहे. मागील काळात 'लोकराज्य'ने अनेक संग्राह्य अंक काढले. यापुढेही हे नियतकालिक लोकाभिरुचीचे संवर्धन करणारे लेख प्रकाशित करील असा मला विश्वास आहे.

**– नरेंद्र चपळगावकर,**औरंगाबाद

## सर्वत्र स्वागत

यशवंतराव चव्हाण विशेषांकाचे वितरण दि. १२ मार्च २०१२ रोजी मा. राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांच्या उपस्थितीत गेटवे ऑफ इंडिया, मुंबई येथे करण्यात आले. केंद्रीय कृषिमंत्री श्री. शरद पवार, मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, विज्ञान आणि तंत्रज्ञानमंत्री श्री. विलासराव देशमुख, ऊर्जामंत्री सुशीलकुमार शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील अनेक सदस्य, खासदार, आमदार, संपादक, पत्रकार यांनी या अंकाचे कौतुक केले आहे.




## संग्राह्य अंक

शासकीय यंत्रणेमार्फत दर्जेदार अंक प्रकाशित केला जातो, याचा प्रत्यय लोकराज्य पाहिल्यावर येतो. यशवंतराव चव्हाण विशेषांक या परंपरेला साजेसा आहे. लक्षवेधक मुखपृष्ठ आणि शीर्षकावरून अंकाच्या उत्तमतेची कल्पना येते. अभ्यासू आणि अनुभवी मान्यवरांचे लेख असल्याने अंक संग्रही ठेवावा असाच आहे. तरूण पिढीला मार्गदर्शक आहे. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून हा अंक सर्वत्र जायला हवा.

**– अरविंद कोकजे,** ज्येष्ठ पत्रकार, रत्नागिरी

## प्रेरणादायी अंक

आपला भारत देश २०२० साली महासत्ता बनेल, हे स्वप्न साकारायचे असेल तर यशवंतराव यांची राष्ट्रनिष्ठा आणि कार्यनिष्ठा या गुणांचा त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त सर्व युवकांना अवलंब करावा लागेल. ते काम या अंकामुळे होईल, असा विश्वास आहे.

**– सौदागरे काळे,**
टाकळी, ता. पंढरपूर

## वाचकाला समृद्ध करणारे 'लोकराज्य'

'लोकराज्य'चे नवे अंक पाहिले. भाषा, साहित्य, संस्कृती, कला यांच्याविषयी हे अंक वाचकांना समृद्ध करणारे आहेत. अंक अतिशय देखणे आहेत. छपाई, सजावट या दृष्टीने ते आकर्षक आहेत. वाचावेसे वाटतात.

**– वसंत आबाजी डहाके**

## देखणे रूपडे

'लोकराज्य'चे रूप सुंदर आकर्षक झाले आहे. 'रूपडे' असे कौतुकाने म्हणावे इतके लोभस. त्याचबरोबर अंतरंगही वाचनीय आणि संग्रहणीय असे झाले आहे. एकेक विषय घेऊन त्यासंबंधी जाणकारांकडून लेखन करून घेण्यामागील संपादक व संबंधितांचे कष्ट जाणवतात. चित्रकार व छायाचित्रकार यांनी अंकांच्या देखणेपणात भर घातली आहे.

**– नारायण कुळकर्णी कवठेकर**

## आकर्षक

'लोकराज्य'चे नवे स्वरूप छपाई आणि आशय या दोन्ही अंगांनी अतिशय आकर्षक होत आहे. एक सूचना : 'नवी पुस्तके' असे एक सदर सुरू करा. म्हणजे हजारो वाचकांना नवे चांगले काय लिहिले जात आहे ते घरबसल्या कळेल.

**– प्रभा गणोरकर**

## कलात्मक

पूर्वीचे लोकराज्य कसे केवळ शासकीय वाटायचे. सरकारी मंत्री अन् मंत्र्यांच्या विविध मंडळांच्या कार्याची जंत्री. आजकाल त्याचा चेहरामोहराच आरपार बदलून गेल्याचे पाहून धक्काच बसला. तो किती आनंददायी होता! राजकारण, मंत्री, नियोजन, योजना याखेरीजही महाराष्ट्राचे एक मोलाचे वाङ्मयीन, सांस्कृतिक, कलात्मक अंग आहे. हे लोकांपुढे मांडणारे अलीकडील अंक आहेत. खूपच मेहनत घेऊन प्रयत्नपूर्वक अन् तेही अतिशय कलात्मक पद्धतीने तयार केलेले दिसून येतात. महाराष्ट्राच्या सर्वांगाचे खरेखुरे दर्शन त्यातून घडते. त्यासाठी परिश्रम घेणाऱ्या सर्वांचे मनोमन अभिनंदन.

**– विठ्ठल वाघ**

## संग्राह्य

अलीकडे मासिकाचे अंतरंग आमूलाग्र बदलले आहे. विशेषत: गेल्या वर्षभरातील लोकराज्यचे सर्वच अंक संग्राह्य तर आहेतच पण त्यांचे संदर्भमूल्यही अनन्यसाधारण आहे. पूर्वी लोकराज्य म्हणजे शासकीय योजनांची जंत्री आणि माहिती देणारे पत्रक असेच वाटे. परंतु लोकराज्यचे अलीकडील भाषा, वाचन, पाणी, मुलगी वाचवा, चित्रशिल्प आणि विदर्भ विशेष हे सर्वच अंक सर्वांग सुंदर असेच आहेत. लोकराज्यचे बदलते स्वरूप पाहून सुखद आश्चर्य वाटले.

**– ॲड. सुभाष पाटील,**
विटा, सांगली

## अभिजात भाषेचा दर्जा मिळेल

महाराष्ट्र व मराठी अस्मिता यांचा जिव्हाळ्याचा संबंध असलेल्या मराठी साहित्य संमेलनाला वाहिलेला माहे जाने.-फेब्रु. २०१२ चा लोकराज्यचा अंक हा फारच आकर्षक, विविध विषयाच्या माहितीने समृद्ध होता.

त्यामुळे अंक सरकारी यंत्रणेकडून प्रकाशित झाला आहे असे वाटतच नाही. तसेच सर्व साहित्य संमेलनाध्यक्षांचे फोटो तसेच यातील काही निवडक भाषणे यांचा सुरेख मेळ यात होता. मराठी साहित्य हे विपुल असून विविधतेने नटलेले आहे. यात काही शंका नाही.मराठी भाषेची व साहित्याची व्यापकता पाहून तमिळ भाषेप्रमाणेच मराठीलाही अभिजात भाषेचा दर्जा मिळेल अशी आशा बाळगायला हरकत नाही.




**– सुनील कुवर,**वरिष्ठ तुरुंग अधिकारी, नागपूर

## माहितीपूर्ण

साहित्य संमेलन विशेष फेब्रुवारी २०१२ चा अंक स्वत:च मराठी वाङ्मयाचा उत्कृष्ट नमुना म्हणता येईल. इतका माहितीपूर्ण अंक, अनेक नामवंताचे लेख आणि जवळजवळ सर्व संमेलनाध्यक्षांचे फोटो (संग्रही ठेवावेत असे) मी प्रथमच पाहिले आहेत.

**– श्रीकृष्ण पुरंदरे,**
तळेगाव, दाभाडे

# झळाळती ग्रामोन्नतीच्या ज्योती



'लोकराज्य'च्या समृद्ध परंपरेतील 'ग्रामोन्नती विशेषांक' वाचकांना सादर करताना अतिशय आनंद होत आहे.

२५०० वर्षांच्या ज्ञात इतिहासाची परंपरा असणारे आपले राज्य मूलत: कृषिप्रधान संस्कृतीद्वारे गोदावरी-कृष्णा-पूर्णा-वरदा-भीमा इ. नद्यांच्या काठी वसलेल्या स्वयंपूर्ण ग्रामांमुळे भरतखंडात नावारूपाला आले. शककर्ते शालिवाहन, चालुक्य-वाकाटक-राष्ट्रकूट-शिलाहार राजघराण्यांनी व मध्ययुगीन कालखंडातील अहमदनगर येथील निजामशाही-वऱ्हाडातील इमादशाही या राजसत्तांनी सागरी व्यापाराबरोबर समृद्ध कृषिउद्योगांद्वारे या प्रदेशाचे 'महा-राष्ट्र' हे नाव सिद्ध केले. मुघल सत्तेशी टक्कर देऊन 'स्वराज्य' निर्माण करणाऱ्या शिवरायांच्या मराठी साम्राज्याचा आधार समकालीन स्वयंपूर्ण ग्रामव्यवस्था होती.

मध्ययुगीन कालखंडानंतर इंग्रजांच्या आगमनामुळे आणि औद्योगिक क्रांतीच्या जागतिक प्रभावामुळे स्वयंपूर्ण-ग्रामव्यवस्थापनामध्ये बदल होणे स्वाभाविक होते. आधुनिक कालखंडात गावच्या पारावरून चालणारा गावकारभार चावडीतून चालण्यास सुरुवात झाल्यानंतर सुधारणांचा वेग वाढला. खेड्यांची आर्थिक स्वायत्तता आणि जनजीवनाची अभेद्यता याबाबत संसदीय समितीचा अहवाल (१८१२), एलफिन्स्टन यांचा पेशवेकालीन ग्रामव्यवस्थेवरील अहवाल (१८१९) आणि मेटकाफ यांची टिप्पणी (१८३०) यामध्ये प्रशंसोद्‌गार काढले आहेत.

स्वातंत्र्य चळवळीत महात्मा गांधीजींनी राजकीय स्थित्यंतराबरोबर ग्रामोद्धाराची कल्पना जनतेसमोर मांडली. खरा भारत हा खेड्यात वसला असून खेडी स्वयंपूर्ण झाली तर ग्रामस्वराज्य येईल, असे महात्मा गांधी यांना वाटे. ग्रामोद्धारासाठी 'ग्रामस्वराज्य' हीच मूलभूत आणि सर्वस्पर्शी योजना असल्याचे त्यांचे मत होते. स्वातंत्र्योत्तर कालखंडात १९६२ नंतर महाराष्ट्रामध्ये पंचायतराज व्यवस्थेचा स्वीकार केला गेला. सत्तेच्या विकेंद्रीकरणाद्वारे स्थानिक पातळीवर ग्रामविकास हा नियोजनाचा केंद्रबिंदू मानून विविध योजना शासनाने कार्यान्वित केल्या. ग्रामपंचायतीला अधिकार देऊन ग्रामपंचायतीसाठी उत्पन्नाची साधने निर्माण केली गेली.

शासनाच्या सक्रिय सहभाग आणि पंचायतराज संस्थांमधील ३३ जिल्हा परिषदा, २७८९६ ग्रामपंचायती, ३५५ पंचायत समित्यांच्या घट्ट विणीच्या जाळ्यांद्वारे झालेल्या प्रयत्नांमुळे स्वातंत्र्यापूर्वीचे खेडे आणि आताचे खेडे यात आमूलाग्र बदल झालेला दिसतो. गावांमध्ये शिक्षण, आरोग्य, रस्ते, पाणी पुरवठा योजना, शौचालये, घरे, वीज अशा मूलभूत सोयी झाल्या. परिचारिका तथा प्रसविका, सार्वजनिक आरोग्य केंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र ते ग्रामीण रुग्णालय असे आरोग्य व्यवस्थेचे स्थित्यंतर आज बघायला मिळते. आधुनिक शेतीतंत्रज्ञान आणि जलसंधारण या उपाययोजनांमुळे शेतीचे उत्पन्न वाढू लागले. नवे प्रयोग होऊ लागले. गावांमध्ये समृद्धी आली. गावातच रोजगार निर्मिती व्हायला सुरुवात झाली. गावातून शहरांकडे जाणाऱ्यांचा ओढा दिसत असला तरी आज गावातसुद्धा रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण झाल्याने गावाच्या मातीशी नाळ जुळलेला तरुण गावातच राहून स्वत:सोबतच गावाची उन्नती साधताना दिसतो. हा बदल एकाएकी झालेला नाही. शासनाच्या पाठिंब्याने आणि लोकसहभागामुळे टप्प्याटप्प्याने हा बदल होत गेला. आमचा शेतकरी कालबाह्य रूढी-परंपरा आणि अंधश्रद्धांना बाजूला सारत माहिती-तंत्रज्ञान आणि जैवतंत्रज्ञान युगाकडे आकर्षिला जात आहे. आधुनिक तंत्रज्ञानामुळे गाव आणि गावकरी जगाशी संपर्क साधत आहेत. 'फेसबुक इंडिया'चे प्रमुख कीर्तीगा रेड्डी यांनी नुकतेच दिल्लीत सांगितले की, सांगली जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी 'फेसबुक'चा उपयोग करून हळदीचा कमी होणारा भाव थोपवला. हा बदल निश्चितच सुखावणारा आहे.

महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतर मागील ६० वर्षांत आपल्या राज्याने पंचायतराज व्यवस्थेच्या अंमलबजावणीत आघाडी घेतली आहे. पायाभूत सुविधा पुरविण्यापासून ते पर्यावरण संतुलित समृद्ध गावांची निर्मिती करण्यापर्यंत मजल गाठली गेली. पारावरची / चावडीवरील ग्रामपंचायत आता ग्रामसचिवालयांद्वारे ई-ग्रामपंचायत होऊ पाहते आहे.

**'गावचे राज्य गावचि करी। कोणाचीच न चाले हुशारी।। आमुचे आम्हीच सर्वतोपरी। नांदू गावी।।'** या राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या वचनाचा प्रत्यय येऊ लागला आहे.

ग्रामविकासाचे विविध पैलू आणि टप्पे समाविष्ट असणाऱ्या लेखांद्वारे विविध विषयांचा ऊहापोह या अंकात करण्यात आला आहे. ग्रामविकास विभागाचे मंत्री मा. श्री. जयंत पाटील आणि राज्यमंत्री मा.श्री. सतेज पाटील यांची प्रेरणा आणि मार्गदर्शन अंकाच्या निर्मितीमागे असल्याचे नमूद करायला हवे. ग्रामविकास सचिव श्री. सुधीर ठाकरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

**'गावागावांसी जागवा। भेदाभेद हा समूळ मिटवा। उजळा ग्रामोन्नतीचा दिवा। तुकड्या म्हणे ।।'** हा राष्ट्रसंतांचा संदेश आणि 'ग्रामविकास ते ग्रामस्वराज्य'पर्यंतचा प्रवास अधोरेखित करणाऱ्या या 'ग्रामोन्नती विशेषांका'मुळे वाचकांना नवी माहिती मिळेलच. इतकेच नव्हे तर गेल्या ५० वर्षांत राज्यातील ग्रामविकासाच्या कामांमुळे झळाळणाऱ्या ग्रामोन्नतीच्या ज्योती भविष्याचा प्रवास सुखकर करतील, याची मला खात्री वाटते.



**प्रमोद त्र्यं. नलावडे**
मुख्य संपादक तथा महासंचालक
(माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)
संपर्क : ०२२-२२०४१५८५/२२०२७९५६
dg@dgipr.maharashtra.gov.in



**ग्रामसुधारणेचा मूलमंत्र । सज्जनांनी व्हावे एकत्र**
**संघटना हेचि शक्तीचे सूत्र । ग्रामराज्य निर्माण करी**

# माझ्या स्वप्नातील आदर्श गाव



**ग्रामविकासाच्या क्षेत्रात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी केलेले कार्य व मांडलेली भूमिका एकविसाव्या शतकातही तितकीच उपयोगी आहे. आदर्श ग्राम निर्माण करण्यासाठी काय करावे लागेल याविषयी त्यांनी तत्कालीन संदर्भात मांडलेले हे विचार आजही प्रेरणादायी आहेत...**

मित्रांनो ! आदर्श ग्रामनिर्माण योजना हा आजच्या युगाचा महत्त्वाचा प्रश्न आहे. एकेकाळी यज्ञाला जे महत्त्व होते ते महत्त्व आजच्या काळी या योजनेला आहे. आपल्या प्रत्येक गावाला आज फार पुढे जावयाचे आहे. राज्याचे किंवा राष्ट्राचे केंद्र दिल्ली नसून आपले प्रत्येक गाव आहे. आपण आपले गाव आदर्श करू तरच राष्ट्र सुखी, समृद्ध, सामर्थ्यवान व उन्नत होईल. गावा-गावातून आपण सुरू केलेले कार्य पाहण्यासाठी दिल्लीचे थोर-थोर नेते येत आहेत. येत राहतील. अनेक पुढारी मला आपल्या छोट्या-छोट्या खेड्यातील कार्यासंबंधी मोठ्या आस्थेने विचारीत असतात. अशी चिमुकली गावे आदर्श झालेली पाहण्यासाठी सारेच उत्सुक आहेत. पूज्य महात्मा गांधीजी किंबहुना आपल्या सर्वच संतमहात्म्यांची इच्छा देखील हीच होती.

पुढाऱ्यांनी आमच्या गावाला भेट द्यावी हे भूषणावहच आहे, पण केवळ त्यासाठी आपले काम होता उपयोगी नाही. नाहीतर त्यात तकलादूपणा-दिखाऊपणा येईल. आपल्याला कार्याची धुंदी चढली पाहिजे, आत्मसंतोषासाठी कार्य करता आले पाहिजे. भक्त पुंडलिकाने आईबापाची सेवा एकनिष्ठेने केली. त्यावेळी देव वैकुंठातून त्याचेकडे आले नि म्हणाले पुंडलिका, मी प्रसन्न झालो आहे, माझे दर्शन घे. पुंडलिकाने म्हटले - देवा! ज्या आई बापाच्या सेवेमुळे तुम्हाला येथे यावे लागले ती सेवा तुम्हा देवापेक्षाही श्रेष्ठ आहे, ती मी कशी सोडू? अखेर आपली सेवा चालू ठेवूनच त्याने वीट फेकली आणि तिचेवर विठ्ठलाला तिष्ठत उभे राहणे भाग पाडले.

भक्त गोऱ्या कुंभाराने मडकी घडवून समाजाची सेवा केली. त्यात त्याची तन्मयता इतकी झाली होती, की स्वत:चे मूल मातीत तुडवले गेले तरी त्याला भान नव्हते. मडके घडविण्यात त्याने कधीतरी बेईमानी किंवा चुकारपणा केला काय? या तन्मयतेने नि इमानदारीनेच त्याची भक्ती योगी-तपी लोकांहूनही श्रेष्ठ ठरली. गावचे काम अशाच वृत्तीने आपण केले तर तीच खरी भक्ती ठरेल! कामातच नाम घेता येईल! किंबहुना देवाचे नाम घेण्यापेक्षाही देवाचे असे काम करणेच मी अधिक श्रेष्ठ समजतो.

ग्राम आदर्श करताना श्रमदान, समयदान इत्यादी गोष्टींची अत्यंत गरज भासते, शोषकखड्डे, धान्यभांडार इत्यादी व्यवस्थाकार्ये त्यात करावी लागतात. ग्रामपंचायत नसताही लोकांनी मनात आणले तर सर्व सोयी ते करू शकतात. ग्रामपंचायत सत्तेने सुधारणा करून घेईल तर सेवामंडळ प्रेमाने समजावून करायला लावील. आपण गावाच्या सुधारणेकडे दुर्लक्ष करतो, सार्वजनिक कामांकडे कानाडोळा करतो, अशा वेळी सरकारला ग्रामपंचायत स्थापन करावी लागते आणि मग तुमचाच पैसा सक्तीने वसूल करून गावाच्या सुधारणेस लावला जातो त्यासाठी पैशाचे जागी दोन पैसे खर्च होतात, शिवाय गावात कलह माजतात. सेवाप्रेम व सहकार्याने स्वयंप्रेरणेने केलेले काम टिकाऊ होते, तसे सत्तेने होत नाही. प्रेमाने लोकात परिवर्तन घडवून आणण्यासाठी पूज्य विनोबांची ग्रामदानाची योजना अत्यंत महत्त्वाची आहे. गावाच्या उन्नतीसाठी सर्वांनी कटिबद्ध होणे याचेच नाव आहे ग्रामदान!

मित्रहो! आपण सर्वच याकडे वळलो आहोत. आपणाला बसण्या-उठण्यापासून तो प्रत्येक काम व्यवस्थित करण्याकडे लक्ष पुरवायचे आहे. गावाच्या उद्धारातच आमचा खरा उद्धार आहे याची जाणीव आपणाला होऊ लागली आहे. त्यासाठी रस्ते, घरे, गोठे व उकिरडे दुरुस्त करणे तर आवश्यकच आहेत, पण माणसेही दुरुस्त करावयाची आहेत. आळशी, व्यसनी, बेकार व गुंडप्रवृत्तीचे कोणीही असता उपयोगी नाही. त्याप्रमाणेच जातीपातीचेही उच्चाटन करून आपण सर्व एक आहोत, एकाच कुटुंबातील आहोत ही जाणीव घेऊन एकोप्याने सर्वांनी वागले पाहिजे. गरीब-अमीर, अडाणी-पंडित, उच-नीच असले भेद शक्य तितक्या त्वरेने नष्ट व्हायला पाहिजेत.

अस्पृश्यता व विषमता हा हिंदुधर्मावरील कलंकच नव्हे तर हे मोठे संकट आहे. जगात ख्रिस्तीधर्म, इस्लामधर्म व बौद्धधर्म यांची लोकसंख्या क्रमाने एकापेक्षा एक कमी आहे. त्या सर्वाहून कमी हिंदुधर्मीयांची लोकसंख्या आहे. त्याची तत्त्व फार उच्च व व्यापक आहेत, पण रुढ्यांनी खूपच गोंधळ घातला आहे. ही शुद्ध तत्त्वे व्यवस्थितपणे अजून व्यवहारात न आणली गेली तर पुढे या थोर धर्माचे काहीच मूल्य उरणार नाही. यासाठी आम्हाला मानवतेच्या दृष्टिकोनातून धर्ममय जीवन करणे अत्यंत जरुरीचे आहे. अमानुष व निरर्थक रूढ्यांना मूठमाती द्यावयाची आहे. जातीने उच्च म्हणविणारा पण कामात आळशी, अशाला सामान्य सेवक समजून काम देणे आणि कुळाने हलका मानला गेलेला पण गुणांनी थोर, अशा व्यक्तीला प्राधान्य देणे आज आवश्यक आहे. द्वेशमत्सर कोणाचाही नको. सहकारिता, सद्‌भावना, सद्‌गुण, सत्प्रेम यांचे पवित्र वातावरण गावभर निर्माण करून गावाला एक आदर्श कुटुंब बनविणे हेच महान पुण्यकार्य आहे, हाच खरा धर्म आहे ! अशा धर्माने रसरसलेले छोटे-मोठे आदर्श गाव पाहून कोणाच्याही हृदयात नवचैतन्य निर्माण होईल, असे कार्य आपण आपापल्या गावी करू शकलो तर तीर्थोतीर्थी जाण्याऐवजी लोक आपल्या गावाचे दर्शन घ्यायला वारंवार उत्सुकतेने येतील. श्रीगुरुदेव आपणास ही प्रेरणा व शक्ती देवो, हीच प्रार्थना!

**प्रामाणिकतेने करणे काम।**
**हेचि आमुचे ईश्वरनाम।**
**सर्व जीवमात्रासी ऐक्यप्रेम।**
**धर्म हा आमुचा।।**

या अंकातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा मूळ लेख आणि त्यांची निवडक वचने अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवामंडळाचे डॉ. राजाराम बोथे यांनी उपलब्ध करून दिले. त्यांचे विशेष आभार.

संघटन गावी मजबूत असावे । आपापले दु:ख त्यासि सांगावे
कोणावरि अन्याय होऊ न द्यावे । कार्य हे संघटनेचे



# ग्रामविकासाची गुढी

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी ५० टक्के आरक्षण लागू केल्यानंतर, प्रथमच या वर्षी झालेल्या निवडणुकांमध्ये जास्तीत जास्त महिला उमेदवारांना निवडणुकीत सहभागी होण्याची व निवडून येण्याची प्रत्यक्ष संधी मिळाली.

- पंचायत राज संस्थांमध्ये अधिक पारदर्शकता आणि उत्तरदायित्व आणण्यासाठी, शासनाने संगणकीय ग्रामीण महाराष्ट्र, म्हणजेच 'संग्राम' हा प्रकल्प सुरू केला आहे. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी, सर्व पंचायत राज संस्थांना संगणक, बहुउद्देशीय प्रिंटर, इंटरनेट जोडणी आणि २०,००० स्थानिक युवकांचे तांत्रिक स्वरूपाचे मनुष्यबळ पुरविण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र राज्य हे ग्रामीण भागात ई-गव्हर्नन्स कार्यक्रम राबविणारे देशातील एक अग्रेसर राज्य आहे.

- 'ग्रामसभा बळकटीकरण अभियान' राज्यात अत्यंत जोमाने राबविण्यात येत असून 'ग्रामसभेचे अधिकार व कर्तव्ये' यांसंबंधीच्या पुस्तिका सुमारे १ कोटी कुटुंबांना ५ जून, २०११ या जागतिक पर्यावरण दिनी वितरित करण्यात आल्या आणि त्याद्वारे त्यांना ग्रामसभेचे महत्त्वही पटवून देण्यात आले.

- ग्रामीण भागाचा पर्यावरणाभिमुख असा सर्वसमावेशक विकास घडवून आणण्यासाठी शासनाने 'पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजना' (पर्यावरण-ग्राम) सुरू केली आहे. राष्ट्रपतींच्या हस्ते राज्यातील एकूण ८१० ग्रामपंचायतींना 'पर्यावरण विकास रत्न' हा पुरस्कार देण्यात आला असून पर्यावरण-ग्राम कार्यक्रमात सहभागी झालेल्या गावांना प्रोत्साहित करण्यासाठी शासनाने ३८९ कोटी रुपये इतका निधी उपलब्ध करून दिला आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल महामहीम श्री. शंकरनारायणन यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनच्या प्रारंभी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांपुढे राज्याच्या विकासाची दिशा स्पष्ट करणारे भाषण केले. त्यातील ग्रामविकासाचे प्रतिबिंब!**



- मानव विकास निर्देशांक उंचावण्यासाठी व दारिद्र्य निर्मूलन करण्यासाठी राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान ही केंद्र पुरस्कृत योजना पहिल्या टप्प्यात गडचिरोली, जालना, नंदुरबार, उस्मानाबाद, रत्नागिरी, सोलापूर, ठाणे, वर्धा आणि यवतमाळ या ९ जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येत आहे.

- राष्ट्रीय ग्रामीण पेय जल कार्यक्रम या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमाअंतर्गत २०१२-१३ व २०१३-१४ या वर्षांच्या कृती आराखड्यात राज्यातील एकूण सुमारे १५,००० इतक्या वाड्या-वस्त्यांचा समावेश केलेला आहे.

- शासनाने 'ग्रामीण दलित वस्ती वैयक्तिक नळजोडणी व शौचालय बांधकाम योजना' सुरू केली असून या योजनेअंतर्गत राज्याच्या ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजाच्या प्रत्येक कुटुंबाला वैयक्तिक शौचालय बांधण्यासाठी ११,००० रुपये आणि घरगुती नळजोडणीसाठी ४००० रुपये इतके अनुदान देण्यात येईल.

- भारत सरकारकडून दिले जाणारे 'निर्मल ग्राम पुरस्कार' पटकावण्यामध्ये महाराष्ट्राचा सिंहाचा वाटा आहे. भारत सरकारने २०१० या वर्षापर्यंत पुरस्कार दिलेल्या एकूण २५,१४५ ग्रामपंचायतींपैकी ९०८२ ग्रामपंचायती महाराष्ट्रातील आहेत. २०११ या वर्षात राज्यातील आणखी ४४२ ग्रामपंचायतींना हा पुरस्कार मिळाला आहे.

- शासनाच्या नियोजनबद्ध आणि अभिनव प्रयत्नांमुळे, 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत' मे २०११ मध्ये मजुरांची साप्ताहिक सरासरी उपस्थिती ६ लाखापर्यंत पोहोचली आहे.



गावाचे जे पवित्र सेवक। तेचि प्रसंगी होती सैनिक
ज्या गावी ऐसे सावध पाईक । तेथे विघ्न न ठाके

# ग्रामविकासाची नवी मांडणी



**विशिष्ट काळानुरूप घटना घडत असतात. त्यानुसार आज बदलत्या परिस्थितीप्रमाणं ग्रामविकासाचं सूत्रदेखील बदलत आहे. ग्रामविकासाची आखणी करताना शेती, पशुपालन या जोडधंद्याच्या बरोबरीनं नवनवीन तंत्रज्ञानाचा अवलंब, शिक्षण आणि गावाच्या आरोग्याकडं गांभीर्यानं पाहण्याची गरज निर्माण झाली आहे. थोडक्यात ग्रामविकासाची आपल्याला नव्यानं मांडणी करावी लागेल. यासाठी व्यापक जनजागृती हवी. ग्रामविकास ही आपणा सर्वांची सामुदायिक जबाबदारी याविषयी सांगताहेत मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण.**

लोकशाही खऱ्या अर्थानं रुजवायची असेल, फलद्रुप करायची असेल तर सत्तेचे विकेंद्रीकरण अपरिहार्य ठरते. देशाचा विकास करायचा असेल तर आधी खेडी समृद्ध करायला हवीत. त्यांचा विकास करायला हवा, या ग्रामविकासाच्या मंत्राचा महात्मा गांधींनी नेहमीच आग्रह धरला होता.

स्थानिक लोकांच्या सहकार्याने आणि सहभागाने ग्रामीण भागाचा विकास करणे, विकासाच्या संधी आणि रोजगार जनतेला स्थानिक पातळीवरच उपलब्ध करून देणे आणि पर्यायाने शहराकडे जाणारा ग्रामीण जनतेचा ओघ थोपवणे आदी उद्देशाने सत्तेचे विकेंद्रीकरण करून संपूर्ण राज्यामध्ये १९६२ साली पंचायतराज व्यवस्था यशस्वीरीत्या लागू करण्यात महाराष्ट्रानं आघाडीची भूमिका बजावली. त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्थेला ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार घटनात्मक दर्जा प्राप्त झाला आहे. महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतरावजी चव्हाण यांनी पंचायतराज व्यवस्था बळकट करण्यासाठी जाणीवपूर्वक निर्णय घेतले. महाराष्ट्राचे आज पन्नास टक्के नागरीकरण झालं असलं तरी निम्मा भाग हा ग्रामीण आहे. त्यामुळेच ग्रामविकासाला आम्ही नेहमीच महत्त्व दिले आहे. काळानुरूप ग्रामविकासाच्या संकल्पना बदलत आहेत हे नाकारून चालणार नाही.

गेल्या काही वर्षांत शहरी भागाप्रमाणेच गावकऱ्यांच्या राहणीमानात, विचारशक्तीमध्येही बदल झाले आहे. बदल हे विकासाचे सूत्र असले तरी त्यात शाश्वतता असायला हवी. गावाचा विकास घडवून आणावयाचा असेल तर प्रथम गावातील जमीन, उपलब्ध पाणी, त्यानुसार अत्याधुनिक पीक व्यवस्थापन आणि शेतीला जोडधंद्याचे गणित जोडले गेले पाहिजे. पाण्याचे योग्य नियोजन केले तर निश्चितपणे पीक उत्पादनात वाढ मिळू शकते. त्याचबरोबर पशुपालन, कुक्कुटपालन आणि कुटीरोद्योगालाही चालना मिळू शकेल. यातून गुंतवणूकही वाढेल.

**पाण्याचे नियोजन करण्याची गरज**

विकासाच्या गतीनुसार शहरी तसेच ग्रामीण भागात पाणी आणि ऊर्जेची मागणी सातत्याने वाढणार आहे. त्याचा दबाव हा उपलब्ध पाण्याच्या स्रोतांवर राहणार आहे. त्यामुळे भविष्यातील पाण्याचे संकट लक्षात घेऊन प्रत्येक गावाने पाण्याचे सुयोग्य नियोजन करण्याची गरज आहे. पीक उत्पादन आणि गावांसाठी लागणाऱ्या प्रत्येक थेंबाचा हिशेब ठेवावा लागणार आहे. यामुळे पाण्याच्या अनिर्बंध उपशावर नियंत्रण येईल.

शेती आणि पाण्याच्या नियोजनाबरोबर शहरी आणि ग्रामीण भागातील पाण्याचे नियोजन आपल्याला करावे लागेल. पाणी प्रश्न निर्माण होण्यास आपणच जबाबदार असलो तरी तो सोडविण्यासाठी आपणच कसा खारीचा वाटा उचलू शकतो हे समजून घेणे उपयुक्त ठरेल. राज्यात कमी-अधिक प्रमाणात सर्वत्र पाऊस पडतो. हा सर्वत्र पडणारा पाऊस बहुतांश वायाच जातो. म्हणूनच उपलब्ध पावसाच्या पाण्याचं नियोजन आणि संधारण हा एकूणच समस्या चक्रातील कळीचा मुद्दा आहे. योग्य प्रकारे जलसंधारण आणि नियोजन केल्यास पाणी पुरवठ्यासाठी बाह्य स्रोतांवर कमी प्रमाणात अवलंबून रहावे लागेल.

जलसंधारणामुळे जमिनीखालील पाण्याची पातळी वाढते. जमिनीखालील पाण्याची पातळी वाढल्याने पाणी वर खेचण्यासाठी लागणाऱ्या विजेच्या वापरात बचत होईल. मिळणारं पावसाचं पाणी जमिनीत मुरवून आणि मिळणारं पावसाचं पाणी विविधप्रकारे गोळा करून वर्षभर किंवा मर्यादित काळासाठी आपल्याला वापरता येईल. ग्रामविकासाची संकल्पना राबविताना आपल्याला पाण्याच्या नियोजनाकडे पुढील काळात अधिक लक्ष द्यावे लागेल.

**शेती हीच राज्याची संस्कृती**

महाराष्ट्र ही पूर्वापार कृषीवलांची भूमी. 'राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा' असं वर्णन असलेल्या आपल्या राज्यात हवामान, पाणी, जमीन यामध्ये कमालीचे वैविध्य आहे. सर्व प्रकारची अन्नधान्ये, फळे, फुले, भाजीपाला यांचे उत्पादन महाराष्ट्रात घेतले जाते. यामुळेच देशाच्या कृषी व्यवसायात महाराष्ट्राचे आगळेवेगळे स्थान आहे. ओलीत शेती, आर्द्र शेती, बागायत शेती, कोरडवाहू शेती, पायऱ्या पायऱ्यांची शेती आणि स्थलांतरित शेती असे शेतीचे प्रकार महाराष्ट्रात आढळतात. शहरीकरण वाढत असले तरी आजही शेती हे लाखो शेतकऱ्यांच्या जीवनाचे एक अभिन्न अंग आहे.

यापुढील काळातही शेती हाच ग्रामविकासाचा केंद्रबिंदू राहणार असल्याने ग्रामविकास समिती, कृषी विभाग आणि कृषी विद्यापीठाच्या समन्वयातूनच नव्याने गावनिहाय पीक व्यवस्थापन आराखडा आणि शेती जोडधंद्याची नव्याने मांडणी करावी लागणार आहे. यासाठी सामुदायिक शेती हा महत्त्वाचा घटक राहणार आहे. यातून निविष्ठांचा खर्च कमी होऊन गुणवत्ता पूर्ण उत्पादन मिळेल. तसेच बाजारपेठेतही किफायतशीर दर मिळविता येईल. राज्यातील काही गावातील शेतकऱ्यांनी अशी उदाहरणे आपल्यासमोर ठेवली आहेत.

**सामुदायिक प्रयत्न महत्त्वाचे**

जेव्हा गावात विकासाची मांडणी केली जाते



काही अपराध घडता गावात । त्वरित कळवावी खबरबात
सर्वांनी भाग घेवोनि त्यात । ठीक करावे बिघडेल ते

तेव्हा सामुदायिक प्रयत्न महत्त्वाचा असतो. आर्थिक प्रगतीच्या बरोबरीनं शिक्षण हा विकासातील महत्त्वाचा मुद्दा आहे. गावातील परिस्थितीला बदलविणारं शिक्षण मुलांना मिळालं पाहिजे. मुलांना त्यांच्या आवडीनुसार तांत्रिक शिक्षण मिळायला हवं. त्याच बरोबरीनं आरोग्य हा देखील महत्त्वाचा घटक आहे. लहान मुले आणि महिलांचे कुपोषण याकडे अधिक लक्ष द्यावे लागेल.

ऊर्जेच्या प्रश्नावर सौर ऊर्जा, पवन ऊर्जा हा चांगला पर्याय आहे. शासनाच्या यासाठी योजना आहेत. या योजना सहकार्यातून राबविल्या पाहिजेत. गावातील निसर्ग संवर्धन देखील ग्रामविकासाचा महत्त्वाचा घटक होऊ शकतो. कृषी आणि ग्रामपर्यटनातूनही गावाच्या विकासाला चालना मिळू शकेल. आज गावातील पाण्याचे स्रोत कमी होत आहेत. नदी-नाले दूषित होत आहेत. त्यामुळे शेतीच्या बरोबरीनं लोकांचे आरोग्यही धोक्यात आले आहे. याचा सामाजिक जीवनावर परिणाम होत आहे. जन्माला येणारी पिढी सशक्त असेल तरच त्या कुटुंबाचे आरोग्य चांगले राहील. शेतीच्या विकासाबरोबरच सामाजिक आरोग्यही जपले पाहिजे. सर्वांगीण विकासच गावाकडून शहराकडे होणारे स्थलांतर रोखू शकते.

चांगले प्रशासन देण्यासाठी ई-गव्हर्नन्सचे महत्त्व जाणून राज्यातील सर्व २७ हजार ८९६ ग्रामपंचायती, ३५१ पंचायत समित्या आणि ३३ जिल्हा परिषदांमध्ये संगणकीय ग्रामीण महाराष्ट्र प्रकल्प आम्ही सुरू केला आहे. ग्रामपंचायत, पंचायत समित्या आणि जिल्हा परिषदेमधील कामे आणि माल पुरवठा ई-टेंडरिंगद्वारे करण्याचा निर्णय आम्ही घेतला.

शिक्षक, विद्यार्थी यांची बायोमेट्रीक हजेरी घेण्याचा पथदर्शी प्रकल्प राज्यातील १,१०० शाळांत सुरू करण्यात आला आहे. इंदिरा आवास योजनेत ज्यांना घर बांधायला जागा नाही, त्यांना एक गुंठा जागा घेण्यासाठी १२ हजार रुपये अनुदानाची योजना, तसेच ग्रामीण भागात बाजारपेठ मिळवून देण्यासाठी 'ग्रामीण मॉल' निर्माण करण्याची योजना सुरू करण्यात आली आहे. ग्रामीण निवारा योजना तसेच यशवंत ग्राम समृद्धीसारख्या परिसर विकासाच्या योजनांमुळे ग्रामविकासाला बळकटी दिली आहे. प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतून रस्ते विकासाचे अनेक प्रकल्प पूर्ण झाले आहेत.

**पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजना**

राज्यातील गावांचा सर्वंकष विकास व्हावा, गावात उच्च प्रतीच्या भौतिक सुविधांची निर्मिती करून जीवनमान उंचावले जावे, तसेच नैसर्गिक साधन संपत्तीचा विनियोग पर्यावरणाचा समतोल राखून कसा करता येईल, या विचाराने शाश्वत विकासासाठी पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजना सुरू करण्यात आली आहे. वृक्षलागवड, शौचालय, मालमत्ता कर आकारणी व पाणीपट्टी आकारणी, प्लास्टिक वापरबंदी, संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान, यशवंत पंचायत राज अभियान, अपारंपरिक ऊर्जा, घनकचरा, सांडपाणी व्यवस्थापन या निकषांचा समावेश असलेली 'कार्यक्षमतेवर आधारित ग्रामपंचायतींना निधी' (Performance based grants to grampanchayat) अशी क्रांतिकारी योजना देशामध्ये प्रथमच राबविण्यात येत आहे. त्यामध्ये निकष पूर्ण करणाऱ्या ग्रामपंचायतींना लोकसंख्येच्या आधारित २ लाख रुपये ते १२ लाख रुपये असे अनुदान देण्यात येते. योजनेसाठी यावर्षी ३८९ कोटी रुपये अनुदान देण्यात आले आहे.




पाच हजार लोकसंख्येवरील गावांचा पर्यावरण विकास कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. बाजारपेठ विकास, सार्वजनिक दिवाबत्तीची सोय, बागबगीचे, उद्याने तयार करणे व अभ्यासकेंद्र या मुद्द्यांच्या आधारावर विकास आराखडा तयार करण्यात येणार आहे. गावात लोकसहभागातून ग्रामविकास कृती आराखडे तयार करण्यासाठी सूक्ष्म नियोजन (मायक्रो प्लॅनिंग) ही पद्धत राबविण्यात येत आहे.

**ग्रामसभा बळकटीकरण अभियान**

पंचायतराज संस्थांना मजबूत करण्यासाठी जास्तीत जास्त अधिकार प्रदान करण्यात आले. त्यानुसार ग्रामसभा ही ग्रामीण लोकशाही व्यवस्थापनातील सर्वोच्च यंत्रणा आहे. या घटनादुरुस्तीनुसार ग्रामसभेला जास्तीत जास्त अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. केंद्र शासनाच्या पंचायत राज मंत्रालयाने २००९-२०१० हे वर्ष ग्रामसभा म्हणून जाहीर केले होते. राष्ट्रीय गौरव ग्रामसभा स्पर्धेमध्ये महाराष्ट्राला राष्ट्रीयस्तरावरील प्रथम पुरस्कार प्राप्त झाला आहे.

भारत निर्माण कार्यक्रमातील नॅशनल गव्हर्नन्स कार्यक्रमांतर्गत सर्व पंचायतीराज संस्थांचे संगणकीकरण करून त्यांच्या कारभारात एकसूत्रता व पारदर्शकता आणण्यासाठी ई-पीआरआय/ पंचायत हा मिशन मोड प्रोग्राम हाती घेण्यात आला आहे.

(उर्वरित मजकूर पान११ वर )



सर्वांनी स्वच्छ, शिस्तबद्ध व्हावे । परस्परांशी प्रेम करावे
तरीच गाव स्वर्ग व्हावे । सर्वतोपरी

# समृद्धीचा आधार...



**खेड्यांचा देश भारत अशी आपल्या देशाची ओळख आहे. महाराष्ट्राच्या बाबतीत अशीच परिस्थिती आहे. सर्वाधिक वेगाने शहरीकरण होणारे राज्य म्हणून महाराष्ट्र ओळखले जात असले तरी महाराष्ट्राचा ग्रामीण चेहरा आजही टिकून आहे. राज्याची ५७.५७ टक्के जनता आज या ग्रामीण भागात रहात आहे. याचा अर्थ महाराष्ट्राचा विकास साधताना निम्म्याहून जास्त लोकसंख्या ज्या ग्रामीण भागात रहाते, त्या ग्रामीण भागाच्या विकासाला प्राधान्य देणे गरजेचे आहे. याविषयी सांगताहेत उपमुख्यमंत्री अजित पवार.**

ग्रामीण विकासाचे महत्त्व लक्षात घेऊन आघाडी शासनानं अनेक नावीन्यपूर्ण योजना राबविल्या आहेत, काही योजना राबविण्याचा संकल्प केला आहे. राज्यातील शहरीकरणावर नजर टाकली तर एक गोष्ट लक्षात येते ती म्हणजे, शहरात होणारे स्थलांतर हे प्रामुख्याने ग्रामीण भागातून होते. ग्रामीण भागात रोजगाराच्या अल्प संधी उपलब्ध असल्यामुळं रोजगाराच्या शोधात शहरांकडं येणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. ग्रामीण लोकसंख्येचे शहरांकडे होणारे हे स्थलांतर रोखण्यासाठी तेथील जनतेला गावाच्या जवळपास रोजगार मिळवून देणे गरजेचे आहे. या भूमिकेतून ग्रामीण भागात एमआयडीसीच्या माध्यमातून विविध उद्योगधंद्याच्या उभारणीस चालना देण्याचा प्रयत्न केला जात आहे.

### ग्रामविकासाला प्राधान्य

नुकताच मी सन २०१२-१३ या आर्थिक वर्षासाठीचा अर्थसंकल्प सादर केला आहे. या अर्थसंकल्पात देखील ग्राम विकासाला प्राधान्य दिल्याचे आपल्या लक्षात येईल. यामध्ये कृषी, जलसंपदा, पाणी पुरवठा व स्वच्छता, सामाजिक न्याय या विभागांकडे लक्ष देण्यात आले आहे. शेती, शेतकरी आणि सामान्य माणूस यांना केंद्रबिंदू मानून हा अर्थसंकल्प सादर करण्यात आला आहे. यामध्ये शेतकऱ्यांना अल्पव्याज दरात पीककर्ज उपलब्ध करून देण्यासाठी राज्य आणि जिल्हा योजनेंतर्गत १३८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. याबरोबरच शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या वीज दरातील सवलतीसाठी २५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

हे वर्ष स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष म्हणून साजरे केले जात आहे. त्यानिमित्त प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या निकषात न बसणाऱ्या गावांकरिता 'यशवंतराव चव्हाण ग्रामसडक योजना' राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेच्या माध्यमातून समतल क्षेत्रातील ५०० पेक्षा कमी तर डोंगरी व आदिवासी भागातील २५० पेक्षा कमी लोकसंख्या असणाऱ्या ५ हजार मनुष्यवस्त्या एका बारमाही रस्त्याने तालुका मुख्यालय किंवा बाजारपेठेला येत्या ५ वर्षांत जोडण्यात येणार आहेत.

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाच्या ८४० कोटी आणि राज्याच्या ६०४ कोटी ८० लाख रुपयांच्या माध्यमातून ५ हजार ७५४ गावांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानाच्या माध्यमातून राबवण्यात येणाऱ्या ३६ योजनांकरिता १७९ कोटी रुपयांचा निधी देण्यात येणार आहे.

स्वच्छता आणि आरोग्य यांचा फार घनिष्ठ संबंध आहे. त्यामुळे ही स्वच्छता गावा-गावांत रहावी याकरिता ग्रामीण स्वच्छता अभियानाला चालना देण्याचा आमचा प्रयत्न आहे. निर्मल ग्राम योजनेत आपण देशात आघाडीवर असलो तरी टप्प्याटप्प्याने तालुका, जिल्हा आणि संपूर्ण राज्य निर्मल व्हावे यासाठी पावले उचलली जात आहेत. त्यासाठी संपूर्ण स्वच्छता अभियान आणि संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाकरिता ४५ कोटी ३७ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

### ग्रामीण भागात पाळणाघरे

या अर्थसंकल्पात ग्रामीण भागातील ६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील मुलांसाठी ठाणे, नंदुरबार, नाशिक, अमरावती, गडचिरोली आणि चंद्रपूर या सहा आदिवासी जिल्ह्यांत प्रत्येकी १०० पाळणाघरे उभारण्यात येऊन ती ग्रामपंचायतीमार्फत चालवण्यात येणार आहेत. ग्रामीण भागातील दारीद्र्यरेषेखालील लोकांचे प्रमाण लक्षात घेऊन बीपीएल व अंत्योदय लाभार्थ्यांना 'धान्य हमी योजनेच्या' माध्यमातून तीन महिन्यांचे धान्य एकाच वेळी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान, निर्मल ग्राम अभियान, पंतप्रधान ग्रामसडक योजना, पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजना, गावांचा पर्यावरण विकास आराखडा बनविणे तसेच ई-पंचायत प्रकल्प, जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत ग्रामपंचायतींना विशेष अनुदान, पंतप्रधान ग्रामसडक योजना, महिला बचत गटांचे सक्षमीकरण या माध्यमातून ग्रामीण क्षेत्राचा कायापालट करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

### निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग

खेडी स्वावलंबी व्हावीत हे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे स्वप्न होते. हे सत्य प्रत्यक्षात उतरवण्याच्या दृष्टिकोनातून बचतगटांची चळवळ महत्त्वाची भूमिका बजावत आहे. ग्रामीण भागाच्या अर्थकारणाला चालना देण्यासाठी बचतगटांच्या चळवळीला शक्ती देण्याचे काम केले जात आहे. महिलांच्या आर्थिक सबलीकरणातून समाजाचा विकास साधण्याचा प्रयत्न केला जात आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी ५० टक्के जागा राखीव ठेवण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे ग्रामीण भागातील महिलांचे केवळ सबलीकरणच होणार नाही तर त्यांचे सक्षमीकरण होऊन त्या निर्णयप्रक्रियेत धडाडीने सहभागी होण्यास मदत होणार आहे.

गावांकडे स्वत:च्या विकासासाठी फारसा पैसा उपलब्ध नसतो. त्यांना शासनाच्या मदतीवरच अवलंबून रहावे लागत असल्यामुळे त्यांच्या विकासावर मर्यादा येत असतात. ही अडचण लक्षात

गावाचा प्रत्येक सज्ञान । यांचे असावे सहकार्य पूर्ण
हाक देता सर्वजण । जमोनि यावेत एकत्र



घेऊन जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत ग्रामपंचायतींना विशेष अनुदान देण्यात येत आहे.

आज औद्योगिकीकरण, वृक्षतोड, जंगलतोड यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. पर्यावरणाचा ऱ्हास म्हणजे जीवसृष्टीचा ऱ्हास. त्यामुळं हा ऱ्हास टाळण्यासाठी पर्यावरण रक्षणाची सुरूवात गावपातळीपासून करण्याच्या उद्देशाने पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजना राबविण्यात येत आहे.

**आरोग्याच्या सोई**

कृषी तसेच दूध आणि दुग्धजन्य पदार्थांच्या निर्मितीत अग्रेसर असणाऱ्या या क्षेत्राकडे जाणीवपूर्वक लक्ष देऊन त्याचा विकास साधणे आवश्यक आहे. ग्रामीण भागात आरोग्याच्या चांगल्या सुविधा निर्माण व्हाव्यात याकरिता शासनाचे प्रयत्न सुरू आहेत. राजीव गांधी जीवनदायी योजनेच्या माध्यमातून काही निवडक जिल्ह्यांमध्ये दर्जेदार आरोग्य सुविधा पुरवण्याचा आमचा प्रयत्न आहे. ग्रामीण तसेच दुर्गम भागात दूरध्वनीद्वारे आपत्कालीन वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील कुपोषण थांबावे याकरितादेखील जाणीवपूर्वक प्रयत्न केले जात आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्था या लोकशाहीच्या शाळा म्हणून संबोधल्या जातात. ग्रामपंचायती, पंचायत समित्या तसेच जिल्हा परिषदांच्या माध्यमातून ग्रामविकासाचे स्वप्न साकारण्याचे शासनाचे ध्येय आहे. यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांचे बळकटीकरण करण्यास प्राधान्य देण्यात येत आहे.




**खेडे – विकासाचा केंद्रबिंदू**

ग्रामविकास हा देशाच्या सर्वांगीण विकासातला महत्त्वाचा टप्पा आहे. भारताला जागतिक महासत्ता बनवण्याचे स्वप्न प्रत्यक्षात साकार करण्यासाठी निम्म्याहून अधिक लोकसंख्येचे वास्तव्य असणाऱ्या ग्रामीण भागाच्या विकासाकडे लक्ष देणे आवश्यक आहे. खेडेगाव हा केंद्रबिंदू मानून विकासाची धोरणे आखणे आवश्यक आहे. बलशाली भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने ग्रामविकासाकडे स्थापनेपासूनच लक्ष दिले आहे. खेड्यांच्या स्वयंपूर्णतेचा ध्यास घेतलेला महाराष्ट्र घडविण्यात आपलीही साथ लाभेल अशी अपेक्षा व्यक्त करतो.

**शब्दांकन – विशाल ढगे**
**संपर्क : ०२२–२२८३५७५९**

✦✦

## (पान ९ वरून) ग्रामविकासाची नवी मांडणी

त्यानुसार महाराष्ट्रातील सर्व पंचायतीराज संस्थांचे संगणकीकरण करून त्यांचा कारभार ऑनलाईन करण्याचा महत्त्वाकांक्षी संग्राम – संगणकीय ग्रामीण महाराष्ट्र – हा प्रकल्प राबविण्यास सुरुवात झाली आहे. जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतस्तरावर सदस्यांसाठी तसेच जिल्हा परिषद अध्यक्ष, पंचायत समिती सभापती व ग्रामपंचायतीचे सरपंच या लोकनियुक्त पदासाठी महिलांना ५० टक्के आरक्षण देण्याचा क्रांतिकारक निर्णय राज्य शासनाने घेतला.

**राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान**

ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाचे जीवनमान सुधारण्यासाठी संधी उपलब्ध करून देण्याकरिता सुवर्णजयंती ग्रामस्वयंरोजगार योजनेच्या उद्दिष्टांना कायम ठेवून दारिद्र्यरेषेखालील प्रत्येक स्वयंरोजगारामध्ये कार्यक्षमता असते. या गृहीतकांवर केंद्र शासनाने राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान राबविण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्र शासनाच्या या योजनेच्या धर्तीवर राज्यामध्ये महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान राबविण्यात येणार आहे. त्यामध्ये दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांचे सक्षमीकरण, संवेदनशील सहाय्य संरचना, सर्वसमावेशक सामाजिक सहभाग, मागणी आधारित योजना, फिरता निधी व भांडवली अनुदान, सर्वसमावेशक आर्थिक अंतर्भाव, व्याजदरासाठी अनुदान, मूलभूत सुविधा निर्मिती व विपणन सहाय्य, अन्य योजनांचे एकत्रीकरण व समन्वय, कौशल्यवृद्धी इत्यादी बाबींचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे.

ग्रामविकासाचे महत्त्वाचे शक्तीस्थळ म्हणून आज पंचायतराज व्यवस्थेकडे पाहिले जाते. गेल्या काही वर्षांत ग्रामविकासाबाबत महत्त्वाचे निर्णय घेऊन आणि त्यांच्या अंमलबजावणीतून पंचायतराज संस्थांच्या बळकटीकरणाचे महत्त्वाचे टप्पे ग्रामविकास विभागाने पार केले आहेत. हे टप्पे पार करताना शासनाच्या दृष्टिकोनाला जनतेने तितक्याच सकारात्मकपणे दिलेल्या प्रतिसादामुळे ग्रामीण विकासाची दिशा स्पष्ट होऊ लागली आहे. वाढत्या नागरीकरणाची आव्हाने पेलत असतानाच सर्वंकष ग्रामविकासाचे कार्यही तेवढेच महत्त्वाचे आहे. नागरी आणि ग्रामीण विकासाच्या समतोल विकासातूनच आपणाला समर्थ महाराष्ट्र घडवायचा आहे.

**शब्दांकन – सतीश पाटणकर**
**संपर्क : ९७५७१६५८३३**

✦✦



याने सर्वांस मिळेल सुख । मिटेल जीवनाची भूक
ग्रामराज्य होईल सुरेख । आर्थिकतेने समृद्ध

# ग्रामविकासाची पायाभरणी

**विकेंद्रीकरणाच्या प्रश्नांचा सर्व बाजूंनी विचार करून विकेंद्रीकरणाची योजना आपल्या राज्यात उत्तमरीतीने अमलात आणण्यासाठी दि. ३ ऑक्टोबर १९६० रोजी मुंबई येथे एका परिसंवादाचे आयोजन केले होते. त्या परिसंवादाच्या उदघाटनप्रसंगी यशवंतराव चव्हाण यांनी केलेल्या भाषणातील काही भाग...**

बलवंतराय मेहता समितीने आपल्या अहवालात जिल्हा, गट व खेडे या पातळीवरील लोकनियुक्त संस्थांना अधिकाधिक अधिकार देण्यासंबंधी जोरदार शिफारस केली आहे. आपल्या राज्यात सत्तेचे विकेंद्रीकरण थोड्याफार प्रमाणात पूर्वीच झालेले असून जिल्हा पातळीवर लोकल बोर्ड, जिल्हा स्कूल बोर्ड, जिल्हा ग्रामपंचायत मंडळ, जिल्हा विकास मंडळ, जिल्हा शाळा इमारत समिती, जिल्हा सहकारी मंडळ आणि जिल्हा देखरेख समिती अशा अनेक संस्था आहेत. विदर्भ विभागात प्रत्येक तहसिलांसाठी एक जनपदसभा आहे. याशिवाय सामूहिक विकास योजनेखाली सुरू केलेल्या गटांसाठी गट विकास समित्या आहेत. त्याचप्रमाणे तालुका पातळीवर तालुका देखरेख संघ ही संस्था काम करते. अशा रीतीने राज्याच्या ग्रामीण विभागातील विकास कार्यासंबंधीची आपली जबाबदारी, जिल्हा लोकल बोर्ड, जनपदसभा, जिल्हा ग्राम पंचायत मंडळे व ग्रामपंचायती यांसारख्या विधिनियुक्त संस्थामार्फत आणि सल्लागार समित्यांच्या साहाय्याने सरकारी यंत्रणेद्वारा शासन पार पाडीत असते.

बलवंतराय मेहता समितीने केलेल्या शिफारशीनुसार, ग्रामीण विकासाबाबत सरकारवर असलेली जबाबदारी जिल्हा व त्या खालच्या पातळीवरील भागांसाठी विधिनियुक्त संस्था स्थापन करून त्यांच्यावर सोपविता येईल की काय, याचा विचार करणे आवश्यक झाले आहे. ग्रामीण भागातील लोकांच्या कल्याणाचा आणि ग्रामीण विकासाचा कार्यक्रम यशस्वी रीतीने अंमलात आणावयाचा असेल तर त्यासाठीं या भागातील जनतेचे उत्स्फूर्त साहाय्य आणि सहकार्य मिळविणे अत्यंत महत्त्वाचे आहे ही गोष्ट आपणाला नाकारता येणार नाही. म्हणून स्थानिक जनतेत उपक्रमशीलता आणि सहकार्य या वृत्तीची संपूर्ण वाढ होण्यासाठी निरनिराळ्या पातळीवर जनतेच्या संस्था उत्तम रीतीने कशा संघटित करता येतील याचा आपण विचार केला पाहिजे. त्याचप्रमाणे त्या त्या भागातील विकासाचा कार्यक्रम तेथील जनतेच्या गरजा आणि आकांक्षा लक्षात घेऊनच आखण्यात आला पाहिजे. या स्थानिक योजना अर्थात राज्याच्या व देशाच्या



कार्यक्रमाशी मिळत्याजुळत्या असल्या पाहिजेत हे उघडच आहे.

गेल्या काही वर्षात, सामूहिक विकास योजनेच्या कार्यामुळे ग्रामीण भागातील जनतेत स्वावलंबनाची वृत्ती निर्माण झाली आहे यात शंका नाही. स्वत:चे श्रम व पैसा विकासाच्या कामी लावण्यासाठी ग्रामीण भागातील जनता स्वयंस्फूर्तीने पुढे येत असल्याचे दृश्य आज आपणास दिसत आहे. जनतेच्या वृत्तीतील हा बदल म्हणजे अलीकडच्या काळात आपण मिळविलेला एक मोठा विजयच आहे असे मी समजतो. ग्रामीण भागातील विकासकार्य अधिक जोमाने व्हावे म्हणून ग्रामीण जनता ज्या तऱ्हेने आपण उत्साह प्रकट करीत आहे तो पाहता, स्थानिक गरजाबाबत त्वरित निर्णय कसे घेता येतील आणि आपल्या कार्यक्रमाच्या अंमजबजावणीचा वेग कसा वाढवता येईल या गोष्टींचा विचार करणे आपणास आता आवश्यक होऊन बसले आहे. खरे म्हणजे लोकशाही विकेंद्रीकरणानुसार ज्या प्रमाणात ह्या गोष्टी साध्य होत जातील त्या प्रमाणात विकेंद्रीकरणाची आवश्यकता सिद्ध होणार आहे.

ग्रामीण विकासाचे कार्य सातत्याने स्वावलंबनाच्या वृत्तीने व्हावयाचे असेल तर स्थानिक स्वराज्य संस्थांनी ग्रामीण विभागाचा आर्थिक विकास घडवून आणणाऱ्या योजनांकडे अधिकाधिक लक्ष पुरविले पाहिजे. आतापर्यंत या संस्था बहुतांशी सामाजिक सुखसोयीकडेच लक्ष पुरवीत आल्या आहेत. अर्थात या गोष्टीची जरूरी आहेच. कारण ग्रामीण भागात अशा प्रकारच्या सुखसोयी जवळजवळ अस्तित्वातच नसल्याकारणाने लोकांच्या राहणीचा दर्जा वाढविण्याच्या दृष्टीने त्या उपलब्ध करून द्यावयास पाहिजेतच. परंतु त्याचबरोबर, या लोकनियुक्त संस्थांना ग्रामीण भागातील आर्थिक विकासाच्या



योजना अमलात आणणे शक्य झाले तर माझ्या मते त्या फार मोठी भरीव कामगिरी बजावू शकतील. सध्या ग्रामीण भागात शेतीच्या विकासास भरपूर वाव असून या भागात उद्योगधंद्यांच्या वाढीला चांगलीच चालना मिळेल अशी अपेक्षा आहे. म्हणून मला असे वाटते की, ग्रामीण विभागाच्या आर्थिक विकासास पोषक असणाऱ्या कार्यक्रमावर आपण आता भर द्यावयास पाहिजे. स्थानिक स्वराज्य संस्थांचे भावी स्वरूप लक्षात घेऊन ही गोष्ट कशी साध्य करता येईल या प्रश्नाचा आपण विचार करावा अशी माझी आपणास कळकळीची विनंती आहे. भारताचे व या राज्याचे जे विकासविषयक धोरण आहे, त्याच्या चौकटीत बसेल अशा तऱ्हेचे ग्रामीण विभागातील शेती व उद्योगधंद्याच्या विकासाचे कार्य स्थानिक संस्थांना हाती घेणे शक्य व्हावे, म्हणून काही तरी मार्ग निश्चितपणे शोधून काढलाच पाहिजे. कारण माझ्या मते ही आजची अत्यंत निकडीची गरज आहे. म्हणून आपल्यासमोर तिचा उल्लेख करण्याची ही संधी मी साधली.

लहानमोठ्या पातळीवरील लोकांच्या या संस्था अर्थातच लोकशाही पद्धतीने उभारल्या गेल्या पाहिजेत. कारण निरनिराळ्या पातळीवर लोकशाही संस्था निर्माण झाल्याशिवाय आपण लोकशाही

**"लोकनियुक्त संस्थांना ग्रामीण भागातील आर्थिक विकासाच्या योजना अंमलात आणणे शक्य झाले तर माझ्या मते त्या फार मोठी भरीव कामगिरी बजावू शकतील."**

नेतृत्व निर्माण करू शकणार नाही. लहानलहान क्षेत्रांत काम करणाऱ्या ह्या लोकशाही संस्थांतूनच भावी नेते तयार होतील. आपण स्वीकारलेली लोकशाही पद्धत दृढमूल करण्याच्या दृष्टीने या गोष्टीला फार महत्त्व आहे. लोकशाही जीवनपद्धतीवर आपली संपूर्ण निष्ठा आहे. आणि म्हणून आपली प्रत्येक कृती, ही निष्ठा दृढतर कशी होईल या दृष्टीने घडली पाहिजे.

आपली आर्थिक परिस्थिती लक्षात घेता या संस्थांनी सेवावृत्तीने काम करणे अत्यंत जरुरीचे आहे. हे घडून येण्यासाठी या संस्था चालविण्याची जबाबदारी ज्या माणसांवर पडेल ती माणसे वृत्तीने सेवाभावी आणि त्यागी असली पाहिजेत. अशा वृत्तीच्या मंडळीची आपणांमध्ये आज उणीव आहे अगर ती यापुढे भासेल मला मुळीच वाटत नाही. मात्र अशा व्यक्तींना काम करण्याची अधिकाधिक संधी मिळाली पाहिजे. आणि म्हणून निरनिराळ्या पातळीवर लोकशाही संस्थांची उभारणी आपण अशा प्रकारे करावयास पाहिजे की, त्यामुळे त्यांना आपल्या विकासयोजना सुरळीतपणे पार पाडता येतील. आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी या संस्थांना अविश्रांत श्रम करावे लागतील व त्याचप्रमाणे त्यांना कल्याणकारी यंत्रणेचे महत्त्वाचे घटक बनावे लागेल. या संस्थांना सुरळीतपणे कार्य करता आले पाहिजे असे मी म्हटले, माझ्या म्हणण्याचा अर्थ असा की, आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी त्यांना जरूर ते अधिकार असले पाहिजेत आणि त्यासाठी योग्य प्रकारची यंत्रणाही त्यांच्याजवळ असली पाहिजे. शिवाय त्यांच्या कामासाठी लागणारा पैसाही त्यांच्याजवळ असला पाहिजे. तसेच, त्यांना तांत्रिक सल्ला व जरूर ते मार्गदर्शन मिळाले पाहिजे आणि विकासाच्या विविध कार्यासाठी जनतेचे सहकार्य मिळविण्याची त्यांच्यांत ताकद असली पाहिजे. थोडक्यात म्हणजे, विकासाच्या क्षेत्रांतील स्थानिक स्वराज्यसंस्था म्हणून खऱ्या अर्थाने त्यांना काम करता आले पाहिजे. परंतु याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांचे कार्य नेहमी जनहिताला पोषक होईल या भूमिकेवरूनच झाले पाहिजे.

**(संदर्भ : सह्याद्रीचे वारे)**

## मराठी भाषेच्या अभिजाततेसंदर्भातील पुरावे पाठवा!

मराठी ही अभिजात भाषा आहे. या भाषेची आणि तिच्यातील साहित्याची परंपरा किमान २००० वर्षे जुनी आहे. हाल या सातवाहन नृपतीचा 'गाथा-सप्तशती' हा प्राकृत-महाराष्ट्री भाषेतील ग्रंथ आजही उपलबध आहे. भाषेच्या अभिजातपणासंबंधी केंद्र शासनाचे निकष पुढीलप्रमाणे आहेत. १. भाषा १५००-२००० वर्षे जुनी असावी. २. ती भाषा बोलणाऱ्या लोकांनी मौल्यवान वारसा म्हणून जपलेले प्राचीन साहित्य असावे. ३. भाषेची परंपरा तिची स्वत:ची असावी. ४. भाषेचे आधुनिक रूप हे तिच्या प्राचीन रूपाहून भिन्न असले तरी चालेल. (पण त्यांच्यात आंतरिक नाते असावे.)

मराठीच्या अभिजातपणाचा योग्य पाठपुरावा करण्यासाठी राज्य शासनाने सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केली आहे. हा प्रस्ताव सर्व मराठी भाषकांच्या वतीने तयार करण्यात येत असून मराठी नागरिक आणि मराठी भाषा-प्रेमी म्हणून त्यात सर्वांना सहभागी होण्याची इच्छा असणे स्वाभाविक आहे. राज्यातील भाषा तज्ज्ञ व्यक्ती, साहित्यिक, इतिहास संशोधक यांच्याकडे याबाबत पुरावे उपलब्ध असण्याची शक्यता आहे. त्यांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा उपयोग हा प्रस्ताव तयार करताना व्हावा अशी समितीची इच्छा आहे. मराठीच्या अभिजाततेचा पुरावा म्हणून ज्या सूचना असतील त्या संबंधित समितीला कळवाव्यात, असे आवाहन समितीतर्फे करण्यात येत आहे. हा प्रस्ताव दोन महिन्यांत सादर करावयाचा आहे. आपल्या सूचना तत्काळ पाठवाव्यात.

**सूचना पाठविण्याचा पत्ता**

- अवर सचिव, मराठी भाषा विभाग, ८ वा मजला,
  नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मुंबई - ४०० ०३२.
  फॅक्स - ०२०-२२८३६८७७.
  ईमेल : marathibhasha.123@gmail.com

- प्रा. हरी नरके, महात्मा फुले अध्यासन,
  पुणे विद्यापीठ प्रकाशन विभागाजवळ, पुणे - ४११ ००७.
  फॅक्स क्र. ०२०-२५६०११७५.
  ईमेल : harinarke@gmail.com

जनतंत्राचा हा काळ । शक्ति लोकाअंगीच सकळ
जनतेच्या निश्चयाने बळ । साम्राज्यासहि नमवू शके

# आपलं गाव - आपलं सरकार

**महाराष्ट्राने देशाला अनेक धोरणं दिली. त्या धोरणातलं सर्वात प्रभावी आणि राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या ग्रामस्वराज्याचं स्वप्न पूर्ण करणारं पंचायत राज धोरण महाराष्ट्रानं देशाला दिलेली देणगी होय. पंचायत राज यंदा पन्नास वर्षांचं झालंय. या धोरणानं महाराष्ट्राला काय दिलं, काय अपेक्षित होतं, काय राहून गेलं आणि काय करावं लागेल याबाबत राज्याचे ग्रामविकासमंत्री जयंत पाटील यांनी अभ्यासू मतं मांडली. पंचायतराजच्या बळकटीकरणाबाबत सरकारने उचललेली पावलं आणि भूमिका याबाबत श्री. जयंत पाटील यांच्याशी साधलेला हा संवाद.**



**प्रश्न : पाटील साहेब, पंचायतराज यंदा पन्नास वर्षाचं झालं. आज पन्नास वर्षांनंतर गावाला गावपण देणाऱ्या या धोरणांकडे पाहताना तुम्हाला काय वाटतं.....**

**जयंत पाटील :** भारत हा खेड्यांचा देश आहे आणि खेडी (गावे) हे भारताचं भविष्य आहेत असं राष्ट्रपिता महात्मा गांधी म्हणाले होते. प्राचीन काळात भारतातील खेडी स्वयंपूर्ण होती. आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या आपली खेडी स्वावलंबी होती. पर्यावरणदृष्ट्या परिपूर्ण होती. नैसर्गिक साधनसंपत्तीने आपली खेडी श्रीमंत नसली तरी समृद्ध होती. एकप्रकारे भारतातली खेडी भारताचं वैभव होती असं म्हटलं जायचं. काठीला सोनं बांधून खेड्यातली लोकं फिरत होती. असा दाखला इतिहासात दिला जातो. त्यामुळे, ग्रामीण भारत हा समृद्ध भारत होता. यांचे अनेक पुरावे आणि इतिहासकालीन दाखले आपल्याला मिळतात.

पण, सध्या खेड्यांची अवस्था बकाल झाली आहे. स्वयंपूर्ण असलेली आपली खेडी शहरीकरणाच्या विळख्यात सापडली. शहरं फुगू लागली. तर गावं ओस पडू लागली. हे महात्मा गांधींनी हेरलं आणि खेड्याकडे चला हा मूलमंत्र त्यांनी देशाला स्वातंत्र्यानंतर दिला. त्यानंतर, ग्रामविकासाचा कळस गाठण्यासाठी देशात पंचायत राजची स्थापना झाली. महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांच्या दूरदृष्टीखाली आणि वसंतराव नाईक यांसारख्या धुरीणांच्या संकल्पनेतून पंचायतराजची आखणी झाली. आज पंचायतराजमध्ये महाराष्ट्र देशात अग्रेसर असल्याचा आम्हाला अभिमान वाटतो.

**प्रश्न : पाटील साहेब गेल्या पन्नास वर्षात महाराष्ट्राला पंचायतराजमुळे काय मिळालं... राज्याच्या अंमलबजावणीवर आपण समाधानी आहात काय...**

**जयंत पाटील :** पंचायतराजने महाराष्ट्रातल्या प्रत्येक नागरिकाला स्वाभिमान दिला, अधिकार दिला, असं मला वाटतं. कारण, या यंत्रणेमुळं महाराष्ट्रात त्रिस्तरीय पंचायतराज अस्तित्वात आलं. आणि आपल्या गावाचं सरकार आपल्या अमूल्य मतांनी निवडून देण्याचं स्वातंत्र्य महाराष्ट्राच्या जनतेला मिळालं. आपल्या गावचा समग्र विकास करण्याच्या हेतूने लहान लहान गावात राहणाऱ्या व्यक्तीला आपल्या मतांचा प्रभावी वापर करण्याचा अधिकार पंचायतराजने मिळाला. त्रिस्तरीय रचनेमुळं ग्रामीण प्रशासनाला वेगळीच शिस्त लागली. जिल्हा, तालुका आणि गाव हा विकासाचा घटक मानल्याने महाराष्ट्रात समतोल विकास करण्यास वाव मिळाला. याशिवाय, पंचायतराजमुळं ग्रामीण प्रश्नांची जाण आणि भान असणारे अनेक नेतृत्व राज्याला मिळाले. गावातल्या मातीत जन्मलेल्या नेत्यांनी राज्य आणि देशपातळीवर प्रभावी काम केले. एका अर्थाने पंचायतराजने राज्याला आणि देशाला दिशा देणारी नेतृत्व जन्माला घातली. यामुळेच ग्रामीण विकासाची गंगा घराघरापर्यंत नेण्याची एक प्रभावी चळवळ आज उभी राहताना दिसते आहे.

**प्रश्न : एका बाजूला पंचायत राजने नेतृत्वाची देणगी राजकारणाला दिली. पण, दुसऱ्या बाजूला गावांचं वैभव हरवत असल्याचे चित्र समोर येत आहे. याबाबत काय सांगाल....**

**जयंत पाटील :** होय, हे काहीअंशी खरे आहे. पन्नास वर्षाच्या पंचायतराजने गावं समृद्ध झाली असा दावा मी करणार नाही. पण गावं समृद्ध करण्याची संधी मिळाली आहे. हे नाकारता येणार नाही. सरकारची महत्त्वाकांक्षा आणि राजकीय इच्छाशक्ती यांच्या माध्यमातून आम्ही गावांना वैभव मिळवून देण्याचा संकल्प सोडला आहे. प्रत्येक गाव स्वयंपूर्ण करण्यासोबत प्रत्येक गाव पर्यावरणदृष्ट्या समृद्ध करण्यास आम्ही कटिबद्ध आहोत. त्यासाठीच्या अनेक योजना आम्ही हाती घेतल्या आहेत. सुदैवाने केंद्र सरकारने देखील ग्रामीण विकासाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला आहे. ग्रामविकास हा मुद्दा केंद्र आणि राज्य सरकारच्या प्रमुख तीन मुद्द्यांपैकी एक बनला आहे. यासाठी मोठ्या प्रमाणात निधीची तरतूद, तज्ज्ञांचे संशोधन,

सर्वांनी झटावे यासाठी । करावी लागेल ती आटाआटी
प्राण गेला तरी संकष्टी । सहन करावे सेवेस्तव



# बक्षिसांची हॅट्रीक

## ग्रामविकास विभागाच्या कार्याचा देशपातळीवर गौरव

पंचायत बळकटीकरण व उत्तरदायित्व प्रोत्साहन योजना अंतर्गत महाराष्ट्राला देशपातळीवर सन २००९-१० व २०१०-११ मध्ये १ कोटी रुपयांचा पुरस्कार मिळाला होता. यावर्षीही भारत सरकारच्या पंचायत राज मंत्रालयाकडून ग्रामविकास विभागाने नाविन्यपूर्ण उपक्रमांची अंमलबजावणी केल्याबद्दल प्रथम क्रमांकाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. दिनांक २४ एप्रिल २०१२ रोजी मा. पंतप्रधानांच्या हस्ते २ कोटी रुपयांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे.

प्रशासकीय सुधारणा आणि सामूहिक आणि वैयक्तिक योजनांची आखणी झालेली आहे. मी ग्रामविकासचा कारभार हाती घेतल्यानंतर ग्रामीण विकासाच्या सर्वांगीण विकासाचा आराखडा तयार केला आहे....

**प्रश्न : केंद्र आणि राज्य सरकारचा मागोवा घेतला असता, पन्नास वर्षांनंतर सरकारने गेल्या चार-दोन वर्षांपासून ग्रामविकासाला सर्वाधिक प्राधान्य देण्यास सुरुवात केली असे यावरून स्पष्ट होते हे तुम्हाला पटते काय...**

**जयंत पाटील :** गेल्या चार-दोन वर्षात सरकारने ग्रामविकासाला सर्वाधिक प्राधान्य दिले असं म्हणण्यापेक्षा गेल्या दशकापासून सरकारने ग्रामविकासावर अधिक प्रभावीपणे लक्ष केंद्रित केले हे खरं आहे. पण यामुळे सरकारचे गावाकडे लक्ष नव्हते असा अर्थ होत नाही. फरक एवढाच आहे की, पूर्वी गावांच्या विकासाला चालना देण्याची फारशी गरज भासली नाही. कारण पारंपरिक दृष्टीने गावातल्या गावात समन्वय होता. प्रत्येक गावातली जनता 'माझं गाव' या नैसर्गिक नात्याने बांधली होती. पण त्याचवेळी शहरीकरणाचा वेगही वाढत होता. शिवाय, गावातल्या लोकसंख्येची अवाढव्य वाढ सुरूच होती. वाढती लोकसंख्या आणि गावातल्या सुविधा यामध्ये मागणी आणि पुरवठा यांच्यातली तफावत वाढली आणि गावातल्या समस्यांमध्ये भर पडत गेली. त्यातच ग्रामीण अर्थकारणाची पद्धत बदलली. जागतिकीकरण आणि आधुनिकीकरणाने गावाची अर्थव्यवस्था, संस्कृती, परंपरा आणि सहकार या वर्षानुवर्षाचा 'स्वभाव' बदलला. सरकारच्या योजना आणि सरकारची मदत यावर विसंबून नसलेली गावं सरकारच्या मदतीवर अवलंबून राहू लागली. गावातली दारिद्र्यरेषेखालील जनता वैयक्तिक लाभाच्या योजनांकडे डोळे लावून बसली. स्वयंशिस्तीने गावगाडा हाकणारे गावकरी सरकारी यंत्रणेकडे बोट दाखवू लागले. एका अर्थाने सरकारी प्रशासनाने गावच्या कारभाराची सूत्र हाती घेतली. यातूनच सरकार विरुद्ध गाव हा संघर्ष सुरू झाला. एका अर्थाने गावात स्थानिक सरकारचं महत्त्व प्रभावी आहे ही मानसिकता हरवून गावात केंद्र आणि राज्य सरकारचा कारभार महत्त्वाचा आहे ही मानसिकता वाढीस लागली. त्यातूनच गावातल्या लोकांची मागणी सरकारला टाळता येणार नाही, ही सरकारची भावनाही जागी झाली. त्यामुळेच, ग्रामीण जनतेला अशाप्रकारच्या सरकारी मानसिकतेतून बाहेर काढून स्वशासनाची शिस्त लागावी यासाठी 'लोकशाही विकेंद्रीकरण' ही महत्त्वाकांक्षी संकल्पना महाराष्ट्राने स्वीकारली. आज ग्रामविकासाला जे प्राधान्य मिळत आहे. महत्त्व आले आहे याचे मूळ कारण लोकशाही विकेंद्रीकरण हेच आहे. 'रयतेचं राज्य', स्थानिक स्वराज्य संस्थाचे राज्य अर्थात मिनी मंत्रालय या नावाने हा कारभार प्रभावी करण्याच्या आमच्या प्रयत्नांना यश आणि वेग येत आहे....

**प्रश्न : लोकशाही विकेंद्रीकरणाची अंमलबजावणी प्रभावी झाली नाही असा आरोप केला जातो. केंद्राने बंधनकारक केलेले विषय जिल्हा परिषदांकडे हस्तांतरित करण्यात राज्य सरकारला अद्याप यश आले नाही हे वास्तव कसे नाकारणार...**

**जयंत पाटील :** लोकशाही विकेंद्रीकरणाची अंमलबजावणी प्रभावी झाली नाही. असे म्हणता येणार नाही. स्थानिक स्वराज्य संस्थाना अधिकार द्यावेत ही संकल्पना योग्य आहे. त्यादृष्टीने सरकारने ११ विषयांचे हस्तांतरण जिल्हा परिषदांच्याकडे केले आहे. पण सर्वच्या सर्व विषय सरसकट हस्तांतरित केल्यास स्थानिक प्रशासनाकडे ते पेलण्याची ताकद आहे काय, याचाही आढावा घेणे महत्त्वाचे आहे. सरकारकडे यंत्रणा आहे, अधिकार आहेत. त्याप्रमाणात जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायती याकडे तेवढी यंत्रणा नाही हे कबूल करावेच लागेल. मात्र, जिल्हा परिषदांचा कारभार पारदर्शक आणि प्रभावी करण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतले आहेत. प्रत्येक गावाचा विकास आराखडा तयार करण्याचा निर्णय मी ग्रामविकास मंत्री झाल्यानंतर घेतला. भविष्यातील १ ते १० वर्षाचा विकास आराखडा प्रत्येक गावाने तयार करण्याचे काम सुरू केले आहे. हे काम पूर्वीच व्हायला हवे होते. पण मागे सांगितल्याप्रमाणे गावाच्या विकास आराखड्यांची गरज सरकारला वाटली नव्हती. पण, आता लोकांची मागणी आणि सर्वांगीण विकास यासाठी ही गरज महत्त्वाची आहे. स्पर्धेतल्या जगात पुढील ८ ते १० वर्षांत प्रत्येक गाव सर्वसुविधांनी संपन्न असेल असा आमचा प्रयत्न आहे. शहरातले राहणीमान आणि गावातले रहाणीमान यामध्ये कोणताही भेद राहणार नाही. असा मला विश्वास आहे. एका बाजूला स्वयंशिस्त लावण्याचे आमचे प्रयत्न आहेत, तर दुसऱ्या बाजूला सत्तेचं विकेंद्रीकरण करण्याचा आमचा ठाम मानस आहे. आतापर्यंत ज्या विषयांचे हस्तांतरण जिल्हा परिषदांकडे करण्यात आले त्याबाबत समाधानकारक प्रगती होताना दिसत आहे. स्थानिक स्वराज्य संस्था प्रभावी काम करण्यावर लक्ष केंद्रित करत आहेत. त्यांच्या कारभारावर राज्य सरकारचा अंकुश असल्यानेच ही प्रगती साधण्यात येत आहे हे मी आवर्जून सांगतो. नाहीतर सर्व अधिकार खालच्या पातळीवर दिले आणि त्यावर कोणत्याच यंत्रणेचे नियंत्रण नसेल तर मोठ्या अडचणींचा सामना राज्यातल्या जनतेला करावा लागेल. अशी भीती व्यक्त होत आहे.

**प्रश्न : अशाप्रकारच्या सक्षम लोकशाही विकेंद्रीकरणासाठी आणि ग्रामविकासासाठी तुम्ही कोणत्या योजनांना प्राधान्य दिले आहे...**

**जयंत पाटील :** ग्रामविकास मंत्री म्हणून माझे पहिले प्राधान्य आहे ते ग्रामीण प्रशासनाला शिस्त लावणे. त्यांचा कारभार गतिशील आणि पारदर्शक राहील यावर माझ्या विभागाने लक्ष केंद्रित केले आहे. पारदर्शक कारभार होत आहे असे जनतेला वाटले तर गावच्या विविध विकास योजनात जनतेचा सहभाग मिळणे अवघड नाही. स्वयंस्फूर्तीने लोक आपल्या गावच्या विकासात सहभागी होतील अशी मानसिकता तयार करण्याचा माझा प्रयत्न आहे. त्यासाठी प्रत्येक ग्रामपंचायत संगणकीकृत करण्यात येत आहे. 'संग्राम' ही यासाठीची महत्त्वाकांक्षी योजना आम्ही सुरू केली आहे. यंदा जवळपास ५६ हजार कोटींचे ग्रामपंचायतीचे व्यवहार संगणकावरून झाले आहेत.



**आपण तेवढे स्वच्छ राहावे । भोवती गलिच्छ वातावरणचि पाहावे**
**याने सुमंगलता कधी न पावे । तन, मन होई दूषित**

ही ग्रामविकासाच्या क्रांतीची नांदी आहे असे मला वाटते.

याशिवाय, ग्रामशिक्षण या क्षेत्रात प्रभावी काम करण्याची सुरुवात आम्ही केली आहे. पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजना हे माझ्या ग्रामविकास विभागाचे स्वप्न आहे. सुंदर गाव. संपन्न गाव. हरित गाव आणि त्याहून अधिक म्हणजे परिपूर्ण गाव हा संकल्प आम्ही सोडला आहे. त्यासाठी ग्रामविकासाचे स्थानिक स्तरावर काम करणारे सर्व अधिकारी जीव ओतून काम करत आहेत. देशाला हेवा वाटेल अशा या योजनेचे यश येत्या दोन तीन वर्षांत महाराष्ट्राला पहायला मिळेल, असा मला ठाम विश्वास आहे.

**प्रश्न : गावातलं शिक्षण आणि शहरातलं शिक्षण यात आजही भेद केला जातो. हा कसा दूर करणार...**

**जयंत पाटील :** आजपर्यंत आपण शिक्षणाच्या क्षेत्रात संख्यात्मक शिक्षणाला महत्त्व दिले.

माझ्या मते संख्यात्मक शिक्षण योग्यच आहे. जेवढी अधिक मुलं शाळेत येतील तेवढे उत्तम. पण केवळ संख्यात्मक शिक्षणाने समस्या सुटणार नाहीत. त्यासाठी गुणात्मक शिक्षणाची आज नितांत गरज आहे. मूल्यात्मक शिक्षण आज काळाची गरज आहे. गावातले शिक्षण गुणात्मक आणि मूल्यात्मक होईल यावर आम्ही कटाक्ष टाकला आहे. त्यासाठी दोन वेळा बायोमेट्रीक हजेरी बंधनकारक करण्याचा निर्णय घेतला आहे. शाळांचे मूल्यमापन करणारी व्यवस्था आणणार आहोत. गावात मोठा फलक लावून त्या गावातल्या शाळेची श्रेणी ठळक अक्षरात लिहिणार आहोत. त्यामुळे, गावातल्या लोकांना आपल्या शाळेच्या प्रगतीचा अंदाज येईल. एकप्रकारची स्पर्धा निर्माण करून शाळांची गुणवत्ता वाढविण्याचा ग्रामविकासचा प्रयत्न आहे.

**प्रश्न : ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी काय उपाययोजना आहेत. कारण बारा बलुतेदारांची परंपरा मोडीत निघाल्याने ग्रामीण व्यवसाय कोलमडून पडले आहेत. ही परंपरा पुनर्ज्जीवीत करण्याचा काही मानस आहे काय...**

**जयंत पाटील :** बारा बलुतेदार ही सामाजिक यंत्रणा होती. आधुनिक जगात बलुतेदारीची परंपरा उचित नाही. पण, गावातले जे पारंपरिक व्यावसायिक आहेत. कारागिर आहेत. त्यांना आर्थिक अनुदान देऊन आधुनिक यंत्रसामग्री खरेदी करण्यास चालना देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. तर, गावांना स्वयंपूर्ण करण्यासाठी महिला बचतगटांचे सक्षमीकरण करण्याची मोठी चळवळ उभारली जात आहे. या बचतगटांच्या उत्पादनांना सरकारच्या सहकार्यातून बाजारपेठा मिळवून देणे, ग्रामीण शॉपींग मॉल उभारण्याच्या योजना अंमलात आणल्या जात आहेत. एक आर्थिक सक्षमीकरणाची चळवळ म्हणून बचतगटांची व्यवस्था उभारी घेताना दिसत आहे.

**प्रश्न : पंचायतराज यंत्रणा विकासाची यंत्रणा होण्याऐवजी राजकीय कार्यकर्ते सांभाळणारी यंत्रणा झाल्याचा आरोप होत आहे. त्यामुळेच केंद्र सरकारने जिल्हा परिषदा रद्द करण्याचा प्रस्ताव राज्य सरकारांना पाठवला होता. त्याचे काय...**

**जयंत पाटील :** ग्रामपंचायत सक्षम करताना लोकसभा – विधानसभा ते ग्रामसभा अशी केंद्राने भूमिका घेतली असून जिल्हापरिषदांचा स्तर कमी करता येऊ शकेल काय याबाबत केंद्राने राज्यांची मतं मागितली होती. महाराष्ट्राने यावर सखोल अभ्यास करून आपला अहवाल तयार केला आहे. त्यात केंद्राच्या या मताचा स्वीकार करता येणार नाही अशी भूमिका स्वीकारण्यात आली आहे. जिल्हा परिषदा रद्द कराव्यात अशी केंद्राची भावना नाही. पण, केंद्राने ग्रामपंचायतींना सक्षम करण्यावर भर दिला आहे. जिल्हा परिषद ही अंमलबजावणी आणि नियंत्रण ठेवणारी सक्षम यंत्रणा आहे. केंद्राने जिल्हा परिषदेत ग्रामीण आणि शहरी भागातले प्रतिनिधी असावेत असा विचार मांडला आहे. नगरपालिका आणि नगरपरिषदा यांचे जिल्हा परिषदेत काहीही स्थान नाही. त्यामुळे, जिल्हास्तरावर जिल्हा विकास मंडळ स्थापन करून त्यामध्ये ग्रामीण आणि शहरी लोकप्रतिनीधींचा समावेश असावा ही भूमिका योग्य आहे. उचित आहे. पण, ग्रामपंचायतींना थेट अधिकार दिल्यास त्यावर नियंत्रण ठेवणे निव्वळ अशक्य आहे. त्यातच ग्रामपंचायतीचे राजकारण अत्यंत ईर्षेचं राजकारण होत आहे. महिला आरक्षण, निरक्षर लोकप्रतिनीधी यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लोकप्रतिनीधींना कारभार करण्याचे प्रशिक्षण देण्याची गरज आहे. आम्ही अशाप्रकारच्या कार्यशाळांचे आयोजन करण्यास प्राधान्य दिले आहे.

**प्रश्न : पंचायतराजचे महत्त्व, अंमलबजावणी आणि महाराष्ट्र याबाबत तुमचे मत काय... महाराष्ट्रात पंचायतराजच्या अंमलबजावणीबाबत तुम्ही समाधानी आहात काय, कारण गुजरात, केरळ आणि छत्तीसगड ही छोटी छोटी राज्ये महाराष्ट्राच्या पुढे गेल्याचा दावा केला जातो...**

**जयंत पाटील :** अजिबात नाही. महाराष्ट्र आजही देशात पंचायत राज्य अंमलबजावणीमध्ये देशात अग्रगण्य आहे. सलग दुसऱ्या वर्षी महाराष्ट्राला राष्ट्रीय पातळीवर पहिल्या क्रमांकाचा पुरस्कार मिळाला आहे. गुजरात, छत्तीसगड आणि केरळ या राज्यांची प्रगतीदेखील वाखाणण्याजोगी आहे. पण ही तिन्ही राज्य महाराष्ट्राच्या तुलनेत लहान आहेत. लोकसंख्येनं कमी आहेत. तिथल्या स्थानिक स्वराज्य संस्थाची संख्या अत्यंत कमी आहे. याउलट महाराष्ट्रात १० हजारच्या वर लोकसंख्या असलेली हजारो गावं आहेत. ही गावं शहरातही मोडत नाहीत आणि गावातही मोडत नाहीत. आम्ही अशा मोठ्या गावांच्या विकासासाठी विकास केंद्र म्हणून निवड केली आहे. १३ व्या वित्त आयोगानुसार महाराष्ट्रातल्या ग्रामपंचायतींना इमारती बांधण्यास निधी मिळणार आहे. सुरुवातीला ५००० ग्रामपंचायतींना हा निधी आम्ही देणार आहोत.

प्रत्येक गावातल्या बेघरांना घरकुल देण्याची योजना प्रभावी आणि पारदर्शकपणे सुरू आहे.

**प्रश्न : पंचायतराज इतक्या प्रभावीपणे अंमलात आल्यास पुढील वीस वर्षांतल्या महाराष्ट्राकडे आपण कोणत्या नजरेतून पाहता... कसा असेल २० वर्षांनंतरचा महाराष्ट्र.. काय सांगाल.......**

**जयंत पाटील :** मी अत्यंत प्रामाणिकपणे सांगतो की, पुढील वीस वर्षात महाष्ट्रातल्या प्रत्येक गावात शहरापेक्षा अधिक सुविधा असतील. प्रत्येक गाव स्वयंपूर्ण असेल. शहरात राहणाऱ्या नागरिकांनाही हेवा वाटेल आणि 'गड्या आपला गाव बरा' असं म्हणत गावाकडची ओढ लागेल. अशी महाराष्ट्रातली गावे होतील याचा मला विश्वास आहे. स्वच्छ हवा, प्रदूषण मुक्त वातावरण, हिरवीगार झाडे, स्वच्छता आणि पाणीपुरवठा, रस्ते, दळणवळण आणि शिक्षण या सर्व सोयीसुविधांनी परिपूर्ण अशी महाराष्ट्रातली गावं असतील यात मला शंका वाटत नाही. प्रशासनाने यासाठी कंबर कसली आहे. तर, राज्यातल्या अनेक गावांनी सहकार्य केल्याने परंपरागत गावांनी कात टाकून आदर्श गावं उभारली आहेत. हे चित्र असेच कायम राहील. आपल्या गावासाठी महाराष्ट्रातला प्रत्येक नागरिक संत गाडगेबाबा व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची ग्रामीण स्वराज्याची प्रेरणा घेऊन सरकारला सहयोग देईल, अशी मला आशा आणि विश्वास आहे.

**शब्दांकन : संजय मिस्कीन**
**संपर्क : ९८७०१०८४४७**



# गाव बदलत आहे...



**शहराकडे लोक धावतात कारण गावात सोयी नाहीत. ग्रामीण भागाचे हे चित्र बदलायचे आहे. शहरे आणि खेडी यातील फरक नाहीसा झाला पाहिजे. ग्रामविकास राज्यमंत्री श्री. सतेज पाटील यांनी मांडलेली भूमिका.**

सध्या आपल्याकडे अशी मानसिकता आहे की खेडे म्हणजे घाण, अस्वच्छता, पाण्याची चिंता, वीज नाही, प्रवासाची साधने नाहीत आणि लागणाऱ्या वस्तू मिळणे अवघड! हे चित्र मला बदलायचे आहे. सरकार त्यादृष्टीने पावले टाकीत आहे. शहरात असणाऱ्या सोयी जर आपण खेड्यात देऊ शकलो तर शहरे व खेडे हा फरक राहणार नाही व त्याचवेळी गावाकडून शहरांकडे धावणारा लोकांचा ओघही कमी होईल. शहरांवरील ताण कमी होईल. एकंदरीत राज्याच्या विकासाचा विचार केला तरी खेड्यांच्या सुविधा वाढणे हे महत्त्वाचे ठरणार आहे. या दृष्टीने राज्य सरकार अनेक योजना आखत असते. ग्राम विकास विभागातर्फे एकंदरीत सोळा महत्त्वाच्या योजना राबवल्या जातात, पण या योजनांमुळे खेड्यातील माणसांना स्वच्छ पाणी मिळावे, चांगले रस्ते, घरकुले, आरोग्य मिळावे अशा साऱ्याच प्रकारच्या योजना आहेत. काही योजना या केंद्र सरकारच्या मदतीने चालवल्या जातात. त्यातील केंद्र सरकारचा वाटा कधी ५० टक्के तर कधी ७५ टक्के खर्चाचा असतो. काही योजना अशा आहेत की राज्य सरकार केंद्राच्या निधीपेक्षा अतिरिक्त निधीची तरतूद करून खेड्यात अधिक तरतूद करून देते आहे.

सध्याचे युग हे संगणकाचे आहे. ही एक माहिती व तंत्रज्ञानाची महाक्रांतीच आहे. त्यात ग्रामीण विकास विभागाने महत्त्वाचे पाऊल टाकलेले आहे. आमच्या विभागाची सारी तयारी पूर्ण झाली आहे. महापंचायत हे पोर्टल लवकरच सुरू होते आहे. यात कोणत्याही एका खेड्याचे नाव टाईप करताच तेथे सारी माहिती रंजक पद्धतीने आपल्या पुढे यावी अशी व्यवस्था आहे. उदाहरणार्थ कुंभारगाव हे माझ्या करवीर मतदारसंघातील एक लहानसे गाव आहे. तिथले भौगोलिक वैशिष्ट्य काय, तिथले ऐतिहासिक मंदिर कोणते, त्याची पर्यटनविषयक अशी माहिती कोणती, गावात कोणती पिके घेतली जातात, तिथले लोक किती त्यांचे व्यवसाय, शेती काय काय याची माहिती, सारा तपशील त्या वेबसाईटवर सहज शोधता येईल. महाराष्ट्राच्या खेडोपाडी अशी अनेक महत्त्वाची स्थळे आहेत. त्या पोर्टलच्या माध्यमातून दक्षिण महाराष्ट्रातील दोनशे वर्षांपूर्वीच्या अत्यंत सुंदर अशा खिद्रापूरच्या मंदिराची माहिती जगातील कोणत्याही कोपऱ्यातून नेटवर शोधणाऱ्या कुणाही माणसाला सहज सापडेल. गुगल सर्चवर आपण ऐतिहासिक मंदिरे असे टाकले तर त्यातही खिद्रापूरची वा महाराष्ट्राच्या तत्सम दूरगामी भागातील गाव खेड्यातील माहिती पुढे आली पाहिजे असा आमचा उद्देश आहे. येत्या १५-२० दिवसातच www.xyz.mahapanchayat.in या पोर्टलचे उद्‌घाटन करण्याचा आमच्या विभागाचा मानस आहे, असेही पाटील यांनी सांगितले.

या योजनेचा तपशील देताना सतेज पाटील म्हणाले की प्रत्येक ग्रामपंचायतीला आपण संगणक दिलेला आहे. तेथे आता कायमस्वरूपी डाटा ऑपरेटर आपण देणार आहोत. हा ऑपरेटर संगणक चालविण्यातील तज्ज्ञ असाच असेल. त्यांनी गावाची सारी माहिती संगणकावर घेऊन वेबसाईटवर ठेवायची आहे. त्यांनी कोणत्या प्रकारचा तपशील गोळा करायचा आहे, माहिती कोणत्या पद्धतीने द्यायची आहे याचा नमुना निश्चित केला आहे.

संगणकाचा आणखी वापर आपल्याला आणखी कसा करता येईल याविषयी बोलताना पाटील म्हणाले की, ग्रामपंचायतीचे वर्किंग मॉड्युल आपल्याला तयार करायचे आहे. गावचा सरपंच, ग्रामसेवक आणि संबंधित जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अशा तिघांनी बसून त्या त्या ग्रामपंचायतीमधील नियमित व नैमित्तिक अशा सर्व कामकाजांचे सूत्रबद्ध नियोजन करायचे आहे. म्हणजे गावात समजा १० किलोमीटर लांबीची गटारे आहेत आणि तीन सफाई कर्मचारी ग्रामपंचायतीकडे उपलब्ध आहेत, तर प्रत्येक कर्मचारी कोणत्या भागातील किती काम किती वेळात करेल हे ठरवून घ्यायचे, तसेच ग्रामपंचायतींच्या अन्य अपेक्षित कामकाजाचेही काम-काळ-वेगाचे गणित बसवायचे! हे सारे ग्रामपंचायतीच्या संगणकावर ठेवता येईल किंवा त्या त्या पंचायतीच्या वेबसाईटवरही ठेवता येईल. यामुळे ग्रामपंचायतीचे कामकाजही व्यावसायिक पद्धतीने पार पाडता येईल त्यावर स्थानिक नागरिकांचेही लक्ष राहू शकेल.

गावाचे स्वरूप व रूप कसे बदलता येईल याविषयी बोलताना पाटील म्हणाले की, महाराष्ट्रात २७,९२० गावे आहेत. त्यापैकी ९००० गावे निर्मल ग्राम झालेली आहेत, ही संख्या वाढली पाहिजे. गावातील कचऱ्याचे व्यवस्थापन आपल्याला करायला हवे तर गावाचे रूप पालटेल. गावातील सांडपाण्यावर गावातच प्रक्रिया केली जावी तसेच पाच ते दहा गावांची मिळून कचऱ्यावर प्रक्रिया करण्याची यंत्रणा करावी लागेल. कचऱ्यावरील खत प्रकल्प अथवा कचऱ्यापासून वीज निर्मिती अशा प्रकल्पांचा विचार करायला हवा. आज शहरातील कचरा ही जशी मोठी समस्या आहे व त्यावर गंभीर उपाय आपण शोधतो आहोत त्याच धर्तीवर गावातील कचऱ्याच्या समस्येवरही उत्तरे शोधावी लागतील, असे पाटील यांनी बजावले. ग्रामसभेची सूचना एसएमएसद्वारे देता येईल अशीही एक संकल्पना राज्यमंत्री सतेज पाटील यांनी पुढे मांडली आहे. ते म्हणतात की, आता गावात प्रत्येक माणसाकडे निदान घरटी एकाकडे मोबाईल आहेच. ग्रामसभा होतात त्यात काय विषय येणार आहेत हे सारे ग्रामसेवकाने एसएमएसवरून गावकऱ्यांना कळविले तर ग्रामसभेची उपस्थितीही वाढेल. कोणत्या प्रश्नांवर ग्रामसभेत चर्चा होणार किंवा ग्रामसभेपुढील विषयावर प्रभागातील लोकांचे मत काय याची चर्चा व्हावी, असेही पाटील यांनी सुचविले आहे.

**शब्दांकन : अनिकेत जोशी**
**संपर्क : ९८६९००४४९६**



ऐसी असावी गावाची तयारी । तरीच गाव बनेल स्वर्गपुरी
नलगे सत्ताधीशांची तुतारी । पाठीमागे

# आपला विकास आपल्या हाती

ग्रामीण विकास हा ''लोकांचा पुढाकार, त्यात शासनाचा पुढाकार'' या पद्धतीने करावा लागेल. पंचायतीराज संस्थांना विकासाच्या दृष्टीने जास्तीत जास्त निधी, अधिकार व जबाबदारी द्यावी लागेल. राज्य शासनाची भूमिका ही सहाय्यकर्त्याची व सल्लागाराची व्हावी लागेल. "Fund, Function, Functionary" (निधी, कार्य आणि मनुष्यबळ) हे संपूर्णपणे पंचायतराज व्यवस्थेच्या अधीन ठेवावे लागतील. मुक्त (Untied) निधी मोठ्या प्रमाणावर द्यावा लागेल. पंचायत निवडणुकीला उभे रहाणाऱ्यांची किमान शैक्षणिक पात्रता, निवडून आल्यावर सत्तीचे प्रशिक्षण, ग्रामसभांचे बळकटीकरण, सामाजिक लेखापरीक्षण असे वेगवेगळे तंत्र वापरावे लागेल. 'लोकांनी, लोकांची, लोकांसाठी' राबविलेल्या विकासप्रणालीच्या माध्यमातून शाश्वत ग्रामीण विकास होऊ शकेल.

महाराष्ट्राच्या ग्रामविकास व पंचायतीराज विभागाची ''समृद्ध ग्राम, संपन्न ग्रामस्थ'' ही संकल्पना (Vision) जेव्हा सत्यात येईल तेव्हा परिपूर्ण ग्रामविकास झाला असे म्हणता येईल. ही संकल्पना मूर्त स्वरूपात येण्यासाठी १) ग्रामीण भागात उच्च दर्जाच्या भौतिक सुविधांची निर्मिती व

**सुधीर ठाकरे,**
सचिव (ग्राम विकास)

व्यवस्थापन, २) मूलभूत सामाजिक गरजांची पूर्तता आणि ३) उपजीविकेच्या सुयोग्य व पर्याप्त सुविधांची उपलब्धतता. या तीन मूलभूत घटकांकडे लक्ष पुरवावे लागेल.

भौतिक सुविधांमध्ये रस्ते विकास, जलपुरवठा, स्वच्छता, ऊर्जा, अशा सामूहिक तर गृहनिर्माण अशा कौटुंबिक/वैयक्तिक सुविधांचा समावेश होतो. मूलभूत सामाजिक गरजांमध्ये शिक्षण, आरोग्य, पोषण, सामाजिक सुरक्षा या बाबींचा तर, उपजिविकेच्या संधीमध्ये स्वयंरोजगार व वेतनी रोजगार यांचा समावेश होतो. ग्रामविकासाचे हे घटक परस्परांशी निगडित आहेत. यातूनच ग्रामीण भागातील स्थानिकांना रोजगार-स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात.

### संस्थात्मक साधनांचा उपयोग

परिपूर्ण ग्रामीण विकास साध्य करण्यासाठी प्रभावी संस्थांत्मक साधनांचा उपयोग करावा लागेल. ही संस्थात्मक रचना, सेवा व विकासयोजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याची वितरण प्रणाली (डिलिव्हरी सिस्टिम) म्हणून काम करताना कितपत लोकाभिमुख, पारदर्शक, तत्पर व संवेदशनील आहे यावर त्याचे यशापयश अवलंबून आहे. ग्रामीण विकास साध्य करण्यासाठी कोणत्या प्रकारच्या संस्थांत्मक व्यवस्थेचा उपयोग करावा, जेणेकरून या



दया हे मुख्य धर्मलक्षण । परि दया म्हणजे प्राण्यांचे पालन
आणि कंटकांचे निर्दालन । बोलिले संती



सेवा ग्रामस्थांना व ग्रामीण समूहाला कायमस्वरूपी विनाविलंब पोहोचू शकतील याचा विचार करूनच यंत्रणा सुनिश्चित करणे आवश्यक आहे. या संस्थांत्मक रचनेत शासन, सेवाभावी संस्था, पंचायतराज संस्था, समूह, कुटुंब अथवा इतर कोणते घटक असावेत हे निश्चित करावे लागेल.

प्रत्येक व्यक्तीने आपला विकास स्वत:च करून घ्यावयाचा असतो. परंतु समाजव्यवस्थेने व राजकीय संस्थात्मक यंत्रणेने उचित संधी प्रत्येक व्यक्तीला उपलब्ध करून देणे आवश्यक ठरते. यासाठी भारतीय राज्य घटनेने ''कायद्याचे राज्य'' व ''कायद्यासमोर समानता'' ही तत्त्वे अंगीकारली आहेत. कोणत्याही सामाजिक उच्च-नीचतेचा विचार न करता स्वक्षमता विकसित करता यावी यासाठी जबाबदार यंत्रणांनी घटनेच्या या चौकटीत काम केले पाहिजे.

विशिष्ट सामाजिक व्यवस्था व परिस्थितीमुळे समाजातील काही घटक संधी न प्राप्त झाल्याने आजपर्यंत विकासापासून वंचित राहिले त्यांना इतरांपेक्षा जादा संधी व झुकते माप देण्याची तरतूद घटनेत आहे. वैयक्तिक विकासासोबतच या बाबी सामूहिक व क्षेत्रनिहाय विकासाला लागू आहेत. वर नमूद ग्रामविकास घटकांच्या बाबतीत ग्रामीण भागाला असे झुकते माप देणे न्यायाला धरून आहे. स्वातंत्र्यापूर्वी इंग्रज राजवटीत शासकीय व प्रशासकीय यंत्रणेचा उपयोग जनतेवर नियंत्रण व नियमन करण्यासाठी होता. सत्ता टिकावी यादृष्टीने इंग्रजांनी प्रशासनाचा वापर करून घेतला. ग्रामीण स्तरावर थोड्याबहूत कल्याणकारी स्वरूपाच्या योजना, विशेषत: टंचाई अथवा नैसर्गिक आपत्तीच्या काळात अथवा रोगराई आल्यास राबविण्यात येत असत. परंतु ग्रामीण विकास या संज्ञेत बसणाऱ्या विकासाच्या बाबी त्या काळात अल्प होत्या.

**परिस्थितीत बदल**

स्वातंत्र्यानंतर मात्र ही परिस्थिती बदलली. शासन आणि प्रशासन यंत्रणा खऱ्या अर्थाने लोकसेवक म्हणून काम करू लागली. परंतु या काळातही शासन यंत्रणेने 'उपकारकर्त्याची' अथवा 'कार्यकारी' स्वरूपाची भूमिका घेतली. त्यामुळे 'शासन यंत्रणा लोकांसाठी कल्याणकारी विकासाच्या योजना राबवित आहे' अशी पद्धत रुजली. इंग्रजांच्या काळातही शासकीय मदतीविना ग्रामस्तरीय समूह (Community) ग्रामस्तरावरील व्यवस्थापन व विकासाची कामे स्वत: करत. अर्थात त्यावेळी ग्रामस्थांच्या गरजाही कमी होत्या. पंचक्रोशीबाहेर व्यवहार करण्याची गरज नसे. परंतु वर नमूद

## भविष्याचा वेध

● स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेंतर्गत दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना उपजीविकेच्या संधी उपलब्ध करून देणे. बचतगटांच्या वस्तूंच्या विक्रीसाठी व्यापक विपणन व्यवस्था राबविणे. ● महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाद्वारे दारिद्र्यनिर्मूलनाचा प्रभावी उपक्रम चालविणे. ● इंदिरा आवास योजनेअंतर्गत निवारा आणि निवाराविषयक सुविधा पुरविणे. ● पर्यावरण संतुलित मूलभूत सुविधांद्वारे स्वच्छ, सुंदर आणि हरित ग्राम तयार करण्यासाठी विविध उपक्रम राबविणे. ● प्रशिक्षणातून विकास कार्यक्रमांतर्गत लोकप्रतिनिधींचे सक्षमीकरण करून पंचायतराज व्यवस्था बळकट करणे. ● तीर्थक्षेत्र विकासासाठी मूलभूत सुविधा आणि संसाधने पुरविणे. ● ई-पंचायत, प्रशासकीय सुधारणा आणि दैनंदिन कामकाजात संगणकाचा वापर वाढविणे. ● मागास क्षेत्र अनुदान निधी प्रकल्पांतर्गत येणाऱ्या जिल्ह्यातील मूलभूत सुविधा आणि साधनांमधील गंभीर त्रूटी भरून काढणे. ● महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना प्रभावीपणे राबविणे. ● प्रशासकीय पारदर्शकतेसाठी ऑनलाईन बदल्या, सेवा पुस्तकांचे संगणकीकृत अद्ययावतीकरण अशा नावीन्यपूर्ण उपक्रमांची अंमलबजावणी करणे. ● पंचायतराज संस्थांना आर्थिक, कायदेशीर आणि पायाभूत सेवांचे पाठबळ देणे. ● यशवंत पंचायतराज अभियानाची प्रभावी अंमलबजावणी. ● ग्रामीण भागात अपारंपरिक ऊर्जा वापरास प्रोत्साहन. ● सौर ऊर्जा वापरासाठी विशेष प्रोत्साहन. ● गावे:वाड्या पाडे बारमाही रस्त्यांनी जोडणे व रस्त्यांची सुधारणा करणे. ● १३ व्या वित्त आयोगातून पंचायत राज संस्थांना मूलभूत सुविधांसाठी मदत. ● जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांचे आयएसओ नामांकन. ● पंचायतराज संस्थांमध्ये ई टेंडरिंग. ● जिल्हा परिषद आणि पंचायत समिती कार्यालयात सॅटकॉम सेवा सुरू करणे. ● पंचायतराज सक्षम कारभारासाठी संसाधनांचे एकत्रीकरण करणे.

ग्रामविकास विभागाने २०१०-११ मध्ये फलनिष्पत्तीवर आधारित दस्तऐवजात (Result Framewok Document ) नमूद केलेला कार्यक्रम अत्यंत प्रभावीपणे राबविल्यामुळे विभागाला एकूण १०० गुणांपैकी ९६ गुण मिळाले आहेत.

विकासाची तीनही अंगे हळूहळू आवश्यक ठरू लागल्याने शासन यंत्रणांनी पुढाकार घेतला. समूहाद्वारे परस्पर सहकार्याने गरजा भागवून घेण्याची ग्रामस्तरावरील पद्धत संपुष्टात आली. प्रत्येक विकासाच्या बाबी या शासन यंत्रणेमार्फतच झाल्या पाहिजेत अशी भावना ग्रामविकासाच्या सर्व क्षेत्रात निर्माण झाली. त्यामुळे सामूहिक पुढाकार आणि सामूहिक जबाबदारी यापेक्षा शासकीय पुढाकार आणि प्रत्येक बाब शासनानेच करावी अशाप्रकारची मानसिकता निर्माण झाली. त्यामुळे शासकीय यंत्रणांच्या कामाची व्याप्ती वाढली.

**पंचायतीराज संस्थांचा विकास**

१९५८ सालचा मुंबई ग्रामपंचायत कायदा पाहिला तर त्यामध्ये ग्रामव्यवस्थापन व ग्रामविकासाचे बरेचसे अधिकार हे लोकशाही पद्धतीने निवडून आलेल्या ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांवर सोपविण्यात आले होते. ग्रामपंचायतींचा सरपंच हा केवळ ग्रामपंचायतीत प्रशासकीय प्रमुख नसून कार्यकारी प्रमुख होता. ग्रामपंचायतीत ग्रामसेवक हा सचिव म्हणून काम पहात असे. १९६२ सालापासून जिल्हा परिषदांच्या निर्मितीनंतर मात्र ग्रामसरकारपेक्षा, 'जिल्हा सरकार' अशा स्वरूपाचे कामकाज प्रभावी झाले. ग्रामपंचायतीचे अधिकार कमी होऊ लागले. १९६२ ते १९७१ हा काळ जिल्हा परिषदेचे प्रशासन व ग्राम विकासाचा सुवर्णकाळ होता. कृषी, वने, सामाजिक विकास, प्राथमिक शिक्षण, आरोग्य, ग्रामीण बांधकामे, पाणीपुरवठा व स्वच्छता, सामूहिक विकास, ग्रामीण गृहनिर्माण असे जवळपास ७५ तऱ्हेचे उपक्रम, कार्यक्रम आणि योजना जिल्हा परिषदांमार्फत राबविण्यात येत होत्या. ग्रामस्तरावरील तलाठ्यासारखी महसुली यंत्रणा आणि जमिनीविषयक दफ्तरांचे व्यवस्थापनही काही काळ जिल्हा परिषदांकडे सोपविण्यात आले होते. जिल्हा स्तरावरील शासन यंत्रणेतील कोणत्याही अधिकाऱ्यांना त्यांच्या सभेत बोलाविण्याचे जिल्हा परिषदेला अधिकार होते. मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद) यांना जिल्हा परिषदेने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याचे अधिकार होते. मात्र कालांतराने ज्या विविध करांमधून ग्रामविकासाची कामे घेण्यात येत होती, ते कर कालांतराने शासनाने स्वत:कडे घेतले. जिल्हा परिषदेमध्ये १४ विभागप्रमुख मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली व जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय नियंत्रणामध्ये काम करीत होते. ही पद्धत

रुजली असती आणि जिल्हा परिषदेचे अधिकार व्यापक केले असते तर खऱ्या अर्थाने 'जिल्हा ग्रामीण सरकार' ही संकल्पना आणि त्याद्वारे 'समृद्ध ग्राम, संपन्न ग्रामस्थ' हे स्वप्न सत्यात उतरले असते.

१९७२ साली जिल्हा नियोजन मंडळे अस्तित्वात आली. जिल्हा परिषदेचे ग्रामीण नियोजनाचे अधिकार जिल्हा नियोजन मंडळाकडे गेले. हळूहळू जिल्हा परिषदेची 'जिल्हा सरकार' ही भूमिका संपुष्टात आली. याच काळात जिल्हा परिषदेला बहाल केलेले व्यवसायकर व वाहनकर असे अनेक कर राज्य शासनाने परत घेतले. तसेच जमीन महसुलाचे दफ्तर ठेवण्याचे अधिकारक्षेत्र जिल्हा परिषदेकडून जिल्हाधिकाऱ्यांना आणि ग्रामीण बलुतेदार संस्थांचे कामकाज सहकार विभागाला देण्यात आले. जिल्हा परिषदांऐवजी राज्य शासनाचे विभाग व यंत्रणांकडे ग्रामविकासाच्या अनेक जबाबदाऱ्या परत देण्यात आल्या. याच काळात जवळजवळ ११ वर्षे जिल्हा परिषदांच्या निवडणुका झाल्या नाहीत. न्यायालयाने निदर्शनास आणून दिल्यानंतर निवडणुका घेण्याऐवजी जिल्हा परिषदेमध्ये जवळजवळ २ वर्षे प्रशासकीय राजवट ठेवण्यात आली.

७३ व्या घटना दुरुस्तीनंतर ग्राम विकासाच्या त्रिस्तरीय यंत्रणेला घटनात्मक दर्जा देण्यात आला. या यंत्रणेने ग्रामीण विकास आणि ग्रामीण सुशासनासाठी योग्यतऱ्हेने काम करावे म्हणून घटनेत ११ वी सूची अंतर्भूत करून २९ विषय या यंत्रणेकडे देण्याबाबत तरतूद करण्यात आली. परंतु या विषयांच्या कोणत्या योजना पंचायतराज यंत्रणेकडे सोपवाव्यात व यासाठी लागणारे मनुष्यबळ व निधी त्यांना किती प्रमाणात बहाल करावेत हे ठरविण्याचे अधिकार कायदा करून संबंधित राज्याच्या विधिमंडळाला देण्यात आले. महाराष्ट्रात अद्याप या २९ विषयांच्या अंतर्गत बऱ्याच योजना पंचायतराज यंत्रणेकडे सोपविण्यात आल्या नाहीत. ज्या योजना सोपविण्यात आल्या त्याबाबत पुरेसा निधी उपलब्ध होऊ शकला नाही.

**आमचा विकास आमच्या हाती**

जिल्हा स्तरावरील अथवा ग्रामस्तरावरील ग्रामीण विकासाच्या योजनांची प्राधान्यता जिल्हा परिषदा अथवा ग्रामपंचायतींच्या लोकनियुक्त यंत्रणेने ठरवावी आणि त्याचे नियोजन करून अंमलबजावणी करावी असे अपेक्षित आहे. यामुळे 'आमचा विकास आमच्या हाती' ही संकल्पना अस्तित्वात येऊन 'लोकांचा, लोकांनी, लोकांसाठी चालविलेला विकास प्रकल्प', असे स्वरूप त्यास प्राप्त होईल. परंतु राज्य शासनाकडून देण्यात येणारा निधी हा शासनाने ठरविलेल्या विकास योजनांसाठी बांधील स्वरुपात देण्यात येतो. स्थानिक स्तरावरील गरजांना प्राधान्य देऊन निर्णय घेण्याची प्रक्रिया त्यात नाही.

एकीकडे विकास योजना शासन यंत्रणेचे ठरविण्याचे धोरण तर दुसरीकडे जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायतींनी करावयाच्या विकासकामाच्या बाबतीत त्रिस्तरीय पंचायत व्यवस्थेत प्रत्येक स्तराने कोणती भूमिका पार पाडावी याबद्दल सुस्पष्टता नाही. 'जे काम ज्या स्तरावर उत्कृष्ट होऊ शकते ते काम त्याच स्तरावर झाले पाहिजे' ही संकल्पना अजूनही रुजली नाही. Principle of Subsidiarity मुळे शासनाने ठरविलेले 'प्राधान्य' व शासनाच्या यंत्रणांची 'अंमलबजावणी' यामुळे ग्रामीण विकास ही शासनाची जबाबदारी असून पंचायतराज व्यवस्थेला यात गौण स्थान असल्याची मानसिकता दिसून येते. घटनेतील ११ व्या सूचीतील विविध विषयांच्या अंतर्गत योजना 'Fund, Function, Functionary' (निधी, कार्य आणि मनुष्यबळ) या तीनही घटकांसह पंचायतीराज यंत्रणेकडे प्रदान करण्याची भारतीय राज्यघटनेतील भूमिका अजूनही प्रभावीपणे रुजली नाही. प्रगत देशात स्थानिक विकासात्मक अधिकार पूर्णत: संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेला असतात. अमेरिकेतील एखाद्या शहराचा महापौर किंवा स्वीत्झरलँडमधील एखाद्या ग्रामपंचायतसदृश यंत्रणा म्हणजे कम्युन यांचे अधिकार आणि आपल्या ग्रामीण क्षेत्रातील अशाच यंत्रणेत मोठी तफावत आहे. स्वित्झरलँडमधील ग्रामपंचायतीकडे असलेले अंतर्गत जमीन नियोजन व विकासाचे अधिकार आपल्याकडील ग्रामपंचायतींच्या अधिकारा-पेक्षा व्यापक आहेत. एखाद्या ग्रामपंचायतीच्या हद्दीत परदेशातील व्यक्ती स्थायिक होऊ इच्छित असल्यास त्या ग्रामपंचायतीने होकार दिल्याशिवाय स्वीत्झरलँडचे केंद्रीय शासन सुद्धा त्या देशाचे नागरिकत्व अशा व्यक्तीला देऊ शकत नाही. असे अनेक अधिकार त्या देशात ग्रामस्तरावर आहेत. ग्रामीण भागात बिनशस्त्रधारी पोलीस यंत्रणा ग्रामपंचायतीच्या अधिकारक्षेत्रात असते. अशातऱ्हेने ग्रामीण विकास व सुशासन स्थानिक लोकनियुक्त प्रतिनिधींनी केल्यामुळेच त्या देशांमध्ये शाश्वत ग्रामविकास झाला आहे.

**शासनाचा सहभाग आणि लोकांचा पुढाकार**

राज्यशासनाची भूमिका ही दात्याची अथवा मालकाची न रहाता ती सहाय्यकर्त्याची असणे आवश्यक आहे. विकास करण्याची 'जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थेची आणि सहकार्य राज्य शासनाचे' अशातऱ्हेची भूमिका जोपर्यंत रुजत नाही तोपर्यंत कायमस्वरूपी ग्रामविकास होणार नाही. त्यादृष्टीने ग्रामपंचायती आर्थिकदृष्ट्या व संस्थात्मकदृष्ट्या सक्षम करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र शासनाने यादृष्टीने महत्त्वाची पावले उचलली आहेत. गावातील नैसर्गिक संसाधनांवर ग्रामसभेचा अंकुश, सामाजिक लेखापरीक्षण, लघुवनोपजक व लघुखनीज, यावर ग्रामसभेचे नियंत्रण, वैयक्तिक लाभार्थ्यांची निवड, ग्रामसभेत स्त्रियांना ५०% आरक्षण, निवडणुकीसाठी किमान शैक्षणिक पात्रता, निवडून आल्यावर किमान प्रशिक्षण अशा अनेक तरतुदी अंतर्भूत आहेत किंवा प्रस्तावित केल्या आहेत. स्थानिक गरजांचा विचार व विकास, प्राधान्यक्रम ठरवून त्यांचे नियोजन ग्रामस्तरावर करावे लागेल. आवश्यक निधीचे वितरण ग्रामस्तरावर झाले पाहिजे व त्याची अंमलबजावणी व देखभालसुद्धा ग्रामस्तरावरच होणे अपेक्षित आहे. जिल्हा परिषदांची भूमिका ही सहाय्यकर्त्याची व वेळप्रसंगी निरीक्षकाची असावी. केंद्र शासनाने अनुसूचित पंचायत विस्तार कायदा. (PESA-Panchayat Extension to Scheduled Area) अथवा बी.आर.जी.एफ. (मागास क्षेत्र विकास निधी - Backward Region Grant Fund) सारख्या काही विकास योजनांमार्फत ही संकल्पना ग्रामविकासात रुजविण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना ग्रामपंचायतीमार्फत राबविण्यात येत आहे. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान अथवा पर्यावरण संतुलित ग्राम अभियान किंवा तंटामुक्त ग्राम अभियान अशा काही योजना लोकसहभागातून राबविण्यात येत आहेत.

**समूह निर्णय व पुढाकार**

विकास कामाला लोकप्रतिनिधींच्या प्राधान्यानुसार निधी दिला जातो. परंतु यामध्ये गावाची गरज ग्रामसमूहबाह्य यंत्रणा ठरवत असल्याने यामध्ये ग्रामसमूहाला व त्यांच्या प्राधान्यांना विशेष स्थान राहत नाही. या उलट 'विकासासाठी स्पर्धा' ही एक नवीन संकल्पना गेल्या १५-२० वर्षात विविध कार्यक्रमातून राबविण्यात आली. संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान हे याचे उत्कृष्ट उदाहरण. जी गावे विशिष्ट अटींचे सर्वोत्कृष्टरीत्या पालन करून गुणानुक्रम पटकावतील त्या गावांच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून दिला जातो. परंतु या प्रकारच्या योजनेत असे लक्षात आले की, काही गावेच वारंवार स्पर्धेत गुणानुक्रमे येऊन निधी प्राप्त करून घेतात तर काही गावे मागे रहातात.

**(उर्वरित मजकूर पान २३ वर)**

अन्याय होता प्रतिकारचि करावा । प्रथम अन्याय समजूनि घ्यावा
निश्चित कळता आवाज द्यावा । संघटनेचा



# गाव तोचि देव!

**सर्वांचा निर्मिक आहे एक धनी ।।**
**त्याचे भय मनी ।। धरा सर्व ।।**

असे महात्मा जोतिबा फुले यांनी म्हणून ठेवले आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळात गोरे अधिकारी ऐषारामात गुंग असून, सरकारी खात्यातील उच्चवर्णीय मंडळी शेतकऱ्यांना लुटत असत. त्यामुळे त्यांना पोटभर भाकरी व अंगभर वस्त्रही मिळत नसे, याचे वर्णन जोतिबांनी 'शेतकऱ्याचा असूड'मध्ये केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतंत्र मजूर पक्षाचा जाहीरनामा तयार केला, तेव्हा शेतकरी व ग्रामीण जनतेच्या विषयावरच जोर दिला. शेतीची प्रगती होऊन, तो धंदा जास्त फलद्रुप व्हावा म्हणून भूतारण बँका, सहकारी पतपेढ्या व खरेदी विक्री संस्थांची स्थापना, लहान तुकड्यातील शेती तोट्याची होते म्हणून शेतीमाल आधारित उद्योगधंदे उभारणे तसेच ग्रामीण जनतेत प्राप्त व्हावी असे प्रयत्न करणे, ही त्यांच्या जाहीरनाम्याची उद्दिष्टे होती.

५१ वर्षांच्या आपल्या आयुष्यात महाराष्ट्राने यशवंतराव चव्हाण यांच्यापासून कृषी औद्योगिक व ग्रामविकासावरच भर दिलेला आहे. पंचायत राजव्यवस्थेत सामान्य माणूस हा सामावला गेला पाहिजे यावर यशवंतरावांचा कटाक्ष होता. त्यापैकी विधिमंडळ काँग्रेस पक्षाची एक बैठक झाली होती. पंचायत समिती सभापतीपद व जिल्हा परिषद अध्यक्षपद ही पदे आमदारांमध्ये असावीत अशी मागणी करण्यात आली. तेव्हा 'हा निर्णय करायचा असेल तर मी महाराष्ट्राचा मुख्यमंत्री असणार नाही' अशी भूमिका त्यांनी घेतली. कार्यकर्त्यांची फळी खेड्यापाड्यातून, तळागाळातून उभी राहिली पाहिजे यावर त्यांचा कटाक्ष होता. त्यांच्या अर्थसंकल्पाचा दृष्टिकोन असाच असे.

यशवंतरावांनंतर मुख्यमंत्री म्हणून ५ डिसेंबर १९६३ रोजी वसंतराव नाईक यांनी शपथ घेतली. त्यानंतर लगेच मंत्रालयात आल्याबरोबर त्यांच्या सरकारने ज्वारी खरेदी करून भरडलेल्या शेतकऱ्यांना योग्य भाव देण्याचा निर्णय घेतला. संकरित ज्वारीचा प्रचार हाती घेऊन अन्नधान्याचे उत्पादन वाढवण्याची मोहीम त्यांनी सुरू केली. त्यामुळे ज्वारी उत्पादक शेतकरी सावरला. अन्यथा ज्वारीचे भाव कोसळल्यामुळे खेड्यातला कोडरवाहू शेतकरी पुरता हेलपाटून मरत होता.

**हेमंत देसाई**

मुख्यमंत्रीपद स्वीकारल्यानंतर पहिल्या स्वातंत्रदिनी ध्वजारोहन समारंभात बोलताना ते म्हणाले की, 'महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातल्या अगदी आडवळणात असलेल्या गहुलीसारख्या एका गावातील मुलाला राज्याचा मुख्यमंत्री या नात्याने ध्वजारोहन करता येईल असे कधी वाटले नव्हते.'

महाराष्ट्रात धान्योत्पादन वाढले तर ग्रामीण क्षेत्रात परिवर्तन येईल. याची जाण वसंतराव नाईक यांना होती. म्हणूनच १९६६ मध्ये पुणे, सातारा, कोल्हापूर, उस्मानाबाद, वगैरे जिल्ह्यांचा दौरा करून त्यांनी उत्पादनवृद्धीकरिता शेतकऱ्यांमध्ये चैतन्य निर्माण केले. जादूची कांडी फिरवून एका दिवसात आपण स्वयंपूर्ण होणार नाही. कष्ट तुम्हाला करायचे आहेत. साधने मला पुरवायची आहेत. साधने पुरविण्यात मी कमी पडणार नाही, असे ते नेहमी सांगत.

भारतामध्ये ७० टक्के आणि महाराष्ट्रात ६५ टक्के जनतेला रोजगार पुरविणारा शेती हा सर्वात मोठा उद्योग आहे. केवळ कृषी उद्योगच नव्हे, तर अन्य उद्योगांची ती जननी आहे याची जाण वसंतराव नाईकांना होती. एच ५४ या संकरित कापसास त्यांनी प्रोत्साहन दिले. एच-४ चे बीज घेण्याचा उपक्रमही सुरू केला. पूर्वी कापसाच्या सरकीचा उपयोग फक्त पशुखाद्य म्हणून होत असे. नंतर सरकीपासून तेल काढले जाऊ लागले व तिची पेंड पशुखाद्य म्हणून विकली जाऊ लागली. त्यामुळे कापूस शेतकऱ्यांच्या मिळकतीत भर पडली.

'महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ' ही वसंतरावांचीच देणगी होती १९६२ साली महाराष्ट्राला आजच्या वागळे ईस्टेटमध्ये पहिली एमआयडीसी झाली. पण ग्रामीण भागातील पहिली एमआयडीसी झाली रोहे तालुक्यातील धाटाव येथे. त्यांचे उद्घाटन केंद्राचे तत्कालीन अर्थमंत्री चिंतामणराव देशमुख यांच्या हस्ते झाले. वसंतरावांनी पिंपरी चिंचवड, बुटीबोरी, वाळुंज, सातपूर, अंबड, इस्लामपूर, लातूर येथे एमआयडीसी







काढल्या. त्यामुळे ग्रामीण औद्योगिकीकरणास प्रेरणा मिळाली. महाराष्ट्रात एकूण ७४ औद्योगिक क्षेत्रे निवडली गेली होती.

त्याच सुमारास वि. स. पागे यांनी वसंतरावांना एक पत्र लिहिले. त्यात त्यांनी म्हटले होते की 'मुख्यमंत्रीजी, माझ्या शेतावर सातशे रुपयांत चौदा-पंधरा दिवस वीस गडी मजुरीने लावता आले असते. मग जर शंभर कोटी रुपये बाजूला काढले, तर किती मजुरांना काम देता येईल!''

हे पत्र वाचून वसंतरावांनी पागेंना बोलवून घेतले व त्यातून ग्रामीण परिवर्तन आणणाऱ्या क्रांतिकारी रोहयोचा जन्म झाला. वसंतराव नाईक यांच्या कारकिर्दीतच राज्यातील एक तृतीयांश, म्हणजे १४ हजार खेडयांना वीजपुरवठा सुरू करण्यात आला. खापरखेडा, पारस, भुसावळ, पोफळी, येलदरी हे प्रकल्प सुरू करण्यात आले. सर्वाधिक वीजनिर्मिती कोराडी येथून सुरू झाली. घरगुती वापराकरिता जोडली जाणारी वीज जेवढी महत्त्वाची तेवढीच कृषिपंपाना पुरवली जाणारी वीज मोलाची, हे त्यांचे धोरण होते. १९७१ ते ७४ दरम्यान ग्रामीण विद्युतीकरणाच्या धडक योजना त्यांनी हाताळल्या.

'शेती संपन्न झाली, तरच लोकशाही संपन्न होईल. शेती मोडली तर लोकशाही मोडेल' असे प्रतिपादन करणाऱ्या वसंतराव नाईकांनी राहुरी, अकोला, परभणी, दापोली येथे कृषी विद्यापीठे स्थापन केली. ज्वारी, कापूस, गहू, तूर, भात, हरभरा, भुईमुग, संत्रे, चिकू या पिकांच्या नव्या जातींचे संशोधन करण्याची व्यवस्था झाली. यातून शेतीची उत्पादकता वाढली व उत्पन्नही.

वसंतदादा पाटील यांनी सहकारी कारखानदारी, सहकारी बँकींग व खरेदी विक्री संस्था यांना मुख्यमंत्री या नात्याने सरकारच्या माध्यमातून स्थैर्य दिले. आज हा सहकाराचा पाया खचू लागल्याने ग्रामीण भागातून शहरांमध्ये होणारे स्थलांतर वाढले आहे.

शरद पवार यांचे बारामतीपासून चार मैल अंतरावर असलेले काट्याची वाडी हे जन्मगाव! खेडेगावात व शेतकरी कुटुंबात जन्म झालेला असल्याने, त्यांना ग्रामीण भागाच्या समस्या नेमकेपणाने समजतात. शिवाय शरदरावांचे वडील गोविंदराव हे शिक्षक होते. शेतकरी कामगार पक्षाच्या संस्थापकांपैकी ते एक. तर शरदरावांच्या मातोश्री या शे.का. पक्षाच्या तिकिटावर त्यावेळच्या बोर्डात निवडून आल्या होत्या. गोविंदरावांचा संबंध सहकारी चळवळीचे प्रणेते वैकुंठभाई मेहता



यांच्याशी आला होता. ही पार्श्वभूमी असल्याने, मुख्यमंत्री होताच शरदरावांनी कापूस एकाधिकार योजनेचे पुनर्गठन केले. ज्वारी, ऊस, फळबागा यांच्या नव्या जाती विकसित करण्यास प्राधान्य दिले. फळे, फुले भाज्या यांच्यावर प्रक्रिया करणारे उद्योग सुरू केले. एवढेच नव्हे, तर फलोद्यान विकास योजना राबवली. कुस्तीगीरांसाठी तालमी व खुराकासाठी शिष्यवृत्या देण्याचा निर्णय घेतला. कबड्डी आशियाई स्तरावर नेण्यात आली. स्वतंत्र क्रीडा विभाग स्थापन करून ग्रामीण भागात व्यायामशाळा, मैदाने उभारली.

महाराष्ट्रात दिवसेंदिवस शेती परवडेनाशी झाली असून 'शेतीमधून बाहेर पडून इतर उद्योग काढा,' असे तरुणांना आवाहन करण्याचे धाडस पवारांनी दाखवले. बिगरशेती व्यवसायातून दोन पैसे कमावण्याची संधी मिळाल्याविना इथली शेती किफायतशीर होणार नाही, असे पवारांचे मत आहे.

शरदरावांच्या 'काटयाच्या वाडीला' पाच वर्षांपूर्वी 'निर्मल ग्राम पुरस्कार' मिळाला. तेथील सर्व शौचालये एका रचनेची असून, सांडपाण्याचा शंभर टक्के निचरा होतो. शिवारात पडणारे पाऊस पाणी शिवारात अडवले जात आहे. बालविवाह थांबले आहेत. गावात मटका, दारू, जुगार, गुटखा नाही, गाव पूर्ण व्यसनमुक्त आहे. सावकारमुक्त आहे. एक गाव एक पाणवठा, एक गाव एक गणपती, या संकल्पना व मोहिमा राबविल्या जातात. काटेवाडीतील प्राथमिक शाळेस साने गुरुजी स्वच्छ शाळा स्पर्धेतील प्रथम पारितोषिक मिळाले आहे. सर्व शेतकरी ठिबक सिंचन पद्धती राबवतात. हे गाव शंभर टक्के बचत करणारे आहे. गावातील सर्व सरकारी कार्यालये 'ग्राम सचिवालय' या एकाच इमारतीत आहेत. महसूल, बांधकाम, तलाठी कार्यालय, कोतवाल, एकाच इमारतीत बाजूला प्राथमिक आरोग्य केंद्र, प्रत्येक घरात चोवीस तास पाणी.

थोडक्यात विविध मुख्यमंत्र्यांच्या कारकिर्दीत अर्थसंकल्पाच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्राचा कायापालट करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या विकासाची गती, त्यास लागलेल्या फटी याबद्दल चर्चा होऊ शकते. त्याबाबत टीकाही करता येईल आणि प्रस्तुत लेखकाने तशी ती अनेकवेळा केलीही आहे. परंतु मागच्या ६२ वर्षांत काहीच प्रगती झाली नाही. असा विरोधी पक्षांप्रमाणे एकारलेला आणि कंटाळी सूर लावण्याचेही कारण नाही.!

२०१२-१३ चा अर्थमंत्री अजितदादा पवार यांनी सादर केलेला अर्थसंकल्प १५२ कोटी रुपयांची शिल्लक दाखवितो. या अर्थसंकल्पाची शक्तीस्थाने आणि वैगुण्ये दोन्ही दाखविता येईल. परंतु येथे ऊहापोह करायचा आहे तो ग्रामीण महाराष्ट्राचा. या दृष्टीने डोंगरी आदिवासी भागातील छोटी गावे बारमाही रस्त्यांनी तालुक्याच्या गावांना जोडणारी 'यशवंतराव चव्हाण ग्रामसडक योजना' अत्यंत महत्त्वाची आहे. प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या निकषात न बसणाऱ्या समता क्षेत्रातील ५०० पेक्षा कमी तर डोंगरी आदिवासी पट्ट्यातील २५० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ५००० पाडे-वाड्यांना तालुका मुख्यालय किंवा बाजारपेठेतही बारमाही रस्त्याने जोडण्यात येणार आहे. त्यासाठी शंभर कोटी रुपयांची तरतूद आहे. त्यामुळे दुर्गम भागातील शेतीमाल वेगाने बाजारपेठांपर्यंत पोहोचविता येईल. परिणामी तालुक्याला शिकायला जाणे, तेथील आरोग्य सुविधांचा लाभ घेणे शक्य होईल.

दारू, गांजा, भांग, अफीम । जुगार, वेश्यादि वाईट काम
यांचे उरू न द्यावे नाम । आपुल्या गावी



महाराष्ट्र ग्रामीण हमी योजनेची तरतूद ७४५ कोटींवरून ८५० कोटी रुपयांवर नेण्यात आली आहे. अर्थात ही योजना पूर्वीइतक्याच जोमाने राबवली जाणेही जिकिरीचे आहे. ती अनुत्साहाने व नाइलाजाने राबवली जाता कामा नये.

कृषी क्षेत्राच्या विकासासाठी (राष्ट्रीय कृषी विकास योजना, एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम, पीक कर्जावरील व्याज सवलत वीजदर सवलत, कृषीपंप अनुशेष भरणे, जलक्षेत्र सुधारणा प्रकल्प, कोरडवाहू शेती विकास, वेगवर्धिक सिंचन प्रकल्पांना चालना) ६५०० कोटी रुपयांची भरघोस तरतूद करण्यात आली आहे.

लागवडीखाली सिंचनाच्या क्षेत्राची राष्ट्रीय सरासरी ४५ टक्के आहे, तर आपल्याकडील फक्त १७ टक्के. या परिस्थितीत बदल करण्यासाठी दादांनी काही ठोस उपाय योजले आहेत. शेतीचा विकास झाला नाही, तर एकट्या सेवा क्षेत्राच्या बळावर आपली प्रगती होऊ शकणार नाही. आणि शेतीची दुरवस्था झाली तर शहरात लोंढे वाढतील. राज्याची स्वयंपूर्णता नष्ट होणे परवडणारे नाही. त्यामुळे जनता महागाईच्या ज्वाळांमध्ये वेढली जात असते.

दहा वर्षांपूर्वी राज्याच्या कृषीविकासाचा दर १५ टक्के होता तो आज पाच टक्के होतो, याचा अर्थ कुठेतरी काहीतरी चुकले आहे. म्हणूनच अर्थसंकल्पामधील शेतीवर दिलेला भर आश्वासक वाटतो. विशेषत: विदर्भ, खानदेश व मराठवाडा शेतीत खूप मागे पडला आहे.

राज्यपालांच्या निर्देशानुसार विदर्भास २२०० कोटी, तर मराठवाड्यास १०२७ कोटी सिंचनासाठी मिळणार आहेत. आता गेल्या सहा सात वर्षात वर्धित सिंचन योजनेतून १० हजार कोटी रुपये देण्यात आले आहेत. पीकहानी बद्दल २००० कोटी रुपयांची नुकसान ( सोयाबीन, भात, कापूस) भरपाई दिली गेली. शेतकऱ्यांना केंद्र व राज्य सरकारने मिळून १३ हजार कोटी रुपयांची भरपाई दिली. विदर्भासाठी मुख्यमंत्र्यांनी १०६५ कोटीचे, तर पंतप्रधानांनी ३६५० कोटी रुपयांचे पॅकेज दिले. परंतु या निधीचे योग्य पद्धतीने वाटप झाले असते, तर परिस्थिती बरीच सुधारली असती,

दारिद्र्यरेषेखालील तसेच आदिवासी वीजग्राहक, राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेतील वीजग्राहक व कृषी वीजग्राहकांच्या वीजबिलाच्या थकबाकीवरील व्याजात सवलत देण्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी केली आहे. महावितरणच्या खात्यात वर्षानुवर्ष दिसणारी १७०० कोटी रुपयांची दंड व व्याजाची रक्कम त्यांनी निर्लेखित केली आहे. यामुळे वीज मंडळाचा ताळेबंद 'स्वच्छ' होईल. शिवाय कृषिपंपधारक शेतकऱ्यांच्या थकबाकी वसुलीसाठी राबविलेल्या कृषी संजीवनी योजनेचा फारसा फायदा महावितरणला याआधी झालेला नाही, हे लक्षात घ्यायला हवे. मात्र त्यांनाही व्याजात सवलत देण्यात आलेली नाही.

राज्यात १८ हजार विहिरी बांधण्यात येणार आहेत व ३००० शेततळी बांधली जाणार आहेत. शेतीचा पाणीपुरवठा मिळेल त्या मार्गाने वाढवण्याचा प्रयत्न करणे निकडीचेच होते. पर्यटनासाठी २२८ कोटी रु. बाजूला ठेवताना कोकणाचा विशेष विचार झाला आहे. कोकणात सुविधा वाढल्यास लाखो पर्यटक कोकणात येतील आणि कोकणचा कॅलिफोर्निया होण्याबरोबरच राज्याचाही फायदा होईल. कारण हे पर्यटक राज्याच्या इतर भागातही जातील.

इस्रायलमधील शेती ही ज्ञानप्रधान आणि उच्च तंत्रज्ञानाने सबळ झालेली आहे. उलट आपल्याकडे शेती पदवीधरांना शेती करायला आवडत नाही! ते नोकरीच्या शोधात आहेत. कारण उन्हातान्हात राबून शेती करण्यापेक्षा खाजगी सरकारी कार्यालयात नोकरी ही फायद्याची असे त्याला वाटते. त्यामुळे शेती व ग्रामीण भाग डळमळीत अवस्थेत आहे. हे चित्र पालटण्याकरिता भाजीपाला, फळे, फुले, यांना बाजारपेठेपर्यंत पोहोचवण्यासाठी मूलभूत सोई द्याव्या लागतील. इस्रायलने 'अॅग्रेस्को' (अॅग्रिकल्चर एक्स्पोर्ट कंपनी) ही संस्था स्थापन करून, शेतकऱ्यांना एकत्र करून, त्यांचा माल निर्यात करण्याचे काम कार्यक्षमतेने केले. महाराष्ट्रात तशी एखादी संस्था स्थापन झाली पाहिजे. शेती मालाच्या बाजारपेठांमध्ये सुधारणा होऊन ग्राहकांना शेतकऱ्यांचा माल थेटपणे मिळाला पाहिजे. तसेच गावांमध्ये पायाभूत सुविधा वाढल्यास शहरांमधला व्यापारी वा उद्योजक मोठ्या प्रमाणात खेड्यात जायला लागेल. लोंढ्यांची ही रिव्हर्स प्रक्रिया सुरू व्हायला हवी. शेती, वीज व रस्त्यांना अग्रक्रम देऊन लोकशाही आघाडी सरकारने अर्थव्यवस्थेचा ढासळलेला पाया सावरण्याच्या दिशेने प्रयत्न केला आहे.

**जे का रंजले गांजले । त्यांसी म्हणे जो आपुले।।**

ही तुकोबांची भावना राज्यकर्त्यांच्या ठायी आहे, असा प्रत्यय त्यांच्या कामातूनही येवो, एवढीच अपेक्षा!

**संपर्क : ९८२०४७९६८८**

++

## (पान २० वरून) आपला विकास आपल्या हाती

त्यामुळे परस्परात स्पर्धा न ठेवता विशिष्ट अटी पूर्ण करणाऱ्या सर्वच गावांना विकास निधी देण्याच्या विकास योजनांची अंमलबजावणी करण्यात आली. तंटामुक्त ग्राम अभियान व केंद्र पुरस्कृत निर्मलग्राम योजना ही याची ठळक उदाहरणे होत. हगणदारीमुक्त किंवा तंटामुक्त होणाऱ्या सर्वच गावांना विकास निधी देऊन त्या गावांचा विकास त्यांनी स्वत: करावा अशीही संकल्पना आहे. शासन व ग्राम समूह या दोघांच्या आर्थिक सहभागीदारीतून गावाचा विकास करावा अशी एक नवी संकल्पना राबविण्यात येत आहे. यशवंत ग्रामसमृद्धी योजनेचा याबाबत उल्लेख करावा लागेल.

परंतु वरील सर्व प्रयोगांमध्ये असे लक्षात आले की, ज्या ठिकाणी ग्रामीणसमूह पूर्वीपासूनच संघटित व जागृत आहे तीच गावे हा विकासनिधी प्राप्त करतात. म्हणून सर्वच गावांनी संघटित होऊन प्रथम काही सुधारणा करावी, झेपेल तेवढी सुरुवात करावी व कालांतराने सुधारणा टप्प्याटप्प्याने अंमलात आणाव्यात असे धोरण ठरविण्यात आले. या विचारातूनच ''सुधारणा करा, कामगिरी दाखवा, विकास निधी प्राप्त करा, सातत्याने करीत रहा'' या संकल्पनेवर आधारित पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजना सुरू केली गेली. गावांनी सामूहिक पद्धतीने प्रयत्न व सुरुवात करून क्षमता वाढवीत नेल्यास दरवर्षी सातत्याने विकास निधी प्राप्त होऊ शकतो. त्यातूनच कालांतराने शाश्वत ग्रामविकास होवू शकेल. मात्र हा विकास करताना पर्यावरणाचे भान ठेवले पाहिजे. नैसर्गिक साधनसंपत्तीचा अवास्तव उपयोग केल्यास होणारा विकास शाश्वत होणार नाही तर तो मानवजातीच्या मुळावर येईल याची जाणीव या संकल्पनेतून देण्यात येत आहे. हा कार्यक्रम व ही संकल्पना राज्यात ग्रामीण विकासात आता रुजू लागली आहे.

**संपर्क : ९८६९२५९२१८**

++



प्रत्येक घरी जोडधंदा । सर्व स्त्री-पुरुष याचि छंदा
दूर करावया आपदा । जीवनाच्या लागावे

# आर्थिक घडी

## राज्याचा आर्थिक आढावा

- सन २०११-१२ मध्ये स्थूल राज्य उत्पन्नात ८.५ टक्के वाढ अपेक्षित
- सन २०१०-११ मध्ये राज्याचे निव्वळ उत्पन्न ९ लाख ८२ हजार ४५२ कोटी रुपये
- सन २०१०-११ मध्ये दरडोई राज्य उत्पन्न रुपये ८७.६८६
- सन २०१२-१३ मध्ये अपेक्षित महसुली उत्पन्न रुपये १३६७११ कोटी ७० लाख
- सन २०१२-१३ मध्ये अपेक्षित महसुली खर्च- रुपये १३६५५९ कोटी २१ लाख
- सन २०१२-१३ मध्ये अपेक्षित महसुली अधिक्य- रुपये १५२ कोटी ४९ लाख.

## राज्य योजना

- राज्याच्या वार्षिक योजनेचे आकारमान रुपये ४५ हजार कोटी
- अनुसूचित जाती उपयोजनेसाठी रुपये ४५९० कोटी
- आदिवासी उपयोजनेसाठी रुपये ४००५ कोटी
- जिल्हा सर्वसाधारण योजनेसाठी रुपये ४९५० कोटी, मागील वर्षीच्यातुलनेत रुपये ६३० कोटीची वाढ



## कृषी व संलग्न क्षेत्र

- राष्ट्रीय कृषी विकास योजनेसाठी रुपये ४१५ कोटीचा निधी
- एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमासाठी रुपये १०५ कोटी
- कृषी विकासाच्या विविध उपक्रमांसाठी रुपये २८४ कोटीची तरतूद
- शेतकऱ्यांना वीज दरात सवलतीसाठी रुपये २५०० कोटी तरतूद
- कृषी पंप विद्युतीकरणासाठी १ लाख ५० हजार इतके लक्ष्य निर्धारित
- कृषी पंप विद्युतीकरण अनुशेष पूर्तीसाठी रुपये १८५ कोटीचा नियतव्यय प्रस्तावित
- अल्पव्याज दरात पीक कर्ज योजनेच्या व्याप्तीत वाढ, यासाठी रुपये १३८ कोटीचा नियतव्यय प्रस्तावित
- विदर्भातील ६ जिल्ह्यामध्ये कृषी विकास प्रकल्पासाठी रुपये ४० कोटी ५० लाखाची तरतूद.
- जागतिक बँक सहाय्यित महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्पांतर्गत पणन विषयक पायाभूत सुविधांसाठी रुपये ६५ कोटी ५६ लाख खर्च अपेक्षित.
- महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेसाठी रुपये ८५० कोटी
- महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पांतर्गत कालवे व वितरणप्रणाली पुन:स्थापना व धरणाची सुरक्षा यासाठी रुपये ४०० कोटी
- वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रमासाठी रुपये २१२९ कोटी १३ लाख
- कोरडवाहू शेतीसाठी रुपये २०० कोटी जादा निधी.



## उद्योग

- औद्योगिक प्रोत्साहन अनुदानासाठी रुपये १४८० कोटीची तरतूद. १८६,००० रोजगार निर्मिती अपेक्षित.
- यंत्रमाग धारकाच्या वीज दरात सवलतीसाठी रुपये ५०० कोटीची तरतूद
- वस्त्रोद्योग धोरणाच्या अंमलबजावणीसाठी रुपये ९३ कोटी ८३ लाख
- राज्याचे नवीन औद्योगिक धोरण लवकरच जाहीर होणार.
- नव्याने स्थापन होणाऱ्या मध्यम व लघू उद्योगांना वीज दर, व्हॅट आकारणी सवलत, व्याज अनुदान देण्याचा मानस.



## आरोग्य

- राजीव गांधी जीवनदायी योजनेसाठी रुपये ३२४ कोटी
- रुग्णालयाच्या इमारती, कर्मचारी निवासस्थाने बांधकामासाठी रुपये २६० कोटी
- आपत्कालीन वैद्यकीय सेवेसाठी रुपये ७३ कोटी
- अलिबाग, नंदुरबार, सातारा, मुंबई येथील नवीन वैद्यकीय महाविद्यालयांच्या प्राथमिक कामासाठी आवश्यक तरतूद.
- जे. जे. हॉस्पिटल येथे हायराईज्ड सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल उभारणीच्या प्राथमिक कामासाठी आवश्यक नियतव्यय.



## पायाभूत सुविधा

- रस्ते विकासासाठी रुपये २८९९ कोटीचा नियतव्यय
- राज्यातील रेल्वे प्रकल्प, पूरक उद्योग, यासाठी आवश्यक तरतूद
- विमानतळ विकास, मिहान प्रकल्प यासाठी रुपये ४३८ कोटी
- यशवंतराव चव्हाण ग्राम सडक योजना रुपये १०० कोटी.

गावचे चार सज्जन मिळोनि । अनिष्ट प्रथा बंद कराव्या त्यांनी
ज्याने गावास पावे नुकसानी । न ठेवावे ते





## पाणीपुरवठा व स्वच्छता

- राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमासाठी रुपये १४४४ कोटी ८० लाख
- सुजल व निर्मल अभियानासाठी रुपये १७९ कोटी
- नागरी भागात दलितांसाठी वैयक्तिक नळजोडणी व शौचालय बांधकामासाठी विशेष घटक योजनेंतर्गत रुपये ५० कोटी.
- संपूर्ण स्वच्छता कार्यक्रमाचा राज्य हिस्सा व संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानासाठी रुपये ४५ कोटी ३७ लाख.



## पर्यटन व सांस्कृतिक कार्य

- पर्यटन विषयक विविध योजनांसाठी रुपये २२८ कोटीची तरतूद
- लोणार सरोवर जतन व संवर्धन प्रकल्प, सिंधुदुर्ग येथे सीवर्ल्ड-थिमपार्क प्रकल्प, कास पठार विकास, कोकणातील समुद्र रस्ते सुधारणा व हाऊसबोट प्रकल्प यांना आवश्यक तरतूद.
- भारतीय चित्रपटसृष्टीच्या शतक महोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांसाठी आवश्यक तरतूद.
- भारतरत्न पंडित भीमसेन जोशी यांच्या नावाने शास्त्रीय संगीत प्रोत्साहन योजना सुरू करण्याचा मानस.
- तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रमासाठी भरीव तरतूद.



## नगर विकास व गृहनिर्माण

- जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानासाठी रुपये २२०० कोटी
- महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानासाठी रुपये २५० कोटी
- मुंबई नागरी परिवहन प्रकल्पातील टप्पा एक पूर्ण, टप्पा दोनसाठी राज्याचा हिस्सा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत रुपये ३५५ कोटी .
- मुंबई महानगर प्रदेशातील ठाणे व रायगड जिल्ह्यात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सन २०१२-१३ साठी ३५० कोटी खर्च अपेक्षित.
- शहरी गरिबांना मूलभूत सुविधा पुरविणे या योजनेसाठी केंद्र व राज्य हिश्शाची एकूण रुपये ८६७ कोटी ८९ लाख तरतूद.
- एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमासाठी रुपये ४१३ कोटी १३ लाख राज्य हिस्सा.
- ५० टक्क्यांपेक्षा जास्त अनुसूचित जातीचे रहिवासी असलेल्या झोपडपट्ट्यात नागरी सुविधा विकसित करण्यासाठी विशेष घटक योजनेंतर्गत रुपये ६० कोटी.



## शिक्षण व क्रीडा

- राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानासाठी केंद्र हिश्यासह रुपये ५०० कोटी
- सर्व शिक्षा अभियानासाठी रुपये २१८८ कोटी २६ लाख
- शालेय पोषण आहार योजनेसाठी रुपये १५३४ कोटी ५२ लाख
- औद्योगिक प्रशिक्षण संस्था बळकटीकरणासाठी रुपये २८ कोटी ७५ लाख
- नक्षलग्रस्त भागातील युवक कौशल्य विकासासाठी रुपये १६ कोटी ९८ लाख
- क्रीडा संकुलासाठी रुपये ९० कोटी
- मानव विकास कार्यक्रमासाठी रुपये ३५९ कोटी ३३ लाख





देवाचिया नावाखाली । काही देतात जीव बळी
बंद करावी प्रथा असली । भावना सुधारोनि लोकांची



## ऊर्जा

- महानिर्मितीच्या विविध प्रकल्पांसाठी रुपये १५०० कोटी प्रस्तावित भाग भांडवल
- महावितरणकरिता शासन भाग भांडवल रुपये ६१५ कोटी
- अपारंपरिक उर्जा विकास योजनेसाठी रुपये ७५ कोटी नियतव्यय
- थकित वीजबिलासाठी महावितरणकडून अंदाजे १७०० कोटीची व्याज सवलत.

## सामाजिक न्याय

- दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील ज्येष्ठ नागरिकांकरिता विविध निवृत्ती वेतन योजनासाठी रुपये १३१० कोटी ३७ लाख
- मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी रुपये १२३० कोटी ६० लाख
- अनुसूचित जातीच्या कुटुंबांना घरकुल अर्थसहाय्यासाठी रुपये ४२५ कोटी
- आदिवासी विद्यार्थी, आश्रमशाळा व वसतिगृहे इमारतींसाठी रुपये ४०० कोटी
- आदिवासी घटकासाठी घरकुल योजना प्रस्तावित
- आदिवासी क्षेत्रातील युवकांच्या कौशल कार्यक्रमासाठी २५ कोटीचा नियतव्यय प्रस्तावित.
- आदिवासी विद्यार्थ्यांकरिता स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण कार्यक्रम
- पारधी समाजाच्या विकासासाठी नवीन योजना, त्यासाठी रुपये २५ कोटीचा नियतव्यय.
- इंदिरा आवास योजना रुपये ५७३ कोटी ९८ लाख
- अल्पसंख्यांकांसाठीच्या योजनांना आवश्यक नियतव्यय.

## वन विभाग

- वन व्यवस्थापन प्रकल्पाकरिता रुपये ७७ कोटी

## मराठी भाषा विकास

- मुंबईमध्ये भाषा भवन बांधण्याचा मानस
- दुर्मीळ ग्रंथाचे ई-बुक तयार करणे
- विश्वकोशाचे खंड इंटरनेटवर उपलब्ध करणे.
- महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागात मराठी भाषा व संस्कृती जोपासण्यासाठी रुपये ५ कोटीची तरतूद.

## कामगार कल्याण

- घरेलु कामगार कल्याण योजनेसाठी रूपये ६ कोटी ५० लाख
- बाल कामगार प्रथेविरुद्ध जनजागृती व इतर प्रकल्पासाठी रुपये १० कोटी.

## गृह विभाग

- पोलीस दल आधुनिकीकरणाकरिता रुपये १५६ कोटी ५५ लाख
- पोलिसांच्या कार्यालयीन व निवासी इमारतींकरिता रुपये २५६ कोटी ७५ लाख .

## इमारत बांधकाम

- महसूल विभागातील प्रशासकीय व कार्यालयीन इमारतीसाठी रुपये १४० कोटीची तरतूद.
- ग्रामविकास विभागांतर्गतच्या प्रशासकीय इमारतीसाठी रुपये ६० कोटी
- अंगणवाडी बांधकाम- रुपये २५३ कोटी ५३ लाख
- गोदाम बांधणीसाठी रुपये २५ कोटी
- शासकीय, निमशासकीय इमारती रुपये २१५ कोटी ३२ लाख
- न्यायालयाच्या इमारतीकरिता रुपये २६२ कोटी.

## अर्थसंकल्पात ग्रामविकास

**महाराष्ट्र ग्रामीण रोजगार :** महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेसाठी सन २०१२-१३ करिता रुपये ८५० कोटी इतका नियतव्यव प्रस्तावित असून, त्यापैकी राज्य रोजगार हमी योजना व महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा राज्य हिस्सा मिळून रुपये ५९० कोटी, जवाहर विहिरींसाठी रुपये २०० कोटी, फलोत्पादनासाठी रुपये ५० कोटी व शेततळ्यांसाठी रुपये १० कोटी प्रस्तावित आहेत.

**ग्रामीण स्वच्छता अभियान :** ग्राम स्वच्छता, आरोग्य आणि पर्यावरणासाठी महत्त्वाचे अभिमान ठरलेल्या 'हागणदारीमुक्त गाव' संकल्पेनस राज्यातील ग्रामीण जनतेकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून ९ हजार ८२ ग्रामपंचायती व ९ पंचायत समित्यांना केंद्र शासनाचा निर्मल ग्राम पुरस्कार प्राप्त झालेला आहे. संपूर्ण स्वच्छता अभियान व गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान या कार्यक्रमासाठी राज्य हिश्यापोटी रुपये ४५ कोटी ३७ लाख इतका नियतव्यय सन २०१२-१३ करीता प्रस्तावित आहे. राज्यातील ग्रामीण भागात १५ हजारपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या ९४ गावात सांडपाणी व्यवस्थापनासाठी रुपये १०३ कोटी किंमतीच्या प्रकल्पास मान्यता देण्यात आली आहे.

**इंदिरा आवास योजना :** इंदिरा आवास योजनेंतर्गत ज्या लाभार्थ्यांकडे घरकुल बांधण्यासाठी स्वत:ची जागा नाही, त्यांना १०० ते २५० चौ.मी. चा भूखंड खरेदी करण्यासाठी रुपये १२ हजार पर्यंत किंवा प्रत्यक्ष खर्च यापैकी जी कमी आहे ती रक्कम अर्थसहाय्य म्हणून देण्यात येते. सन २०१२-१३ साठी रुपये ५७३ कोटी ९८ लाख इतका नियतव्यय प्रस्तावित आहे. त्याद्वारे १ लाख ६५ हजार १७६ इतक्या घरकुलांचे बांधकाम अपेक्षित आहे.

सुसज्ज असावेत गावचे तरुण । कोणतेहि संकट येता ऐकून
आपुली सर्व कामे सोडून । धाव घ्यावी तयांनी



# ‘यशवंत’ महाराष्ट्र

## डॉ. सुरेखा मुळे

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, दूरदृष्टी असलेले मुख्यमंत्री, साहित्य, कला, समाजजीवन, उद्योग, सहकार, कृषी, शिक्षण, ग्रामविकास अशा विविध क्षेत्रात लक्ष्यवेधी आणि मूलगामी स्वरूपाचं काम करणारं व्यक्तिमत्त्व म्हणून आपल्याला स्व. यशवंतराव चव्हाण यांच्याकडे बघावं लागतं. ग्रामपंचायत ही लोकशाहीचा पाया आहे असे ते मानत. ग्रामपंचायत ही केवळ खेड्यांचा कारभार चालविणारी यंत्रणा नसून तिच्यावर गावातील समाज जीवनाच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारी आहे अशी त्यांची धारणा होती. खेडी स्वावलंबी व्हावीत, समृद्ध लोकशाही आणि विकासाची बीजे खेड्यात रुजावीत म्हणून त्यांनी केलेले सत्तेचे विकेंद्रीकरण हे एक महत्त्वाकांक्षी पाऊल होते.

**यशवंत पंचायतराज अभियान**

‘समृद्ध ग्राम- संपन्न ग्रामस्थ’ची संकल्पना प्रत्यक्षात आणताना या संस्थांनी केलेली कामगिरी लक्षात घेऊन उत्कृष्ट कार्य करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांना आणि गुणवंत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मदिनी ‘यशवंत पंचायतराज अभियानांतर्गत’ विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. योजनेचे हे सातवे वर्ष आहे.

**महाराष्ट्र देशाचा मुकुटमणी**

केंद्रीय नियोजन आयोगाने काही वर्षांपूर्वी महाराष्ट्राने केलेल्या कामगिरीचा गौरव करतांना महाराष्ट्राला ‘देशाचा मुकुटमणी’ असा किताब दिला होता. किती खरे आहे ते! आजपर्यंत कितीतरी नावीन्यपूर्ण योजनांच्या अंमलबजावणीचे श्रेय महाराष्ट्राकडे जाते. यामध्ये माहितीचा अधिकार, रोजगार हमी योजना किंवा हगणदारीमुक्त गाव योजना यांचा ठळक उल्लेख करावा लागेल. या योजना राज्याने केवळ कागदावरच ठेवल्या नाहीत तर त्यांची यशस्वी अंमलबजावणीही केली. महाराष्ट्राचे हे योगदान देशपातळीवर सन्मानित झाले. राष्ट्रीय स्तरावर या योजना स्वीकारल्या जाऊन त्या देशभर राबविण्यात येऊ लागल्या. निर्मलग्राम योजनेत महाराष्ट्राने देशपातळीवर सातत्याने आपले अग्रस्थान कायम ठेवले. . .

**योजनेचा सन्मान**

महाराष्ट्राची ‘यशवंत पंचायतराज अभियान योजना’ देखील देशपातळीवर स्वीकारण्यात आली असून पंचायतराज मंत्रालय, भारत सरकार यांनी पंचायतराज व्यवस्थेच्या सक्षमीकरणासाठी काम करणाऱ्या राज्यांना तसेच राज्यातील पंचायतराज संस्थांना प्रोत्साहन देण्याचे निश्चित केले आहे. यासाठी ‘पंचायत सबलीकरण आणि उत्तरदायित्व प्रोत्साहन योजना’ त्यांनी सुरू केली असून या योजनेअंतर्गत राज्यात प्रथम येणारी जिल्हा परिषद, प्रथम येणाऱ्या दोन पंचायत समित्या (त्यातील एक अनुसूचित क्षेत्रात प्रथम येणारी पंचायत समिती) आणि प्रथम येणाऱ्या दोन ग्रामपंचायतीसह (त्यातील एक अनुसूचित क्षेत्रात प्रथम येणारी ग्रामपंचायत) प्रत्येक विभागातील २ अशा १२ ग्रामपंचायती अशा १४ ग्रामपंचायती राष्ट्रीय पातळीवर अनुदान मिळण्यास पात्र ठरतील.

**दृष्टिक्षेप ग्रामीण महाराष्ट्राकडे. . .**

महाराष्ट्राचे एकूण क्षेत्रफळ ३,०८,००० चौ. कि.मी. आहे. यामध्ये ग्रामीण भागाचे क्षेत्र २,८५,००० चौ.कि.मी इतके आहे. २०११ च्या जणगणनेनुसार राज्याची लोकसंख्या ११.१६ कोटी इतकी आहे त्यामध्ये ग्रामीण लोकसंख्या ६.१५ कोटी इतकी आहे. राज्यात ग्रामीण कुटुंबांची संख्या २०११ च्या जणगणनेनुसार १.३० कोटी इतकी आहे. राज्यात दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची संख्या ४५ लाख इतकी आहे. राज्यात ३३ जिल्हा परिषदा, ३५१ पंचायत समित्या आणि २७,८९६ ग्रामपंचायती आहेत. २७,८९६ ग्रामपंचायतींमध्ये १० हजार ते ५० हजार पर्यंत लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींची संख्या ३८९ इतकी आहे. ३५१ ब्लॉक मुख्यालयांपैकी १५० ब्लॉक मुख्यालयांमध्ये ५० टक्केपेक्षा अधिक रोजगार शेतीवर अवलंबून आहे, त्यामुळे त्या अजूनही ग्रामपंचायती आहेत.

राज्यात ५ हजारपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावांची संख्या १,३२६ इतकी आहे. या गावांमध्ये विकास केंद्र बनण्याची क्षमता असल्याने या गावांना विशेष सुविधा पुरविणे आवश्यक आहे. एवढ्या मोठ्या लोकसंख्येसाठी आणि त्यांच्या विकासासाठी काम करतांना ते नियोजनपूर्वक केल्यास त्याचे दृश्य फलित चांगले दिसू शकतात हे लक्षात घेऊन त्यांनी केलेल्या कामांचे विविध निकषांच्या





ऐसी करावी ग्रामसेवा । हेचि कर्म आवडे देवा
संशय काही मनी न धरावा । तुकड्या म्हणे

## यशवंत पंचायतराज अभियानांतर्गत राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायती २०११-१२

### जिल्हा परिषद (राज्यस्तर)

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा परिषद, ठाणे | प्रथम पारितोषिक | रु.२५,००,०००/- रोख रक्कम, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र |
| २ | जिल्हा परिषद, पुणे | द्वितीय पारितोषिक | रु.१५,००,०००/- रोख रक्कम, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र |
| ३ | जिल्हा परिषद, चंद्रपूर | तृतीय पारितोषिक | रु.१०,००,०००/- रोख रक्कम, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र |

### पंचायत समिती (राज्यस्तर)

| | | | |
|---|---|---|---|
| १ | पंचायत समिती भिवंडी, जिल्हा ठाणे | प्रथम पारितोषिक | रु.१५,००,०००/- रोख रक्कम, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र |
| २ | पंचायत समिती, बारामती, जिल्हा पुणे. | द्वितीय पारितोषिक | रु.१२,००,०००/- रोख रक्कम, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र |
| ३ | पंचायत समिती, हिंगोली, जिल्हा हिंगोली | तृतीय पारितोषिक (संयुक्त) | रु.५,००,०००/-/- रोख रक्कम, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र |
| | पंचायत समिती, मोहाडी जिल्हा भंडारा | | रु.५,००,०००/- रोख रक्कम, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र |

### ग्रामपंचायत (राज्यस्तर)

| | | | |
|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत पिंगुळी, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग | प्रथम पारितोषिक | रु.७,००,०००/- रोख रक्कम, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र |
| २ | ग्रामपंचायत बिड (सितेपार), ता. मोहाडी, जि. भंडारा | द्वितीय पारितोषिक | रु.५,००,०००/- रोख रक्कम, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र |
| ३ | ग्रामपंचायत कांदळी, ता. जुन्नर , जि. पुणे | तृतीय पारितोषिक | रु.३,००,०००/- रोख रक्कम, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र |

आधारे मूल्यमापन करून प्राप्त गुणांच्या आधारे त्यांचे श्रेणीनिहाय वर्गीकरण करण्याचे महत्त्वाकांक्षी पाऊल ग्रामविकास विभागाने टाकले. त्यामुळे किती पंचायतराज संस्थांनी अत्युत्कृष्ट-उत्कृष्ट काम केले तर किती ग्रामपंचायती त्यात मागे राहिल्या हे स्पष्ट झाले त्यामुळे गुणात्मक आणि दर्जात्मक सुधारणांची गरज स्पष्ट झाली. त्याचे नियोजन करून प्रभावी अंमलबजावणीची दिशा निश्चित झाली. गावातील जनतेला पारदर्शक आणि लोकाभिमुख प्रशासन देण्याच्यादृष्टीने स्थानिक स्वराज्य संस्थांनी दर्जेदार आणि तत्पर सेवा देणे आवश्यक आहे. यातून 'ग्राम स्वराज्या'ची संकल्पना साकारली जाणार असून विभागाची 'समृद्ध ग्राम-संपन्न ग्रामस्थ'ची संकल्पना प्रत्यक्षात येणार आहे.

**श्रेणीनिहाय वर्गीकरण**

राज्याच्या ग्रामविकास विभागाने जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतींची विविध निकषांच्या आधारे तपासणी करून त्यांचे अ +, अ, ब आणि क असे श्रेणीनिहाय वर्गीकरण करण्याचे धाडस दाखवले आहे. पंचायतराज संस्थांनी अधिक लोकाभिमुख होऊन पारदर्शीपणे काम करतांना गावातील नागरिकांना तत्पर आणि दर्जेदार सेवा उपलब्ध करून देणे अपेक्षित असते. या अपेक्षांना या संस्था किती खऱ्या उतरल्या, किती संस्थांनी उत्कृष्ट काम केले तर किती संस्था हे सर्व काम करताना मागे राहिल्या याचं वस्तुनिष्ठ मूल्यमापन करणं आणि ते सत्य तितक्याच खिलाडूवृत्तीने स्वीकारून स्वत:च्या कामात सुधारणा करण्याचा संकल्प करण्यास धाडस लागते. त्यामुळे विभागाने दाखविलेल्या या धाडसाचे सर्वत्र कौतुक होताना दिसत आहे.

## पंचायत

| अ.क्र. | जिल्हा | एकूण संख्या | अ+ |
|---|---|---|---|
| १ | ठाणे | १३ | भिवंडी, शहापूर, पालघर, डहाणू, अंबरनाथ, तलासरी, वाडा |
| २ | रायगड | १५ | अलिबाग, पेण, श्रीवर्धन उरण, कर्जत, रोहा, सुधागड, माणगाव, पनवेल |
| ३ | रत्नागिरी | ९ | मंडणगड, गुहागर |
| ४ | सिंधुदुर्ग | ८ | देवगड, कणकवली, कुडाळ, वेंगुर्ले, दोडामार्ग, मालवण, वैभववाडी |
| ५ | नाशिक | १५ | - |
| ६ | धुळे | ४ | - |
| ७ | नंदूरबार | ६ | - |
| ८ | जळगांव | १५ | रावेर |
| ९ | अहमदनगर | १४ | शेवगांव, संगमनेर, राहुरी, पाथर्डी, अकोले, नेवासा, श्रीगोंदा, कर्जत |
| १० | पुणे | १३ | बारामती, दौंड, शिरुर, मावळ, वेल्हे, खेड, पुरंदर, मुळशी, भोर |
| ११ | सातारा | ११ | महाबळेश्वर, फलटण, सातारा, खंडाळा, |
| १२ | सांगली | १० | खानापूर, वाळवा, शिराळा, |
| १३ | सोलापूर | ११ | मोहोळ |

मी समजतो गावहि शरीर । त्यास राखावे नेहमी पवित्र
त्यानेच नांदेल सर्वत्र । आनंद गावी

# समित्यांचे मूल्यमापन गुण आणि श्रेणी (विभागस्तरीय गुणानुक्रमानुसार)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **श्रेणी** | १४ | कोल्हापूर | १२ | गडहिंग्लज, राधानगरी, | कागल, आजरा, शिरोळ, पन्हाळा, भुदरगड चंदगड, शाहूवाडी, हातकणंगले, करवीर, |
| **अ** | | | | | |
| मुरबाड, विक्रमगड, कल्याण, | १५ | औरंगाबाद | ९ | वैजापूर | कन्नड, खुलताबाद, औरंगाबाद, सोयगांव |
| जव्हार, वसई, मोखाडा | १६ | जालना | ८ | घनसावंगी, | अंबड, बदनापूर, जालना, जाफ्राबाद, मंठा |
| | १७ | परभणी | ९ | – | पूर्णा, परभणी, पालम, गंगाखेड, मानवत |
| मुरुड, तळा, म्हसळा, | | | | | |
| महाड, खालापूर, पोलादपूर | १८ | हिंगोली | ५ | हिंगोली | औंढा, वसमत, कळमनूरी, |
| | १९ | बीड | ११ | – | वडवणी, आष्टी, माजलगाव, अंबाजोगाई, बीड, शिरुर-कासार, परळी |
| संगमेश्वर, लांजा, चिपळूण, | | | | | |
| दापोली, राजापूर, खेड | २० | नांदेड | १६ | – | नांदेड, अर्धापूर, हिमायतनगर, बिलोली, माहूर, मूदखेड, भोकर, देगलूर, मुखेड, उमरी, कंधार, किनवट, धर्माबाद, नायगाव, हदगांव |
| सावंतवाडी | | | | | |
| | २१ | उस्मानाबाद | ८ | – | उमरगा, भूम, कळंब, उस्मानाबाद |
| नाशिक, दिंडोरी, कळवण, देवळा, | | | | | |
| बागलाण, नांदगाव, इगतपुरी, येवळा, | २२ | लातूर | १० | शिरुर अनंतपाळ, देवणी, | अहमदपूर, चाकूर, औसा, निलंगा, जळकोट, |
| त्रंबकेश्वर, मालेगाव, निफाड, पेठ, | २३ | बुलढाणा | १३ | – | खामगाव, संग्रामपूर, नांदूरा |
| सिन्नर, चांदवड | २४ | अकोला | ७ | – | – |
| | २५ | वाशिम | ६ | – | – |
| शिंदखेडा, शिरपूर, धुळे | २६ | अमरावती | १४ | अचलपूर | धामणगाव रेल्वे, नांदगांव खंडेश्वर, चादूर रेल्वे, मोर्शी, तिवसा, दर्यापूर, वरुड, अमरावती. |
| अक्कलकुवा, तळोदा, शहादा, | | | | | |
| धडगाव, नंदूरबार | २७ | यवतमाळ | १६ | पुसद, दिग्रज | उमरखेड, वणी, आर्णी, दारव्हा, राळेगाव, पांढरकवडा, महागाव, बाभुळगाव, नेर, मारेगाव, कळंब, घाटंजी, झरी-जामणी |
| धरणगाव, भुसावळ, | | | | | |
| ऐरंडोल, भडगाव, अमळनेर, | | | | | |
| चोपडा, यावल, पारोळा, | २८ | वर्धा | ८ | समुद्रपूर, सेलू, वर्धा, हिंगणघाट, आष्टी, आर्वी, देवळी, कारंजा | – |
| बोदवड, जळगाव, मुक्ताईनगर, | | | | | |
| पाचोरा, चाळीसगाव | २९ | नागपूर | १३ | पारशिवनी, नागपूर, काटोल, मौदा, हिंगणा, कळमेश्वर, सावनेर, कुही, उमरेड, | नरखेड, कामटी, भिवापूर, रामटेक |
| श्रीरामपूर, पारनेर, राहाता, | | | | | |
| कोपरगाव, अहमदनगर | | | | | |
| | ३० | भंडारा | ७ | मोहाडी, लाखांदूर, साकोली, तुमसर, भंडारा | लाखनी, पवनी |
| इंदापूर, आंबेगाव, | | | | | |
| जुन्नर, हवेली, | ३१ | गोंदिया | ८ | आमगाव, देवरी, तिरोडा | सालेकसा, गोदिया, अर्जुर्नी/मोर. सडक/अर्जुनी, गोरेगाव |
| कराड, जावली (मेढा),कोरेगाव, | ३२ | चंद्रपूर | १५ | चंद्रपूर, गोंडपिंपरी, नागभिड, राजूरा, बल्लारपूर, जिवती, मूल, कोरपना, पोभूर्णा, भद्रावती | ब्रम्हपुरी, वरोरा, सावली |
| खटाव, वाई,पाटण, माण. | | | | | |
| आटपाडी, जत, कडेगाव, पलुस, | | | | | |
| क.महाकाळ, तासगाव, मिरज | | | | शिंदेवाही, चिमूर, | |
| | ३३ | गडचिरोली | १२ | देसाईगंज, कोरची | सिरोंचा, कुरखेडा, धानोरा, आरमोरी, एटापल्ली, गडचिरोली, चामोर्शी, अहेरी, मुलचेरा, भामरागड. |
| मंगळवेढा, उ.सोलापूर, माळशिरस, | | | | | |
| अक्कलकोट, पंढरपूर, माढा-कुर्डूवाडी, | | | | | |
| सांगोला, द. सोलापूर, बार्शी, करमाळा | | | | | |



जैसे आपण स्नान करावे । तैसे गावहि स्वच्छ ठेवीत जावे
सर्वचि लोकांनी झिजूनि घ्यावे । श्रेय गावाच्या उन्नतीचे

# असे आहेत निकष

## ग्रामपंचायत

- ग्रामपंचायतीची माहिती.
- ग्रामपंचायतीने घेतलेल्या सभा, सदस्यांची उपस्थिती, वर्षभरातील ठराव आणि स्थिती, ग्रामपंचायतीमार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांचा आढावा.
- वर्षभरात घेतलेल्या ग्रामसभा, महिला ग्रामसभा, ग्रामसभेतील सामाजिक उपस्थिती, लाभार्थ्यांची उपस्थिती, ग्रामसभेत घ्यावयाचे सामाजिक लेखा परीक्षण.
- ग्रामपंचायतीचे सदस्य प्रशिक्षित आहेत का? ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचा आस्थापनाविषयक खर्च, कायम आणि हंगामी स्वरूपातील खर्च व्यवस्थापन.
- ग्रामपंचायतींचे वार्षिक नियोजन, त्यास ग्रामसभेची मान्यता, पंचायत समितीची मान्यता घेणे, अनिवार्य बाबींसाठी अंदाजपत्रकात तरतूद करणे.
- ग्रामपंचायतीने केलेली वसुली आणि उत्पन्न वाढीसाठी केलेले प्रयत्न.
- केंद्रीय-राज्य आणि ग्रामपंचायत योजनांची अंमलबजावणी.
- गावातील नागरिकांना दिलेल्या नागरी सुविधा.
- लेखा परीक्षण आणि पारदर्शकता, ईपंचायत.
- विविध अभियानात सहभाग घेऊन केलेली कामगिरी आणि मिळवलेली पारितोषिके.

## पंचायत समिती

- पंचायत समितीची माहिती.
- मासिक सभेतील सदस्यांची उपस्थिती, सदस्यांनी उपस्थित केलेले प्रश्न, तहकूब केलेल्या बैठका, बैठकींचे कार्यवृत्तांत, पारित व रद्द केलेले ठराव, अभिलेख वर्गीकरण.
- प्रशिक्षण कार्यक्रम, अधिकाऱ्यांच्या कामाचा आढावा, राजीव गांधी गतिमानता प्रशासकीय अभियानातील बक्षीस, कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकाच्या अहवालाची पडताळणी.
- वार्षिक कृती आराखडा व अंदाजपत्रक तयार करणे.
- निधीचा स्रोत निर्माण करणे.
- केंद्र व राज्य पुरस्कृत योजनेतील भौतिक व आर्थिक साध्य, राज्यस्तरीय अभियान, बंधमुक्त निधीचा खर्च, नागरी सेवेतील व समूह गटातील कार्यक्षमता, ग्रामपंचायत संगणकीकरण, कुटुंब नियोजन, कुपोषण निर्मूलन अभियानात केलेले काम.
- लेखाविषयक नोंदवह्या व तक्रारींचे निवारण.

## जिल्हा परिषद

- जिल्हा परिषदेची माहिती.
- घेतलेल्या सभा, सभांचे इतिवृत्त, पारित झालेले ठराव, आमसभा, जिल्हा परिषदांच्या स्थायी व विषय समित्यांचे कामकाज.
- जिल्हा परिषदेद्वारे पदभरती, प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन, अधिकाऱ्यांच्या कामाचा आढावा, कर्मचाऱ्यांच्या तक्रारींचे निवारण, निवृत्तिवेतन प्रकरणे निकाली काढणे इ. चा समावेश.
- दूरदर्शी आराखडे, अंदाजपत्रके तयार करणे व त्यातील महत्त्वाच्या घटकांची अंमलबजावणी, वार्षिक प्रशासन अहवाल इ. चा समावेश.
- जिल्हा परिषदांच्या उत्पन्नांचे नियोजन, उत्पन्नाचे नवीन स्रोत, देय रक्कमांची वसुली.
- केंद्रीय तसेच राज्याच्या योजनांमधील भौतिक व आर्थिक उद्दिष्टपूर्ती, अनुसूचित जाती जमातींसाठी व महिलांच्या विकासासाठी केलेला खर्च, नागरी सुविधांचा तपशील, समाजगटांसाठी राबविलेले उपक्रम, माहिती व शिक्षण संपर्कासाठी घेतलेले पुढाकार व जिल्हा परिषदमार्फत पुढाकार घेऊन केलेले विशेष प्रयत्न.
- जमाखर्चाचे लेखे, लेखापरीक्षण मुद्दे , तक्रारींचे निराकरण, माहितीचा अधिकार अर्जाची पूर्तता, तपासणी मुद्द्यांची पूर्तता, जिल्हा परिषदेअंतर्गत इंटरनेटची सुविधा असलेल्या पंचायत समित्या व ग्रामपंचायतींची संख्या, आय.एस.ओ. प्रमाणपत्र.
- अपारंपारिक ऊर्जास्रोतांच्या वापराबाबत पुढाकार.
- विभागीय/राज्य/राष्ट्रीय पातळीवर बक्षीस किंवा पारितोषिक जाहीर झाले आहे का, यशवंत पंचायत राज अभियान तथा पंचायत सबलीकरण आणि उत्तरदायित्व प्रोत्साहन योजनेमध्ये जिल्हा परिषद अधिनस्त ६०% पेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या पंचायत समितींची संख्या इत्यादींचा समावेश.

**संपर्क : ०२२-२२७९३७४३**

यशवंत पंचायतराज अभियानांतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांची विविध निकषांच्या आधारे तपासणी करण्यासाठी जिल्हा, विभाग आणि तालुका स्तरावर समित्यांची स्थापना करण्यात आली होती. या समित्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांनी केलेली कामगिरी लक्षात घेऊन त्यांच्या श्रेणी निश्चित केल्या आहेत. मिळालेले गुण आणि त्यानुसार मिळणारी श्रेणी अशी आहे-

| ७५ पेक्षा अधिक गुण | ६० ते ७५ गुण | ५० ते ६० पेक्षा कमी गुण | ५० पेक्षा कमी गुण |
|---|---|---|---|
| अ + | अ | ब | क |

जेव्हा वाढेल मार्गी घाण । तेव्हा होईल मलीन मन
तयायोगे विकास पूर्ण । राहील अडोन जीवांचा



# विकासामागील 'ऊर्जा'

आपल्या संभाषणात 'ग्रामीण भाग' असा शब्दप्रयोग सहजपणे येतो. मात्र ग्रामीण भाग म्हणजे नेमके काय? ग्रामीण लोकसंख्या कोणाला म्हणावे? भारतात अशी लोकसंख्या किती आहे? जगाच्या क्रमवारीत भारताचे स्थान ग्रामीण लोकसंख्येच्या संदर्भात किती आहे? या लोकसंख्येला किमान दैनंदिन सुविधा देणे कितपत शक्य आहे? असे एक ना अनेक प्रश्न उपस्थित होतात. त्यादृष्टीने सतत विचार आणि कृती चालू असते. यापैकी काही मुद्द्यांवर प्रगती होत आहे तर काही बाबतीत प्रत्यक्ष सुरू आहे. त्याखेरीज स्वप्रयत्नातून ग्रामीण जीवन सुकर आणि समृद्ध करण्यासाठी अनेकजण सक्रिय असतात. त्यांची दखल घेणेही आवश्यक आहे.

'भारत खेड्यात राहतो' असे महात्मा गांधी यांचे उद्‌गार प्रसिद्ध आहेत. 'ग्रामस्वराज्य' म्हणजेच 'रामराज्य' अशी त्यांची भूमिका होती. त्यांच्याआधी लोकमान्य टिळकांनी ग्रामीण भागांत उद्योग उभारण्यासाठी सक्रीय पुढाकार घेतला होता. तथापि स्वातंत्र्य हे प्राधान्यस्थानी राहिल्याने ग्रामविकास हा मुद्दा मागे पडला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जवाहरलाल नेहरू यांनी औद्योगिकीकरणाची पायाभरणी केली. परिणामी ग्रामविकासाची प्राधान्यता मागेच राहिली. ग्रामीण भागात उपजीविका दुरापास्त झाल्याने शहरीकरणाचा वेग वाढू लागला. त्याचे पर्यावसान नागरी समस्या जटिल होण्यामध्ये झाले. त्याच काळात ग्रामीण भागांकडील दुर्लक्ष वाढले. त्यामुळे आज भारतातील सुमारे ७२ टक्के लोकसंख्या म्हणजेच जवळपास ८२ कोटी लोक अगदी मूलभूत सुविधांपासून वंचित आहेत. या परिस्थितीमधून गंभीर असमतोलाची सामाजिक समस्या उभी ठाकली आहे. भारताचा ग्रामीण भाग सुजलाम् सुफलाम् करणे हा यावरचा प्रभावी उपाय आहे.

**ग्रामीण भागाची व्याख्या**

भारताच्या जनगणना आयुक्तालयाने ग्रामीण भाग या संज्ञेसाठी पुढील तीन प्रमुख निकष ठरविले आहेत.

* ५००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेली वस्ती
* लोकसंख्येची घनता प्रति चौरस किलोमीटर ४०० पेक्षा कमी
* २५ टक्यांपेक्षा जास्त लोकसंख्या कृषिकार्याशी संलग्न अशा वस्तीला महसूल विभागाच्या मान्यतेनंतर



खेडे म्हटले जाते. आजकाल हिंदीच्या प्रभावामुळे 'गाव' या शब्दाचा वापर करण्यात येतो. परंतु गाव म्हणजेच खेडे. ही संज्ञा अधिक स्पष्ट करण्यासाठी नागरी (शहरी) भाग म्हणजे काय याचाही खुलासा होणे आवश्यक आहे. नागरी भाग म्हणजे.

* किमान लोकसंख्या ५०००
* लोकसंख्येची घनता प्रति चौरस किलोमीटर ४०० पेक्षा जास्त

**दिलीप चावरे**

* किमान ७५ टक्के लोकसंख्या अकृषि कार्याशी संलग्न

कोणता भूभाग ग्रामीण अथवा नागरी असल्याचे जाहीर करावे, असा प्रश्न पडल्यास वरील तीन निकष वापरण्यात येतात. त्यानंतरही स्पष्टता न आल्यास राज्य शासनाबरोबर सल्लामसलत करून निर्णय घेण्याचा अधिकार संबंधित राज्य जनगणना संचालनालयाला देण्यात आले आहेत. या सर्व घटकांचा विचार केल्यास भारतातील सुमारे ७२ टक्के ग्रामीण भागात रहात असल्याचे दिसते. या निकषावर भारताचा जगात अव्वल क्रमांक आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या आकडेवाडीनुसार २०१० साली जगाची लोकसंख्या ६९० कोटी होती. ही लोकसंख्या २०२५ या वर्षी ९३० कोटींवर तर २१०० साली १००० कोटींवर जाईल असे अनुमान आहे. चालू शतकात अविकसित राष्ट्रांची लोकसंख्या तिप्पट होईल. आणि त्याच प्रमाणात सध्याची ३४० कोटी ही ग्रामीण लोकसंख्या फुगत जाईल असे तज्ज्ञांना वाटते. यापैकी अंदाजे ३१० कोटी ग्रामीण जनता अविकसित देशांची रहिवासी आहे. आफ्रिका खंडातील ६० टक्के तर आशिया खंडातील ५८ टक्के जनता ग्रामीण भागात राहते.

शेतीविषयक कार्य हे ग्रामीण भागांमधील प्रमुख रोजगाराचे साधन आहे. याघडीला जगातील एकूण जमिनीपैकी ३८ टक्के जमीन शेतीखाली आहे. वनजमीन सुमारे ३१ टक्के आहे. उरलेली अंदाजे ३० टक्के मानववस्तीने व्यापलेली आहे. जसजशी लोकसंख्या वाढेल तसतसे हे प्रमाण व्यस्त होत जाईल. म्हणजेच पेयजलाचे संकट गंभीर होऊ लागेल. हा धोका लक्षात घेऊन चीन, भारत, अमेरिका आणि व्हिएटनाम अशा काही देशांनी वनीकरण आणि वनसंवर्धन कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर सुरू केल्याची नोंद संयुक्त राष्ट्रसंघाने घेतली आहे. मात्र एवढेच पुरेसे नाही. ग्रामीण लोकसंख्येला किमान सुविधा उपलब्ध करून देतानाच निसर्गाचे शोषण अवाजवी होणार नाही याचेही भान राखावे लागेल. या पार्श्वभूमीवर भारतात व इतर देशांमधील काही कल्पक व्यक्तींनी स्वपुढाकाराने केलेल्या प्रयत्नांची माहिती सामान्य जनतेला होणे अगत्याचे आहे. ही उदाहरणे प्रातिनिधिक असून असे अनेक प्रयत्न असू शकतात.

**भाताच्या तुसापासून वीज**

भारताच्या प्रत्येक राज्यात वीजटंचाई असून ही बिहार राज्यात फार गंभीर समस्या आहे. विशेषत: ग्रामीण भागांत अद्याप वीज पोहोचलेली नाही. ज्ञानेश पांडे आणि रत्नेश यादव यांनी या समस्येवर मात करण्याचा निर्धार केला. मनोज सिन्हा आणि चार्लस रॅन्सलर यांनी त्यांना साथ दिली आणि 'हस्क पॉवर' हा उपक्रम स्थापन झाला. हस्क (HUSK) म्हणजे भाताची तुसे! तांदूळ काढल्यानंतर तूस उरते पण शेतकऱ्याला त्याची उपयुक्तता माहीत नसते. या तुसांमधून वीज निर्माण करण्याचा चमत्कार या चौकडीने करून दाखविला आहे.

पांडेचा जन्म बिहारचा. केवळ या एका कारणामुळे त्याला इतर राज्यांमधून येणारे सहाध्यायी तुच्छतेने वागवत. बिहारच्या अविकसित वातावरणामध्ये वीज घरात असण्याचा प्रश्नच नव्हता. आपल्या कर्तृत्वाची कसोटी घेण्यासाठी पांडे अमेरिकेत पोहोचला. पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केल्यानंतर चांगली नोकरी त्याला मिळाली. तेथे विविध विद्युत उपकरणांची कार्यक्षमता वाढविण्याचे आव्हान त्याने यशस्वीपणे पेलले. त्यानंतर त्याचे मायदेशाबद्दल विचारचक्र सुरू



**आपुल्या गावचे वैशिष्ट्य। ते जगापुढे मांडाया स्पष्ट**
**प्रदर्शन, संमेलन, यात्रादि इष्ट। सुरू करणे आपुल्या गावी**

झाले. दरम्यानच्या काळात यादव त्याला भेटला आणि दोघांनी भारतात परतण्याचा निर्णय घेतला. खेडोपाडी स्वस्तात वीज पुरवण्याच्या स्वप्नाने त्यांना झपाटून टाकले. या उद्दिष्टाचा पाठपुरावा करताना सौर दिवा विकसित करण्याचा प्रयत्नही त्यांनी केला. बिहारमध्ये फिरताना त्यांना असे दिसून आले की जळण म्हणून शेतकरी तुसांचा वापर करतो. त्यांच्या विचारचक्राला आता गती मिळाली. तुसांचा उपयोग अन्य कोणत्याही कारणास्तव होऊ शकत नसल्यामुळे बहुतेक शेतकरी ती कचऱ्यात फेकून देतात असे त्यांना सांगण्यात आले होते. म्हणून त्यांनी तुसांची उपलब्धता कितपत होऊ शकेल याचा अंदाज घेतला. त्यांना असे आढळले की ही उपलब्धता प्रचंड आहे. त्यांचा निर्णय पक्का झाला. तरीही त्यांनी पुन्हा एकदा सर्व तपशील तपासला. तुसाचा वापर घरगुती जळण म्हणून सार्वत्रिक नसल्याचे स्पष्ट झाले. याचे प्रमुख कारण म्हणजे त्याचे ज्वलन चुलीत होत नाही आणि त्यात सिलिका असल्याने पारा म्हणूनही ते उपयुक्त नसते. ते कचऱ्यात टाकल्यास त्यामधून मिथेन वायू उत्सर्जित होतो. एका अंदाजानुसार बिहारमध्ये दरवर्षी जवळपास २० कोटी टन तूस वाया जाते.

पांडे आणि यादव यांनी तुसांवर प्रयोग सुरू केले. जनरेटर वापरून वीज उत्पादन करण्याचे त्यांचे प्रयत्न आकार घेऊ लागले. अथक प्रयत्नांनी त्यांनी विकसित केलेल्या यंत्रामधून दर तासाला ५० किलो तुसे जाळून ३२ किलोवॉट वीज निर्माण होऊ लागली. त्यातून सुमारे ५०० ग्रामीण घरांची गरज भागू लागली. आता या प्रयोगाची कसोटी प्रत्यक्ष व्यवहारात घेण्याचे ठरले. त्यासाठी त्यांनी तामकुहा नावाचे खेडे निवडले. तेथील गावकऱ्यांनी त्यांच्या प्रस्तावाचे स्वागत केले. तो प्रस्ताव असा होता. दरमहा ८० रुपयांच्या बदल्यात एका घरात ३० वॉटचा एक अथवा २५ वॉटचे दोन दिवे दररोज प्रकाशमान होतील; तसेच, मोबाईलचे रिचार्जिंग सायंकाळी ५ ते रात्री ११ या अवधीत मोफत करता येईल. गावातील दारिद्र्य एवढे होते की बहुतेक गावकऱ्यांकडे एकच दिवा लावण्याची क्षमता होती परंतु ती गरज भागवण्यासाठी त्यांना रॉकेलचा वापर करावा लागत असे. वीज आल्यास रॉकेलसाठी होणारी वणवण थांबेल. दिव्याचा प्रकाश तेजस्वी असेल मासिक खर्च १५० रुपयांवरून अर्धा होईल. प्रदूषण आणि आगीचा धोका टळेल आणि मोबाईल मनमुराद वापरता येईल असे फायदे स्पष्टपणे दिसत होते. त्यामुळे त्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला तिकडे अमेरिकेत सिन्हा आणि चार्लस यांना भांडवल उभारण्यात यश आले. अशा प्रकारे १५ ऑगस्ट २००७ या शुभदिनी तामकुहा गावातील घरे विजेच्या प्रकाशात उजळली. अकेरिकेच्या शेल प्रतिष्ठानने या प्रयत्नास हातभार लावला. गतवर्षाच्या अखेरीस तुसापासून वीज निर्माण करणारे ६० प्रकल्प कार्यान्वित झाले होते. त्याच्या यशोगाथेस देशात आणि परदेशात अतोनात प्रसिद्धी लाभली आहे.

**सायकल पंप आणि जलधारा**

दुसरे उदाहरण आहे महाराष्ट्रात विकसित झालेले राजकोट येथील. एका कंपनीत काम करणाऱ्या चंद्रकांत पाठक या अभियंत्याला रत्नागिरी जिल्ह्याच्या भेटीनंतर तेथील पेयजलाच्या दुर्भिक्ष्याने अस्वस्थ करून सोडले. ग्रामीण भागात वीज पुरवठा करण्याबाबतच्या मर्यादा तर स्पष्ट दिसत होत्या. काय करावे असा विचार चालू असताना पाठक यांना असे आढळून आले की अनेक शेतकऱ्यांकडे सायकली होत्या. या सायकलींचा वापर करून शेतकरी स्वत:पुरती वीजनिर्मिती करू शकेल ही खात्री त्यांना होती. घरी परतताच त्यांनी एका मोटर पंपाला जुनी सायकल जोडली आणि तिची चाके फिरवून आपला प्रयोग सुरू केला. थोड्या प्रयत्नांनंतर त्यांना यश आले. हा सायकलपंप म्हणजे छोटेखानी वीजनिर्मिती संच ठरला. त्याचा वापर करून शेतकरी पाणी खेचू शकतो. याच तंत्राचा वापर करून त्यांनी विकसित केलेल्या तुषार यंत्रालाही उत्तम प्रतिसाद लाभला.

सायकल पंपाच्या यशानंतर पाठक यांनी बैलांच्या वापराचा प्रयोग सुरू केला. बैलगाडीवर बसवलेला हा पंप बैलगाडीच्या हालचालीतून निर्माण होणाऱ्या विजेवर चालू शकतो. त्याला पाठक यांनी 'जलधारा' असे नांव दिले आहे. जंतुनाशकाची फवारणी आणि तुषार सिंचन अशा दोन्हीसाठी तो वापरता येतो. या पाठोपाठ पाठक यांचे लक्ष तेलघाण्याने वेधून घेतले. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी अंदमानच्या जेलमध्ये कोल्हू पिसल्याचे वर्णन केले आहे. तेच तंत्र वापरून पाठक यांनी कोल्हूमधून वीज निर्मिती करण्याचे उद्दिष्ट साध्य केले.

तथापि ग्रामीण भागातील महिलांनाही सहभागी करून वीजनिर्मिती कशी करता येईल या प्रश्नाचा पाठक यांनी घेतलेला ध्यास कायम होता. अचानक एके दिवशी त्यांना काही मुली झोपाळ्यावर खेळताना दिसल्या आणि या प्रश्नाचे उत्तर त्यांना गवसले. 'झोपाळा पंप' ही पाठक यांची उपलब्धी अशा प्रकारे साकार झाली. वीजनिर्मितीमध्ये जनतेचा सहभाग असल्याखेरीज ग्रामीण भारत स्वयंपूर्ण होणार नाही, असा त्यांचा सिद्धांत आहे.

| अ.क्र. | देश | ग्रामीण लोकसंख्या | लोकसंख्येशी टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | भारत | ८१.८४ | ७२ |
| २ | चीन | ७३.७४ | -- |
| ३ | इंडोनेशिया | ११.५४ | ५४ |
| ४ | पाकिस्तान | १०.९३ | ६६ |
| ५ | मलेशिया | ८.२६ | ३६ |
| ६ | नायजेरिया | ७.९५ | ५३ |
| ७ | इथिओपिया | ६.४७ | ८४ |
| ८ | व्हिएटनाम | ६.१८ | ७४ |
| ९ | अमेरिका | ५.४७ | २० |
| १० | इजिप्त | ४.४१ | ५८ |

ही आकडेवारी संयुक्त राष्ट्रसंघाच्या आर्थिक आणि सामाजिक कार्यविभागामार्फत प्रसिद्ध करण्यात आली आहे. लोकसंख्येचे आकडे कोटी/लाख दर्शविणारे आहेत.

पश्चिम बंगालमधील सुप्रिया दास यांचे प्रयत्न अशाच दिशेने चालू आहेत. पेडल मारून चालणाऱ्या यंत्रामधून निर्माण झालेली वीज वापरून मोबाईल फोनची बॅटरी चार्ज करू शकणारे तंत्र त्यांनी विकसित केले. त्याचा वापर सुंदरबनात २००९ साली झालेल्या वादळामुळे अडकून पडलेल्या लोकांना झाला. संपूर्ण संपर्कयंत्रणा कोलमडलेली असताना या लोकांना बाह्य जगाबरोबर मोबाईलच्या माध्यमातून संपर्क कायम राखणे शक्य झाले. दास यांनी लठ्ठ पगाराची नोकरी सोडून लोकोपयोगी संशोधनास वाहून घेतले आहे. दास यांच्या यंत्राचा वापर करून ग्रामीण भागातील घरेही प्रकाशमान होऊ शकतील असा विश्वास त्यांना आहे.

आपली प्रत्येक समस्या सोडवण्याचा भार शासनावर टाकणे शक्य नसल्याच्या जाणिवेतून असे प्रयत्न भारताच्या प्रत्येक राज्यात चालू आहेत. ते आमजनतेपर्यंत जाणे महत्त्वाचे आहे. त्यातून स्फूर्ती घेऊन स्वत:च्या पुढाकाराने होणारे प्रयत्न शाश्वत स्वयंपूर्णतेचा मार्ग दाखवू शकतील ही जबाबदारी शासनाबरोबर समाजाची आहे.

संपर्क : ९८६७५५७३२७



हात फिरे तेथे लक्ष्मी शिरे । हे सूत्र ध्यानी ठेवोनि खरे
आपुले ग्रामचि करावे गोजिरे । शहराहूनि

# शाश्वत विकास

राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात ग्रामविकास विभागाने सुरू केलेली पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजना ही गावांच्या शाश्वत विकासासाठी टाकलेले महत्त्वाचे पाऊल मानता येईल. गावांच्या सर्वांगीण विकासात जे घटक महत्वाचे ठरतात ते सर्व घटक यामध्ये अंतर्भूत करण्यात आले असून समृद्ध ग्राम आणि संपन्न ग्रामस्थाच्या संकल्पनेच्या अधिक जवळ नेणारी अशी ही योजना आहे.

वाढत्या तापमानाचा गावावर होणारा परिणाम लक्षात घेऊन या योजनेंतर्गत पर्यावरण संरक्षित ग्राम विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. यासाठी सुरुवातीला एक व्यक्ती एक झाड आणि आता एक व्यक्ती दहा झाडं यासारखी नावीन्यपूर्ण कल्पना राबविण्यात येत आहे. पहिल्या वर्षी योजनेत ५.९३ कोटी झाडं लावली गेली तर दुसऱ्या वर्षी आतापर्यंत ३.२५ कोटी वृक्षांची लागवड झाली आहे.

वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमात शालेय विद्यार्थ्यांपासून वृद्ध नागरिकांपर्यंत सर्वांनी अतिशय उत्साहाने सहभाग घेतला. गावातील विद्यार्थ्यांनी तर झाडांना आपली नावे दिली असून स्वत:हून झाडांच्या संगोपनाची जबाबदारी स्वीकारली आहे.

स्थानिक - भौगोलिक रचना आणि नैसर्गिक वातावरण लक्षात घेऊन ही झाडे लावली जात आहेत. वृक्ष लावगडीसाठी रोपांची उपलब्धता करून घेण्याचे काम मोठ्या प्रमाणात हाती घेण्यात आले आहे. जिल्ह्यात आणि गावात रोपवाटिका विकसित करण्यात येत आहेत. जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतींनी रोपवाटिका विकसित केल्या असून यामध्ये लोकांचा सहभाग फार मोठ्या प्रमाणात घेण्यात आला आहे. सामाजिक वनीकरण, वन विभागाच्या रोपवाटिका, खाजगी रोपवाटिका, हरित सेना, शाळा- महाविद्यालये, पर्यावरण प्रेमी आणि संस्थांकडून रोपे तयार करण्यात येत आहेत. रोजगार हमी योजनेअंतर्गतही रोपवाटिका तयार करण्याचे काम गतीने पूर्ण केले जात आहे. वृक्ष लागवडीचे नियोजन ग्रामपंचातीमार्फत करण्यात येत असून गायरान जमीन, पडीक क्षेत्र, खाजगी क्षेत्र, गावांतर्गत रस्ते, शाळा-महाविद्यालये, वैयक्तिक घरांच्या जागा, शेतीचे बांध, विविध संस्थांच्या जागा, उद्योगांच्या तसेच तीर्थक्षेत्रांच्या जागी ही रोपे लावण्यात येत आहेत.

**पर्यावरण विकास आराखडा**

योजनेअंतर्गत १० हजार लोकसंख्येपेक्षा मोठ्या गावांचा विकास केंद्र म्हणून विकास करण्याला प्राधान्य देण्यात आले आहे. या योजनेत सहभागी झाल्यानंतर ग्रामपंचायतींनी एक वर्षाच्या आत नगररचनेच्या धर्तीवर गावांचा विकास तसेच पर्यावरण विषयक आराखडा तयार करण्यासाठी कृतिकार्यक्रमाची अंमलबजावणी करणे अभिप्रेत आहे. यामध्ये १५१ गावांसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सल्ल्याने असा पर्यावरण विकास आराखडा तयार करण्यात येत आहे. असा आराखडा तयार करतांना तांत्रिक सेवा आणि मार्गदर्शन देण्यासाठी २४ तज्ज्ञ संस्थांची निवड करण्यात आली आहे.

या पर्यावरण विकास आराखड्यात जलसंपत्ती व्यवस्थापन, पूर पाणी व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन, हवा प्रदूषण व्यवस्थापन, घनकचरा व्यवस्थापन, नैसर्गिक साधनसंपत्ती व्यवस्थापन, जैववैविध्य संरक्षण, ऊर्जा व्यवस्थापन, वस्त्या आणि पायाभूत सुविधांचा शाश्वत विकास, औद्योगिक व व्यावसायिक विकास आणि व्यवस्थापन यासारख्या आराखड्यांबरोबरच पर्यावरण पूरक पर्यटन, ऐतिहासिक वास्तूंचे जतन, गावाच्या क्षमता बांधणीचा आराखडाही सामील आहे.

राज्यातील गावांच्या शाश्वत विकासासाठी टाकलेल्या या शुभलक्ष्मी पावलाला प्रचंड यश मिळाले. स्वत: ग्रामविकास मंत्री जयंत पाटील यांनी राज्याच्या कानाकोपऱ्यात १०१ सभा घेऊन गावातील लोकापर्यंत योजना केवळ पोहोचवलीच नाही तर योजनेच्या अंमलबजावणीचे फलित समजावून सांगून योजनेला व्यापक प्रमाणात लोकाश्रय मिळवला.

योजनेची अंमलबजावणी करताना पहिल्या वर्षी मिळालेल्या यशाने गावकऱ्यांची, प्रशासकीय यंत्रणेची उमेद आणखी वाढवली. ग्रामपंचायतीच्या हद्दीत लोकसंख्येच्या किमान ५० टक्के झाडे लावणे आणि ती जगविण्याची हमी घेणे, गाव ६० टक्के हगणदारीमुक्त करणे, प्रत्यक्ष कर वसुली ६० टक्के असणे, ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लॅस्टिक वापराला बंदी घालणे, संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता तसेच यशवंत पंचायतराज अभियानात भाग घेणे, यासारखे निकष पहिल्या वर्षासाठी निश्चित करण्यात आले होते. योजनेची अंमलबजावणी सुरू झाली आणि पाहता पाहता गावाचं रुपडं बदलू लागलं. गाव पर्यावरण संरक्षित झाल्याशिवाय पायात चप्पल घालणार नाही अशी शपथ घेणारी माणसं योजनेच्या यशासाठी कार्यरत झाली.

राज्यात एकूण २७८९६ ग्रामपंचायती आहेत. यापैकी १८,६३० गावांनी आपल्या गावात ५० टक्क्यांपेक्षा अधिक वृक्षलागवड केली. ६० टक्क्यांपेक्षा जास्त कुटुंबांकडे शौचालय असण्याची अट पहिल्या वर्षात होती त्यामध्ये यशस्वी ठरलेल्या ग्रामपंचायतींची संख्या १६,१६६ इतकी आहे. १५,६८३ ग्रामपंचायतींनी योजनेत ठरवून दिल्याप्रमाणे ६० टक्के कर वसुली केली आहे तर या सर्व निकषांना पात्र ठरून योजनेची यशस्वीरीत्या अंमलबजावणी करणाऱ्या ग्रामपंचायतींची संख्या १२,१९३ इतकी आहे. या १२,१९३ ग्रामपंचायतींना योजनेच्या पहिल्या वर्षीचे विशेष अनुदान वितरित करण्यात आले असून ही रक्कम ३८९.८९ कोटी रुपये इतकी आहे.

**पर्यावरण विकासरत्न**

योजनेच्या अनोख्या वैशिष्ट्यांनी गावकऱ्यांना आणि प्रशासकीय यंत्रणांना एवढा हुरुप दिला की काही ग्रामपंचायतींनी योजनेत तिसऱ्या वर्षी पूर्ण

## आठवणींचा दरवळ

स्मृती मग त्या आनंदाच्या असोत किंवा दु:खाच्या! त्या माणसाला आयुष्यभर सोबत करतात. पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजनेनं गावांना अशीच एक संधी उपलब्ध करून दिली. या योजनेअंतर्गत स्मृतिवन नावाची कल्पना प्रत्यक्षात आली. गमावलेली पण जिव्हाळ्याची नातीगोती या स्मृतिवनात झाडांच्या रूपानं रुजू लागली. वाढू लागली. गावकऱ्यांनी या स्मृतिवनात केवळ झाडं लावली नाही तर त्यांच्या संगोपनाची जबाबदारीही घेतली. या वाढणाऱ्या आणि डौलणाऱ्या झाडांसमवेत गावाचं पर्यावरण रक्षण होतानाच आठवणींचा सुगंध अधिक गडद होत चालला आहे.



सुखाचे मुख्य साधन । सर्वतोपरी स्वावलंबन
शहरावरि न राहता अवलंबून । काम करावे सर्वांनी

# निकष कोणते

| अ.क्र. | निकष | प्रथम वर्ष | द्वितीय वर्ष | तृतीय वर्ष |
|---|---|---|---|---|
| १ | अ) वृक्ष लागवड<br>ब) वृक्ष संवर्धन | ५०% लोकसंख्या इतके वृक्ष लागवड | १) लोकसंख्येच्या प्रमाणात झाडे लावली नसल्यास त्यापैकी किमान ५०% नवीन लागवड<br>२) गतवर्षी लावलेल्या वृक्षांच्या जगल्याच्या प्रमाणात अनुदान परंतु २५% जास्त जगल्यासच अनुदानास पात्र | लोकसंख्येच्या इतकी झाडे लावली नसल्यास ती लावणे व गेल्या २ वर्षांत लावलेल्या वृक्ष जगल्याच्या प्रमाणात अनुदान ५०% जास्त जगल्यास अनुदानास पात्र |
| २ | हगणदारीमुक्त | ६०% | ७५ % | १०० % |
| ३ | कर वसुली (घरपट्टी, पाणीपट्टी) | ६०% | ८० % | ९० % |
| ४ | प्लास्टीक बंदी ५० टक्के मायक्रॉनपेक्षा कमी जाडी | पूर्ण | पूर्ण | पूर्ण |
| ५ | संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान | सहभाग घेणे | ५०% गुण | ६०% गुण |
| ६ | यशवंत पंचायतराज अभियान | सहभाग घेणे | ५०% गुण | ६० % गुण |
| ७ | अपारंपरिक ऊर्जा | | ५०% स्ट्रिट लाईट (सौर, CFL, LED)<br>१% कुटुंबांकडे बायोगॅस | १००% स्ट्रिट लाईट (सौर, CFL, LED)<br>१% कुटुबांकडे बायोगॅस<br>१०% घरात सौरऊर्जावापर(CFL, LED) |
| ८ | घनकचरा व्यवस्थापन | | १००% संकलन<br>५०% कचऱ्यापासून खत निर्मिती | १००% संकलन<br>१००% कचऱ्यापासून खत निर्मिती |
| ९ | सांडपाणी व्यवस्थापन | | ५०% शास्त्रशुद्ध व्यवस्थापन | ७५% शास्त्रशुद्ध व्यवस्थापन |

करावयाची उद्दिष्ट्ये पहिल्याच वर्षी पूर्ण केली. असं अत्युत्कृष्ट काम करणाऱ्या ८१० ग्रामपंचायतींचा नुकताच राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते 'पर्यावरण विकास रत्न' पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. २ ऑक्टोबर २०११ पासून योजनेच्या दुसऱ्या वर्षाच्या अंमलबजावणीस प्रारंभ झाला आहे. या वर्षीही राज्यातील ग्रामपंचायतींकडून मिळणारा प्रतिसाद अतिशय उत्तम असा असून ग्रामीण लोकसंख्येएवढी झाडे लावणे आणि ती जगविणे या निकषांतर्गत आत्तापर्यंत ३.२५ कोटी वृक्षांची लागवड करण्यात आली आहे.

### सुधारणा करा, सहभागी व्हा

गावांच्या शाश्वत विकासासाठी सुरू केलेल्या प्रयत्नात सातत्य राहावे म्हणून पर्यावरण संरक्षित समृद्ध ग्राम योजनेत एक आगळे वेगळे सूत्र लागू करण्यात आले आहे. गावांनी केवळ एक वर्ष सुधारणा करून ती दाखवून चालणार नाही तर त्यात सातत्य राहील अशी काळजी यात घेण्यात आली आहे. योजनेत सहभागी होण्यासाठी सुधारणा करा, सहभागी व्हा, कामगिरी दाखवा आणि विकासासाठी अनुदान घेऊन पुढे जा हे या योजनेचे मुख्य सूत्र असून सातत्यपूर्ण कामगिरीच्या आधारावरच ग्रामपंचायतींना विकासासाठी विशेष अनुदान दिले जात आहे.

### विकास निधीसाठी निकष

● १० हजारपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींना दरवर्षी १० लाख याप्रमाणे ३० लाख रुपये. (तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी असलेल्या ग्रामपंचायतींना दरवर्षी १२ लाख याप्रमाणे ३६ लाख) ●७००१ ते १० हजार लोकसंख्येच्या ग्रामपंचायतींना प्रत्येक वर्षी ८ लाख याप्रमाणे २४ लाख रुपये. ●५००१ ते ७ हजार लोकसंख्येच्या ग्रामपंचायतींना प्रत्येक वर्षी ५ लाख याप्रमाणे १५ लाख रुपये. ● २००१ ते ५००० पर्यंत लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींना प्रत्येक वर्षी ४ लाख याप्रमाणे १२ लाख रुपये. ● १००१ ते २००० पर्यंत लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींना प्रत्येक वर्षी ३ लाख याप्रमाणे ९ लाख रुपये. ● १००० लोकसंख्येपर्यंतच्या ग्रामपंचायतींना दरवर्षी २ लाख रुपये याप्रमाणे ६ लाख रुपयांचा निधी दिला जाईल.

### सूक्ष्म ग्रामविकास आराखडा

पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजनेत पहिल्या वर्षी १२,१९३ ग्रामपंचायतींनी पहिल्या वर्षीचे सर्व निकष पूर्ण केले आहेत. या ग्रामपंचायतींनी गावातील विकास कामाबाबत ग्रामविकास कृती आराखडा तयार करावयाचा आहे. सूक्ष्म नियोजन पद्धतीने हा आराखडा तयार करण्यात येणार असून ही प्रक्रिया राबविण्यासाठी गावकऱ्यांच्या सहभागाबरोबर आवश्यक असलेली यंत्रणा निश्चित करण्यात आली आहे.

**(संकलन : ग्रामविकास विभाग)**

उत्तम बुद्धिकौशल्यज्ञान । शक्तिसामर्थ्य इकडे योजून
गावी वाढवावे स्वावलंबन । आळस झाडून सर्वांचा



# गाव करी ते राव न करी

शुभवर्तमान म्हणायला हवं. कारण एकीकडे दारिद्र्यरेषेखाली येण्यासाठी आग्रही मागणी आणि दुसरीकडे मात्र आम्हाला दारिद्र्यरेषेखालील यादीतून वगळा असं सांगणारं वर्धा जिल्ह्यातलं गोंडेगाव. लोकांची मानसिकता सकारात्मकरीत्या बदलली की असं व्हायचंच! पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजनेमुळे राज्यातील गावांची मानसिकता बदलण्याचं फार मोठं काम झालंय.

लोक पर्यावरण संरक्षणाचं महत्त्व जाणू लागले. सौर ऊर्जेचं, सीएफएल दिव्यांचं महत्त्व लोकांना पटलंय. सांडपाण्याचा वापर परसबागेसाठी सुरू झालाय. गटारं बंदिस्त झाल्याने आरोग्यात सुधारणा झालीय. गावाच्या लोकसंख्येपेक्षा अधिक झाडांची लागवड करून त्यांचं संरक्षण व देखभाल करण्याकडे कल वाढलाय. गावाची सामूहिक शक्ती गावाच्या समृद्धीला हातभार लावू शकते हे पटल्यानं १०० टक्के करवसुली, कुऱ्हाड बंदी, चराई बंदी, प्लॅस्टिक बंदी, कचऱ्याचा उपयोग कंपोस्ट खताच्या निर्मितीसाठी असे नानाविध उपक्रम या गावांमध्ये यशस्वी होताहेत. एखादं गाव जेव्हा एकजूट होतं. तेव्हा त्याचा कायापालट दृश्य स्वरूपात दिसू लागतो. महाराष्ट्रातील काही गावांनी वैयक्तिक शौचालय, सांडपाणी, घनकचरा व्यवस्थापन, सौर ऊर्जेचा वापर, प्लॅस्टिक बंदी यात केलेलं काम हे प्रेरणादायी आणि महात्मा गांधींच्या स्वप्नाच्या दिशेनं टाकलेलं महत्त्वाचं पाऊल आहे.

**१. अनगर (ता. मोहळ, जि. सोलापूर)**

या गावाने स्वत:मध्ये गेल्या काही वर्षांत केलेला बदल आश्चर्यचकित करणारा! ८००० लोकसंख्या असलेल्या या गावात महिलांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण हिंडावं लागायचं. गावात विजेचा अपुरा पुरवठा, झाडं झुडपं अत्यल्प, या गावाला पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजना कळली आणि गावं बदलू लागलं. या योजनेअंतर्गत व्यक्तिगत बायोगॅस प्रकल्प सुरू केले गेले. त्याद्वारे गावाला नियमित वीज मिळू लागली. गावाला सौर ऊर्जेचं महत्त्व इतकं पटलं की लोकवर्गणीतून सौर प्रकल्प (सोलर प्लाँट) व पाण्याची टाकी बसवून पाण्याची अडचण दूर केली गेली. वाड्या आणि वस्त्यांवर सौर पथदिवे उभारले. सौर अभ्यासिका सुरू करण्यात आली. गावातच पवनचक्की उभारून विजेचा प्रश्न कायमस्वरूपी मिटवायचा, असा संकल्प या गावानं केलाय. गावानं कमी खर्चात भूमिगत गटारं बांधून सांडपाण्याचा निचरा करणाऱ्या व्यवस्थेचा 'अनगर पॅटर्न' विकसित केला. गावातल्या प्रत्येक व्यक्तीनं एक झाड दत्तक घेतलं. शेतकऱ्यांनी फळझाडांची लागवड सुरू केली. त्यामुळे त्यांना पूरक व्यवसाय मिळाला. या गावानं १०० टक्के करवसुली केली.

**२. अंठीपाडा ( ता. नवापूर, जि. नंदुरबार)**

७४१ लोकसंख्या असलेल्या या आदिवासी गावानं १०० टक्के प्लॅस्टिक बंदी केली. १०० टक्के शौचालयं बांधली. गावात १६५० वृक्ष लावण्यात आले. शेणखताचा उपयोग गोबरगॅससाठी सुरू झाला. कंपोस्ट खत तयार करण्याकडे लोकांचा कल वाढला. सांडपाण्याचा वापर परसबागेसाठी सुरु झाला. त्यामुळे गावातली गटारं नाहिशी झाली. गावात १७ सी.एफ.एल. आणि ४ सौर असे २१ पथदिवे लावले गेले.

**३. बसरापूर (ता. भोर जिल्हा. पुणे)**

हे गाव काही महिन्यांपूर्वी अतिशय अस्वच्छ होतं. पर्यावरण संतुलित समृद्धग्राम योजना आली नि



त्यातून हे गाव स्वच्छ व सुंदर बनलं. प्रत्येक गावकऱ्याने सांडपाण्यासाठी शोषखड्डे तयार केले. गावात सर्वच पथदिव्यांवर सी.एफ.एल. व सौर दिवे लावण्यात आले. पूर्वी कर वसुली फारशी होत नसे, मात्र आता हे गाव स्वयंस्फूर्तीनं कर वसुलीसाठी पुढाकार घेताना दिसतंय. गोबरगॅस संयंत्राची दुरुस्ती वाढलीय. नवीन गोबर गॅस आणि सौर दिव्यांबाबत गावकऱ्यांचा आग्रह दिसतो. परसबाग लागवडीकडे गावकऱ्यांचा ओढा वाढलाय. त्यामुळे प्रत्येक कुटुंबाला पुरेल एवढा भाजीपाला घरीच मिळणार आहे.

**४. भाग्यनगर ( ता. खानापूर, जि. सांगली )**

अस्वच्छता आणि व्यसनाने पोखरलेलं हे १३७५ लोकसंख्या वस्तीचं गावं. पर्यावरण संतुलित समृद्ध गाव योजनेच्या काळात गावानं वृक्ष लागवडीवर भर दिला. गावात किंवा घराच्या आसपास असणारी मूळ झाडं आणि त्यानंतर लागणारी झाडं यांचं सर्वेक्षण ग्रामपंचायतीनं केलं. त्यानंतर रोपाचं वाटप केलं. ग्रामपंचायतीच्या जागेत ५०० झाडं लावून त्याला ट्रीप गार्ड तयार केले. या वृक्षांच्या देखभालीसाठी स्वतंत्र व्यक्ती नेमल्या. गावातल्या लोकांची मानसिकता बदलण्यासाठी केलेल्या प्रयत्नांमुळे आज या गावात कायमस्वरूपी प्लॅस्टिक बंदी, रस्त्यांवर सीएफएल आणि सौर दिवे, सांडपाणी व्यवस्थापन याचं नियोजन केलं गेलंय.

**५. धाबा (ता. बार्शीटाकळी, जि. अकोला)**

साधारणत: नागरी भागात दिसणारे पेविंग ब्लॉकचे रस्ते धाबा या गावांमध्ये दिसतात. गावाचं हे चकचकित रूप कौतुकास्पद असंच! या गावाला जोडणारे सर्व रस्ते डांबरी, सर्वत्र भूमिगत गटारे, पथ दिवे सौरऊर्जेवरच! त्यामुळे गावात अंधार नाही. या गावात वेगवेगळी २५ कार्यालयसुद्धा आहेत. रस्त्याच्या दुतर्फा आणि बांधांवर २५००च्या आसपास झाडं लावण्यात आली आहेत.



कायमस्वरूपी प्लॅस्टिक बंदी आहे. गांडूळ प्रकल्प आणि घनकचरा व्यवस्थापनाची सांगड घातली गेलीय.

**६. धामनेर (ता. कोरगाव, जि. सातारा)**

या गावात सामाजिक सलोख्याचा वेगळा आदर्श दिसतो. ग्रामपंचायतीच्या इमारतीसाठी मशीद हलवणं आवश्यक होतं. सामंजस्याने ते शक्य झालं. मुस्लीम बांधवांचं यासाठी सक्रीय सहकार्य मिळालं. ही मशीद लोकवर्गणीतून इतरत्र बांधली गेली. 'आमच्या गावात आम्ही सरकार' या योजनेचा लाभ घेत ग्रामपंचायतीनं कृष्णा नदीच्या बॅक वॉटरवर बोट क्लब सुरू केला. या व्यवसायातून ग्रामपंचायतीच्या उत्पन्नात वाढ झाली. पर्यावरण गणेशाचे महत्त्व गावानं जाणलंय. त्यामुळे सर्व गणपती कृत्रिम तलावात विसर्जित केले जातात. सांडपाण्याचा पुनर्वापर करून त्यावर बागेची निर्मिती, १०० टक्के सी.एफ.एल. पथदिवे, सार्वजनिक शौचालयावर बायोगॅस निर्मिती ही या गावाची आणखी काही वैशिष्ट्ये.

**७. गाडेगाव (ता. गणघाट जि. वर्धा)**

या गावातील नागरिक 'आम्हाला दारिद्र्यरेषेखालील यादीतून काढा' असं सांगू लागली आहेत. दारिद्र्यरेषेखालील यादीत समाविष्ट होण्यासाठी अहमहिका लागण्याच्या काळातलं हे अप्रुपच! ६२९ लोकसंख्येच्या या गावात वनराई बंधाऱ्याची योजना राबवली गेली. त्यामुळे पाण्याची पातळी वाढून शेतीचं उत्पन्न वाढलं. घनकचऱ्याचं व्यवस्थापन ७० टक्क्यांवर पोहचलं. त्यातून खतनिर्मिती झाली. त्याचा शेतीला फायदा झाला. उत्पन्न वाढल्यानं राहणीमान सुधारलं.

१०० टक्के शौचालय झालीत. पाणी व करवसुली १०० टक्के, वृक्षतोड १०० टक्के, थांबली. सांडपाणी वाहून नेण्यासाठी गटारांचं बांधकाम पूर्ण झालं. परिणामी गावकऱ्यांच्या आरोग्यात चांगलीच सुधारणा झाली.

**८. पाटोदा (ता.जि. औरंगाबाद)**

या गावाला सौर ऊर्जेचं महत्त्व प्रारंभी नीट लक्षात आलं नाही. मात्र जेव्हा याचे नानाविध फायदे कळले, तेव्हा गावकऱ्यांनी ३० सोलर हिटर बसवले. या सोलर हिटर खरेदीसाठी बँकेचं कर्ज काढलं. सौर ऊर्जेचे १५ संच बसविण्यात आले. सी.एफ.एल. दिव्यांचाच गावात अधिक वापर होतो. या गावाचं वैशिष्ट म्हणजे, गावात झाडं लावल्यावर त्याच्या संरक्षण आणि संवर्धनाची जबाबदारी घर मालकांकडे सोपविण्यात येते. हे गाव एमआयडीसीच्या जवळ असल्यानं हवा, पाणी यांचं या गावातलं प्रदूषण चांगलच होतं. पण, पर्यावरण संतुलित समृद्ध गाव योजनेतील विविध उपक्रमांमुळे हे गाव जवळपास प्रदूषणमुक्ती अनुभवतंय. संत गाडगेबाबा स्वच्छता अभियानातही या गावाचं काम मराठवाड्यात विशेषत्वानं नावाजलं गेलं.

**९. हातनूर (ता. तासगाव, जि. सांगली)**

या गावचा मध्यभाग उंचावर तर काही भाग खोलगट! अशा भौगोलिक रचनेमुळे गावाला बऱ्याच अडचणींना तोंड द्यावं लागतं. त्यामुळे आला दिवस गाव काढत होतं. पण पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजना आली. गावाची मानसिकता बदलली, गावही बदललं. ज्या गावामध्ये उघड्या गटारांमध्ये शौचालयाचं पाणी तुंबत असे आज त्या गावात कायमस्वरूपी पाण्याची व्यवस्था असलेली सार्वजनिक शौचालये बांधली गेलीत. गाव स्वच्छ झालं. सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारला गेला असून ८०००० एलपीडी पाण्यावर प्रक्रिया करणं शक्य झालं. हे पाणी ठिबक सिंचनानं गावातील झाडांना दिलं जातं. गावातल्या पडक्या इमारती पाडल्या गेल्या. त्या जागांचं सपाटीकरण करून झाडं लावण्यात आली. दररोज कचरागाडीतून कचरा गोळा होतो. याच गाडीचा उपयोग झाडांना पाणी घालण्यासाठी केला जातो. कचऱ्याचा उपयोग गांडूळ निर्मितीसाठी केला जातो! २५ ठिकाणी सौरऊर्जेवर चालणारे दिवे लावले गेले. ग्रामपंचायत कार्यलयाच्या वर १ किलो वॅट वीज निर्मितीची क्षमता असलेली पवनचक्की उभारण्यात आली. ग्रामपंचायत व पथदिव्यांसाठी ही वीज वापरली जाते.

**१०. हिवरे बाजार (ता. जि. अहमदनगर)**

हे गाव केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशातील इतर गावांसाठी रोलमॉडेल! या गावाच्या प्रयोगशीलतेला सलाम ठोकावा लागतो. कारण या गावानं खडकांमध्ये स्फोट करून पाण्याचं पुनर्भरण प्रयोग यशस्वी केला. देशातला असा पहिलाच प्रयोग! खडकावर बोअर मारून वृक्ष लागवड, मृत्यूनंतर व्यक्तीचं थडगं बांधण्याऐवजी स्मृती उद्यानात एका झाडाची लागवड, ऊस, केळी यासारख्या अधिक पाणी घेणाऱ्या पिकांवर बंदी, चराई बंदी, कुऱ्हाड बंदी, शेतीसाठी बोअरवेल बंदी, एक मूल-एक झाड, बालवृक्षमित्र पुरस्कार, संपूर्ण शिवाराची मोजणी हे नावीन्यपूर्ण उपक्रम! या गावात प्लॅस्टिक पिशव्या वापरल्या जातात त्या रोपवाटिकेसाठी! वैयक्तिक ५० आणि सार्वजनिक ४ ठिकाणी कचऱ्यापासून खत निर्मिती होते. शौचालय आणि गोबर गॅस यांच्या संयुक्त उपयोगातून वीजनिर्मिती केली जाते. पथ दिव्यांसाठी सौर ऊर्जा वापरली जाते. या गावात २३० कुटुंबापैकी ९८ कुटुंबांकडे सौर दिवे आहेत. पिण्याच्या पाण्यासाठी वापरात नसलेल्या विहिरीत गणपतीच्या मूर्तीचे न करता प्रतिकात्मक मूर्तीचे विसर्जन केलं जातं. कंपोष्ट खतासाठी निर्माल्य वापरलं जातं. ओला व सुका कचरा स्वतंत्रपणे गोळा केला जातो. त्यापासून गांडूळ व कंपोष्ट खताची निर्मिती केली जाते. प्रत्येक घरात सांडपाणी व्यवस्था असणं हे गावाचं महत्त्वाचं वैशिष्ट्य. गावात दरवर्षी प्रति माणसी एक झाड लावल जातं.

**११. काळवाडी (ता. जुन्नर, जि. पुणे)**

वृक्ष लागवडीचं अधिकृत रजिस्टर ठेवणाऱ्या या गावात पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजनेंतर्गत ४२८५ झाड लागली. त्यापैकी ३६३६ झाडं सध्या उत्तम स्थितीत आहेत. सर्व झाडांचं टॅगिंग झालय. अपारंपरिक ऊर्जा साधनांचा खुल्या दिलानं गावानं स्वीकार केला. त्यामुळे सध्या गावात ६२ बायोगॅस, ५ सौरपथक, १५ सौर कंदील यांचा वापर होतोय. गावात ३ सोलर हिटर आहेत. पथ दिव्यांवर केवळ सी.एफ.एल. दिवेच दिसतात. प्लॅस्टिक बंदी आहेच. दुकानामध्ये कागदी पिशव्यांचा वापर होतो. वेगवेगळ्या उत्सवातील मूर्तींचं विसर्जन कृत्रिम हौदात केलं जातं. घनकचऱ्याचं १०० टक्के





व्यवस्थापन केलं जातं. गावातला सगळा कचरा नॅडॅप खत खड्ड्यात टाकला जातो. कुजलेल्या कचऱ्याचा उपयोग गांडूळ खतासाठी केला जातो. सगळं सांडपाणी शोषखड्डे, परसबाग, बंदिस्त गटारांमधून 'फिल्टर बेड'मध्ये टाकलं जातं. महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेद्वारे या गावानं १० हजार रोपवाटिका तयार केल्या आहेत.

**१२. कसारी (तू) (ता. देसाईगंज, जि.गडचिरोली)**

या गावाचं आरोग्य पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजनेमुळे सुधारलं. हगणदारी मुक्तीसाठी गावानं विशेष प्रयत्न केले. घरोघरी शोषखड्डे झाले. सांडपाणी आणि घन कचऱ्याच्या व्यवस्थापनावर अधिक लक्ष दिलं गेलं. १०० टक्के शौचालयं बांधली गेली. गावाची लोकसंख्या १०७७. मात्र त्यापेक्षा अधिक झाडं लावण्यात आली. रोपवाटिकेत ५००० रोपं तयार झालीत. आता प्रत्येक घरी, रस्त्यांवर, शेतात ती लावण्यात येणार आहेत. करमुक्त ग्रामपंचायत, १०० टक्के शौचालयांचा वापर आणि प्लॅस्टिक वापर बंदी यावर आता गावानं लक्ष केंद्रित केलंय.

**१३. काष्टी (ता. मोखाडा, जि. ठाणे)**

या गावानं लोकसंख्येपेक्षा ३ पट अधिक वृक्ष लागवड केलीय. स्वच्छतेचं वावडं असणारं हे गाव संपूर्णपणे आता हगणदारी मुक्त झालंय. गावात कुऱ्हाड बंदी, दारूबंदी आहे. प्लॅस्टिक बंदी गावानं स्वीकारलीय. विविध मूर्ती आणि निर्माल्यांचं विसर्जन कृत्रिम तळ्यातच केलं जातं. घरोघरी आणि चौकात सौरऊर्जेची संयंत्रे आहेत. त्यामुळे ऊर्जा बचत झाली. झाडं लावताना वनौषधीला प्राधान्य दिलं जातं. वनौषधी उद्यान निर्मितीचं या गावाचं स्वप्न आहे. त्या दिशेनं या गावानं पुढचं पाऊल टाकलंय, ते असं! झाडांच्या लागवडीसाठी खास 'जनजागृती दिवस' इथं साजरा होतो. मोकाट गुरांनी झाडांची नासधूस केल्यास नुकसान झालेल्या झाडाच्या जागी त्यांच्या मालकांना दोन झाडं लावून त्याचं सरंक्षण आणि संगोपन करावं लागतं.

**१४. खापरखेडा (ता. वसमत, जि. हिंगोली)**

हे गाव डोंगराळ प्रदेशातलं. गावात आदिवासी आणि इतर मागास जातीची लोकसंख्या अधिक. हे गाव पूर्वी शासकीय योजनांचा लाभ घेण्याबाबत तसं उदासीनच होतं. मात्र पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजनेमुळं गावाची मानसिकता बदलली. त्यामुळे वैयक्तिक लाभाच्या शासकीय योजनांचा लाभ घेणाऱ्यांच्या संख्येत वाढ झाली. प्लॅस्टिक पिशव्यांवर बंदी आली. सी.एफ.एल. दिव्यांचा वापर वाढला. वृक्ष लागवडीबाबत उत्साह निर्माण झाला. लावलेली ९० टक्के झाडं आज सुस्थितीत आहेत.

**१५) किकवारी (खु) (ता. वसमत, जि. हिंगोली)**

या गावानं जलसंवर्धनाच्या विविध उपक्रमांना यशस्वीपणे राबवून आर्थिक संपन्नता साधली. लोकसहभागाद्वारे वनराई बंधारे, भूमीगत बंधारे, मातीबांध व इतर बंधारे बांधून पाणी अडवलं, पाणी जिरवलं. कुऱ्हाड बंदी आणि चराई बंदी केली. त्यामुळे पाण्याची पातळी वाढली. परिणामी शेतीचं उत्पन्न वाढलं. बागायती क्षेत्रात वाढ झाली. मजुरांना गावातच रोजगार मिळू लागला. घनकचऱ्याचं व्यवस्थापन आणि १०० टक्के करवसुली हे या गावाचं वैशिष्ट्य.

**१५. राजगड (ता. मूल जि. चंद्रपूर)**

या गावानं तलावाच्या काठावर पर्यावरण बाग (इको पार्क) ची निर्मिती केलीय. या गावात नसबंदी, नशाबंदी, चराईबंदी, कुऱ्हाडबंदी, लोटाबंदी, बोअरबंदी, श्रमदान या सप्तसूत्रीचं १०० टक्के पालन केलं जातं. या गावात पान टपऱ्यांना स्थान नाही. गावात सर्व अंतर्गत रस्ते सिमेंट क्राँक्रिटचे! सार्वजनिक सांडपाण्यावर प्रक्रिया करणारी ३ संयंत्र इथं आहेत. औषधी वनस्पती प्रामुख्यानं असलेली ४० हजार रोपं असलेली रोपवाटिका हे गावाचं वैशिष्ट्य. गावात १० सौरऊर्जेचे पथदिवे, सर्व ५० पथदिव्यांना सी.एफ.एल. दिवे लावण्यात आले आहेत. घरातल्या आणि गावातल्या एकत्रित सांडपाण्यावरची परसबाग या गावात दिसते. गावात २५०० मिटरची बंद गटारे आहेत. ३०५ कुटुंबांकडे पक्की शौचालयं आहेत. ग्रामपंचायतीच्या उत्पन्नात वाढ व्हावी म्हणून ११०० सागाची लागवड करण्यात आली. गावकरी घरपट्टी आणि पाणीपट्टी नियमितपणे भरतात. घरोघरी स्वच्छ पिण्याचं पाणी जातं. कधीही गेलं तरी स्वच्छ, सुंदर आणि प्रसन्न दिसणारं हे गाव इतर गावांसाठी प्रेरणादायी असच!

**१६. वझर (ता. खामगाव, जि. बुलढाणा)**

या गावच्या शाळेतील मुलांनी शौचालय बांधण्यासाठी पालकांकडे आग्रह धरला. करवसुली वाढण्यासही याच शाळकरी मुलांचा आग्रह कामी आला. गावात १०० टक्के करवसुली झाली. संपूर्ण गावात सी.एफ.एल. दिव्यांचा वापर केला जातो. गावातील मजुरांचे स्थलांतर थांबविण्यासाठी गाव तलावाचं खोलीकरण, वृक्ष लागवड, बांध बंधिस्ती असे उपक्रम राबवले गेले.

**१७. कोरेगाव (ता. वाळवा जि. सांगली)**

या गावानं ११ गुंठे जागेवर 'विकास पेरू' या प्रजातीच्या वृक्षांची लागवड करण्याची कल्पकता दाखवली. 'विकास पेरू' पासून ग्रामपंचायतीस वार्षिक ८० हजाराचं उत्पन्न मिळेल. हा पैसा गावाच्या विकासासाठी वापरला जाईल. या झाडांना पाणी देण्यासाठी सहा बॅरेलची खरेदी केली गेली. त्यातून भरपूर पाणी दिलं जातं.

गावातल्या सगळ्या कचऱ्यापासून खत तयार केलं जातं. हेच खत गावातील झाडांसाठी वापरलं जातं. कचऱ्याचं कंपोस्टिंग होत असल्यानं गाव झालं संपूर्ण प्रदूषणमुक्त. १०० टक्के हगणदारी मुक्तीचाही फायदा झाला. प्लॅस्टिक बंदी आहेच. गावातील सगळ्याच घरांना गटारं आहेत. या सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते शेतीसाठी भाड्यानं दिलं जातं. ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाचं हे आणखी एक साधन! गावात २५ ठिकाणी सौरदिवे लावले गेले आहेत.

**१८. लिंबगाव (ता. उदगीर, जि. लातूर)**

माळरानावर बसलेल्या या गावाची मानसिकता शासनाच्या विविध अभियानामुळं बदलली. गाव शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी पुढं आलं. गावातील पशुधनात वाढ होऊन दूध उत्पादन वाढलं. ९० सिंचन विहिरी गावाला मिळाल्या. ६५७ लोकसंख्या असलेल्या या गावात ३ बायोगॅस संयंत्रे, ६ सार्वजनिक कचराकुंड्या, २ सौरऊर्जा पथदिवे आहेत. कापडी पिशव्याचा वापर, सर्व पथदिवे सी.एफ.एल. व सौरऊर्जेवर चालणारे लावणं, बायोगॅस वापर वाढविणं, १०० टक्के कचऱ्यापासून खतनिर्मिती, सांडपाण्याचं व्यवस्थापन यावर या गावानं आता लक्ष केंद्रित केलं आहे.

**१९. मान्याची वाडी (ता. पाटण जि.सातारा)**

या गावानं १० बचतगटाच्या सहाय्यानं 'सौरग्राम'





ही संकल्पना यशस्वी केली. गावात सर्व कुटुंबाकडे एलईडी बल्ब आहेत. सर्वत्र बंदिस्त गटारं दिसतात. या पाण्यावर परसबाग फुलल्या. रासायनिक खतांवर बंदी टाकून सेंद्रिय शेतीला गावानं प्राधान्य दिलय. 'घर तेथे गांडूळ प्रकल्प' राबवला जातो. 'घर तेथे मुऱ्हा म्हैस' अशी एक योजना राबवली जाते. गावानं इतरांपेक्षा पुढचं पाऊल टाकून 'एक व्यक्ती पाच झाडं' या तत्त्वाला अंगीकारलय. त्यामुळे गावात लोकसंख्येच्या पाचपट झाडं आहेत.

**२०. पिंगुळी (ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग)**

१०० टक्के मीटर पद्धतीनं पाणी पुरवठा करणारी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एकमेव ग्रामपंचायत. ग्रामपंचायतीनं नळपाणी पुरवठा बिलाचं संगणकीकरण केलय. पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजनेपूर्वीच १२५ बायोगॅस उभारून या गावानं राज्यात नाव कमावलं. या बायोगॅसमुळे दर महिन्याला १५२ सिलेंडर्स आणि ६० हजार रुपयांपेक्षा जास्त वार्षिक बचत झाली. टाकावू वस्तू आणि घनकचऱ्याचा उपयोग ऊर्जा निर्मितीसाठी झाला. त्यामुळे पर्यावरणाची हानी टळली. सेंद्रिय शेणखताचा वापर वाढला. रासायनिक खतांचा वापर घटला. जळावू लाकडाच्या वापराचं प्रमाण कमी झालं. पर्यावरण संतुलनाचं वैशिष्ट्यपूर्ण काम गावात दिसून येतं.

**२१. सावळे (ता.पनवेल, जि. रायगड)**

गावच्या ग्रामपंचायतीनं शोषखड्डे, गटारे, वृक्ष लागवड, सार्वजनिक बायोगॅस यासाठी जागा उपलब्ध करून घेण्यासाठी अतिक्रमण हटविण्याची जोरदार मोहीम राबवली. त्यामुळे घनकचरा, सांडपाण्याची विल्हेवाट सुव्यवस्थितरीत्या करता आली. लोकसंख्येच्या दुप्पट झाडं लागली. शोषखड्डे झाले. परसबागा उभ्या राहिल्या.

उघड्यावर शौचालयास जाण्यास बंदी घातली गेली. ओला कचरा आणि सुका कचरा टाकण्यासाठी प्रत्येकी १० घरामागे कुंड्या ठेवण्यात आल्या. घंटागाडी सुरू करून कचरा उचलण्याची दररोज व्यवस्था केली गेली. गावातली अस्वच्छता आणि घाण कमी झाल्यानं रोगांचं प्रमाण कमी झालं. औषधांवरील खर्च कमी झाल्यानं खर्चात बचत झाली. पशुंचे मलमूत्र आणि सार्वजनिक शौचालयातील मलमूत्राचा उपयोग इंधन व वीज निर्मितीसाठी करण्यात आला. सौरऊर्जेवर चालणारे वाटर हिटर, सौर कूकर, सौर दिवे यांचा वापर करण्यावर या गावाचा भर आहे.

**२२. शेळगाव-गौरी (ता. नायगाव, जिल्हा नांदेड)**

पोळा सण सगळ्या गावातच साजरा होतो. पण या



दिवशी पशुधन अधिकाऱ्यांना गावात बोलावून त्यांच्याकडून सर्व गुरांची तपासणी व लसीकरण करणारं हे गाव कदाचित एकमेव असावं. या गावानं महिलांचा सन्मान करण्यासाठी प्रत्येक घराला एका स्त्रीचं नाव दिलंय. प्रत्येक घरापर्यंत पिण्याचा पाण्याचा नळ पोहचवला. गावाचा सामाजिक सलोखा इतका मोठा की सर्व धर्मीयांसाठी इथं एकच स्मशान भूमी! या सलोख्यामुळे हे गाव विविध योजना यशस्वीपणे राबवणारं 'आदर्श गाव' असा लौकिक प्राप्त करू शकलं.

**२३. शीर (ता. गुहागर, जि. रत्नागिरी)**

या गावातील महिलांच्या १७ बचतगटांनी भाजीपाला व्यवसायासाठी कर्ज घेतलं. गावातील १० हेक्टर पडीक जमिनीवर मिरची, कलिंगड, चवळी, पावटा, वांगी, पालेभाज्या, भेंडी, हळद ही पिकं घेण्यास सुरुवात केली. या शेतीसाठी ठिबक सिंचनाच्या वापरासाठी या बचतगटांनी पुढाकार घेतला. हे महिला बचतगट आणि शाळेतील विद्यार्थ्यांमधून निवडलेले पर्यावरणदूत यांच्या सहाय्यानं वृक्ष लागवडीचं काम केलं गेलं. आजूबाजूच्या ४ वाड्यांनी एकत्र येऊन स्वतंत्र पाणीपुरवठा योजना तयार केली. यासाठी शासनाचं अनुदान घेतलं नाही. ग्रामपंचायतीनं लोकसहभागातून २० वनराई बंधारे बांधले. झाडांचं संगोपन आणि देखभाल करण्यासाठी वार्ड सदस्यांची समिती नेमली. माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना वाड्या दत्तक देऊन झाडांच्या संगोपनाचं काम केलं.

**२४. येलूर (ता. वाळवा, जि. सांगली)**

हे गाव पूर्वी वृक्षलागवडीबाबत फारसं उत्साहित नव्हतं. मात्र पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजनेमध्ये वृक्ष लागवडीवर भर दिला गेला. गावातील सर्व सहकारी संस्थांना अभियानात सामील करून घेतलं गेलं. संस्थेचा लाभांश रोखीने देण्याऐवजी झाडाच्या रूपात दिला गेला. ७००० झाडांची लागवड केली गेली. महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेत २०००० रोप लावण्यात आली. मोकळ्या जागांवर दुतर्फा वृक्ष लागवड केली गेली. कचरा व्यवस्थापन, बायोगॅस, सौरऊर्जा, प्लॅस्टिक बंदी यावर या गावानं आता लक्ष केंद्रित केलं आहे.

ही काही प्रातिनिधिक उदाहरणं झालीत. अशी बरीच गावे आपापल्या पद्धतीने व कुवतीनुसार पर्यावरण संतुलित ग्राम समृद्धी योजनेमध्ये सहभागी होऊन स्वत:मध्ये बदल घडवताहेत. अशाच गावांमुळे देशही घडतो. देश म्हणजे अशाच गावांनी बनलेला जिवंत प्रदेश. देशाचं चैतन्य, पावित्र्य, उत्साह राखण्याचं काम अशी गावं करीत असतात. शासनाचं सहाय्य आणि लोकसहभागाचा सकारात्मकरित्या समन्वय साधला जातो, तेव्हा त्यातून नवनिर्मिती होते. ही सर्व आदर्श गावे म्हणजे त्याचं मूर्तिमंत रूप. या गावांचा आदर्श ठेवत आता सर्वच गावांनी आपलं गाव कसं आदर्श बनविता येईल याचा ध्यास घेतला पाहिजे.

**(संदर्भ : ग्रामविकास विभागाची पर्यावरणरत्न पुस्तिका )**

✦✦

गावीच केले हातोडे-खिळे । ऐरणी-कुऱ्हाडी, सापळे-विळे
पावडे-कुदळ्या, शिंके आदि सगळे । सामान जीवनाचे



# विकासाची सिद्धी

महाराष्ट्राला सामाजिक कार्यकर्त्यांचा वारसा मिळाला आहे. अनेक समाजसेवकांनी विविध क्षेत्रांमध्ये कार्य करून त्याही क्षेत्रात सकारात्मक बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला आहे आणि त्यात ते यशस्वी झाले आहेत. महाराष्ट्रातील सामाजिक कार्यकर्ते आणि सामाजिक क्रांतिकारक म्हटले की डोळ्यांसमोर महात्मा जोतीबा फुले, सावित्रीबाई फुले, धोंडो केशव कर्वे, इरावती कर्वे, रघुनाथ कर्वे, बाबा आमटे, प्रकाश आमटे, डॉ. अभय बंग, अण्णा हजारे अशी अनेक नावे येतात. या सर्वांव्यतिरिक्त अनेक कार्यकर्ते आहेत ज्यांची दखल माध्यमातून किंवा राज्य पातळीवर घेतली जात नाही. स्वातंत्र्यानंतर गांधीजींकडून प्रेरणा घेऊन अनेक सामाजिक कार्यकर्ते देशातील इतर राज्यात जसे निर्माण झाले तसेच महाराष्ट्रातही झाले. ग्राम विकासाचे काम करणारे काही कार्यकर्ते आपल्या कामाचे श्रेय गांधीजींच्या विचारांना देत नसले, तरी अशा कामांचा मूळ पाया गांधीजींच्या विचारांवरच आधारित आहे हे मान्य करावे लागेल.

प्रत्येक सामाजिक कार्यकर्त्यांचे काही ना काही प्रेरणास्थान असते. अण्णा हजारेंनी जगण्याची प्रेरणा स्वामी विवेकानंद यांच्या विचारांतून घेतली. सैन्यात असलेल्या आणि जीवनाला कंटाळलेल्या हजारे यांनी आत्महत्या करण्याचा विचार केला होता, मात्र स्वामी विवेकानंद यांचे विचार वाचल्यानंतर आपला मनसुबा बदलला आणि आपले जीवन ग्राम विकासाला वाहून घेतले. पण त्या अगोदर १२ वर्षे लष्कराची सेवा करून स्वेच्छानिवृत्ती घेतली ज्यामुळे त्यांना निवृत्ती वेतन लागू झाले.

आपल्या कार्याकरिता अण्णांनी अहमदनगर जिल्ह्याच्या पारनेर तालुक्यातील अतिशय दुष्काळग्रस्त असलेले राळेगणसिद्धी हे गाव निश्चित केले. पाणी, अन्न आणि रोजगाराकरिता या गावातील लोकांना वणवण फिरावे लागत असे. उन्हाळ्यात त्या गावाला टँकरने पाणी पुरविले जात असे. एकीकडे अफाट गरिबी आणि दुसरीकडे गावातील पुरुषांचे दारूचे व्यसन यामुळे गावतील बायका त्रस्त झाल्या होत्या. दारूच्या आहारी गेलेल्या लोकांमुळे गावातील शांतता बिघडली होती. गावाचा विकास करण्यासाठी गावात दारूबंदी करण्याचा निश्चय अण्णांनी केला आणि गावातीलच काही मंडळींना घेऊन गावात दारूबंदी मोहीम यशस्वीरीत्या राबवली. हे कार्य सोपे नव्हते पण अण्णांच्या नेतृत्वाने ते शक्य झाले.

पुढील आयुष्यात जरी अण्णा हजारे यांनी



गांधीजींच्या काही तत्त्वांचा स्वीकार केला असला, तरी त्यांची सर्वच पावले गांधीवादी विचारातून उचललेली नव्हती. उदाहरणार्थ दारूबंदीच्या मोहिमेत दारूच्या

**अभय मोकाशी**

आहारी गेलेल्या लोकांना वेळप्रसंगी दारू सोडण्याकरिता फटकवण्यातही आले. नेतृत्व करणाऱ्या अण्णा हजारेंनी आपल्या हाताची बोटे काही दारुड्यांच्या गालावरही उमटवली. दारू पिणाऱ्यांच्या कुटुंबाच्या संरक्षणाकरिता असे करणे योग्यच होते असा अण्णांचा विश्वास होता.

गावातील पाण्याची बिकट परिस्थिती लक्षात घेऊन अण्णा हजारे यांनी गावात श्रमदानाने पाण्याचे व्यवस्थापन करायचे ठरविले. ग्रामपंचायतीबरोबरच गावातील लोकांच्या श्रमदानाने हे कार्य पुढे नेण्याचे ठरविले. अशा प्रकारचे काम कुठे चालले आहे त्याचा अभ्यास अण्णांनी केला आणि त्यातूनच त्यांच्या लक्षात आले की पुणे जिल्ह्यातील सासवडमध्ये विलासराव साळुंखे नावाच्या कार्यकर्त्यांनी जल विभाजकाचा वापर करून पाणी अडविले होते. राळेगणसिद्धीमध्ये पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे प्रत्येक थेंब अडवून त्याचा वापर गावाकरिता व्हावा असा प्रयत्न अण्णांचा होता. गावकऱ्यांच्या मदतीने अण्णांनी गावात सुरुवातीला ४० बांध बांधून पाणी अडविण्यास सुरुवात केली.

बघता बघता गावातील लोकांनी ५०० हेक्टर जमीन ओलाव्याखाली आणली आणि तेथे वनीकरणाचे काम हाती घेण्यात आले. या सर्व प्रयत्नाने जमिनीत झिरपत असलेल्या पाण्यात वाढ झाली आणि भूगर्भातील पाण्याची पातळी वाढली. हा प्रयत्न सुरू करण्याअगोदर जेमतेम ३०० एकर जमिनीवर शेती होऊ शकत होती. ते प्रमाण लवकरच दीड हजार एकरवर गेले. अशा प्रकारे राळेगणसिद्धीत लोकांचे उत्पन्न वाढू लागले. मोठ्याप्रमाणात जमीन ओलाव्याखाली आल्यामुळे शेतीत वाढ झाली आणि गावातच रोजगार निर्माण झाले. अन्नाकरिता गावोगावी फिरणाऱ्या गावातील लोकांना आपल्याच गावात मुबलक अन्न मिळू लागले. तसेच शेतीकरिता लागणाऱ्या श्रमाची गरज लक्षात घेता गावातच रोजगार मिळू लागला. योग्य नियोजन केल्यामुळे ग्रामीण भागातील परिस्थिती कशी बदलू शकते याचे उदाहरण अण्णांनी जगासमोर मांडले. एके काळी रोजगाराकरिता स्थलांतर करून वणवण फिरणाऱ्या राळेगणसिद्धीतील जनतेला आपल्याच गावात रोजगार मिळू तर लागलाच, पण गावाच्या क्षमतेप्रमाणे तेथील शेतीची कामे पूर्ण करण्याकरिता मनुष्यबळ कमी पडू लागले आणि इतर गावातून राळेगणसिद्धीत मजुरी करणाऱ्या लोकांची रांग लागली. अण्णांच्या ह्या ग्रामसेवेच्या कार्याची नोंद विविध स्तरांवर घेण्यात आली आहे. महाराष्ट्रामध्ये किमान ७० गावांमध्ये अण्णांनी सुरू केलेले पाणी व्यवस्थापन अंमलात येत आहे. आज राळेगणसिद्धीमध्ये अडीच हजार एकर जमीन शेतीखाली आलेली आहे. अण्णांच्या प्रेरणेने आज गावामध्ये धान्याची पेढी उभारण्यात आली आहे, ज्यात शेतकरी शिलकीचे धान्य जमा करतात आणि गरजू लोकांना त्यातून धान्य पुरविले जाते. असे करजावलेले धान्य घेणाऱ्या लोकांकडून परत केले जाते. अण्णा हजारेंच्या प्रयत्नाने गावामध्ये जातीय भेद कमी झाला आहे, तसेच सामूहिक विवाहांचे आयोजन केले जाते. अण्णा हजारे यांच्या कार्यामुळे अण्णांना विविध सन्मानाने गौरवण्यात आले आहे, त्यामध्ये प्रामुख्याने पद्मश्री व पद्मभूषण, महाराष्ट्र सरकारचे कृषी भूषण पुरकार जागतिक बँकेचे जीतगील स्मृती पुरस्कार आणि केअर फाऊंडेशनचा केअर आंतराष्ट्रीय पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

**संपर्क : ९८६९०३१३३०**

# उजळणाऱ्या वाटा...

## आदर्श गाव संकल्प व प्रकल्प समितीचे कार्याध्यक्ष पोपटराव पवार यांची विशेष मुलाखत...



**आदर्शगाव संकल्पना कशी सुचली?**

१९९२ ला महाराष्ट्र शासनातर्फे ऑगस्ट क्रांती दिनाचा सुवर्णमहोत्सव साजरा केला जात होता. त्यानिमित्त तत्कालीन मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. त्या बैठकीत अच्युतराव पटवर्धन यांनी सूचना केली की, महात्मा गांधीजी यांच्या ग्रामस्वराज योजनेला मूर्त स्वरूप द्यायचे असेल तर गांधीजींनी खेड्याकडे चला अशी जी हाक दिली होती त्यानुसार काम होणे काळाची गरज आहे. म्हणजेच नगर जिल्ह्यातील राळेगणसिद्धी येथे ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी जे कार्य केले, त्याच धर्तीवर महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात एक गाव आदर्श झालेच पाहिजे. यातूनच आदर्शगाव कल्पनेचा जन्म झाला.

**प्रत्यक्ष कामाला कशी सुरुवात झाली?**

१९९४-९५ ला आदर्श गावांसाठी ३५० गावे निवडली. पैकी २५५ गावांचे प्रस्ताव आले. आदर्शगाव समितीच्या अध्यक्षपदी अण्णा हजारे यांची निवड करण्यात आली. माझे आदर्शगाव हिवरेबाजार याच योजनेतून आदर्श बनले. यास १ एप्रिल २०१२ ला १६ वर्षे पूर्ण होत आहेत. १ जानेवारी २००९ ला मी (पोपटराव पवार) आदर्शगाव संकल्पना व प्रकल्प समितीचा कार्याध्यक्ष झालो. या समितीचे मुख्य कार्यालय पुणे येथे आहे. हिवरेबाजार गाव सुरुवातीच्याच योजनेत आदर्श करण्यात आले होते. जुन्या योजनेतील २५५ गावांना आदर्श करण्यासाठी गेल्या १६ वर्षांत ४१ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला. निधीची कमी-अधिक प्रमाणात उपलब्धता, गावांचा सहभाग, तांत्रिक सहकार्य यामुळे आदर्शगाव प्रकल्प योजना काहीशी विस्कळीत झाली होती. त्यानंतर बैठका घेऊन आवाहन करण्यात आले, पत्रव्यवहारही करण्यात आला. या प्रयत्नांमुळे ५८ गावांचे प्रस्ताव आले. पुन्हा नव्या जोमाने काम सुरू केले. ही ५८ गावे आदर्श करण्यासाठी बैठका घेण्यात आल्या. २०१० ला यासाठी दोन विशेष कार्यशाळा घेण्यात आल्या. जी गावे सक्रिय असल्याचे आढळून आली, त्या गावांना निधी देण्यात आला. आदर्श गाव प्रकल्पाची प्रक्रिया, मंजुरी यानुसार निधीचे वाटप करण्यात आले. गेल्या दीड ते दोन वर्षांत ५८ पैकी ३६ गावांसाठी १४ कोटी रुपयांचा निधी मंजुर झाला. त्यातील ३० गावांना निधीचे समसमान वाटप करण्यात आले. ३१ मार्च २०१२ पर्यंत जुनी गावे पूर्ण करा, अशी मुदत निश्चित करण्यात आली होती. त्यानुसार ९० ते ९५ टक्के कामे पूर्ण झाली आहेत. गेल्या वर्षभरात (२०११) आलेल्या नव्या प्रस्तावांतून ७८ पैकी ३६ गावांची निवड करण्यात आली. प्रत्यक्ष प्रशिक्षण देऊन कामास सुरुवात केली.

**आतापर्यंत मॉडेल म्हणून कोणती गावे समोर आली आहेत?**

जुन्या ३६ गावांपैकी ८ गावे मॉडेल म्हणून खूपच चांगली तयार झाली आहेत. त्यातील ३ गावे अमरावती विभागातील आहेत. झांबरून महाली (ता. वाशिम) या गावाने तर शेडनेटपासून डेअरीपर्यंत प्रगती साधली आहे. पंजाबराव देशमुख यांचे पापळ (जि. अमरावती) गाव आदर्श बनविण्यासाठी १ कोटी ३ लाख रुपये खर्च करण्यात आले. चालडाणा (जि. बुलडाणा) या भूदान चळवळीच्या गावानेही आदर्शगाव म्हणून बहुमान मिळविला आहे. विशेष म्हणजे या तिन्ही गावांमध्ये दलित, आदिवासी लोक बहुसंख्येने राहतात. या गावावर ७० लाख रुपये खर्च केले. येथील पीक पद्धती (क्रॉप पॅटर्न) देखील बदलली आहे. या गावाने गहू कधी पाहिला नव्हता. येथील शेतकरी आता मोठ्या प्रमाणावर गव्हाचे पीक घेऊ लागले आहेत. सुमारे १२०० लोकसंख्येचे हे गाव हागणदारीमुक्त असून, एकाच रंगाची शौचालये या गावात बांधण्यात आली आहेत. निर्मल असल्याशिवाय आदर्शगाव योजनेसाठी पैसाच उपलब्ध करून दिला जात नाही.

**हिवरेबाजार सारखी गावे करण्यासाठी कुठे आणि कोणते प्रयत्न केले?**

विदर्भातील लोकांनी हिवरेबाजार किंवा राळेगणसिद्धी पाहण्यासाठी अजिबात यायचेच नाही म्हणजेच त्यांनी त्यांचीच गावे अशी काही निर्माण करायची की त्यांचाच आदर्श लोकांनी घ्यावयास हवा, असे पवार म्हणाले. सर्वाधिक शेतकऱ्यांच्या आत्महत्या या विदर्भात त्यातल्या त्यात अमरावती जिल्ह्यात झालेल्या असल्यामुळे आम्ही तेथे लक्ष

**श्रमदानाचे सप्ताह घेवोनि । रस्ते दुरुस्त करावे सर्वांनी**
**शोषक खड्डे, मोऱ्या करोनि। सांडपाणी थांबवावे**



केंद्रित केले. आणखी एक गाव परभणी जिल्ह्यातील पुंगळा येथे सुमारे ८० ते ८२ लाख रुपये खर्च केले. रायगड जिल्ह्यातील वरंद (ता. महाड) या गावावरही १ कोटी खर्च केले. विशेष म्हणजे या गावांची आदर्शगाव करण्यासाठी मनापासूनची तयारी होती. म्हणूनच ही गावे संपूर्णतः आदर्श केली. नगर तालुक्यातील पिंपळगाव कौडा येथेही जवळपास ८४ ते ८५ लाख रुपये खर्च केल्यामुळेच हे गाव आदर्शगाव म्हणून नावारूपास आले आहे, अशी ही जुन्या योजनेतील गावे आदर्शगावे म्हणून निर्माण झाली आहेत. सुरुवातीस राज्यातील राळेगणसिद्धी व हिवरेबाजार या दोनच गावांची आदर्शगावे म्हणून चर्चा होती. दीड-दोन वर्षांत राज्यातील ८ गावांची चर्चा होत आहे. आगामी नवीन योजनेमध्ये छत्तीस गावांची कामे सुरू आहेत. त्यातील २४ गावे एकट्या विदर्भातील आहेत. आणि विशेष म्हणजे आदिवासी, दलित, बहुजन असा समाज असलेली ही गावे आहेत. नागपुर विभागातूनही चांगली गावे पुढे येत आहेत. वर्षभरात ३५ गावे आदर्श होतील. या गावांची राळेगण आणि हिवरेबाजार प्रमाणेच राज्यात नव्हे तर देशात चर्चा होईल आणि राळेगणसिद्धी, हिवरेबाजार येथील गर्दी कमी होऊन या नवीन गावांना भेटी देण्यासाठी लोकांची पावले पडतील, असे धोरण आम्ही निश्चित केले आहे.

**वैशिष्ट्य :** आदर्शगाव योजनेचा आर्थिक आढावा घेतला जात नाही. येथे फक्त तपासली जाते ती गुणवत्ता. पुणे कार्यालयातील तांत्रिक पथक, संस्थेचे तांत्रिक पथक आणि ग्रामसमिती यांच्या बैठका घेतल्या जातात. जिल्हा समितीकडे आलेल्या अंदाजपत्रकांवर चर्चा होऊन समितीमार्फत तो प्रस्ताव पुणे कार्यालयाला पाठविण्यात येतो. विशेष म्हणजे केवळ बैठकांवर वेळ न दवडता ७५ टक्के वेळ गावांमध्येच प्रत्यक्ष फील्डवर देण्यात येतो. आणि २५ टक्के वेळ कार्यालयात दिला जातो. महिन्यातून ५ ते ६ हजार किलोमीटरचा प्रवास माझ्यासह आदर्शगाव योजनेच्या टीमचा होतो, असे पोपटराव पवार म्हणतात.

**केंद्र व राज्याकडून काय मदत मिळते?**

ही योजना केवळ महाराष्ट्र राज्यापुरती मर्यादित आहे. त्यामुळे सर्व निधी राज्याकडून प्राप्त होतो. या योजनेचे अध्यक्ष जलसंधारण मंत्री नितीन राऊत व राज्यमंत्री गुलाबराव देवकर आहेत. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांचेही योजनेस पाठबळ मिळते. ही प्रकल्पयोजना तीन वर्षांची आहे. दीड वर्षात गावातील जलसंधारणाची कामे पूर्ण केली जातात. सहा महिन्यांत कृषी विस्तार कार्यावर भर दिला जातो. आणि राहिलेल्या एका वर्षात गावातील इतर कामे पूर्ण केली जातात. प्रत्यक्षात दीड वर्षातच संपविण्याचा प्रयत्न असतो. कमीतकमी वेळेत काम संपले की लोकसहभाग आणि प्रतिसाद चांगला मिळतो. लोक खूश होतात. म्हणजेच काम रखडले, रेंगाळले किंवा लांबणीवर पडले तर लोकांचा उत्साह मावळतो. पुन्हा ते अशा कामासाठी सहजासहजी तयार होत नाहीत. मुख्य काम : पाणलोट क्षेत्र विकास हे आदर्शगाव योजनेतील मुख्य काम होय. ५ ज्यांच्याकडे उपभोगाची साधने नाहीत उदा. मागासवर्गीय, भटके विमुक्त, अनुसूचित जाती-जमाती, दारिद्र्यरेषेखालील लोक, सुशिक्षित बेरोजगार तरुण यांच्यासाठी १९ टक्के तरतूद आहे. गावाची आर्थिक, सामाजिक विषमता दूर करणे हे या योजनेचे उद्दिष्ट्य आहे. १) महात्मा गांधींची ग्रामस्वराज २) डॉ. आंबेडकरांचे सामाजिक व आर्थिक विषमता दूर करण्याचे धोरण ३) स्व. यशवंतराव चव्हाण यांचे त्रिस्तरीय पंचायतराज या तीन गोष्टी साध्य केल्या जातात. योजनेचे सर्व निर्णय ग्रामसभा घेते.

**आतापर्यंत हिवरेबाजारला कोणीकोणी भेटी दिल्या?**

केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी २००९ मध्ये हिवरेबाजारला भेट दिली. महसूलमंत्री बाळासाहेब थोरात दरवर्षी आवर्जून हिवरेबाजारला भेट देतात. एवढेच नव्हे तर मे महिन्यात ना. थोरात हिवरेबाजारमध्ये पाणीपातळी पाहण्यासाठी आवर्जुन येतात. उपमुख्यमंत्री अजित पवार, गृहमंत्री आर.आर. पाटील, ग्रामविकास मंत्री जयंत पाटील, माजी ग्रामविकासमरमंत्री विजयसिंह मोहिते पाटील आदींनी हिवरेबाजारला भेट दिली आहे. अनेक केंद्रीय मंत्री, राज्यमंत्री हिवरेबाजारला भेट देऊन गेले आहेत. केंद्रीय ग्रामविकासमंत्री डॉ. सी.पी. जोशी, रघुवंशप्रतापसिंग आदींनी आदर्श हिवरेबाजारला भेट देऊन प्रशंसोद्गार काढले आहेत.

**(उर्वरित मजकूर पान ५८ वर)**

## आफ्रिकेत हिवरे बाजार

केंद्राच्या ग्रामविकास खात्यावर महाराष्ट्राचे प्रभूत्व अनेक कारणांनी आहे. मोठया प्रमाणात निधी खेचण्याचे काम तर विविध योजनेतून राज्य करीत असतेच... परंतु महाराष्ट्र हे अनेक नव्या प्रयोगासाठी या विभागाचे प्रेरणास्त्रोत आहे.

रोजगार हमी योजना, माहितीचा अधिकार यासह शेकडो योजना देणारे राज्य सध्या हिवरे बाजार, राळेगणसिद्धी आदी आदर्श गावांच्या माध्यमातून या विभागाचे मार्गदर्शन करीत आहे. ५ व ७ मार्च २०१२ रोजी नवी दिल्लीत झालेल्या ऑफ्रो-एशिएन रुरल डेव्हलपमेंट ऑरगॅनायझेशनच्या ५० व्या बैठकीत हिवरे बाजारचे सरपंच पोपटराव पवार यांनी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग व ग्रामविकास मंत्री जयराम रमेश यांच्यापुढे आदर्श गावाचे सादरीकरण केले. मुंबई आयआयटीचे विद्यार्थी असणारे जयराम रमेश या सादरीकरणाने प्रभावित झाले. तर आफ्रो-एशिएन संस्थेच्या प्रकल्प संचालक एन्जेला फोकोजिले बीडीडीझा यांनी या परिषदेत हिवरे बाजर मॉडेल अफ्रिकेत राबविण्याचे जाहीर केले. केंद्रीय मंत्री जयराम रमेश यांनी या वेळी पोपटराव पवार यांना हिवरे बाजारला लगेच मला यायचे अशी विचारणा केली. देश निवडणुकांमध्ये गुंग असताना जयराम रमेश १० मार्चला हिवरे बाजारच्या ग्रामस्थांनी टेकडीवर असलेल्या हातपंपाचे पाणी हाताने पित होते...

**- प्रवीण टाके, नवी दिल्ली**



सुंदर असावे वाचनालय । नाना ग्रंथ ज्ञानमय
करावया सुबुद्धिचा उदय । गाव-लोकी

# रोजगार हमीची मुद्रा!

**डॉ. श्रीकर परदेशी**
जिल्हाधिकारी, नांदेड

महाराष्ट्र राज्याच्या रोजगार हमी योजनेच्या यशस्वी वाटचालीची दखल घेत केंद्र शासनाने संपूर्ण देशामध्ये ही योजना लागू करण्याच्या हेतूने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अधिनियम २००५ पारित केला. या राष्ट्रीय कायद्याची अंमलबजावणी दि. २ फेब्रुवारी २००६ रोजी सुरू करण्यात येऊन टप्प्याटप्प्याने दि. १ एप्रिल २००८ पर्यंत देशातील सर्व जिल्ह्यांचा त्यात समावेश करण्यात आला आहे.

महाराष्ट्रात दि. २ फेब्रुवारी २००६ पासून सुरू झालेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेच्या पहिल्या टप्प्यात आदिवासी बहुल व मागास अशा १२ जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला. दि. १ एप्रिल २००७ पासून आणखी ६ जिल्ह्यांचा समावेश तर दि. १ एप्रिल २००८ पासून उर्वरित १५ जिल्ह्यांचा त्यात समावेश करण्यात येऊन ही योजना संपूर्ण महाराष्ट्रात लागू करण्यात आली आहे. दि. २६ जुलै २०११ पासून महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेचे नांव 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र' असे करण्यात आले आहे.

या योजनेंतर्गत नोंदणी केलेल्या ग्रामीण कुटुंबाला वित्तीय वर्षात किमान १०० दिवस केंद्र शासनाच्या निधीतून अकुशल कामाची हमी देण्यात आली आहे. त्यापेक्षा जास्त दिवस काम पाहिजे असल्यास राज्य



साधावा कार्याचा उत्साह। तोचि उत्सव निःसंदेह
तुकड्या म्हणे गावी प्रवाह । वाहू द्या शांति, सुखाचा



शासनाच्या निधीतून अकुशल रोजगारांची हमी देण्यात आली आहे. या योजनेंतर्गत किमान ५० टक्के रक्कमेची कामे ग्रामपंचायतीने करणे अपेक्षित असून कायद्याची अंमलबजावणीची प्रथम जबाबदारी ग्रामपंचायतीची आहे. या योजनेमध्ये केवळ नोंदणीकृत जॉबकार्ड धारक मजुरांनाच काम दिले जाते. गावाच्या ५ कि.मी. परिसरात रोजगार देणे बंधनकारक आहे. या कामावर कंत्राटदार लावण्याची बंदी असून मजुरांमार्फत करता येणाऱ्या किमान अनिवार्य कामांसाठीच यांत्रिक साधनांचा वापर करता येतो.

या योजनेची अंमलबजावणी करताना मजुरांनी अर्ज केल्यानंतर १५ दिवसांच्या आत काम देणे बंधनकारक असून रोजगार न दिल्यास मजुरांना बेरोजगार भत्ता देण्याची तरतूद आहे. याचबरोबर कामाची अंमलबजावणी करताना कामाच्या ठिकाणी मजुरांना पिण्याचे स्वच्छ पाणी, लहान मुलासाठी निवारा, विश्रांतीची जागा, प्रथमोपचार आदी सुविधा उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. जिल्हा स्तरावर कामांची अंमलबजावणी करताना मजुरी व साहित्य यावरील खर्चाचे प्रमाणे ६०:४० असे असणे बंधकारक आहे. या योजनेअंतर्गत मजुरांने किती वेळ व कोणती कामे केली त्याचे मोजमाप करून मंजुराना मजुरी दिली जाते. सरासरी ९ तास (१ तास विश्रांतीचा धरून) सर्वसाधारणपणे काम केल्यास १२७ रुपये इतकी मजुरी प्रतिदिन मजुराला मिळू शकते.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अधिकाअधिक लोकाभिमुख, पारदर्शक करण्याच्या हेतूने मजुरीचे वाटप बँक किंवा पोस्ट खात्यामार्फत करणे बंधनकारक करण्यात आले असून रोख स्वरूपात वाटप करण्यास संपूर्णत: मनाई करण्यात आली आहे. प्रत्येक कामाचे सामाजिक अंकेक्षण करणे बंधनकारक करण्यात आले आहे. पारदर्शकतेचा एक पुढील टप्पा म्हणून अतिशय प्रभावी अशी MIS प्रणाली विकसित करण्यात आली असून NIC मार्फत विकसित www.nrega.nic.in या वेबसाईटवर संपूर्ण देशाची अद्ययावत माहिती पाहता येऊ शकते.

योजनेच्या अंमलबजावणीकरिता जिल्हाधिकारी यांना जिल्हा कार्यक्रम समन्वयक या नात्याने जिल्हाप्रमुख करण्यात आले आहे.

या योजनेमधून अकुशल रोजगाराची पूर्तता, दीर्घकालीन होणारी कामे व त्याद्वारे सामाजिक पायाभूत सोयी उपलब्ध करून देऊन ग्रामीण जनतेचे राहणीमान उंचावेल व कायम स्वरूपाची मालमत्ता तयार होईल अशी अपेक्षा आहे.

**योजनेंतर्गत घ्यावयाच्या कामांचे स्वरुप.**

■ दुष्काळ प्रतिबंधक कामे (वनीकरण व वृक्ष लागवडीसह) ■ जलसिंचन कालव्यांची कामे (लघू व सूक्ष्म जलसिंचन कामासहित) ■ अनुसूचित जातीजमाती, दारिद्र्यरेषेखालील, भूसुधार खालील व इंदिरा आवास योजनेचे लाभार्थी, कर्जबाजारी लहान व अल्पशेतकरी यांच्या जमिनीसाठी जलसिंचन निर्माण करणारी कामे, फळझाड व भूसुधार कामे. ■ पारंपरिक पाणीसाठ्यांच्या याजनेचे नूतनीकरण करणे व तलावातील गाळ काढणे ■ भूविकासाची कामे. ■ पूरनियंत्रण, पूरसंरक्षणाची कामे, पाणथळ क्षेत्रात चाऱ्याची कामे. ■ ग्रामीण भागात बारमाही जोडरस्त्यांची कामे. ■ राजीव गांधी भवन ■ केंद्र शासनाची सल्लामसलत करून राज्य शासनाने ठरविलेली कामे

ही योजना यशस्वी करण्याची अतिशय महत्त्वाची जबाबदारी ग्रामपंचायतींवर सोपविण्यात आली आहे. ग्रामपंचायतींनी ग्रामसभेच्या माध्यमातून प्रत्येक गावच्या वार्षिक अकुशल रोजगारांच्या गरजेचा अंदाज बांधून वार्षिक कामाचा आराखडा व नियोजन तयार करणे अभिप्रेत आहे. यामध्ये घ्यावयाच्या कामाची निवड व प्राधान्य याचा अधिकार ग्रामपंचायतीला आहे. ग्रामपंचायती मार्फत कामे करताना स्थानिक गावकऱ्यांचे व स्थानिक लोकप्रतिनिधींचे त्यावर प्रभावी नियंत्रण राहून गुणवत्तापूर्ण कामे पूर्ण व्हावीत अशी यामागची अपेक्षा आहे. हे सर्व करणे सुलभ व्हावे या करिता शासनाने तालुकास्तरावरील प्रशासकीय व तांत्रिक अधिकार यांचे प्रभावी विकेंद्रीकरण केले आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत देशात सर्वत्र मोठ्या प्रमाणात कामे होत असताना सुरुवातीस या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये महाराष्ट्र मागे पडला होता. जुनी रोजगार हमी योजनेची मानसिकता व नवीन योजनेच्या बदलाची उदासीनता यामुळे सुरुवातीच्या काही वर्षात या योजनेच्या अमंलबजावणीच्या प्रगतीत सुधारणा नव्हती. तथापि, गेल्या (२०११-१२) वर्षामध्ये राज्य शासनाने या योजनेच्या

**महाराष्ट्राची वाटचाल** (२३ मार्च २०१२ पर्यंत)

| सन | मनुष्य दिन निर्मिती(लाख) | खर्च (रु.कोटी) |
|---|---|---|
| २००९-१० | १९१.६६ | २५३.४९ |
| २०१०-११ | १८८.९४ | ३४५.९५ |
| २०११-१२ | ४५६.७५ | १०२१.६९ |

परिणामकारक अंमलबजावणीसाठी राज्य शासनातर्फे अनेक महत्त्वाचे निर्णय गेल्या काही महिन्यात घेण्यात आले आहेत. परिणामी सन २०११-१२ मध्ये मजुरांची उपस्थिती व योजनेवरील खर्च वाढला.

राज्य शासनाने घेतलेला अतिशय सकारात्मक धोरणात्मक निर्णयामुळे क्षेत्रीय स्तरावरील कामांमध्ये मोठी गती आली आहे.

**नांदेडची प्रेरणादायी यशोगाथा**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत नांदेड जिल्ह्याने गेल्या तीन वर्षांमध्ये राज्यात सर्वाधिक मनुष्यदिन निर्मिती व सर्वाधिक खर्च केलेला आहे. हे कशा पद्धतीने साध्य केले त्याची ही यशकथा.

ही यशोगाथा साकारताना खालीलप्रमाणे नियोजनपूर्वक कार्यवाही करण्यात आली.

**१. यंत्रणेची मानसिकता**

नांदेड जिल्हा हा जुन्या रोजगार हमी योजनेमध्ये मजुरांना कामे पुरविण्यात अग्रेसर होता. हा जिल्हा शेतीप्रधान असून आर्थिकदृष्ट्या मागासलेला आहे. जिल्ह्याच्या मोठया क्षेत्रामध्ये उद्योग, सेवा क्षेत्र अथवा पूरक व्यवसायांचा पुरेसा विकास न झाल्याने जिल्ह्यामध्ये मजुरांना कामाची निश्चितपणे गरज आहे, याची जाणीव सर्व यंत्रणांना करून देण्यात आली. एका बाजूला लोहा, कंधार, मुखेड सारखे अवर्षण प्रवण तालुके तर दुसऱ्या बाजूला किनवट, माहूर, भोकर सारखे आदिवासीबहुल तालुके, या तालुक्यांमध्ये मजुरांची अधिक प्रमाणात मागणी असल्याने या तालुक्यामध्ये अधिक परिणामकारक नियोजन करण्यावर भर देण्यात आला.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेला कायद्याचा आधार असल्याने ग्रामपंचायतींना ही बाब गांभीर्याने घेण्याबाबत प्रवृत्त करण्यात आले. ग्रामपंचायतींची अडचण लक्षात घेता विविध प्रकारचे मनुष्यबळ कंत्राटी तत्त्वावर घेण्याची हमी ग्रामपंचायतींना देण्यात आली.

**२. ग्राम पंचायतींचे सक्षमीकरण**

ग्रामपंचातींच्या सक्षमीकरणावर विशेष भर देण्यात आला. जिल्ह्यातील सर्व १३०९ (त्यावेळच्या १३११) ग्रामपंचायतींकरिता ग्रामरोजगार सेवक नेमण्यात आले आहेत. ग्रामपंचायतींकडे अंदाज पत्रक तयार करणे, मोजमाप करणे, इत्यादी तांत्रिक बाबीकरिता तांत्रिक मनुष्यबळ नसल्याने स्थापत्य अभियंता पदवी / पदविका धारक तसेच कृषी पदवीधारकांना कंत्राटी तत्त्वावर ग्रामपंचायतीना मदत व्हावी याकरिता नियुक्त करण्यात आले .

**जेथे पुरुषांचा दवाखाना । तेथे हवी सूतिकागृहाचीहि योजना**
**दोहोंचीहि आवश्यकता ग्राम-जना । भासतसे अत्यंत**





या योजनेकडे पूर्ण वेळ लक्ष देण्यासाठी प्रत्येक तालुक्यामध्ये साहाय्यक कार्यक्रम अधिकारी कंत्राटी तत्त्वावर नेमण्यात आले. सदर साहाय्यक कार्यक्रम अधिकारी हे साधारणत: एम. एस. डब्ल्यू. (समाजकार्य) पदवीधारक आहेत.

**३. संगणकीकरण**

केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयाच्या निर्देशानुसार या योजनेमध्ये प्रत्येक मजुराची सर्व माहिती त्यांचे रोजगार पत्रक नंबर, देण्यात आलेली मजुरी इत्यादी सर्व माहिती अचूकपणे व नियमितपणे भरणे अनिवार्य आहे. माहिती न भरल्यास केंद्र शासनाकडून निधी प्राप्त होत नाही. सदर एम.आय.एस. बाबत परिणामकारक पद्धतीने कार्यवाही व्हावी यासाठी प्रत्येक तालुक्यामध्ये किमान दोन संगणक, ब्रॉडबँड जोडणीसह देण्यात आलेले आहेत. मजुराची सर्व माहिती त्वरित अचूकपणे भरली जावी याकरिता आवश्यक मनष्यबळ उपलब्ध करून देण्यात आले. यामुळे नांदेड जिल्ह्याची महत्त्वपूर्ण माहिती तातडीने वेबसाईटवर भरण्यात येते.

**४. मजुरीचे वाटप**

या योजनेमध्ये मजुरांना रोख स्वरूपात मजुरी देण्याची परवानगी नाही नांदेड जिल्ह्यात आजमितीस १०० टक्के मजुरांची मजुरी मजुराच्या खात्यामध्ये जमा होत असून रोख अदायगीचे प्रमाण शून्य आहे. जिल्हामध्ये एकूण १,२६,९४३ मजुरांची (९८.२७ %) खाती पोस्ट ऑफीसमध्ये असून २२२७ मजुरांची (१.७३ %) खाती बँकेमध्ये खाती आहेत. कामे पूर्ण झाल्यानंतर निर्धारित मुदतीमध्ये मजुरांना मजुरी देण्यात येते. मजुरी वाटप करण्यासाठी हजेरीपत्रक विविध कार्यालयांकडे पाठवावे लागतात यासाठी जिल्ह्यात प्रत्येक तालुक्यास कंत्राटी तत्त्वावर संदेशवाहकाची नियुक्ती केलेली आहे. यामुळे मजुरी वाटपाचा कालावधी कमी करता येतो.

**फलनिष्पती**

गेल्या तीन आर्थिक वर्षामध्ये नांदेड जिल्हा महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीमध्ये महाराष्ट्रात सर्वप्रथम राहिलेला आहे. सन २००९-१० मध्ये रुपये ४१.२१ कोटी, सन २०१०-११ मध्ये रु. ७२.६२ कोटी व सन २०११-१२ मध्ये ( २० मार्च २०१२ पर्यंत ) रुपये १२२ कोटी या प्रमाणे नांदेड जिल्ह्याने या योजनेमध्ये खर्च केलेला आहे. या योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीमूळे नांदेड जिल्ह्याच्या ग्रामीण भागातून मुंबई, पुणे व हैद्राबाद या शहरांकडे होणारे स्थलांतर कमी झाले असून या मजुरांच्या कुटुंबीयांच्या शिक्षण व आरोग्याकडे अधिक चांगल्या पद्धतीने लक्ष पुरविणे प्रशासनास शक्य होत आहे.

**संपर्क : ०२४६२-२३७१०१**

## शाळांची गुणवत्ता सुधारणार

**गावातील मुलांना शहरी मुलांप्रमाणे गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि शैक्षणिक सुविधा मिळाव्यात या उद्देशाने ग्रामविकास विभागाने स्थापन केलेल्या कार्यगटाच्या शिफारसी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. यात प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश करण्यात आला असून या शिफारसींवर शासनस्तरावर कार्यवाही सुरू आहे.**

- जिल्हा परिषदांतर्गत येणाऱ्या प्राथमिक आणि माध्यमिक शाळांचे त्यांच्या वस्तुनिष्ठ मूल्यांकनानंतर अ, ब, क, ड ,ई असे श्रेणीकरण.
- यामध्ये भौतिक सुविधांना ३५ गुण, शालेय व्यवस्थापनाला ६५ गुण आणि अध्ययन आणि अध्यापनसंबंधित घटकाला १०० गुण देण्याचा प्रस्ताव.
- शाळेच्या मुख्य भिंतीवर प्राप्त श्रेणीचा फलक लावण्याची शिफारस.
- सर्वोत्कृष्ट ठरणाऱ्या शाळांना राज्य, विभाग, जिल्हा आणि तालुकास्तरावर पारितोषिके देण्याची एक महत्त्वपूर्ण शिफारस.
- प्राथमिक शाळा तपासणीसंदर्भात मूळ तपासणी अहवालातील त्रुटी दूर करून शैक्षणिक गुणवत्ता वाढीस लागण्याच्या उद्देशाने सुधारित सर्वंकष तपासणी मूल्यमापन अहवालाची निश्चिती.
- पालक तसेच शिक्षक यांच्या बैठकांमध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा तसेच उपस्थिती-अनुपस्थितीचा आढावा. यात ग्रामस्थांना सहभागी करून घेण्याची शिफारस.
- शिक्षकांचा शाळाबाह्य कामांचा ताण कमी करण्यासाठी संगणकाचा वापर. तालुका तसेच शिक्षण उपसंचालक कार्यालयात पाठवावयाचे अहवाल, प्रमाणपत्रे संगणकाच्या माध्यमातून पाठवून शिक्षकांच्या वेळेची बचत.
- विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी गैरहजर किंवा दीर्घमुदती रजेवरील शिक्षकांच्या जागी पर्यायी शिक्षकांची तत्काळ व्यवस्था.
- विद्यार्थी समृद्धी प्रकल्प राबविण्याची शिफारस.
- कथाकथन, काव्य वाचन, प्रश्नमंजूषा, भेंड्या, नाटक, पाढे पाठांतर, इंग्रजी वाचन यासारखे आनंददायी उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास. हे सर्व चावडी वाचन कार्यक्रमात न करता ते शाळेच्या व्यवस्थापन समितीसमोर करावे अशी ही एक वेगळी शिफारस.
- गाव तिथे मुख्याध्यापक अशी एक वेगळी शिफारस.

ऐसे गाव होता आदर्शपूर्ण । शहराहूनीहि नंदनवन
सर्वांचे करील आकर्षण । सुंदर जीवन तुकड्या म्हणे



# सुदृढ महाराष्ट्राची पायाभरणी

महाराष्ट्र शासनाने दि. २६ सप्टेंबर २०११ रोजी राजमाता जिजाऊ कुपोषणमुक्त ग्राम अभियान सुरू केले. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, ग्रामविकास मंत्री यांच्या उपस्थितीत कुपोषणमुक्त ग्राम अभियानाची सुरुवात दि. २ ऑक्टोबर २०११ रोजी झाली. हे अभियान बालदिनी दि. १४ नोव्हेंबर २०११ रोजी सुरू होऊन जागतिक आरोग्य दिनी दि. ७ एप्रिल २०१२ रोजी संपणार आहे. पुढील वर्षापर्यंत हे अभियान राबविले जाणार आहे.

अभियान सुरू करत असताना कुपोषणाच्या कारणांवर बराच अभ्यास करण्यात आला. मुले कशामुळे कुपोषित होतात याचे विश्लेषण करताना प्रामुख्याने जन्मत: कमी वजन, मुलांना आहार भरविण्याच्या चुकीच्या पद्धती आणि आजार ही कारणे दिसून आली. हे आजार प्रामुख्याने जलजन्य आणि श्वसनदाहाशी निगडित आहेत. रोगप्रतिकारक क्षमता कमी झाल्याने हे आजार होतात. रोगप्रतिकारक क्षमता कमी होण्याची प्रमुख कारणे लोह, कॅल्शीअम, झिंक, आयोडिन, जीवनसत्व 'अ' यांची कमतरता, जंतनाशक औषध न देणे व सर्व लसीकरण वेळापत्रकाप्रमाणे न देणे ही आहेत. कुपोषणाची कारणे योग्य पद्धतीने समजावी यासाठी 'कुपोषणाचे घर' ही संकल्पना मांडण्यात आली. या घरात एकसुद्धा मूल शिरले नाही, तर राज्य कुपोषणमुक्त होईल हे स्पष्ट आहे. या घराला चार दारे म्हणजे १. जन्मत: कमी वजनाची मुले, २. मुलांना आहार भरविण्याच्या चुकीच्या पद्धती ३. जलजन्य आजार ४. श्वसनदाहाशी निगडित आजार आहेत. रोगप्रतिकार क्षमता कमी करणाऱ्या ६ बाबी दिसत नसल्यामुळे त्यांना भुयारीमार्गे असे दाखविण्यात आले आहे. ही सर्व दारे आणि भुयारी मार्ग बंद केल्याने कुपोषणाच्या घरात कोणतेही मूल शिरणार नाही आणि राज्य कुपोषणमुक्त होईल.



वरील प्रमाणे सर्व संकल्पना विकसित करत असताना युनिसेफचे तज्ज्ञ तसेच राज्यातील या विषयावर कार्य करणारे सर्व तज्ज्ञ व स्वयंसेवी संस्थांशी वेळोवेळी चर्चा करण्यात आली. मुंबई येथे दोन दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. यामध्ये तज्ज्ञ व स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधी समवेत मुख्य सचिव व मंत्री उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्यासोबत शिष्टमंडळाने चर्चा केली. या सर्व विचारमंथनातून कुपोषणमुक्त महाराष्ट्राची संकल्पना उदयास आली.

जगाच्या पातळीवर भारतात सर्वांत जास्त मुले कुपोषित आहेत. इतर देशांमध्ये सुद्धा ही समस्या मोठ्या प्रमाणावर होती आणि त्यांना कमी करण्यात यश आले आहे. या जागतिक अनुभवांच्या आधारावर महाराष्ट्र राज्याने कुपोषणमुक्तीसाठी दशपदीचा वापर केला. ही दशपदी खालील प्रमाणे आहे.

१. बाळाच्या जन्माच्या एका तासाच्या आत चिकाचे दूध पाजणे.

२. बाळाच्या जन्माच्या ६ महिने वयापर्यंत फक्त आईचे दूध पाजणे.

३. बाळ ६ महिन्यांचे झाल्यावर आईच्या दुधासह पूरक आहार सुरू करणे.

४. बाळाला चौरस आहार देणे.

५. बाळाला आहाराची वारंवारिता सुरुवातीस ३ वेळा आणि नंतर ६ ते ८ वेळा ठेवणे.

६. बाळाच्या आहारात लोह गोळ्या, साईरप किंवा स्प्रिंकल देणे.

७. बाळाला ९ महिने ते ५ वर्षे वयापर्यंत दर सहा



**गोपालांचा देश भारत । आला गायीगुरे पूजीत**
**परंतु गायी झाल्या खात । लक्षचि नाही तयांकडे**

महिन्याला जीवनसत्व 'अ'चे डोस देणे.

८. घरात फक्त आयोडिनयुक्त मीठाचा वापर करणे.

९. सर्व लसीकरण वेळापत्रकाप्रमाणे देणे.

१०. लहान आणि मोठ्यांच्या मलमूत्राची योग्य विल्हेवाट लावणे

**हे होत नाही तोपर्यंत –**

**अ.** ६ ते २४ महिने वयापर्यंतच्या बालकांना फक्त उकळलेले पाणी थंड करून पाजणे. **ब.** बाळाला औषध किंवा पाणी पाजत असताना किंवा आहार भरवत असताना हात साबणाने स्वच्छ धुणे. **क.** बाळाला एक ते सहा वर्षे वयापर्यंत दर सहा महिन्यांनी जंतनाशन औषधे देणे.

दशपदी करूनसुद्धा काही मुले आजारी पडल्यास त्यासाठी एकपदी तयार करण्यात आली आहे. ती पुढीलप्रमाणे आहे.. आजारी पडल्यावर लगेच वजन घ्यावे. आजाराच्या वेळी मुले आधीप्रमाणे आहार घेतील याची काळजी घ्यावी. आजार लवकर दुरुस्त होईल यासाठी दक्षता घ्यावी. आजार दूर झाल्यावर पुढील १५ दिवस १ वेळा अधिक आहार देऊन मुलाचे वजन पूर्ववत होईल याची दक्षता घ्यावी. असे केल्याने आजारामुळे मुलांचे होणारे कमी वजन थांबवता येईल. अशा पद्धतीने कमी वजन होणे थांबवता येईल. जन्मत: कमी वजनाचे प्रमाण कमी करण्यासाठी द्विपदीचा वापर करण्यात येत आहे. यामध्ये गरोदर महिला आणि किशोरवयीन मुलींचे : १. बॉडी मास इंडेक्स १८.५ पेक्षा कमी असू नये. २. हिमोग्लोबीन १३ पेक्षा कमी असू नये. असल्यास एक वेळा अधिक आहार घ्यावा आणि लोह गोळ्यांचे सेवन करावे.

कोणत्याही वयामध्ये वयाप्रमाणे कमी वजन असणे धोक्याचे आहे. लहानपणी (दोन वर्षांपर्यंत) मुलांच्या मेंदूची वाढ (९० टक्के) झपाट्याने होत असल्यामुळे या वयामध्ये वजन कमी राहिल्यास मुलांचा न भरून निघणारा तोटा होतो. कमी वजन असणारी मुले हाडकुळी होतात, त्यांना कुपोषित मुले म्हणतात. कुपोषित मुले जास्तच आजारी पडतात आणि काही दगावतातसुद्धा. वरीलपैकी कोणतीही बाब त्यांच्या मुलांसोबत घडावी हे आई-वडिलांना आवडत नाही. त्यामुळे याप्रमाणे माहिती दिल्याने ते आपल्या मुलाचे वजन वाढविण्यास तयार होतात. यामुळे मुले मध्यम कमी वजनामध्ये असताना माता/कुटुंब सक्षमीकरण करून मुलांना सामान्य श्रेणीत आणता येते. असे केल्याने कोणतेही मूल मध्यम कमी वजनाच्या खाली जाऊ नये याची दक्षता घेता येते.

या वर्षी अभियान राबवित असताना हे लक्षात आले की, कोणत्याही मुलाच्या कायमस्वरूपी कुपोषणमुक्तीकरिता आई-वडिलांकडून मिळालेल्या आहारातूनच वजन वाढविले गेले पाहिजे. बाहेरच्या आहारातून वजन वाढविता येते. पण ते कायमस्वरूपी नसल्यामुळे मुलाचे वजन पुन्हा कमी होण्याची भीती असते. माता/कुटुंब सक्षमीकरण हाच यावर एकमेव उपाय आहे. कुटुंबियांना मुलाचे कुपोषण दूर करण्यासाठी तीन प्रकारच्या संसाधनांची गरज असते. ते म्हणजे अन्न. वेळ (शिजवणे व भरवण्यासाठी) आणि योग्य आहाराबद्दल माहिती.

मेळघाटातील कामावरून मुलाचे वजन कसे वाढवावे हेही लक्षात आले. त्यासाठी प्रत्येक मुलासाठी सहा टप्प्यांमध्ये कार्य करावे लागते. मुलाचे वजन कमी असल्याने त्यांच्या मेंदूचा विकास बरोबर होत नाही. त्यामुळे त्यांचे भवितव्य धोक्यात येते. मग वजन वाढविणार काय? असे प्रश्न विचारल्याने आई-कुटुंबीय लगेच तयार होतात. त्यानंतर वजन कमी असल्याच्या कारणांचा शोध घेतला जातो. मुख्य समस्या २-३ वेळा आहार देणे आणि कोरडा भात किंवा कोरडी भाकरी देणे हे दिसून आले आहे. ६ ते ८ वेळा आहार दिल्याने तसेच भात आणि भाकरीमध्ये २ चमचे तेल किंवा तूप टाकून मीठ, गूळ किंवा साखर टाकल्याने मुलांचे वजन वाढण्यास सुरुवात झाली आहे. एकदा वजन वाढण्यास सुरुवात झाली की माता खूश होते. मग ती उपमा/शिरा/पोहे/शेंगदाण्याचे लाडूसुद्धा द्यावयास तयार होते. मेळघाटातील हे कार्य पाहत असताना राज्यातील मागास आर्थिक गटातील कुटुंबीयांमध्ये आहार देण्याची हीच पद्धत दिसून आली. त्यामुळे हीच पद्धत राज्यामध्ये अवलंबिण्यात येत आहे. मुले मध्यम (कमी) वजनामध्ये असताना त्यांच्याकडे दुर्लक्ष झाल्यास ती मुले आणखी (तीव्र) कमी वजनामध्ये जातात. तेव्हासुद्धा योग्य काळजी न घेतली गेल्यास मध्यम व तीव्र कुपोषित मुले तयार होतात. अशा आजारी नसलेल्या मुलांसाठी ग्राम बाल विकास केंद्र आणि आजारी असलेल्या मुलांसाठी बाल उपचार केंद्र राबविले जाते. संबंध राज्यामध्ये मध्यम व तीव्र कुपोषित मुलांचे सर्वेक्षण जानेवारी आणि जुलै अशा दर सहा महिन्याला करण्याचा निर्णय या वर्षी घेण्यात आला. अभियानामुळे या वर्षी आतापर्यंत सुमारे २ लाख मुले कुपोषणातून बाहेर पडली आहेत. माहे फेब्रुवारी २०१२ अखेर ३००५ गावे पूर्णपणे कुपोषणमुक्त झाली आहेत. ग्रामीण भागातील जवळ-जवळ निम्म्या अंगणवाड्यांमध्ये मध्यम व तीव्र कुपोषित मुले नाहीत. अलीकडेच राज्य शासनाने अडचणीत असलेल्या कुटुंबातील मुलांसाठी पाळणाघर उघडण्याचा निर्णय घेतला आहे.

**(संकलन : राजमाता जिजाऊ मिशन)**

## ग्रामविकासाच्या योजना

***केंद्र शासन***

१. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना
२. महालक्ष्मी सरस
३. सुवर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना
४. राष्ट्रीय जीवनोन्नती अभियान
५. प्रधानमंत्री ग्राम सडक योजना
६. इंदिरा आवास योजना
७. बायोगॅस
८. पंचायती राज बळकटीकरण व उत्तरदायित्व प्रोत्साहन योजना
९. पंचायत महिला शक्ती अभियान
१०. मागास क्षेत्र अनुदान निधी
११. तेराव्या वित्त आयोगाचा निधी
१२. राष्ट्रीय ग्राम स्वराज्य योजना

***राज्य शासन***

१. तीर्थक्षेत्र विकास योजना २. छोट्या गावांच्या पायाभूत सुविधांसाठी जनसुविधा विकास योजना ३. मोठ्या गावांसाठी मुलभूत सुविधा योजना ४. पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजना ५. यशवंत ग्राम समृद्धी योजना ६. यशवंत पंचायत राज अभियान ७. संग्राम (संगणकीकृत ग्रामीण महाराष्ट्र)८. रमाई आवास योजना ९. बचत गटाच्या वस्तुच्या विक्रीसाठी केंद्रे १०. आदर्श गाव योजना

भारत कृषिप्रधान देश । शेतीसाठी हवा गोवंश
गोरसाइतुका नसे सत्त्वांश । अन्यत्र शुद्ध



# यशवंत ग्राम समृद्धी योजना

यशवंत ग्राम समृद्धी योजनेचा मुख्य उद्देश लोकांच्या सहभागातून ग्राम समृद्धी हा आहे. इतर उद्दिष्ट्ये : १. विविध योजनांमध्ये गावकऱ्यांचा सहभाग वाढवणे २. निर्णय प्रक्रियेत लोकांना सक्रिय करून योजना यशस्वी करणे ३. राज्यातील विकासकामांची माहिती प्रत्यक्षात गावांपर्यंत पोहोचवणे ४. खरोखरच गरज असलेली कामे प्राधान्याने करणे.

यशवंत ग्राम समृद्धी ही योजना सन २००२-०३ या आर्थिक वर्षापासून राज्यात राबविण्यात येत आहे. या योजनेमध्ये दलित / आदिवासी भागातील लाभार्थ्यांना १० टक्के तर सर्वसाधारण भागासाठी १५ टक्के लोकवर्गणी निश्चित केली आहे. तर उर्वरित ८५ ते ९० टक्के आर्थिक सहभाग शासनाचा आहे. या योजनेंतर्गत रुपये १०.०० लाखापर्यंतची विकासाची कामे घेता येतात. एका ग्रामपंचायतीला एका आर्थिक वर्षात रूपये १०.०० लक्ष किमतीची एक योजना / काम करता येते.

या योजनेंतर्गत ग्रामीण विकासाची निरनिराळ्या प्रकारची यात गावांतर्गत रस्ते, गटारी, नाली, अंगणवाडी, इमारती, दहन व दफनभूमी, बसथांबा शेड, काटेरी तारांशिवाय कुंपणे, गाव / वाड्यांच्या रस्त्यावरील विद्युतीकरणाची कामे, वाचनालय, व्यायामशाळा अशी २२३९३ कामे घेण्यात आली. त्यापैकी २२०९५ कामे पूर्ण झाली आहेत. २०९ कामे मार्च २०१२ अखेरपर्यंत पूर्ण होतील. ८९ कामे काही तांत्रिक कारणांमुळे रद्द करण्यात आली आहेत.या योजनेच्या अंमलबजावणीसाठी सन २००८-०९ पर्यंत रुपये १२३७.२१ कोटी निधी जिल्हा परिषदांना उपलब्ध करून देण्यात आला आहे.

## कर्तृत्वाचे पैलू

- पंचायतराज व्यवस्थेमध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण.
- पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजनेची राज्यात प्रभावी अंमलबजावणी. २७,९२० ग्रामपंचायतीपैकी १२,१९३ ग्रामपंचायती पहिल्या वर्षीच्या निकषांमध्ये पात्र. त्यांना ३८९ कोटी रुपयांच्या विशेष अनुदानाचे वितरण.
- पंचायतराज संस्थातील शौचालय नसलेल्या लोकप्रतिनिधींना निवडून येण्यास व सदस्य राहण्यास प्रतिबंध करणारा कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य.
- राज्यातील सर्व जिल्हा परिषदा आय.एस.ओ. मानांकन प्राप्त.
- लोकाभिमुख, पारदर्शक आणि तत्पर प्रशासनासाठी ३३ जिल्हा परिषदा, ३५१ पंचायत समित्या आणि २७,९२० ग्रामपंचायतींमध्ये १ मे २०११ पासून संगणकीय ग्रामीण महाराष्ट्र या कार्यक्रमाची म्हणजेच संग्रामची अंमलबजावणी.
- ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषदांमधील ५ लाख रुपयांवरील कामे तसेच १ लाख रुपयांवरील माल पुरवठा करण्याची कामे केवळ ई- टेंडरिंगद्वारे करण्याचा महत्त्वाचा निर्णय.
- शिक्षक- विद्यार्थी यांची बायोमॅट्रीक्स पद्धतीने हजेरी घेण्याचा पथदर्शी प्रयोग. ९८४ शाळांमध्ये त्याची अंमलबजावणी.
- राज्याला सलग दोन वर्षांपासून उत्कृष्ट पंचायतराज व्यवस्थेसाठी केंद्र शासनाचे १ कोटी रुपयांचे तृतीय क्रमांकाचे पारितोषिक.
- राज्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायतीच्या २ लाख ३१ हजार लोकप्रतिनिधींसाठी प्रशिक्षणातून विकास हा प्रकल्प सुरू.
- राज्यात ग्रामसेवक व ग्राम विकास अधिकाऱ्यांची २,२१८ पदे मंजूर करण्यात आली असून ती भरण्याची कार्यवाही सुरु
- कंत्राटी ग्रामसेवकांचे मानधन २,५०० वरून ६ हजार इतके वाढवले.
- इंदिरा आवास योजनेत ज्यांना घर बांधायला जागा नाही त्यांना १ गुंठा जागा घेण्यासाठी १२ हजार रुपयांपर्यंतची अनुदान योजना.
- ग्रामीण भागात बाजारपेठ मिळवून देण्यासाठी ग्रामीण मॉल निर्माण करून बचतगटांच्या वस्तूंची व्यापक स्वरूपात विक्री.
- ग्राम विस्तार अधिकारी आणि ग्रामसेवक यांचे स्वत:चे गाव ज्या जिल्हा परिषद मतदारसंघात असेल ते गाव सोडून व जिल्हा मतदारसंघ सोडून तालुक्यात कोठेही त्यांची बदली करण्याची नवी तरतूद.
- प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी प्रलंबित प्रकरणांचा आढावा. प्रलंबित प्रकरणांची यादी खऱ्या कारणांसह संबंधित अधिकाऱ्याने वरिष्ठ स्तरावर सादर करावी तशीच ती कार्यालयाच्या सूचना फलकावर लावावी अशी सूचना देण्यात आल्याने प्रलंबित प्रकरणाचा जलदगतीने निपटारा. विभागाची शून्य प्रलंबित प्रकरणाकडे वाटचाल.



गोरसाने आरोग्य शरीरी । मग कोठे राहिला धन्वंतरी?
सत्वांश मिळता बुद्धि गोजिरी । सरस्वती ही गोदुग्धी

# आमची ग्रामसभा

ग्रामसभा हा लोकशाही व्यवस्थेतील सर्वांत महत्त्वाचा घटक आहे. देशाचा मूलभूत पातळीवरून विकास होण्यासाठी ग्रामसभेची भूमिका निर्णायक ठरते. ७३ व्या घटनादुरुस्तीमुळे व ग्रामसभेला व्यापक अधिकार दिल्याने पंचायतराज व्यवस्थेला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. या सुधारणेचा मुख्य उद्देश, अधिकाराचे विकेंद्रीकरण व ग्रामपातळीवर पंचायत आणि ग्रामसभा यांना जास्तीत जास्त अधिकार प्रदान करणे, हा आहे. यामुळे महिलांसह गावकऱ्यांना विकासाच्या कामांमध्ये प्रभावीपणे सहभाग घेता येईल आणि गावाच्या कारभाराचे नियंत्रण करणे शक्य होईल.

**थोडक्यात ग्रामसभा**

१. वर्षातून सहा ग्रामसभा घेणे बंधनकारक.

२. वर्षातील पहिल्या ग्रामसभेचा अध्यक्ष सरपंच असतो. इतर सर्व ग्रामसभेचा अध्यक्ष सभेमध्ये बहुमताने निवडलेली व्यक्ती असते.

३. पहिल्या ग्रामसभेमध्ये पंचायतीचा वार्षिक प्रशासन अहवाल, पंचायतीचा मागील वर्षाचा जमाखर्च, पंचायतीच्या कामकाजासंबंधाने केलेल्या लेखापरीक्षणातील आक्षेपांना पंचायतीने दिलेली उत्तरे, पुढील वर्षाच्या नियोजनबाबत चर्चा केली जाते.

४. ग्रामसभेला केंद्र शासन व राज्य शासनाच्या योजनांसाठी वैयक्तिक लाभार्थी निवडीचा अधिकार आहे.

५. अनुसूचित क्षेत्रातील प्रकल्पाला मंजुरी घेणे, जमीन संपादन करण्यापूर्वी ग्रामसभेची सहमती घेणे,

डॉ. संभाजी खराट

वनजमिनीच्या संक्रमण संबंधाने शिफारसी घेणे, गौण खनिजा संबंधाने मान्यता घेणे असे अधिकार ग्रामपंचातींना देण्यात आले आहेत.

६. ग्रामसभेची सूचना सभेपूर्वी ७ दिवस अगोदर व विशेष ग्रामसभेसाठी किमान ४ दिवस अगोदर काढावी लागते.

७. ग्रामसभेचा किमान उपस्थिती १०० किंवा एकूण मतदारांच्या किमान १५ टक्के जी कमी असेल इतकी उपस्थिती गणपूर्तीसाठी आवश्यक आहे.

८. मागासक्षेत्र अनुदान निधी / महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना या कार्यक्रमासाठी दक्षता व सनियंत्रण समितीच्या सदस्यांची निवड करण्याचा अधिकार ग्रामसभेला आहे.

९. महाराष्ट्र राष्ट्रीय रोजगार हमी योजनेच्या आराखड्याला मंजुरी देण्याचा व कामाचा प्राधान्यक्रम ठरविण्याचा अधिकार ग्रामसभेला आहे.

१०. शासकीय व निमशासकीय व पंचायतीच्या कर्मचाऱ्यांवर ग्रामसभेचे शिस्त-विषयक नियंत्रण असते.



**अधिकार व कर्तव्ये**

१. प्रत्येक ग्रामसभा पंचायतीकडून राबविण्यात येतील अशा सामाजिक किंवा आर्थिक विकासाच्या योजना, कार्यक्रम व प्रकल्प यांना, अशा योजना, कार्यक्रम व प्रकल्प यांच्या अंमलबजावणीचे काम त्या पंचायतीने हाती घेण्यापूर्वी, मान्यता देते.

२. विकास योजनांवर कोणताही खर्च करण्याची पंचायतीला परवानगी देते.

३. अशा पंचायतीच्या अधिकारितेत येणारी कोणतीही जमीन शासकीय कामासाठी, संबंधित भूमी संपादन प्राधिकरणाद्वारे संपादित करण्याच्या कोणत्याही प्रस्तावासंबंधात पंचायतीकडून कोणताही निर्णय घेण्यात येण्यापूर्वी पंचायतीला आपली मते कळविणे यासाठी सक्षम असते.

**ग्रामसभेच्या बैठकी**

१. प्रत्येक वित्तीय वर्षी ठरविण्यात येणाऱ्या अशा तारखेस ग्रामसभेच्या निदान सहा सभा घेण्यात येतात. जर सरपंच किंवा त्याच्या अनुपस्थितीत उपसरपंच, पुरेशा कारणाशिवाय अशा सहापैकी कोणतीही सभा घेण्यास चुकला तर तो सरपंच किंवा यथास्थिती, उपसरपंच म्हणून चालू राहण्यास किंवा पंचायतीच्या सदस्यांच्या उरलेल्या पदावधीसाठी त्या अधिकारपदावर निवडला जाण्यास अपात्र ठरतो. तसेच सभा बोलवण्यात कोणतीही कसूर केल्याबद्दल प्रथमदर्शनी जबाबदार असल्याचे आढळून आले तर पंचायतीचा सचिव देखील निलंबित करण्यास आणि संबंधित नियमान्वये तरतूद केल्याप्रमाणे, त्याच्या विरुद्ध अशी इतर शिस्तभंगाची कारवाई करण्यास पात्र असतो. असे पुरेसे कारण होते किंवा नाही या प्रश्नावर जिल्हाधिकाऱ्यांचा निर्णय अंतिम असतो.

**४. ग्रामसभेची बैठक :** ग्रामसभेची बैठक बोलावण्याची रीत व त्या बैठकीचे कामकाज चालविण्याची पद्धत ग्रामसभा बैठक नियम, १९५९ मध्ये दिलेली आहे. सभेचा कोरम १०० किंवा



लोकसंख्येच्या १५ टक्के यांपैकी कमी असेल अशा संख्येच्या सभासदांचा असतो. बैठकीचे कामकाज नियम ११ ते १५ प्रमाणे चालते. अध्यक्षांनी जागा स्वीकारल्यानंतर बैठकीच्या कामास सुरुवात होते व अध्यक्ष बैठक बरखास्त करीपर्यंत तिचे काम चालू राहते.

**अ. बैठकीचे वैशिष्ट्य :** ग्रामसभेची बैठक ही गावात होणाऱ्या इतर जाहीर बैठकीसारखी नाही. कारण ही बैठक ह्या अधिनियमाखाली सरपंचाने बोलाविलेली असते. या बैठकीत ग्रामसभेच्या सदस्यांशिवाय, नेमलेल्या अधिकाऱ्यांव्यतिरिक्त इतरांना भाग घेण्याचा अधिकार नाही. या बैठकीपुढे येणारे विषय हे ग्रामपंचायतीच्या कक्षेतील कामाचे व ग्रामपंचायतीच्या कारभाराबद्दचे असतात.

**आ. बैठकीची नोटीस :** साधारण बैठकीची नोटीस, निदान सात दिवस अगोदर व जादा बैठकीची नोटीस निदान चार दिवस अगोदर दिली पाहिजे. बैठकीच्या ४ दिवस अगोदर व शिवाय बैठकीच्या दिवशी बैठकीबद्दल गावात दवंडीही दिली पाहिजे. नोटिशीमध्ये बैठकीची तारीख, वेळ, जागा व बैठकीपुढे येणारे विषय नमूद केले पाहिजेत.

**इ. बैठकीचा अध्यक्ष व त्याचे अधिकार व कर्तव्ये :** अध्यक्षाचे अधिकार व कर्तव्ये खाली नमूद केले आहेत.

१. अध्यक्षस्थान स्वीकारल्यानंतर पुरेसे सभासद हजर नसल्यास, अध्यक्षाने गणपूर्ती अभावी बैठक तहकूब केली पाहिजे.

२. पुरेसे सभासद हजर असल्यास अध्यक्षाने मागील बैठकीच्या ग्रामसभेच्या नोंदबुकातील वृत्तांत वाचून दाखविला पाहिजे. तो सभासदांनी कायम केल्यावर अध्यक्षाने त्यावर सही केली पाहिजे.

३. वित्तीय वर्षाची पहिली बैठक असल्यास अध्यक्षाने त्यावर सही केली पाहिजे. व त्यानंतरच्या बैठकीत त्यापैकी कोणती कामे करावयाची व कामाच्या प्रगतीचा आढावा घेतला पाहिजे. ग्रामसभेच्या सभासदाला पंचायतीच्या कामाबद्दल प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे. अध्यक्षाने त्या प्रश्नांची तोंडी उत्तरे दिली पाहिजेत.

४. बैठकीपुढे आयत्यावेळी आलेल्या नवीन विषयांच्या चर्चेला परवानगी देणे अगर नाकारणे.

५. बैठकीत प्रत्येक विषयावर अगर ठरावावर बोलू इच्छिणाऱ्या सदस्यांची नावे मागविणे व ते ठरवाच्या बाजूने किंवा विरोधी भाषण करणार ही माहिती त्यांच्याकडून घेणे.

६. जरूर पडेल त्या ठरावावर हात वर करून मतमोजणी करणे. ठरावाच्या बाजूने प्रथम मते देणारांना हात वर करण्यास सांगून त्यांची मते मोजावी. नंतर ठरावाच्या विरोधकांना हात वर करण्यास सांगून त्यांची मते मोजावी. मतमोजणी नंतर ठराव मंजूर किंवा नामंजूर झाला हे जाहीर करावे.

ज्यावेळी ठरावाच्या बाजूची व विरोधी मते सारखी असतील त्यावेळी अध्यक्षाने स्वत:चे मत देऊन ठराव मंजूर किंवा नामंजूर झाला हे जाहीर करावे. सभासदांनी फेरमतमोजणीची मागणी केल्यास पुन्हा मतदान घेण्यात यावे व निकाल जाहीर करावा.

७. सभासदाने बैठकीपूर्वी पाठविलेली सूचना नमूद केलेल्या कारणांसाठी सरपंचाला ती बैठकीपुढे ठेवण्याचे नाकारता येते.

८. अध्यक्षाने नामंजूर न केलेल्या सर्व सूचनांवर ग्रामसभेच्या बैठकीत चर्चा करण्यात आली पाहिजे.

९. बैठकीतील कामकाजाचे नियमन करणे आणि व्यवस्था राखणे हे अध्यक्षाचे कर्तव्य आहे.

अशाप्रकारे ग्रामसभेचे कामकाज चालते व त्यामुळे ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेला वेग येतो.

**संपर्क : ९४२२५९५७८८**

++

## आधी महिलासभा.. मग ग्रामसभा !

महिला धोरण स्वीकारून त्याची अंमलबजावणी करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. गावाच्या विकास- निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग अतिशय महत्त्वाचा आहे. गावाचा सामाजिक, आर्थिक विकास आराखडा बनविणे आणि गाव पातळीवर राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांचे नियोजन करण्याची जबाबदारी ग्रामसभेची आहे. ७३ व्या घटना दुरुस्तीनंतर ग्रामसभेला घटनात्मक दर्जा प्राप्त झालेला आहे. 'गाव, गावकऱ्यांची व्यवस्था, पंचायतराज व्यवस्थेच्या सक्षम बांधणी आणि तत्पर सेवेतून गावांचा विकास' हे सूत्र ग्रामसभेचे महत्त्व पटवून देण्यास पुरेसे आहे. लोकांच्या सहभागाशिवाय लोकशाही जिवंत राहू शकत नाही हे लक्षता घेऊन ग्रामसभांच्या बळकटीकरणाला विभागाने प्राधान्य दिले आहे.

ग्रामसभा हे नागरिकांचे मंडळ आहे. यात पन्नास टक्के वाटा महिलांचा आहे. गावाच्या विकासात व निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग अतिशय महत्त्वाचा आहे. ग्रामसभेत महिलांची उपस्थिती वाढावी, महिलांच्या विकासाचे प्रश्न चर्चिले जावेत ही महिला सभेच्या आयोजनामागची प्रमुख भूमिका आहे. महाराष्ट्र शासनाने ग्रामसभेच्या प्रत्येक नियमित सभेपूर्वी महिलासभा घेण्याची कायद्यामध्ये तरतूद केली आहे. त्यानुसार प्रत्येक ग्रामसभेपूर्वी महिलांची सभा बोलाविण्यात येते. या सभेमध्ये महिलांनी घेतलेले निर्णय, चर्चा, विषय हे दुसऱ्या दिवशी होणाऱ्या ग्रामसभेमध्ये प्राधान्याने चर्चेला घेतले जातात.. या महिलासभेत महिला व बालकल्याणाचे महत्त्वाचे प्रश्न आणि त्यावरील उपाययोजना यावर चर्चा होणे अपेक्षित असते.

महिला सभेनंतर होणाऱ्या मुख्य ग्रामसभेतसुध्दा महिलांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. त्यामुळे महिलांसंबंधी घेतलेले निर्णय, महिलांच्या विविध कार्यक्रमांबाबत त्यांची मते याचा विचार केला जातो की नाही याची माहिती मिळते. तसेच महिलांच्या विकासासाठी दबाव निर्माण होण्यास मदत होते. ग्रामसभेतील महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने ग्रामसभेच्या तारखा निश्चित केल्या आहेत. त्यामध्ये १ मार्च ते ८ मार्च या कालावधीत ग्रामसभा घेण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. महिलांच्या आणि ग्रामविकासाच्या विविध विकास योजनांची माहिती महिलांना व्हावी, ग्रामसभेच्या माध्यमातून महिलांच्या सक्षमीकरणाच्या कामाला वेग यावा, महिलांना आपल्या अधिकारांची जाणीव व्हावी, हा त्यामागचा हेतू आहे. महिलांना आपली मते मांडण्याचा अधिकार मिळतांनाच त्यांच्या मतांचा सन्मान व्हावा म्हणूनच शासनाने महिला सभा घेण्याची तरतूद मुंबई ग्रामपंचायत अधिनियमामध्ये केलेली आहे. आज ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद या तीनही संस्थांमध्ये महिलांना ५०% जागा राखून ठेवलेल्या असल्या तरी प्रत्यक्षात आज ५० % पेक्षा जास्त महिला या संस्थांमध्ये प्रतिनिधी म्हणून काम करताना दिसून येतात. महिलांचा ग्रामसभेतील सहभाग वाढविण्यासाठी अंगणवाडी कार्यकर्ती, मदतनीस, बचतगटातील प्रतिनिधी आणि स्वयंसेवी संस्थांची देखील मदत घेतली जाते.



**धन हे गरीबांचे रक्त । समजोनि वागोत श्रीमंत**
**श्रम ही गावाची दौलत । म्हणोनि व्हावा मान तिचा**

# गावातलं पाणी गावात!

**कुमार खेडकर**

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेचा आढावा घेतला तर ग्रामीण महाराष्ट्रामध्ये ९८,८४२ गाव, वाड्या व वस्त्यांना पाणी पुरविले जाते. राज्याच्या स्वत:च्या निधीमधून, बाह्य अर्थसहाय्यित, केंद्र सरकारच्या महत्त्वाच्या कार्यक्रमाद्वारे ग्रामीण पाणी पुरवठ्याच्या सुविधा वाढविण्याचे सातत्याने प्रयत्न झालेले आहेत. सन २००० सालानंतर राज्याने मागणी आधारित धोरण स्वीकारले. लोकसहभागाच्या आधारावर योजना उभ्या करण्यावर भर दिला. भारतीय राज्यघटनेतील तरतुदीनुसार जनतेला पिण्यासाठी शुद्ध व पुरेसा पाणीपुरवठा करणे ही राज्य शासनाची जबाबदारी आहे, यासाठी आतापर्यंत मोठया प्रमाणात प्रयत्न करण्यात आले आहेत. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर १९६०-७० या दशकामध्ये गावांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी शासनाने विहिरी खोदून दिल्या. १९७१-८५ या कालावधीमध्ये बोअरवेल्स व हातपंपावर भर देऊन ग्रामस्थांची तहान भागविण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले गेले. १९८५ ते १९९७ या दरम्यान गावांची तृष्णा भागविण्यासाठी गावात नळ योजना दाखल झाल्या. यातच जागतिक बँकेने पिण्याच्या पाण्यासाठी पहिल्यांदा हात पुढे केला आणि रु. ५०४.२५ कोटीचा पहिला प्रकल्प सन १९९१-१९९८ दरम्यान राबविण्यात आला. पुढे १९९७-२००० दरम्यान अनेक प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना उभ्या राहिल्या.

सन २००३-२००९ या कालावधीत मैलाचा दगड ठरलेला जलस्वराज्य प्रकल्प याच कालावधीत ३०१७ ग्रामपंचायतीमध्ये राबविला गेला. लोकसहभागाधारित योजनाचा किंवा उपक्रमाचा जिवंत आविष्कार म्हणून जगाने या प्रकल्पाचे कौतुक केले. महिलांना निर्णय प्रक्रियेमध्ये थेट संधी, देखभाल दुरुस्तीची ग्रामस्थांवर जबाबदारी, पारदर्शकता आदी महत्त्वाची तत्त्वे या प्रकल्पाने स्वीकारलेली होती. सन २००९ मध्ये केंद्र सरकारने जलस्वराज्य प्रकल्पाच्या धर्तीवरच राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम सुरू झाला. या कार्यक्रमामध्ये सन २०१०-११, सन २०११-१२, सन २०१२-१३ व सन २०१३-१४ या आर्थिक वर्षांमध्ये राज्यातील प्रत्येक गाव/वाडी/वस्ती वरील प्रत्येक कुटुंबाला किमान दरडोई ४० लिटर पाणी पुरवठा होईल हे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. १ एप्रिल, २०११ पर्यंत करण्यात आलेल्या ९८८४२ गाव, वाडी व वस्ती पैकी ८२५५० एवढी गावे, वाडी व वस्त्यांमध्ये पाणी पुरवठा योजनाची व्याप्ती झालेली आहे. शिल्लक राहिलेल्या १६५७० गाव, वाडी व वस्त्याचा समावेश येणाऱ्या २ वर्षामध्ये वार्षिक कृती आराखड्यात समावेश करण्यात येईल.

या कार्यक्रमासाठी केंद्र सरकार आणि राज्य सरकार खर्चाचा समान हिस्सा देते. पाणी पुरवठा योजनांच्या भविष्यकालीन शाश्वततेचा विचार करून या योजनेच्या २०% निधी हा शाश्वततेवर खर्च करण्यात येत आहे. याद्वारे पाणी पुरवठा योजनांना जलस्त्रोत बळकट करून शाश्वत करण्यावर भर आहे. त्याचप्रमाणे उभ्या राहिलेल्या योजनांच्या देखभाल आणि दुरुस्तीसाठी १०% निधी खर्च करण्यात येणार आहे. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या बाबत ग्रामस्थांना व पदाधिकाऱ्यांना जबाबदारीची जाणीव व्हावी यासाठी त्यांच्या क्षमता विकसित व्हाव्यात, तांत्रिक ज्ञान त्यांच्यापर्यंत पोहचावे यासाठी राज्यभर स्वतंत्र यंत्रणेची गरज होती. त्याचमुळे महाराष्ट्राने पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेची (WSSO) ची स्थापना केली आहे. सर्व ग्रामीण जिल्ह्यांमध्ये जिल्हास्तरावर स्वतंत्र यंत्रणा कार्यरत करण्यात आली आहे.

या कार्यक्रमांचा एक प्रमुख भाग म्हणजे पाणी गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रम, राज्याने केंद्राच्या मदतीने हाती घेतला आहे. राज्यातील सर्व जलस्रोतांना कोडींग केले आहे. राज्यातील पाण्याच्या नमुन्याची तपासणी करणाऱ्या आरोग्य विभागाच्या व भूजल सर्वेक्षण आणि यंत्रणेच्या सर्व प्रयोगशाळांचे बळकटीकरण करण्यात येत आहे. राज्यातील ३ लाख ५० हजार स्रोतांच्या पाण्याच्या नमुन्याची तपासणी मोहीम स्वरूपात करण्यात येत आहे. यापैकी ११ जिल्ह्यांमध्ये तपासणीचे काम पहिल्या टप्प्यामध्ये सुरू सुद्धा झाले आहे. लवकरच प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये जैविक व रासायनिक तपासणीचा संच उपलब्ध करून दिला जाणार आहे. संच हाताळण्याचे प्रशिक्षण गावस्तरावर दिले जाणार आहे.

**संपर्क : ८९७६०८८८८५**



मंदिरी बैसोनि नाक दाबावे । त्यापेक्षा मार्गीचे काटे उचलावे
दु:खितासि प्रेमे पाणी पाजावे । हे श्रेष्ठ तीर्थस्नानाहूनि



# नवनिर्माणाचे आधारस्तंभ

केंद्र शासनाने ग्रामीण विकासाला गतिशील करण्यासाठी आणि त्या अंतर्गत अपेक्षित विकास घडवून आणण्यासाठी भारत निर्माण स्वयंसेवक हा उपक्रम सुरू करण्याचा निर्णय घेतला. सुरुवातीस प्रत्येक राज्यातील १ ते २ तालुक्यातील भारत निर्माण स्वयंसेवकांची निवड करण्यात आली. महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यातील वाळवा व वर्धा जिल्ह्यातील देवळी हे दोन तालुके प्रथम टप्प्यात पथदर्शी तालुके म्हणून निवडण्यात आले. या २ तालुक्यांमध्ये भारत निर्माण स्वयंसेवकांची निवड करून त्यांना प्रशिक्षण देण्यात आले. त्यांच्या मदतीने काही गावांमध्ये योजनांची माहिती तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न सुरू केला. यास चांगला प्रतिसाद मिळाला. केंद्र शासनाच्या ग्राम विकास मंत्रालयाच्या सहकार्याने यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) मार्फत प्रशिक्षण देण्यात आले. भारत निर्माण स्वयंसेवक हे शासन व गाव यातील महत्त्वाचा दुवा म्हणून काम करताना दिसून आले.

यानंतर गडचिरोली व गोंदिया जिल्ह्यात भारत निर्माण स्वयंसेवक हे अभियान राबविण्यास सुरुवात झाली. ग्रामविकास विभागामार्फत शाश्वत व सर्वसमावेशक विकासासाठी पर्यावरण संतुलित समृद्ध ग्रामयोजना राबविण्यात येत आहे. या योजनेतसुद्धा भारत निर्माण स्वयंसेवक महत्त्वाची भूमिका बजावतील. ग्रामविकास विभागाने भारत निर्माण स्वयंसेवक हा उपक्रम सर्व जिल्ह्यांत राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

### स्वयंसेवकांची निवड करण्याची उद्दिष्टे

१. शासकीय योजनांचे प्रमुख लाभार्थी असणाऱ्या ग्रामीण कुटुंबांशी निकट संबंध प्रस्थापित करणे. २. शासकीय योजनांबद्दल जनजागृती करणे, त्यांचा लाभ घेण्याकरिता आवश्यक त्या कृतींची माहिती देणे. ३. विविध शासकीय कार्यक्रमांतर्गत जनतेला मिळणारे हक्क आणि फायदे :- ग्रामीण विकास, कृषी, पाणलोट क्षेत्र विकास, आरोग्य व कुटुंब कल्याण, शिक्षण, स्त्रिया व बालक विकास, पायाभूत सुविधा (रस्ते, विद्युतीकरण, सिंचन, पिण्याचे पाणी, आरोग्य, ब्रॉडबँड, दूरध्वनी, बँक, पोस्ट ऑफीस या विषयीचे हक्क व फायदे) आणि पर्यावरण सुरक्षा याविषयी विधिवत साक्षर करणे. ४. शासकीय व्यवस्थापन आणि पंचायतराज संस्था यांना आपले कार्य पार पाडण्यासाठी, विशेषत: नागरी हक्कांच्या संबंधात सहाय्य करणे. ५. शासकीय कार्यक्रमांचे सामाजिक लेखा परीक्षण करण्यास मदत करणे. ६. तक्रार निवारणात मदत करणे व मदत केंद्रांपर्यंत पोचविण्यास लोकांना सहाय्य करणे. ७. राबविण्यात आलेल्या शासकीय कार्यक्रमांच्या दर्जाबाबत संबंधित अधिकाऱ्यांना मूल्यमापनात्मक अहवाल देणे व कामाचा दर्जा सुधारण्याकरिता सहाय्यभूत होणे. ८. सामाजिकरीत्या जागरूक

**डॉ. मल्लीनाथ कलशेट्टी**

असणाऱ्या नागरिकांना राष्ट्रीय निर्माण कार्यास मदत करण्यासाठी पुढाकार घेण्यास सहाय्य करणे. ९. लोकांमधील नेतृत्वगुण वाढीला लावणे. १०. बदल आणि विकास याबद्दल समर्पण भावाने काम करण्याकरिता स्वयंसेवकांना प्रशिक्षण देणे. ११. ग्रामीण भागात शांतता व स्थैर्याकरिता आवश्यक ती संधी उपलब्ध करून देणे.

### स्वयंसेवकांची निवड व प्रशिक्षण

भारत निर्माण : स्वयंसेवक हे सामाजिक बांधीलकीने आणि निःस्वार्थीपणे ग्रामीण भागात काम करण्यास इच्छुक असावेत. ते लिहिता, वाचता येणारे, उच्च मूल्य जोपासणारे असावेत. ते ग्रामसभेचे सदस्य असावेत. त्यांनी त्यांचे स्वत:चे काम सांभाळून उर्वरित वेळेत कोणतेही मानधन न घेता काम करावयाचे आहे. या स्वयंसेवकाची निवड पारदर्शीपणे ग्रामसभेच्या मान्यतेने करण्यात येते. राष्ट्रीय सेवा योजनेत काम केलेले स्वयंसेवक, स्वच्छता अभियानाचे व विविध शासकीय कार्यक्रमात उत्कृष्ट काम केलेले कार्यकर्ते, साधनव्यक्ती, प्रमुख प्रशिक्षक, सामाजिक कार्यकर्ते यांची निवड प्राधान्याने करण्यात येते.

### भारत निर्माण स्वयंसेवकांची कार्ये

हा स्वयंसेवक शासनाच्या विविध योजना गरजू व पात्र लाभार्थ्यांपर्यंत नेण्यासाठी प्रयत्न करील. पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजना, स्वच्छता व आरोग्याचा संदेश प्रत्येक कुटुंबापर्यंत नेण्यासाठी 'विकासदूत' म्हणून काम करेल. गावाचा विकास आराखडा, पर्यावरण विकास आराखडा तसेच सूक्ष्म नियोजन प्रक्रियेतून गाव आराखडा बनविण्यात भारत निर्माण स्वयंसेवक सहभाग घेईल.

ग्रामसभा बळकट करण्यासाठी ग्रामसभेबाबत प्रचार व प्रसिद्धी करणे तसेच ग्रामसभेला ग्रामस्थांनी उपस्थित राहण्यासाठी प्रयत्न करेल. तसेच विविध योजनेत सामाजिक लेखापरीक्षणासाठी सहकार्य करेल. भारत निर्माण स्वयंसेवक हा ज्या जिल्ह्यात साक्षर भारत अभियान सुरू आहे त्या जिल्ह्यात ग्रामपंचायतीमध्ये या अभियानाला विशेष सहकार्य करेल. सर्व शासकीय योजनांची अद्ययावत माहिती भारत निर्माण स्वयंसेवकास देण्याची जबाबदारी ग्रामसेवक, विस्तार अधिकारी, पंचायत समिती व गट विकास अधिकारी पार पाडतील. ग्रामपंचायतीच्या प्रतिनिधींबरोबर ग्रामपंचायतीच्या सदस्यांच्या सहकार्याने व ग्रामसेवकाच्या संपर्कात राहून लोकसहभाग वाढविण्यासाठी भारत निर्माण स्वयंसेवक कार्य करील.

### प्रशिक्षण व इतर सहाय्य

१. या स्वयंसेवकास तालुका पातळीवर सुरुवातीस निवड झाल्याबरोबर चार दिवसांचे प्रशिक्षण देण्यात येते. प्रशिक्षणाचे नियोजन यशदा (पुणे), ग्राम विकास विभाग, जिल्हा परिषद यांच्यामार्फत करण्यात येत आहे. या स्वयंसेवकाचे प्राथमिक प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर ग्रामपंचायतींचे ओळखपत्र मिळेल. हे स्वयंसेवक ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकांच्या संपर्कात राहून काम करतील. दरमहा सरपंच व ग्रामसेवक हे या स्वयंसेवकांची बैठक घेऊन त्यांच्या कामाची माहिती घेऊन मार्गदर्शन करतील. स्वयंसेवकाने केलेल्या कार्याच्या नोंदी घेऊन त्याचा गौरव ग्रामपंचायत स्तरावर २६ जानेवारी, १ मे, १५ ऑगस्ट व २ ऑक्टोबर या दिवशी होणाऱ्या ग्रामसभेत/कार्यक्रमात करण्यात येणार आहे.

२. जिल्हा परिषद, पंचायत समितीचे अधिकारी व कर्मचारी ग्रामपंचायतीस भेटी देतील. भारत निर्माण स्वयंसेवकांशी चर्चा करून त्यांच्या अडचणी सोडवून तसेच मार्गदर्शन करून त्यांना कार्यप्रेरणा देतील. तालुक्यातील सर्व भारत निर्माण स्वयंसेवकाचा स्थानिक समुपदेशक म्हणून गट विकास अधिकारी यांची भूमिका राहील.

**संपर्क : ९४२२६६१२६५**



एक हात खोदावी जमीन । हे पूजनाहूनि पूजन
परिणाम शेकडो व्याख्यानांहून । अधिक तयाचा

# पर्यावरण जपणारा बायोगॅस

बायोगॅस म्हणजे जनावरांचे शेण, मानवी विष्ठा व इतर सेंद्रिय पदार्थ यांचे विशिष्ट प्रकारच्या हवाबंद टाकीमध्ये कुजवून बॅक्टेरीयामुळे विघटन होणे. या प्रक्रियेत जो गॅस बाहेर पडतो त्याला बायोगॅस / गोबरगॅस असे म्हणतात. बायोगॅस हा ज्वलनशील वायू सेंद्रिय पदार्थाच्या हवा विरहित विघटनापासून तयार होतो. नैसर्गिकरीत्या तयार होणारा बायोगॅस हवेत विरून जाण्यापूर्वी पकडण्यासाठी बायोगॅस सयंत्र हे मुद्दाम तयार केलेले साधन आहे.

**बायोगॅस का?**

आज जगामध्ये ऊर्जासमस्या व खत समस्या ह्या मानवाला भेडसावणाऱ्या फार मोठ्या समस्या आहेत. त्याच बरोबर ग्रामीण आरोग्य, पर्यावरणाच्या सुद्धा समस्या आहेत. ह्या संदर्भात बायोगॅसचे महत्त्व आता लोकांना पटू लागले आहे.

गेल्या दोनशे वर्षांपासून मानव ऊर्जेचा अतिशय झपाट्याने वापर करतो आहे. ह्याच वेगाने तिचा वापर सुरू राहिला तर ती काही वर्षातच संपून जाईल. या बाबींचा विचार करता बायोगॅससारखी पुनर्निर्मितीक्षम ऊर्जा हा एक पर्याय असू शकतो. सध्या शेतीमध्ये रासायनिक खतांचा वापर वाढला आहे. रासायनिक खत निर्मितीसाठी खनिज तेलाचा उपयोग करावा लागत असल्यामुळे त्यांच्या आयातीसाठी कोट्यवधी रुपयांचे परकीय चलन खर्च करावे लागते. तसेच ह्या रासायनिक खताच्या वापरामुळे जमिनीची सुपीकता टिकविण्यासाठी वाढत्या प्रमाणावर खताचा वापर करावा लागत आहे, त्यामुळे जमिनीचा कस कमी होत चालला आहे. याउलट बायोगॅस संयंत्रापासून तयार होणारे खत उत्कृष्ट प्रतीचे सेंद्रिय खत असून त्याचा जमिनीवर व पिकांवर कोणत्याही प्रकारे दुष्परिणाम होत नाही, उलट जमिनीचा पोत सुधारतो व उत्पादन वाढीस हातभार लागतो.



तेल व कोळसा ह्यासारख्या इंधनाच्या अंदाधुंद वापरामुळे वातावणात विषारी वायूंचा संचय होतो. ह्या प्रदूषणामुळे मानवी आरोग्याला धोका पोहोचतो, कार्बाम्लवायूचे प्रमाण दरवर्षाला ०.५ टक्के वाढत आहे. त्यामुळे गेल्या १०० वर्षात पृथ्वीचे तापमान २ अंश सेल्सीअसने वाढले आहे. बायोगॅसच्या वापरामुळे प्रदूषण नियंत्रणासाठी मदत होईल.

**किरण केंद्रे**

बेसुमार जंगलतोडीमुळे निसर्गाच्या पर्यावरणाचा समतोल बिघडला आहे. दिवसेंदिवस पावसाचे प्रमाण कमी होऊ लागले आहे व पाऊस अनियमित होत चालला आहे. बायोगॅसच्या उपयोगामुळे जंगलतोडीस आळा बसेल व पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत होईल.

सध्या खेड्यामध्ये शौचालय नसल्यामुळे ग्रामीण जनता शौचासाठी मोकळ्या जागेचा उपयोग करते. मानवी विष्ठेमुळे रोगांचा फैलाव होतो, तसेच मानवी विष्ठेचा खताच्या दृष्टीकोनातून काहीच उपयोग होत नाही, सेप्टीक टाकी पद्धतीचे शौचालय मोठ्या प्रमाणावर उभारण्यासाठी लाखो रुपयांचे भांडवल गुंतवावे लागते. त्याऐवजी शौचालय बायोगॅस सयंत्राला जोडल्यास मानवी विष्ठेचा खत तयार करण्यासाठी उपयोग होईल व साथीच्या रोगांना आळा बसेल. बायोगॅस सयंत्रामुळे खेड्यातील शेण आणि मानवी विष्ठेबरोबर शेतातील काडीकचऱ्याचाही उपयोग होत असल्यामुळे परिसरातील घाण कमी होऊन ग्रामीण आरोग्यात सुधारणा होईल. खेड्यांमध्ये स्वयंपाकासाठी लाकूड, गोवऱ्या आणि काडीकचरा यांचा उपयोग केला जातो. त्यातून निर्माण होणाऱ्या धुरामुळे स्त्रियांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होतो. बायोगॅसच्या वापरामुळे त्याला आळा बसेल.

**बायोगॅसचा उपयोग**

बायोगॅस हे उत्कृष्ट इंधन आहे. बायोगॅस हे मिथेन आणि कार्बाम्लवायू यांचे मिश्रण असून बायोगॅसमध्ये ५५ टक्के मिथेन असल्यास १ घ.मी. बायोगॅसचे उष्णता मूल्य (Calorific Value) ४७०० किलो कॅलरी असते. बायोगॅसचा उपयोग स्वयंपाकासाठी, प्रकाशासाठी, डिझेल इंजिन चालविण्यासाठी आणि वीज निर्मितीसाठी केला जातो. बायोगॅसचा सर्वोत्तम उपयोग स्वयंपाकासाठी होतो. स्वयंपाकासाठी जेव्हा बायोगॅसचा उपयोग होतो तेव्हा त्यामधील ऊर्जेचे सर्वाधिक रूपांतर उष्मा निर्माण करण्यामध्ये होते. बायोगॅसचा दुसरा उत्तम उपयोग दिवा लावण्यासाठी होतो. ज्या भागात वीज पोहोचली नाही त्या भागात बायोगॅसवर चालणाऱ्या दिव्यांचा उपयोग केला जाऊ शकतो. सध्या बाजारात घरात व घराबाहेर अशा दोन्ही प्रकारच्या वापरासाठी बायोगॅसचे दिवे उपलब्ध आहेत. या दिव्यापासून १०० कॅंडल पॉवर किंवा ४० वॅट बल्ब एवढा प्रकाश मिळतो. बायोगॅसचा उपयोग डिझेल इंजिन चालविण्यासाठीही होऊ शकतो.

बायोगॅसपासून जनरेटर लावून वीज निर्मितीसुद्धा करता येते, वीज-निर्मितीसाठी प्रथम बायोगॅसमधील ऊर्जेचे रूपांतर बायोगॅस कम डिझेल इंजिनद्वारे (Duel Fuel Engine) यांत्रीक शक्तीमध्ये करावे लागते. त्यानंतर यावर जनरेटर चालवून त्यापासून वीज-निर्मिती करता येते.

**लाभार्थी निवडीचे निकष**

- विहित नमुन्यातील अर्ज
- लाभार्थीचे नावे ७/१२ व ८ अ उतारा
- ग्रामसेवकाचा रहिवासी दाखला
- अर्जदाराकडे पशुधन असणे आवश्यक आहे.
- बायोगॅस सयंत्र बांधकामासाठी जागा उपलब्ध असावी.

**अनुदानाचे स्वरूप**

१ घ.मी. सयंत्राकरिता रु.४०००/-

२-४ घ.मी. सयंत्राकरिता रु. ८०००/-

तसेच बायोगॅस सयंत्र शौचालयास जोडण्यात आल्यास प्रोत्साहन म्हणून रु. १०००/- जास्तीचे अनुदान देण्यात येते. याशिवाय बायोगॅसचा उपयोग डिझेल इंजिन, जनरेटर सेट यासाठी केल्यास वाढीव रु. ५०००/- एवढे अनुदान देय राहील.

अधिक माहितीसाठी कृषी विकास अधिकारी जिल्हा परिषद समिती यांचेकडे संपर्क करावा.

**संपर्क : ७३०३४२८५५५**

श्रमनिष्ठेचा करावा प्रचार । सर्वांस आपुलकी वाटे पुरेपुर
ऐसी व्यवस्था करावी सुंदर । गावचे उत्पादन वाढवोनि



# आरोग्यातून संपन्नतेकडे

अजय जाधव

ग्रामविकासाच्या संकल्पना राबविताना नेहमीच स्वच्छतेला प्राधान्य देण्यात येते. परिसर तसेच वैयक्तिक स्वच्छतेचा त्यात अंतर्भाव केला आहे. स्वच्छतेतून निरोगी जीवनाकडे जाण्याचा संदेशच अशा योजनांमधून दिला जात आहे. त्याच धर्तीवर आरोग्य विभागामार्फत केंद्र शासनाचे राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (एनआरएचएम) राबविले जात आहे.

गरीब, दुर्लक्षित तसेच गरजू ग्रामीण जनतेस सहज परवडण्याजोगी आणि विश्वासार्ह आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान सुरू केले आहे. आरोग्यावर परिणाम करणाऱ्या आहार, परिसर स्वच्छता, सुरक्षित पाणीपुरवठा, महिला व बालविकास इत्यादी बाबींचा या अभियानामध्ये एकत्रित विचार करण्यात आला आहे.

खाजगी क्षेत्रातील आरोग्य सेवेवर नियंत्रण नसल्याने आरोग्य सेवेवरील खर्चात वाढ झाली असून ती ग्रामीण भागातील जनतेस न परवडण्याजोगी आहे. देशाला निरनिराळ्या आरोग्यविषयक पेचप्रसंगास सामोरे जावे लागल्याने आरोग्य सेवेचा खर्च आणि जनतेच्या अपेक्षांमध्ये वाढ होते. दुर्गम ग्रामीण भागात गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा देण्याचे आव्हान अधिक महत्त्वाचे आहे. या प्रश्नांचे गांभीर्य व व्याप्ती लक्षात घेता लहान योजनांवर लक्ष केंद्रित करणे पुरेसे नाही. सार्वजनिक आरोग्य सेवेचे कार्यक्षम सेवेत रूपांतरित करणे अत्यंत आवश्यक आहे. याच भावनेतून देशातील आरोग्य अभियान संकल्पनेचा विकास झाला.

### अभियानाची उद्दिष्टे

- ग्रामीण भागातील जनतेस प्रभावी, सहजसाध्य, गुणवत्तापूर्ण सेवा उपलब्ध करून देणे.
- योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे व सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचे बळकटीकरण करणे यासाठी आरोग्य यंत्रणेच्या संरचनेत बदल करणे.
- परंपरागत उपचार पद्धतीचे पुनर्जीवन आणि आयुषचा सार्वजनिक आरोग्य यंत्रणेच्या मुख्य प्रवाहात समावेश करणे.
- आरोग्य, पोषण, स्वच्छ पाणीपुरवठा, स्त्री-पुरुष समानता इ.च्या समावेशासह जिल्हा स्तरावर विकेंद्रीकरण पद्धतीने आरोग्य सेवेचे प्रभावी एकत्रीकरण.
- आंतरराज्य व आंतरजिल्हा आरोग्य असमानता या बाबींवर निवेदन करणे.
- प्रगतीच्या दृष्टीने लक्ष निर्धारित करणे व तसा सार्वजनिक अहवाल सादर करणे.
- ग्रामीण भागातील जनतेस, विशेषत: गरीब स्त्रिया व बालके यांना सहजसाध्य परवडण्याजोगी, कार्यक्षम, उत्तरदायी आणि विश्वासार्ह प्राथमिक आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे.
- सार्वजनिक आरोग्य खात्यासाठी पुरेशा अनुदानाची उपलब्धता.
- आरोग्य सेवेच्या दर्जामध्ये सर्वांगीण सुधारणा.
- ग्रामीण भागातील जनतेला विशेषत: स्त्रिया व मुले तसेच दारिद्र्यरेषेखालील लाभार्थी यांना अधिक दर्जेदार व परिणामकारक आरोग्य सेवा पुरविणे.
- आरोग्य सेवांची सहज उपलब्धता.
- समाजाचा सहभाग वाढविणे.
- आरोग्यसेवांचे बळकटीकरण.

### राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाची प्रमुख धोरणे

- विकेंद्रीकरण आधारित जिल्हास्तरीय व गावपातळीवरील नियोजन व अंमलबजावणी.
- आरोग्य सेवांचे बळकटीकरण (विशेषत: ग्रामीण भागात).
- सुधारित आरोग्य व्यवस्थापन.
- ग्रामीण भागाच्या गरजेनुसार अंमलबजावणी.
- समाजाचा आरोग्य कार्यक्रम अंमलबजावणीत सहभाग वाढविणे.
- खाजगी वैद्यकीय क्षेत्रावर योग्य नियंत्रण.
- खाजगी वैद्यकीय क्षेत्राचा आरोग्य कार्यक्रम अंमलबजावणीतील सहभाग वाढविणे.
- वैद्यकीय शिक्षण पद्धतीची पुनर्रचना.
- आरोग्य विम्याचा समाजात प्रसार करणे.
- समाजातील आरोग्य संवर्धक रूढींना चालना देणे.

### राज्य शासनाची भूमिका

- राज्य व जिल्हा स्तरावर अभियान अंमलबजावणी कक्ष सुरू करणे.
- लोकांच्या व आरोग्य सेवांच्या गरजा ध्यानात घेऊन नियोजन करणे.
- पंचायतराज संस्थांना अधिक प्रशासकीय अधिकार देणे.



- अभियान अंमलबजावणीसाठी वेळेवर व पुरेसे अनुदान उपलब्ध करून देणे.

### पंचायतराज संस्थांची भूमिका

- या अभियान अंमलबजावणीत पंचायतराज संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वाची राहणार आहे. ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद यांना अधिक अधिकार विकेंद्रित होतील. आर्थिक तरतुदीचा विनियोगही या स्तरावरच होईल.

### ठळक बाबी

- राज्य व जिल्हा समित्यांची स्थापना.
- विविध समित्यांचे एकत्रीकरण.
- कृतियोजना तयार करणे (तालुका/जिल्हा/राज्य इत्यादी).
- उद्दिष्टे निश्चित करणे, उद्दिष्टे प्राप्तीवर आधारित अनुदान वाटप तसेच दुर्बल घटकांचे उद्दिष्टे प्राप्त केल्यास १० टक्केपर्यंत सानुग्रह अनुदान.
- रुग्ण कल्याण समित्यांची स्थापना.
- लसीकरण सेवांचे बळकटीकरण.
- फिरत्या आरोग्य पथकांची स्थापना.
- अंगणवाडीमध्ये स्त्रिया व बालकासाठी दर महिन्याला आरोग्य शिबिरे आयोजित करणे.
- दवाखान्यात प्रसुती करून घेण्यासाठी स्त्रियांना प्रवृत्त करणे, ग्रामीण भागातील आरोग्य संस्थांना आर्थिक मदत - (१. ग्रामीण रुग्णालयास रुपये २० लाख एवढे अनुदान. २. प्रत्येक ग्रामीण रुग्णालयासाठी (देखभाल) यासाठी रुपये १ लाख. ३. प्रत्येक उपकेंद्रास रु. १० हजार.)
- औषधांचा अतिरिक्त पुरवठा.
- फिरती आरोग्य पथके.
- अंगणवाडीमध्ये स्त्रिया व बालकांसाठी दर महिन्याला, आरोग्य शिबिरे आयोजित करणे.
- दवाखान्यात प्रसुती करून घेण्यासाठी स्त्रियांना प्रवृत्त करणे.

संपर्क : ९७०२९७३९४६



गावचे कलावंत निपुण । त्यांना द्यावे उत्तेजन
नवनव्या वस्तु कराव्या निर्माण । उपयोगाच्या जीवनासि

# मने जोडणारे रस्ते

गावातील रस्त्यांच्या विकासासाठी राज्यात पंतप्रधान ग्राम सडक योजना सन २००० पासून राबविली जाते. प्रारंभी ही योजना सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत राबविण्यात आली. त्यानंतर ७३ व्या घटना दुरुस्तीनंतर ग्रामीण रस्त्यांची जबाबदारी पंचायतराज संस्थांवर सोपविण्यात आल्याने २००१-०२ पासून योजनेची अंमलबजावणी जिल्हा परिषदांमार्फत करण्यात येत होती. आता हे काम ग्रामीण रस्ते विकास संस्थेकडे देण्यात आले आहे. जिल्हा पातळीवर ३३ पथकांमार्फत प्रत्यक्षात ही योजना राबविली जाते. राज्यस्तरावर मुख्य अभियंता आणि विभागीय स्तरावर अधीक्षक अभियंता यांच्यासह इतर पदांची निर्मिती करण्यात आली असून कामांचे संनियंत्रण करण्यासाठी आणि दर्जा तपासण्यासाठी राज्य गुणवत्ता समन्वयक, वित्तीय नियंत्रकासह इतर पदेही मंजूर करण्यात आली आहेत. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी १,०९१ स्वतंत्र पदांनाही मंजुरी देण्यात आली आहे.

केंद्र शासनाने २००५-०६ पासून या योजनेचा समावेश भारत निर्माण कार्यक्रमात केला असून याअंतर्गत ५०० पेक्षा जास्त लोकवस्तीची न जोडली गेलेली गावे बारमाही रस्त्यांद्वारे जोडली जावीत या उद्देशाने योजनेची अंमलबजावणी होत आहे. आदिवासी भागासाठी हा निकष २५० लोकसंख्या असा आहे. अद्याप न जोडल्या गेलेल्या लोकवस्त्यांची संख्या साधारणत: ५३६८ इतकी आहे. गामीण कोअर नेटवर्कमधील अस्तित्वात असलेल्या रस्त्यांचा दर्जा सुधारणे यात अपेक्षित आहे. केंद्र शासनाने ग्रामीण रस्ते विकास कार्यक्रम संकल्प आराखडा २०२५ प्रसिद्ध केला आहे.

राज्यातील ग्रामीण रस्त्यांचा आढावा घेतला तर असं दिसून येतं की, ग्रामविकास विभागांतर्गत राज्यातील एकूण १,४९,७४० कि.मी. लांबीचे रस्ते येतात. यामध्ये पंतप्रधान ग्राम सडक योजनेचा वाटा ९८,६३९ कि.मी चौ आहे. केंद्र शासनाने राज्यासाठी एकूण ९ टप्प्यात ५,३८३ कोटी रुपये खर्च अपेक्षित असलेले २३,२०६ कि.मी लांबीचे प्रकल्प मंजूर केले आहेत. यासाठी एकूण ५२६०.६० कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला असून फेब्रुवारी २०१२ अखेर ४७५०.१४ कोटी रुपयांचा खर्च झाला आहे. यामधून २१०७१.०८ कि.मी लांबीच्या रस्त्यांची कामे पूर्ण झाली आहेत. हे वर्ष धरून सलग ४ वर्षे केंद्र शासनाने निर्धारित केलेले लक्ष्य गाठण्यात महाराष्ट्राला यश आले आहे. रस्ते उन्नतीकरणाच्या प्रकल्प मंजुरीतही महाराष्ट्राचा तिसरा क्रमांक लागतो. २०११-१२ साठी केंद्र शासनाकडून राज्यास ७८३ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे.

**दीपक मोरे**

रस्त्यांची गुणवत्ता तपासण्यासाठी राज्यात ३३ जिल्हा प्रयोगशाळांची निर्मिती करण्यात आली असून ४५ राज्य गुणवत्ता नियंत्रकाची नियुक्ती करण्यात आली आहे.

महाराष्ट्र हे रोजगार हमी योजनेचे जनक असल्याने सुरुवातीला या योजनेअंतर्गत ग्रामीण रस्त्यांची कामे मोठ्या प्रमाणात घेण्यात आली. परंतु ही सर्व कामे कच्च्या स्वरूपाची असून हे रस्ते पंतप्रधान ग्रामसडक योजनेअंतर्गत घेण्यात येऊन पक्क्या आणि कायमस्वरूपी रस्त्यांनी महाराष्ट्राचा ग्रामीण भाग जोडला जावा ही महाराष्ट्राची आग्रही मागणी आहे.

अद्याप केंद्र शासनाकडून या मागणीवर निर्णय घेण्यात आला नाही. इतर राज्यातील ग्रामीण रस्त्यांची पूर्तता झाल्यानंतर महाराष्ट्राच्या मागणीचा विचार करण्याची भूमिका घेण्यात आल्याने महाराष्ट्राला पंतप्रधान ग्रामसडक योजनेअंतर्गत मिळणारा निधी आवश्यकतेप्रमाणे मिळत नाही. राज्याची मागणी विचारात घेऊन केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाने यावर सकारात्मक भूमिका घ्यावी आणि अशी गावे पंतप्रधान ग्रामसडक योजनेअंतर्गत असलेल्या कोअरनेटवर्कमध्ये सामील करावीत, यासाठी शासनातर्फे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे.

याप्रमाणेच प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत ग्रामीण रस्त्यांच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून दिला जातो. परंतु हे रस्ते तयार करताना ज्या ठिकाणी पुलांच्या बांधकामाची आवश्यकता असते, त्या पुलांच्या बांधकामासाठी मात्र यात निधी मिळत नाही हे राज्य शासनाने केंद्र शासनाच्या निदर्शनास आणून दिले आहे. पंतप्रधान ग्रामसडक योजनेअंतर्गत राज्यातील कोअर नेटवर्क लांबीतील सुटलेल्या पुलांच्या बांधकामास मंजुरी द्यावी, ही राज्य शासनाची मागणी आहे. यासंबंधीचा १,२०० कोटी रुपयांचा प्रस्ताव ग्रामीण विकास मंत्रालयाकडे पाठविण्यात आला आहे. या कामांना मंजुरी मिळाल्यास या रस्त्यांवरील पुलांच्या बांधकामास वेग येईल आणि गावांचा आर्थिक विकास गतिमान होईल अशी अपेक्षा आहे.

पंतप्रधान ग्रामसडक योजनेअंतर्गत सर्वसाधारण क्षेत्रासाठी ५०० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या भागातच रस्त्यांची कामे करता येतात. आदिवासी भागासाठी हा निकष २५० लोकसंख्येचा आहे. पण गडचिरोली आणि गोंदिया या दोन जिल्ह्यात ३५० लोकवस्त्या अशा आहेत की ज्यांची लोकसंख्या २५० पेक्षा कमी आहे. यापैकी ४६ लोकवस्त्यांना जोडणारे सुमारे ४६८ मार्ग विकसित करण्यासाठी आणि ९७ रस्त्यांचा दर्जा सुधारण्यासाठी एकूण १७० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. या कामासाठी निधी देण्याबाबत ग्रामीण विकास मंत्रालयाने सकारात्मक भूमिका दर्शविली आहे. या लोकवस्त्यांना रस्त्यांनी जोडण्यासाठी २५० पेक्षा अधिक लोकसंख्या असण्याचा निकष त्या भागासाठी शिथिल करावा अशी मागणी राज्य शासनाने केली आहे.

गावाच्या गतिमान विकासासाठी दळणवळणाच्या साधनांचा प्राधान्याने विकास झाला पाहिजे, हे लक्षात घेऊन शासनाने पंतप्रधान ग्रामसडक योजनेअंतर्गत रस्ते विकासाच्या कामाला प्राधान्य दिले आहे.

**संपर्क : ०२२-२२८४६८९५**



## विदर्भ पंढरीची वारी सुलभ आणि सुरक्षित

शेगाव! विदर्भाची पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या देवस्थानाकडे या रस्त्यावरून दर गुरुवारी, रविवारी आणि एकादशीच्या दिवशी दुचाकी, चारचाकी आणि इतर वाहनांद्वारे मोठ्या प्रमाणात भाविक प्रवास करीत असतात. श्रीक्षेत्र शेगाव ते अकोला अंतर महामार्गावरून साधारणतः ५2 किलोमीटरचं. गजानन महाराजांच्या प्रकटदिन महोत्सवाच्या वेळी जवळजवळ ५ लाख भाविक या क्षेत्रास भेट देतात. पायी वारीने जाणाऱ्या भाविकांची संख्याही जवळपास ८ ते १० हजार! वार्षिक उत्सवात ही संख्या किती तरी पटीने वाढते. हे सगळे चित्र पाहिले तर भाविकांची सुरक्षितता आणि सुविधा लक्षात घेणे गरजेचे होते.

यादृष्टीने पंतप्रधान ग्रामसडक योजनेच्या कोअर नेटवर्कमध्ये समाविष्ट असलेल्या खीरपुरी, व्याळा, निमकर्दा, कसुरा, नागझरी ते शेगाव असा 2५ कि.मी. लांबीच्या रस्त्याचे काम यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आले. यामुळे भाविकांची मोठी सोय झाली त्याबरोबर मोठ्या प्रमाणात वाहतूक वर्दळ टाळण्यात यश आल्याने अपघातांना आळा बसला. शिवाय शेगाव अकोला हे अंतर १५ कि.मी.ने कमी झाले.

## पूल नव्हे समृद्धीचा महामार्ग

बोकारडोह नदीचं प्रचंड पात्र. त्यावर पूल नाही. त्यामुळे दळणवळणाच्या अनंत अडचणींचा सामना करत आसपासच्या गावांचा कारभार चाललेला. आरोग्य आणि शिक्षणाच्या सेवा-सुविधांचा लाभ घेणे कठीण. येथे प्रमुख व्यवसाय शेतीचा. पण शेतमालाची ने-आण करणं अवघड झालं. त्यामुळे गावाचा सामाजिक, आर्थिक विकास खोळंबला. चंद्रपूर जिल्ह्यातील सिंदेवाही तालुक्यातील बोकरडोह नदीवर पूल नसल्यामुळे निर्माण झालेलं हे चित्र होतं. ते बदलण्यासाठी विभागाने यासाठी पुढाकार घेतला. पळसगाव ते आलेसूरचक रस्ता आणि पुलाचे काम पंतप्रधान ग्रामसडक योजनेअंतर्गत घेण्यात आले. हा रस्ता चंद्रपूर-नागपूर प्रमुख राज्यमार्गाला जोडणारा आहे. बोकारडोह नदीवरील पुलाचे बांधकाम २००९-१० मध्ये करण्यात आले. हा पूल बॉक्स सेल टाईप प्रकारचा असून १६१ मीटर लांबीचा आहे. यात ३ बाय २ मीटरचे ४५ गाळे आहेत. तर रुंदी ५.५० मीटर आहे.

पंतप्रधान ग्रामसडक योजनेअंतर्गत बांधण्यात आलेला हा राज्यातील सर्वांत मोठा पूल आहे. या पुलामुळे पळसगांव जाट, देळणवाडी, धुमनखेडा, नवरगांव, चक आलेसूर ही गावे जोडण्यात आली. या बांधकामामुळे रत्नापूर, शिवणी, पिपरवडा, विहीरगाव, मदनापूर, ताडोबा येथील गावकऱ्यांना तळोधी ता. नागभिड येथे जाण्यासाठी सर्वात जवळचा मार्ग उपलब्ध झाला.

नदीवरील पुलाने दळणवळणाची सोय झाली, गावातील नागरिकांना, शेतकऱ्यांना आपला शेतमाल ने-आण करणे सोयीचे झाले आणि परिस्थिती बदलली. आज बोकरडोह नदीवरचा पूल 'विकास सेतू' झाला आहे.





गावी चालते सवाई-दिढी । त्यास याने बसेल अढी
ग्रामनिधीची उघडता पेढी । थंडावेल व्यापारी-सावकारी

# गावच्या कारभारणी

जगदीश त्र्यं. मोरे

पंचायतराज व्यवस्थेतील जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायती या त्रिस्तरीय रचनेमुळे सत्तेचे विकेंद्रीकरण झाले. जनतेला स्थानिक प्रश्न आपल्याच पातळीवर सोडविणे शक्य झाले. ग्रामविकासालाही चालना मिळाली. या स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार लोकशाही पद्धतीने चालावा यासाठी त्यांच्या निवडणुकांची संविधानिक जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आली आहे.

राज्यात ३३ जिल्हा परिषदा, ३५१ पंचायत समित्या आणि २७ हजार ८९६ ग्रामपंचायतीच्या माध्यमातून ग्रामविकाला गती दिली जात आहे. जिल्हा परिषदांचे १ हजार ९५५, पंचायत समित्यांचे ३ हजार ९१०; तर ग्रामपंचायतींचे १ लाख ९७ हजार ३३८ सदस्यांच्या माध्यमातून ग्रामविकासाचा रथ पुढे नेला जात आहे. जगातील सर्वात मोठी संसदीय लोकशाही प्रणाली राबविणारे राष्ट्र म्हणून भारताकडे पाहिले जाते.

या सर्वात मोठ्या लोकशाहीला स्थानिक स्वराज्य संस्थांमधील लोकशाहीच्या लहानशा प्रक्रियेतून बळकटीच दिली जाते. लोकशाहीचा पाया असलेल्या या संस्थांमध्ये राज्य शासनाने महिलांसाठी ५० टक्के आरक्षण लागू केले आहे. त्यानुसार राज्य निवडणूक आयोगाने महिलांसाठी ५० टक्के जागा निश्चित करून जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतींच्या निवडणुकांची प्रक्रिया पार पाडली. महिलांनी या संधीचा लाभ घेऊन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारात आपले कर्तृत्व स्वबळावर सिद्ध करावे आणि ग्रामविकासात योगदान द्यावे, यासाठी राज्य निवडणूक आयोगाने 'क्रांतिज्योती' प्रकल्प हाती घेतला आहे.

स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून महिलांना सामाजिक व राजकीयदृष्ट्या सक्षम करण्यासाठी हे पाऊल उचलले आहे. प्रथमच निवडून आलेल्या महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा आणि इतर महिलांनी त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन स्वत: पुढे यायला हवे, यासाठी आयोग प्रयत्नशील आहे. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी महिलांचे शिक्षण आणि त्यांच्या सबलीकरणासाठी दिलेल्या योगदानाचे स्मरण म्हणून राज्य निवडणूक आयुक्त नीला सत्यनारायण यांनी या प्रकल्पाला 'क्रांतिज्योती' हे नाव दिले.

सेलू (जि. वर्धा) तालुक्यात प्रायोगिक तत्त्वावर प्रशिक्षण घेण्यात आले. त्याचे मूल्यमापन करून हा प्रकल्प साकारण्यात आला. सामाजिक बांधिलकी आणि महिलांच्या समस्यांची जाणीव ठेवून प्रकल्पाचे नियोजन आणि आखणी केली आहे. पहिल्या टप्प्यात हा प्रकल्प ठाणे, नाशिक, पुणे, सातारा, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, सोलापूर, नांदेड, अमरावती आणि वर्धा या १० जिल्ह्यांतील ग्रामपंचायत महिला सदस्यांसाठी राबविला जात आहे.

प्रशिक्षक आणि महिला सदस्यांच्या माहितीकरिता सर्वंकष साहित्याचे संकलन व निर्मिती करण्यात आली आहे. त्याहीपेक्षा खेळ, गाणी आणि प्रात्यक्षिकांद्वारे प्रशिक्षण देण्यावर भर आहे.

### ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांचा तपशील

| संस्था | संख्या | एकूण सदस्य | महिला आरक्षण |
|---|---|---|---|
| जिल्हा परिषदा | ३३ | १,९५५ | ९७८ |
| पंचायत समित्या | ३५१ | ३,९१० | १,९५५ |
| ग्रामपंचायती | २७,८९६ | १९,७३३८ | ९८,६६९ |





दुर्गम भागातील महिलांसाठी स्थानिक भाषेत साहित्य उपलब्ध करून देण्यात येईल.

ग्रामपंचायतींचा प्रत्यक्ष कारभार, ज्वलंत सामाजिक समस्या आणि शासनाच्या विविध योजना यांची माहिती देऊन स्त्रियांच्या एकंदरीत व्यक्तिमत्त्वाचा विकास व्हावा, यावर भर देण्यात येत आहे. प्रशिक्षणात पंचायतराज कार्यपद्धती, ग्रामपंचायत कायदा, त्यातील नियम आणि ग्रामपंचायतींचे अर्थव्यवस्थापन याबाबत मार्गदर्शन करण्यात येते. ग्रामीण भागात विशेषत: महिलांकरिता राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची महिलांना तपशीलवार माहिती दिली जाते. ग्रामपंचायतीचे अर्थव्यवस्थापन, अंदाजपत्रक तयार करणे याचेसुद्धा प्रशिक्षण दिले जाते.

क्रांतिज्योतीच्या माध्यमातून राज्यस्तर ते ग्रामीणस्तरापर्यंत महिला सदस्यांच्या प्रशिक्षकांची एक सक्षम फळी उभी करण्यात येत आहे. राज्य आणि जिल्हास्तरावर प्रशिक्षकांसाठी प्रशिक्षण आयोजित केले जाते. तसेच जिल्हास्तरावर मदत कक्ष किंवा सल्ला केंद्र स्थापन केले जाते. प्रशिक्षणानंतर दरमहा पाठपुरावा सत्रांचे आयोजन केले जाते. सहा महिन्यांच्या कालावधीत प्रशिक्षणार्थी महिला सदस्यांचे विविध बाबींवरून मूल्यमापन केले जाते. कारभाराची माहिती, आत्मविश्वास, कार्यक्षमता, ग्रामपंचायत प्रशासनामधील सहभाग, व्यक्तिमत्त्व व गुणवत्ता यामधील प्रगती यासारख्या मुद्द्यांचा समावेश असतो.

**संपर्क : ९९६७८३६६८७**

## महिलांच्या नेतृत्वाखालील जिल्हा परिषदा...

| जिल्हा | अध्यक्ष | पक्ष | संपर्क क्रमांक |
|---|---|---|---|
| नागपूर | संध्या अशोकराव गोतमारे | भाजपा | ७३८७३०००३१ |
| गडचिरोली | भाग्यश्री धर्मराव आत्राम | राष्ट्रवादी | ९४०४०८६३३७ |
| अमरावती | सुरेखा सुरेंद्र ठाकरे | राष्ट्रवादी | ९४२३१२४०९१ |
| बुलडाणा | वर्षा सुरेश वनारे | काँग्रेस | ९४२१४७००७६ |
| सोलापूर | निशिगंधा कोल्हे | राष्ट्रवादी | ७५८८५०७७७६ |
| सातारा | अरुणादेवी पिसाळ | राष्ट्रवादी | ८८८८११५५२२ |
| ठाणे | सारिका गायकवाड | राष्ट्रवादी | ९२७०८७२१६६ |
| रायगड | कविता गायकवाड | शेकाप | ८८७९३४९१२३ |
| रत्नागिरी | मनीषा जाधव | राष्ट्रवादी | ९४२०६६३८६१ |
| सिंधुदुर्ग | निकिता परब | काँग्रेस | ९४२३८३२८५९ |
| औरंगाबाद | नाहिदा खान | काँग्रेस | ९८२३४४५४९९ |
| जालना | आशा भुतेकर | शिवसेना | ९४०३०३२२५२ |
| परभणी | मीरा बुधवंत | राष्ट्रवादी | ९७६७८५१९२२ |
| हिंगोली | मीनाक्षी बोधले | शिवसेना | ०२४५६-२२४४०५ |
| नाशिक | जयश्री नितीन पवार | राष्ट्रवादी | ९४२०३६२७०७ |

# पंचायत महिला शक्ती अभियान

७३ व्या घटना दुरुस्तीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी १/३ जागा राखून ठेवण्यात आल्या. २४ मार्च २०११ रोजी पंचायतराज संस्थांमध्ये महिलांना ५०% आरक्षण देण्याचा निर्णय शासनाने घेतला.

पंचायतराज संस्थांमधील निवडून आलेल्या महिला लोकप्रतिनिधींना लोकशाही विषयी जागृती निर्माण करणे, कामकाजाबाबतचे प्रशिक्षण देणे त्यांच्या समस्यांचे निराकरण करणे यासाठी भारत सरकारच्या पंचायतराज मंत्रालयाने एक व्यासपीठ म्हणून २००७ पासून 'पंचायत महिला शक्ती' अभियान सुरू केले आहे.

पंचायत महिला शक्ती अभियानांतर्गत जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत या तिन्ही स्तरावरील लोकनियुक्त महिला प्रतिनिधींचा संघ स्थापन करण्यात आला आहे. प्रत्येक जिल्ह्यातून तिन्ही स्तरावरील प्रत्येकी एका महिला प्रतिनिधीची निवड करण्यात आली. अशा ३३ जिल्ह्यांतून प्रत्येकी ३ अशा ९९ सदस्यांचा संघ तयार करण्यात आला. या ९९ सदस्यांतून १८ प्रतिनिधींचे कार्यकारी मंडळ तयार करण्यात आले. यशदा पुणे येथे संघातील ९९ सदस्यांची सर्वसाधारण सभा आयोजित करून कार्यकारी मंडळावरील प्रतिनिधीसाठी निवडणूक घेण्यात आली. कार्यकारी मंडळावरील सदस्यातून अध्यक्ष पदासाठी निवडणूक घेण्यात आली. पुणे जिल्ह्यातील दौंड पंचायत समितीच्या सदस्या श्रीमती वैशाली बाळासाहेब नागवडे यांची अध्यक्षपदी निवड झाली. अशा प्रकारचा लोकनियुक्त महिला प्रतिनिधींचा संघ देशात प्रथम महाराष्ट्र राज्याने स्थापित केला आहे.

पंचायत महिला शक्ती अभियानांतर्गत नागपूर येथे राज्य सहाय्य केंद्र स्थापन करण्यात आले आहे. पंचायत महिला शक्ती अभियानांतर्गत विभागनिहाय महिला प्रतिनिधींचे संमेलन आयोजित करण्यात आले.

## महिला प्रतिनिधी संघाची जबाबदारी

१. लैंगिक अन्याय, बालकांचे शोषण, अस्पृश्यता संबंधित विषयाबाबत शासनाकडे पाठपुरावा करणे.
२. याबाबतचे ठराव घेऊन उचित कार्यवाहीसाठी शासनाकडे पाठविणे.
३. महिला सबलीकरणासाठी कृती आराखडा सादर करणे.
४. चार्टर ऑफ डिमांडमध्ये मान्य करण्यात आलेल्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी पाठपुरावा करणे.

या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी, प्रत्येक जिल्ह्यात एक युनिट स्थापन करण्यात आले. संघात समाविष्ट असलेल्या जिल्ह्यातील ३ महिला तसेच सभापती, महिला व बाल कल्याण समिती आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बाल कल्याण) या ५ जणांचा युनिटमध्ये समावेश आहे. या युनिटची बैठक दर २ महिन्याने जिल्हा परिषदेमध्ये उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बाल कल्याण) यांच्या अध्यक्षतेखाली होते.



मजूरा मजुरी पूर्ण द्यावी । जेणे मुलबाळे सुखे जगवी
तैसीच उत्पन्ने वाढवोनि घ्यावी । गावामाजी

# हक्काचा निवारा



आपल्या हक्काचा निवारा हा प्रत्येकाला हवा असतो. पण सर्वांना हे सहज शक्य होतेच असं नाही हे लक्षात घेऊन केंद्र शासनामार्फत इंदिरा आवास योजना राबविली जाते. दरवर्षी घरकुलाचे उद्दिष्ट केंद्र शासनामार्फत निश्चित करून देण्यात येते तसेच जिल्हानिहाय घरकुलाचे वाटप शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयाकडून जिल्ह्यांना परस्पर करण्यात येते. यामध्ये राज्याला बदल करण्याचे अधिकार नाहीत. या उद्दिष्टाची पूर्तता ग्रामविकास विभागाच्या अखत्यारितील जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालकांकडून करण्यात येते.

टिकाऊ आणि मजबूत घरांच्या बांधणीसाठी केंद्र शासनाकडून प्रत्येक घरकुलाला ४५ हजार रुपयांचे अनुदान देण्यात येते. यामध्ये राज्य शासनाच्या २५ टक्के अनुदाचा समावेश आहे. परंतु २००९ पासून राज्य शासनाने आपल्या हिश्शात अतिरिक्त वाढ केली असून प्रत्येक घरकुलाची किंमत ७० हजार केली आहे. यामध्ये केंद्र शासनाचे ३३,७५० रुपये, राज्य शासनाचे ३४,७५० रुपये असा हिस्सा असून लाभार्थ्याचा हिस्सा केवळ १,५०० रुपयांचा आहे.

इंदिरा आवास योजनेचा एक भाग म्हणून ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील बेघरांपैकी ज्यांना स्वत:ची जागा नाही अशा कुटुंबांकरिता जागा उपलब्ध करून देण्याच्या योजनेस केंद्र शासनाने मान्यता दिली आहे. योजनेमध्ये घरकुलाच्या जागेसाठी प्रत्येक लाभार्थ्यास साधारण १०० ते २५० चौरस मीटर जागा खरेदी करणे किंवा जागा ताब्यात घेण्यासाठी १० हजार रुपये किंवा प्रत्यक्ष खर्चाची रक्कम यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढे आर्थिक सहाय्य देण्यात येते. दारिद्र्यरेषेखालील लोकांना लवकरात लवकर घरे देण्यासाठी इंदिरा आवास योजनेंतर्गत देण्यात येणारे घरकुलांचे उद्दिष्ट वाढवून मिळावे यासाठी राज्य शासन सातत्याने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करीत आहे. हे उद्दिष्ट वाढून मिळाल्यास येत्या काही वर्षांमध्ये सर्वांना या योजनेचा लाभ मिळून हक्काचा निवारा प्राप्त होऊ शकेल.

### रमाई आवास योजना

रमाई आवास योजनेचीही राज्यातील ३३ जिल्ह्यात अंमलबजावणी सुरू आहे. योजनेची अंमलबजावणी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत करण्यात येत असून अनुसूचित जातीतील दारिद्र्यरेषेखालील लाभार्थ्यांसाठी ही योजना राबविण्यात येते. योजनेअंतर्गत २०१०-११ मध्ये ६८,५०० घरकुले मंजूर करण्यात आली होती त्यापैकी मार्च २०११ अखेर ७,३०० घरकुले पूर्ण करण्यात आली तर ४९,४४१ घरकुलांचे बांधकाम प्रगतिपथावर आहे.

### राजीव गांधी निवारा योजना

गृहनिर्माण विभागाची राजीव गांधी निवारा योजना एक आणि दोन, या योजनाही जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत राबविण्यात येत आहेत. राजीव गांधी निवारा योजना-१ अंतर्गत दारिद्र्यरेषेखालील लाभार्थ्यांना घरकुलांसाठी अनुदान उपलब्ध करून देण्यात येते तर राजीव गांधी निवारा योजना- २ अंतर्गत दारिद्र्यरेषेच्यावर असलेल्या लाभार्थ्यांसाठी १ लाख रुपयांची रक्कम बँक तसेच जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत उपलब्ध करून देण्यात येते. या रकमेमध्ये लाभार्थ्याचा हिस्सा १० हजार रुपयांचा असतो तसेच या रकमेवरील व्याजाची रक्कम शासनामार्फत संबंधित बँकेत अदा करण्यात येते.

✦✦

(पान ४१ वरून) **उजळणाऱ्या वाटा...**

**अन्य गावांसाठी काय कल्पना आहेत?**

सर्वांनी काम केले तर आमच्याकडे कोणीच फिरकणार नाही. आम्ही केलेल्या आदर्श गावांच्या कामातून सर्वांनी प्रेरणा अवश्य घ्यावी. केवळ प्रेरणा घेऊन उपयोग नाही. म्हणजेच कृतीशिवाय प्रेरणेला अर्थ नाही. आदर्शगाव उभे करण्यासाठी संघर्ष करावा लागतो. यातून काही जण मध्येच काढता पाय घेतात.

**लोकप्रतिनिधींकडून काय अपेक्षा?**

सरपंच म्हणून मी एवढे काम करू शकलो. प्रत्येक पंचायत सदस्याने एक गाव, जि. प. सदस्याने दोन गावे, आमदाराने पाच गावे, खासदाराने दहा गावे आदर्श म्हणून निर्माण केल्यास राज्याचे, देशाचे चित्र पालटण्यास वेळ लागणार नाही. लोकसहभागातून जे काम उभे केले जाते, त्याला कुंपणमुक्त समाज म्हणतात. लोकांचे प्रश्न सोडविल्याशिवाय ते गाव आदर्शगाव म्हणून उभेच राहू शकत नाही. आधी गावातील लोकांचे प्रश्न, समस्या, अडचणी सोडवाव्याच लागतात. त्याशिवाय गत्यंतर नाही. रस्ते, बांध, बंदिस्ती, कौटुंबिक आदी सर्व प्रश्न सोडविणे क्रमप्राप्त असते. त्याशिवाय कामाला सुरुवात करता येत नाही. दगड उचलणे, श्रमदान करणे, निर्मल पालन ही सर्व कामे लोकहभागातून झाली तर आदर्शगाव उभे राहण्यास वेळ लागत नाही. म्हणजेच संपूर्ण गाव डोळ्यांसमोर ठेवून काम हाती घ्यावे लागते अणि ते तडीस न्यावे लागते. ग्रामस्तरांवर काम करणारे तलाठी, ग्रामसेवक, अंगणवाडी शिक्षिका, वायरमन, कृषी पर्यवेक्षक या सर्वांना राळेगणसिद्धी, हिवरेबाजार येथे प्रशिक्षण देण्यात येते. त्यांनी आदर्शगाव योजनेत काम केलेल्या कर्मचाऱ्यांशी, लोकांशी प्रत्यक्ष संवाद साधून स्थानिक कार्यकर्ते आणि लोकांच्या सहभागातून आपले गाव आदर्श बनवावे, यासाठी हे प्रशिक्षण उपयुक्त ठरते. प्रत्येक गावात ग्रामसमिती, मागासवर्गीय प्रतिनिधी, महिला, शेतकरी, सुशिक्षित बेरोजगार, अध्यात्मिक क्षेत्रातील एक अशा व्यक्तींचा यात समावेश असतो. त्यांना हिवरेबाजार येथे हे प्रशिक्षण दिले जाते. माजी चेअरमन, माजी सरपंच, पाण्याचे नियोजन करणारे, दुध उत्पादक, गुराखी संघटनेचे सदस्य आदी सर्वांचे अनुभव समितीच्या सदस्यांना सांगून आदर्शगाव बनविण्याचे काम हाती घेतले जाते. प्रात्यक्षिकात मशागत चांगली करून घेतली जाते. निधीचे पैसे आल्यावर गडबड गोंधळ होता कामा नये. यामुळे ग्रामसभेतही पारदर्शी कारभार पाहावयास मिळतो. ही गावे वेगवान प्रगती करतात. उत्कृष्ट काम करणाऱ्या गावांचा म्हणजेच सरपंच, कर्मचारी, अंगणवाडी सेविका आदी सर्वांचा सन्मान करण्यात येतो. जी संस्था उत्कृष्ट काम करून आदर्शगाव म्हणून गावाला मोठे करेल, त्याची गुणवत्ता तपासून त्या संस्थेला दुसरे गाव आदर्श बनविण्यासाठी तत्काळ परवानगी देण्यात येते.

**मुलाखत : शेषराव पठाडे,**
**संपर्क : ८८०५००७६४९**

✦✦



# ‘सरस’ महालक्ष्मी

डॉ. नरेश गीते

बचतगट म्हटलं की आपल्या डोळ्यांसमोर साधारणत: पापड, लोणची, मसाल्याचे पदार्थ आणि छोट्या वस्तू बनविणाऱ्या महिलांचे उद्योग असं चित्र समोर येतं. पण अलीकडच्या काळात बचतगटांनी मोठी झेप घेतलेली आहे. पारंपरिक क्षेत्रापलीकडे जाऊन महिलांनी जेट्रोफा लागवड, गारमेंट उद्योग, समूह शेतीसारख्या मोठ्या उद्योगात आपलं पाऊल खंबीरपणे रोवलं आहे. एवढंच कशाला तर सहकारी साखर कारखाना ते एफ.एम. आकाशवाणी केंद्र सुरू करण्यापर्यंत या बचतगटांनी धाडस दाखवलं आहे. आपल्या उत्पादनांना देशांतर्गत बाजारपेठेबरोबर आंतरराष्ट्रीय बाजारपेठदेखील मिळवून दिली आहे.

राज्यामध्ये महिला आर्थिक विकास महामंडळ, नाबार्ड, जलस्वराज्य प्रकल्प, ग्रामविकास आणि अल्पसंख्याक विकास विभाग अशा विविध विभागांच्या माध्यमातून सुमारे चार ते साडेचार लाख बचतगट कार्यरत आहेत. आंतरराष्ट्रीय नाणे निधीच्या मदतीनं राज्यात महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला सक्षमीकरण कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. एका बचतगटात किमान १० सदस्य आहेत असं जर गृहीत धरलं तर याद्वारे संघटित झालेली कार्यशक्ती आणि उपलब्ध झालेल्या रोजगाराच्या संधी लक्षात येतात.

बचतगटांच्या या चळवळीला अधिक गतिमान आणि मजबूत करण्यासाठी शासनाने विविध उपक्रम हाती घेतले आहेत. यामध्ये ४ टक्के एवढ्या अल्प व्याजदराने कर्ज उपलब्ध करून देण्यापासून बचतगटांनी तयार केलेल्या वस्तूंच्या विक्रीसाठी व्यापक बाजारपेठ उपलब्ध करून देणे, बचतगटांचे महासंघ स्थापन करणे या कामांचा समावेश आहे.

केंद्रशासन पुरस्कृत स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेअंतर्गत दारिद्र्यनिर्मूलनासाठी ठोस कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. याअंतर्गत दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना बचतगटांच्या माध्यमातून संघटित केले जाते. तसेच बँकांचे कर्ज आणि शासकीय अनुदान देऊन स्वयंरोजगाराचे साधन उपलब्ध करून देऊन त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न केला जातो. बचतगटातील तसेच स्वरोजगारींना आवश्यक असलेले व्यावसायिक प्रशिक्षण देण्याची व्यवस्थादेखील यामध्ये आहे. केंद्र शासनातर्फे ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण केंद्रे सुरू करण्यात येत असून राज्यात रत्नागिरी, पुणे, सोलापूर, औरंगाबाद, अमरावती, नागपूर आणि नाशिक अशा सात जिल्ह्यांमध्ये अशी केंद्रे मंजूर करण्यात आली आहेत. आजमितीस राज्यात या योजनेंतर्गत २ लाख ६० हजार बचतगट स्थापन झाले आहेत. यामध्ये ८० टक्के बचतगट महिलांचे आहेत.



स्वत:च्या उद्योग-व्यवसायाबरोबरच हे बचतगट दारूबंदी, ग्रामस्वच्छता अभियान, कुपोषण निर्मूलन यासारख्या सामाजिक कार्यात योगदान देत आहेत. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत अंगणवाड्यांमध्ये देण्यात येणाऱ्या पूरक पोषण आहार वितरणाचे काम महिला बचतगटांना देण्यात आले आहे. आपलं गावं-आपलं पाणी सारखी नावीन्यपूर्ण कल्पना जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत महिला बचतगटांमार्फत राबविली जात आहे. एवढेच नाही, तर अनेक गावांत पाणीपुरवठ्याच्या योजनांच्या देखभाल आणि दुरुस्तीचे काम महिला बचतगटांना देण्यात आले आहे.

राज्यात विभाग आणि जिल्हा स्तरावर बचतगटांच्या वस्तूंची प्रदर्शने भरविली जातात व त्या माध्यमातून बचतगटांच्या वस्तूंना स्थानिक बाजारपेठ उपलब्ध करून दिली जाते. याशिवाय शहरांमध्ये मॉलमधूनही बचतगटांच्या वस्तू विक्रीसाठी ठेवण्यात येतात. मोठ्या गावांमध्ये, तालुका आणि जिल्हा स्तरावर बचतगटांच्या वस्तूंचे ग्रामीण मॉल उभे करण्याचे काम प्रायोगिक तत्त्वावर राज्यात सुरू झाले असून आकर्षक पॅकेजिंग आणि ब्रॅण्डिंगसाठी प्रशिक्षण देण्यात येत आहे. यासाठी तज्ज्ञ बाजारपेठ संस्थेची नियुक्ती करण्यात येईल. वर्ध्याचा ‘वर्धिनी’, ठाण्याचा ‘वज्रेश्वरी’, कोल्हापूरचा ‘महालक्ष्मी’, पुण्याचा ‘सावित्री’ असे विविध ब्रॅण्ड आता बाजारपेठेत स्थिरावत असून काही बचतगटांच्या उत्पादनांनी देशाच्या सीमा पार केल्या आहेत. बचतगटांच्या उत्पादनांना व्यापक बाजारपेठ मिळावी म्हणून २००३ पासून मुंबईत ‘महालक्ष्मी (विभागीय) सरस’ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येत आहे.

**संपर्क : ९८२२६०३५०१**



गावचे राज्य गावचि करी । कोणाचीच न चाले हूशारी
आमुचे आम्हीच सर्वतोपरी । नांदू गावी

# बचतगटाची किमया

आत्मसन्मान मिळवण्यासाठी आर्थिक स्वावलंबनाच्या वाटेवरून जावे लागते याचे आत्मभान तळागाळातील महिलांना दिलं ते बचतगटांनीच. खेड्यापाड्यातील, वाड्या वस्त्यातील अशिक्षित, अल्पशिक्षित बायकांना आम्हीही कोणीतरी आहोत ही ओळख निर्माण करून देण्याचं काम या बचतगटांच्या माध्यमातून झालं. छोट्याछोट्या बचतीतून मी माझ्या घरासाठी काही करू शकते हे लक्षात आल्यानंतर महिलांनी स्वावलंबनाचा राजमार्ग स्वीकारला आणि पाहता पाहता पापड-लोणची आणि मसाल्याच्या पदार्थापासून सुरू झालेला त्यांचा उद्योजकतेचा प्रवास आज प्रचंड विस्तारला आहे. सामूहिक शेती, जेट्रोफा लागवड, पाळणाघरे, एवढंच कशाला सहकारी साखर कारखान्यापासून एफएम रेडिओ चालवण्यापर्यंत या बचतगटांनी यशाचं शिखर काबीज केलं आहे.

बचतगटांच्या माध्यमातून सामाजिक अभिसरणाची प्रक्रियाही वेग घेत आहे. विकासापासून दूर असलेल्या घटकाला मुख्य प्रवाहात आणतांना बचतगटांनी हुंडाबंदी, कुपोषण निर्मुलन, दारूबंदी, कौटुंबिक छळातून सुटका असे सामाजिक प्रश्नही अतिशय यशस्वीपणे हाताळले आहेत. ग्रामस्वच्छतेच्या कामातही या महिला अतिशय हिरिरीने भाग घेत आहेत. महिलेवर आलेल्या संकटात बचतगटाची सामूहिक ताकद त्या महिलेच्या मागं उभी राहते. या माध्यमातून महिलांची राजकीय जाणीव जागृतीही मोठ्या प्रमाणात होत असून बचतगटातील महिला सरपंच, ग्रामसेवक आणि ग्रामपंचायत-पंचायत समिती सदस्य म्हणून काम करताना आणि गावाच्या विकासात सहभागी होताना दिसत आहेत.

लहान उद्योगांच्या माध्यमातून पुरेसा रोजगार निर्माण करण्याबरोबरच ग्रामीण कारागिरांच्या कला-कौशल्याला वाव देण्याचे महत्त्वपूर्ण काम देखील यातून केले जाते. त्यांनी तयार केलेल्या वस्तूंची विक्री व्यवस्था करण्यासाठी मदत केली जाते.

योजनेअंतर्गत आतापर्यंत १८८१०१.५९ लाख रुपयांचे अनुदान तर २४२४५२.७७ लाख रुपयांचा कर्जपुरवठा करण्यात आला आहे. २ लाख ६३ हजार ५३२ बचतगटातील १,३६,३६६५ स्वरोजगारींना याचा लाभ झाला आहे. यातील ९०,०२१ स्वयंसहाय्यता बचतगटांनी स्वत:चे व्यवसाय सुरू केले आहेत. योजनेअंतर्गत ३,३९,६८२ अनुसूचित जातीच्या स्वरोजगारींना, २,७५,६१९ अनुसूचित जमातीच्या स्वरोजगारींना, ६७,१८५ अल्पसंख्याक स्वरोजगारींना, १००४७९० महिला स्वरोजगारींबरोबर १८,२८६ अपंग स्वरोजगारींना लाभ देण्यात आला आहे.

महिला बचतगटांना ४ टक्के व्याज दराने कर्ज उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करण्यात आली असून उर्वरित ७ टक्क्यांपर्यंतचे व्याज राज्य शासन भरत आहे. त्यामध्ये आतापर्यंत सुमारे ५,७०० बचतगटांना सुमारे ४.३० कोटी रुपयांचे अनुदान वितरित करण्यात आले आहे. योजनेमध्ये बचतगटांच्या संस्थात्मक मदतीसाठी गाव ते जिल्हा स्तरावर बचतगटांचे महासंघ स्थापन करण्यात येत असून आतापर्यंत ७५०० महासंघांची स्थापना झाली आहे. प्रत्येक जिल्ह्यात ग्रामीण विकास व स्वयंरोजगार प्रशिक्षण केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. या संस्थेसाठी जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी सुमारे एक ते दीड एकर जागा राज्य शासनाने उपलब्ध करून द्यावयाची आहे. केंद्र शासनाने आतापर्यंत अशा १६ प्रशिक्षण केंद्रांना मान्यता दिली असून २८ ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात भाड्याच्या जागेत केंद्र सुरू झाली आहेत. त्यामधून सुमारे ९ हजार प्रशिक्षणार्थींनी कौशल्यवृद्धी प्रशिक्षण घेतले आहे.

बचतगटांना व्यापक बाजारपेठ प्राप्त व्हावी म्हणून दरवर्षी विभागीय तसेच जिल्हा स्तरावर बचतगटांच्या वस्तूंची प्रदर्शने भरवली जातात. योजनेमधून विभागीय प्रदर्शनासाठी प्रत्येकी २५ लाख रुपये, जिल्हा प्रदर्शनासाठी प्रत्येकी १० लाख रुपये याप्रमाणे निधी दिला जातो. याशिवाय बचतगटांच्या उत्पादित मालाच्या विक्रीसाठी तालुका आणि जिल्हा स्तरावर कायमस्वरूपी विक्रीकेंद्रे बांधण्याला शासनाने प्राधान्य दिले आहे, त्याअंतर्गत प्रत्येक जिल्हा केंद्रासाठी ५० लाख रुपयांचा तर तालुका केंद्रासाठी २५ लाख रुपयांचा निधी देण्यात येत आहे. राज्यात आठ जिल्ह्यांतील १२९ तालुक्यांत अशी कायमस्वरूपी विक्री केंद्र बांधण्यासाठी २००९-१० मध्ये ३,६२५ लाख रुपयांचा निधी देण्यात आला असून कायमस्वरूपी विक्री केंद्रांचे बांधकाम वेगाने सुरू आहे.

**(संकलन : ग्रामविकास विभाग)**

## जीवनोन्नती. . .

स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचे राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानात रूपांतर करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला आहे. या अभियानांतर्गत दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना आर्थिक प्रगतीच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विशेषत्वाने प्रयत्न करण्यात येतील. राज्यात ४५ लाख कुटुंब दारिद्र्यरेषेखाली आहेत. आतापर्यंत २ लाख ६३ हजार बचतगटांच्या स्थापनेद्वारे सुमारे २६ लाख कुटुंब बचतगटांच्या कार्यकक्षेत आली असली तरी अद्याप १८ लाख कुटुंबांची बांधणी आणि संघटन या बचतगटांच्या माध्यमातून करणे बाकी आहे. प्रत्येक कुटुंबात क्षमता असते आणि प्रत्येकाला दारिद्र्याच्या बाहेर यायचे असते हे लक्षात घेऊन राष्ट्रीय जीवनोन्नती अभियानाचा पाया रचला गेला आहे. महाराष्ट्रासह १२ राज्यांना अभियानातील महत्त्वाच्या घटकांसाठी जागतिक बँकेचे सहकार्यसुद्धा मिळणार आहे. सध्या पथदर्शी स्वरूपात सुरू झालेलं हे अभियान महाराष्ट्रातल्या रत्नागिरी, नंदुरबार, सोलापूर, जालना, यवतमाळ आणि गडचिरोली जिल्ह्यात ग्रामपंचायत क्षेत्रातील काही भागात राबविण्यात येईल. टप्प्याटप्प्याने या अभियानाचा विस्तार होणार असून प्रत्येक महसूल विभागात सर्वांत कमी मानव विकास निर्देशांक असलेल्या जिल्ह्यात याची अंमलबजाणी होईल.

## ग्रामीण मॉल

केंद्र शासनाने स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेअंतर्गत बचतगटांनी तयार केलेल्या वस्तूंच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी गाव, जिल्हा आणि राज्यस्तरावर कायमस्वरूपी विक्री केंद्र बांधण्याचा नवीन उपक्रम हाती घेतला आहे. याअंतर्गत ७५ टक्के खर्च केंद्र शासन तर २५ टक्के खर्च राज्य शासन करणार आहे. बचतगटांनी तयार केलेल्या वस्तूंच्या विक्रीचे हे ग्रामीण मॉल गावस्तरावर बांधण्यासाठी १५ लाख, जिल्हा स्तरावर बांधण्यासाठी १५० लाख आणि राज्य स्तरावर बांधण्यासाठी ३०० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

उत्सवाच्या निमित्ताने । सुंदर करावी सहभोजने
बंधुप्रेम वाढेल जेणे । आचरावे तैसेचि



# वारीमधील प्रबोधनाचं वारं

अध्यात्मापासून जनप्रबोधनापर्यंत अनेक अंत:प्रवाहाचा स्वीकार केलेली वारी आता हायटेक होत असून लोकसंवादाचं एक सशक्त माध्यम म्हणून नावारूपाला येत आहे.

ज्यावेळी त्या सावळ्या श्रीहरीच्या दर्शनाची ओढ लागलेली असते त्यावेळी त्यांच्यासोबत स्वच्छतेचे महत्त्व सांगणारे, ग्रामविकासाच्या विविध योजनांची माहिती सांगणारे चित्ररथही धावत असतात. चित्ररथांबरोबर कलापथकांच्या माध्यमातूनही ग्रामविकासाचा संदेश घरोघर पोहोचवला जातो. गेल्या आषाढीला संत ज्ञानेश्वर आणि संत तुकारामांच्या पालखीसमवेत ग्रामविकास विभागाची 'ग्रामसभा सशक्तीकरण दिंडी' पंढरीच्या वाटेवर मार्गस्थ झाली होती. विभागाचे १६५ कर्मचारी यात सहभागी झाले. एवढेच नाही, तर दोन्ही पालख्यांसमवेत ८ कलापथके आणि ८ चित्ररथांच्या माध्यमातून ग्रामविकासाचा, स्वच्छतेचा आणि पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यात आला. भारूड, गोंधळ, कीर्तन, प्रवचनासारख्या लोकमाध्यमांचा देखील या संवादात उपयोग करून घेतला गेला. गावगाडा व्यवस्थित चालवायचा असेल, गावाचा विकास करायचा असेल, गावं आरोग्यसंपन्न ठेवायचे असेल तर स्वच्छतेच्या सवयी लावून घेताना विविध विकास योजनांचा लाभ कसा घ्यायचा याची माहिती अतिशय परिणामकारक स्वरूपात यावेळी देण्यात आली.

व. दा. राठोड

राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या सर्वसामान्य माणसाशी थेट बोलण्याची संधी या वारीने उपलब्ध करून दिली असून शासन आणि हरिभक्तांमधला हा संवाद



लोकमाध्यमांमुळे 'ये हृदयीचे ते हृदयी' असा थेट जाऊन पोहोचत आहे.

'गावकरी मिळून एक काम करू- लोकसंख्ये एवढी झाडं लावू, सांडपाण्याची योग्य विल्हेवाट- गावात येईल आरोग्याची पहाट, स्वच्छ आणि शुद्ध पाण्याचे तंत्र हाच खरा आरोग्याचा मंत्र, परसबाग ज्याचे दारी- पौष्टिक आहार त्याचे घरी, स्वच्छ-सुंदर परिसर- आरोग्याचे माहेरघर' असे अनेकविध संदेश लावलेल्या चित्ररथांनी वारकऱ्यांचे आणि नागरिकांचे लक्ष वेधून घेतले होते.

यावेळी महिलांचे कलापथक हा लोकार्षणाचा विषय ठरला होता. वारी जेव्हा विश्रांतीसाठी मुक्कामाला स्थिरावायची तेव्हा ग्रामविकास, पाणीपुरवठा आणि स्वच्छता क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन, प्रवचनही तिथे आयोजित करण्यात आले.

'चालता-बोलता'सारख्या कार्यक्रमातून वारकऱ्यांना सोपे प्रश्न विचारून लोकशिक्षणाचे कामही या दिंड्यांनी केले. ग्रामविकास मंत्री जयंत पाटील यांनी ग्रामसभा सशक्तीकरण दिंडीमध्ये प्रत्यक्ष सहभाग घेऊन वारीसोबत मार्गक्रमणा केली.

**संपर्क : ०२२-२२८४४६१३**

## तीर्थक्षेत्र विकास. . .

गावखेड्यातून फिरत असताना अचानक एखादं मंदिर, त्याचं बांधकाम आणि तिथलं वातावरण आपले लक्ष वेधून घेतं. कधी कधी प्रकाशझोतात नसलेली पण पुरातन आणि वास्तुकलेचा उत्कृष्ट नमुना असलेली मंदिरे आपल्याला खेडोपाडी पाहायला मिळतात. त्याच्या पौराणिक आणि ऐतिहासिक कथांनी आपण भारावून जातो. या मंदिरामधील देवतांच्या दर्शनासाठी वर्षभर येणारे भाविक आणि प्रथेप्रमाणे येथे साजरे होणारे उत्सव, जत्रा हे ग्रामीण भागातील लोकार्षणाचं केंद्र असतं. भाविकांच्या मनात त्याला अनन्यसाधारण असं महत्त्व असत.

ही तीर्थक्षेत्रे विकसित व्हावीत, इथे येणाऱ्या भाविकांना आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध व्हाव्यात या उद्देशानं शासनातर्फे ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजना राबविली जाते. या योजनेच्या माध्यमातून शासनस्तरावर 'ब' वर्गात असलेल्या ग्रामीण तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी पायाभूत सुविधांची उभारणी केली जाते. यामध्ये तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी पाणीपुरवठ्याच्या किंवा स्वच्छता गृहाच्या सोयी निर्माण केल्या जातात. या सर्व व्यवस्थांची उभारणी करून भाविकाला दर्शन घेताना किंवा तिथे येताना त्रास होणार नाही यादृष्टीने तीर्थक्षेत्राचा विकास केला जातो. यामध्ये जोडरस्ते, पथदिवे, भक्तनिवास आणि संरक्षक भिंतीची कामे यांचा समावेश आहे. ग्रामीण तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी वर्षभर भाविक सातत्याने येत असतात. विविध सुविधांच्या उभारणीतून त्यांची योग्यप्रकारे व्यवस्था केल्यास यातून अप्रत्यक्ष रोजगार निर्मितीला चालना मिळत असते. रोजगारातून आर्थिक विकासाची चळवळ गतिमान होतांना कळत-नकळत ते व्यवसाय करणाऱ्या कुटुंबांबरोबर त्या भागाचा विकास होत असतो. आर्थिक विकासाची चळवळ गतिमान होत असते. ग्रामीण तीर्थक्षेत्रांच्या विकासाला असलेले वेगळे महत्त्व ओळखून शासनामार्फत या योजनेची अंमलबजावणी होत आहे. या योजनेअंतर्गत एका तीर्थक्षेत्रसाठी जास्तीत जास्त एक कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येतो. आतापर्यंत साधारणत: ९० ठिकाणच्या देवस्थानांना 'ब' वर्ग दर्जा देण्यात आला आहे. या ठिकाणी पायाभूत सुविधांची उभारणी करण्यासाठी १४० कोटी रुपयांची रक्कम खर्च करण्यात आली आहे. श्रद्धास्थान असलेल्या देवाचे दर्शन घेताना ते सुखकर झाले, काही त्रास झाला नाही, तिथे अपेक्षित असलेल्या सुविधा उपलब्ध झाल्या तर देवदर्शनाचा आनंद द्विगुणित होतो. भाविकांच्या ह्याच भावनेचा सन्मान ग्रामीण तीर्थक्षेत्र विकासाला प्राधान्य देण्यामागे आहे.



यास्तव श्रीमंत, शिक्षित, हूद्देदार । कलावंत , शेतकरी, कामगार
सर्वांनी मिळोनि ग्रामोद्धार । करावा ग्रामोद्योगांनी


# विकासासाठी 'संग्राम'

एकनाथ मोरे

कादाला कागद जोडून वर्षानुवर्षे एकाच प्रकारे काम करण्याच्या सवयीला बाजूला सारून गावातील जनतेला पारदर्शक, दर्जेदार आणि गतिमान सेवा देण्यासाठी ग्रामविकास विभागात 'संग्राम' सुरू आहे. संग्राम म्हणजे संगणकीकृत ग्रामीण महाराष्ट्र कार्यक्रमाची अंमलबजावणी! राज्यातील जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतींचे संपूर्ण कामकाज संगणकाच्या माध्यमातून करण्यासाठी ई-पंचायत हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. यासाठी केंद्र शासनाने वेगवेगळ्या प्रकारची १२ सॉफ्टवेअर्स (आज्ञावल्या) उपलब्ध करून दिले आहेत.

या आज्ञावल्यांचा उपयोग करून ग्रामपंचायतींचा कारभार अधिक लोकाभिमुख व्हावा, त्याचबरोबर ग्रामीण जनतेला सर्व प्रकारच्या दाखल्यांबरोबर आनुषंगिक सोयी-सुविधा एकाच ठिकाणी मिळाव्यात हा त्यामागचा उद्देश आहे. यामध्ये टप्प्याटप्प्याने दूरध्वनी, वीज देयक, भ्रमणध्वनी देयक भरणे, बस, रेल्वे आरक्षण सेवेचा लाभ घेणे शक्य होईल. यातून सुमारे २० हजार ग्रामीण युवकांना काम मिळाले आहे.

प्रिया सॉफ्टवेअरच्या माध्यमातून राज्यातील २७,८९६ ग्रामपंचायतीपैकी २७,८४० ग्रामपंचायतींचे काम ऑनलाईन स्वरूपात पाहाता येते. एप्रिल २०११ ते १९ मार्च २०१२ पर्यंतच्या ऑनलाईन कामाचा आढावा घेतला तर आपल्याला राज्यभरात जमा व खर्चाच्या ५६ लाख ४ हजार ६८४ नोंदी संगणकाच्या माध्यमातून झालेल्या दिसतात त्यात ३५,०२९ कोटी रुपयांच्या जमा नोंदी असून ३१,२२२ कोटी रुपयांच्या खर्चाच्या नोंदी समाविष्ट




## प्रियाची शिस्त

स्थानिक स्वराज्य संस्थेतील वित्तीय शिस्तीसाठी 'प्रिया' सुसज्ज झाली आहे. ही 'प्रिया' म्हणजे पंचायतराज इंस्टिट्यूशन अकाऊंटिंग सॉफ्टेअर ही आज्ञावली.

स्थानिक स्वराज्य संस्थांना मासिक तसेच वार्षिक लेखे तयार करण्यास लागणारा विलंब, त्यामुळे स्थानिक निधी लेखा कार्यालयाबरोबर महालेखापलांचे आक्षेप, वाढलेली वार्षिक हिशेब पत्रकांची संख्या, हे सगळे काम हाताने होत असल्याने येणाऱ्या मर्यादा, त्यासाठी लागणारा डेटा बेस उपलब्ध नसणे अशा अनेक अडचणींवर मात करणे 'प्रिया' सॉफ्टवेअरमुळे शक्य होऊ शकेल.

या आज्ञावलीमुळे चांदा ते बांदा अशा एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत आणि दुर्गम भागात कार्यरत असलेल्या ग्रामपंचायतींच्या लेखांकनाच्या कार्यात सुसुत्रता, एकसुत्रिपणा आणि अचुकता आली. लेखांकनामधील विसंगती दूर झाल्याने अखेरीस जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत स्तरावर योजनानिहाय किती निधी शिल्लक आहे याची माहिती शासनला ऑनलाईन मिळू लागली. या आज्ञावलीच्या व्हर्जन-२ प्रणालीतून नागरिकांनाही प्राप्त अनुदान आणि खर्चाची माहिती पाहता येते. शिवाय शासनाला धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी आवश्यक असलेली अचूक माहिती मिळते.

कामात शिस्त आणि पारदर्शकता आणणाऱ्या महाराष्ट्राने 'प्रिया' सॉफ्टवेअरच्या अंमलबजावणीत उत्कृष्ट काम केले. त्याचे फलित म्हणून पंचायतराज मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडून सन २०१०-११ साली देण्यात आलेला देशपातळीवरील दुसऱ्या क्रमांकाचा ३० लाख रुपयांचा पुरस्कार महाराष्ट्राला मिळाला. १३ व्या वित्त आयोगाच्या निधी वितरणाच्या अटींमध्ये देखील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेख्यांचे संगणकीकरण अनिवार्य करण्यात आले असून महाराष्ट्राने या आज्ञावलीमध्ये लेखे ठेवल्याने १३ व्या वित्त आयोगामार्फत महाराष्ट्राला १०९ कोटी रुपयांच्या परफॉर्मन्स ग्रँटस् प्राप्त झाल्या आहेत. देशात अशी फक्त आठ राज्य आहेत. त्यात आपला महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर!

आहेत.

जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायती या त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्थेचे प्रशासकीय व्यवस्थापन हे देखील खूप आव्हानात्मक असे काम आहे. या कामात गती आणि पारदर्शकता आणण्याला विभागाने प्राधान्य दिले आहे. याचाच एक भाग म्हणून ग्रामविकास विभागाच्या अधिपत्याखालील अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, गट विकास अधिकारी यांच्या बदल्या ऑनलाईन पद्धतीने करण्याचा प्रयत्न या वर्षी प्रायोगिक तत्त्वावर करण्यात आला. त्यासाठी स्वतंत्र आज्ञावली विकसित करण्यात आली आहे. यात आवश्यकतेनुसार सुधारणा करण्यात येऊन जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या बदल्याही अशाच पद्धतीने करण्याचा विभागाचा मानस आहे.

**शाळा तिथे शिक्षक. . .**

जिल्हा परिषदांच्या शाळांचा गुणात्मक आणि दर्जात्मक विकास करण्याचा प्रयत्न विभागाकडून जाणीवपूर्वक केला जात आहे. यासाठी स्थापन करण्यात आलेल्या अभ्यासगटाचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे. यासाठी राबविण्यात येत असलेल्या अनेक महत्त्वाकांक्षी उपक्रमातील एक पाऊल म्हणजे विद्यार्थी आणि शिक्षकांची बायोमॅट्रीक्स पद्धतीने हजेरी!

राज्यातील ६ महसुली विभागात ६ वेगवेगळ्या तालुक्यातील जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये बायोमॅट्रीक प्रणाली प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात आली आहे. यामध्ये ९८४ शाळा आणि १ लाख ३ हजार विद्यार्थी आणि ४,०६१ शिक्षकांचा अंतर्भाव आहे. यामुळे जिल्हा परिषदांच्या शाळांचे कामकाज पारदर्शक होईल. यातून विद्यार्थ्यांची आणि शिक्षकांची उपस्थिती लक्षात तर येईलच पण शाळेतील वर्गनिहाय पटसंख्या स्पष्ट झाल्याने विद्यार्थ्यांसाठी असलेल्या योजना अधिक परिणामकारकरीत्या राबविता येतील. त्याचबरोबर त्या योजनांच्या अंमलबजावणीतही पारदर्शकता येईल.

बऱ्याचदा असं लक्षात येतं की विद्यार्थी आहेत पण त्या प्रमाणात शाळेत शिक्षक उपलब्ध नाहीत. अशावेळी जर विद्यार्थ्यांची पटसंख्या वर्षाच्या सुरुवातीलाच लक्षात आली तर त्या संख्येच्या प्रमाणात शिक्षकांची नियुक्ती करणे शक्य होणार असल्याने विभागाने या बाबीला प्राधान्य दिले आहे. याचा आणखी एक लाभ म्हणजे शिक्षकाच्या रजेच्या कालावधीत पर्यायी शिक्षकाची व्यवस्था करणे सोयीचे होईल. गावातील शाळेत जर एखादा शिक्षक वेळेत पोहोचला नाही किंवा तो रजेवर असेल तर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून बाजूच्या गावातील शिक्षक अर्ध्या ते एक तासाच्या कालावधीत तिथे पाठवता येऊ शकेल अशी व्यवस्था याद्वारे निर्माण करण्यात येत आहे.

बायोमॅट्रीक्स हजेरीचा शालेय स्तरावर सुरू झालेला हा उपक्रम अधिक व्यापक करण्याचा विभागाचा मानस असून या अंतर्गत गावात सेवा देणाऱ्या या सर्व विभागांच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना टप्प्याटप्प्याने अशी हजेरी सक्तीची करण्यात येणार आहे. त्यामुळे तो संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी गावात किती वाजता आला, त्याने गावात किती तास सेवा दिली, तो गावातून कधी बाहेर गेला याची माहिती मिळू शकेल. गावासाठी काम करणाऱ्या सर्व यंत्रणांनी त्यांच्या सेवा वेळेत, पारदर्शीपणे आणि समर्पित भावनेने द्याव्यात, तसे झाल्यास ग्रामविकासाला गती येईल ही त्या मागची भूमिका आहे.

**संपर्क : ०२२-२२८२३५८०**



## ‘लालफित सुटली’

शासकीय कामकाजात पारदर्शकता, गतिमानता आणि लोकाभिमुखता आणणारे अनेक निर्णय शासनाने राबविले असून कामकाजात संगणकाचा वापर वाढवला जात आहे. ऑनलाईन सेवांचा विस्तार होत आहे. त्यामुळे ‘लालफित’ सुटली असं म्हटलं तर ते वावगे ठरू नये.

ग्रामविकास विभागानं यापुढे एक पाऊल टाकून विभागाला ‘शून्य प्रलंबित प्रकरणा’कडे नेण्याचं निश्चित केलं आहे. प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी प्रलंबित प्रकरणाचा आढावा घेतला जातो. विभागात प्रलंबित प्रकरणे राहणार नाहीत याची दक्षता घेतली जाते. ग्रामविकास मंत्री कार्यालयापासून ग्रामपंचायत स्तरापर्यंत हा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबविला जात आहे.

विभागात, जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत स्तरावर प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी प्रलंबित प्रकरणाचा आढावा घेतला जातो. त्यामध्ये जी प्रकरणे प्रलंबित आहेत त्याची खरी कारणे नमूद करून अशा प्रलंबित प्रकरणाची यादी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सादर केली जाते. ही यादी त्या कारणांसह कार्यालयाच्या सूचना फलकावर लावावी अशा सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे टेबलवर आलेले काम प्रलंबित राहणार नाही अशा पद्धतीने काम करण्याचा अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा कल वाढला आहे. जी प्रकरणे प्रलंबित आहेत किंवा परस्पर समन्वयातून अथवा इतर विभागाच्या समन्वयातून पूर्ण करावयाची आहेत त्याची स्वतंत्रपणे नोंद घेण्यात येत आहे. प्रत्येक शासकीय अधिकारी आणि कर्मचारी यांनी, त्यांना नेमून दिलेले काम गतिमान व अचूक पद्धतीनं करणं आवश्यक असून अशी कामे त्यांनी सात दिवसांच्या आत तर तत्काळ स्वरूपात करावयाची कामे ४ दिवसांच्या आत करणे आवश्यक ठरतं! यासाठी कार्यपद्धती निश्चिती करण्यात आली आहे. कर्मचाऱ्यांमध्ये यादृष्टीने प्रोत्साहनात्मक वातावरण निर्माण करतानाच उत्तम कार्यसंस्कृतीची बीजे रुजविली जात आहेत.



**म्हणोनि स्वच्छ ठेवावे दुकान, घर। नाल्या, मोऱ्या, सडका चौफेर**
**मग रामधूनची फेरी सुंदर । काढावी आबालवृद्धांनी**

# आमचे गाव... आम्ही कारभारी

जिथे सर्व प्रशासकीय व्यवहार होतात त्या इमारतीला पूर्वी सचिवालय म्हणायचे. आता मुंबईत जे सहा मजली मंत्रालय आहे त्यालाही पूर्वी सचिवालय म्हणत असत. परंतु काही वर्षांपूर्वी लोकप्रतिनिधींना तो कमीपणा वाटू लागला. आम्हाला लोकांनी निवडून दिले. आम्ही इथे जनतेसाठी निर्णय करतो, योजना आखतो आणि त्या इमारतीला सचिवालय का म्हणायचे? मग विचारांती त्याचे नाव मंत्रालय झाले आणि समोरच्या १७ मजली इमारतीला प्रशासकीय इमारत नाव देण्यात आले. परंतु जे जुने राजकारणी किंवा समाजसेवक आहेत ते मात्र आजही सचिवालयातून परवानगी आणली असेच म्हणतात. सचिवालय या शब्दाविषयीचा हा थोडा इतिहास झाला.

शहरातील माणसाला जशी विविध प्रमाणपत्र लागतात, कर भरावे लागतात, काही सुविधासाठी तक्रार करावी लागते तशीच गावातल्या माणसालाही लागतातच. परंतु गावातल्या माणसाला या सगळ्या बाबीसाठी अक्षरशः पायपीट करावी लागत असायची. साधे रहिवासी प्रमाणपत्र असेल किंवा भूमिहीन असल्याचे प्रमाणपत्र पाहिजे असेल तर त्या माणसाला शहरात असलेल्या तलाठी, ग्रामसेवकाच्या भेटीसाठी प्रवास करावा लागत असे त्यांच्या भेटीसाठी तहसील किंवा पंचायत समितीच्या आवारातील लिंबाच्या किंवा पिंपळाच्या झाडाखाली हातातील फाटक्या पिशवीतील कागदाची भेंडोळी घेऊन ऊन पावसात वाट पाहावी लागत असे. संध्याकाळपर्यंत त्या अधिकाऱ्याची भेट झाली नाही तर शेवटच्या मुक्कामाच्या गाडीने परत गावी जायचे आणि दुसऱ्या दिवशी पुन्हा भाजी भाकरी, चटणी भाकरी सोबत घेऊन शहरात यावे लागत असायचे नाही तर मग शहरात असलेले दलाल त्यांची लूट करायचे हे सर्व टळले ते ग्राम सचिवालयामुळेच.

१९९८ साली राज्यात मोठ्या म्हणजे सरकारी भाषेत ज्याला महसुली मंडळ असणाऱ्या गावाचा दर्जा आहे, अशा गावात ग्रामसचिवालयाच्या इमारती बांधल्या गेल्या. ज्या ग्रामपंचायतीचे स्वतःचे उत्पन्न चांगले आहे त्यांनी स्वनिधी, जिल्हा ग्राम विकास निधीतून याचे बाधकाम केले. या ग्रामसचिवालयासाठी जिल्हा परिषदेकडेही जिल्हा ग्राम विकास निधीची तरतूद आहे त्यातून काही ठिकाणी कामे झाली आहेत. या ग्रामसचिवालयाच्या इमारतीमध्ये सर्वसाधारणपणे ग्रामपंचायतीचे, वीज मंडळाचे, सिंचन विभागाचे कार्यालय आहेत. त्याच प्रमाणे अनेक ठिकाणी ग्रामसचिवालयाच्या देखभाल दुरुस्तीसाठी दुकानांचेही बांधकाम करण्यात आले असून ते गाळे गावातीलच व्यावसायिकांना, महिला बचत गटाला भाड्याने देण्यात

**अरुण समुद्रे**

आले आहेत जेणे करून ग्रामपंचायतीलाही आर्थिक साधन निर्माण झाले आहे.

या ग्रामसचिवालयाच्या माध्यमातून महसूल विभागामार्फत २४ प्रकारच्या सेवा देण्यात येतात.



त्यामध्ये प्रामुख्याने सातबाराचे उताऱ्यापासून ते बेबाकी प्रमाणपत्रापर्यंतचे सर्व प्रमाणपत्र आणि संजय गांधी निराधार योजनेपासून ते रोजगार हमी योजनेत काम मिळण्यापर्यंतचे अर्ज दाखल करता येऊ शकतात आणि तक्रार अर्जही दाखल करतात येतात.

ग्रामविकास विभागामार्फत देण्यात येणाऱ्या जन्ममृत्यूच्या दाखल्यापासून ते वृद्धाला निराधार असल्याचा आणि वृद्ध असल्याचा दाखला दिला जातो. असे एकूण १८ प्रकारचे दाखले देता येतात. त्या शिवाय वीज मंडळाच्या कार्यालयासाठी जागा असल्याने तिथे वायरमन, लाईनमन, मोठे गाव असेल तर कनिष्ट अभियंत्याची सेवाही उपलब्ध होत आहे. लाईटमीटर घेण्यापासून ते विजेच्या ताराबाबतच्या तक्रारी आणि अर्ज दाखल करण्याची सुविधा इथे झाली आहे.

ज्या गावांना कॅनॉलच्या पाण्याचा उपयोग होत असतो तिथे सिंचन विभागाच्या सुपरवायझरला बसायला जागा मिळते आणि पाणीपट्टी वसुली असो की पाणी वेळेवर सुटले की नाही कोठे पाणी मिळत नाही याची तक्रार दाखल करता येऊ शकते. अनेक ठिकाणी कृषी विभागाच्या पर्यवेक्षकांची कार्यालये आहेत त्याचा फायदा शेतकऱ्यांना होत असतो.

गावच्या सर्वांगीण विकासासाठी आणि गावकऱ्यांच्या संपूर्ण विकासासाठी ग्रामसचिवालय हे एक शक्ती केंद्र ठरत असते. गावातल्या राजकारण्यांनाही सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त करून देणारे हे केंद्र असते. या ठिकाणी ग्रामपंचायतीच्या बैठकासाठी हॉल आहे. सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, तलाठी यांच्यासाठी स्वतंत्र कक्ष असतात, जेणेकरून लोकशाहीत गावचा कारभार हा वाड्यावरून वा गढीवरून होण्यापेक्षा ग्राम सचिवालयातून होणे ही सामाजिक क्रांती आहे.

राज्यात सध्या ३३ जिल्ह्यांतील १२४४ महसूल मंडळांपैकी ५३५ ठिकाणी सुसज्ज असे ग्रामसचिवालय असून काही ठिकाणी तर संगणक आणि ब्रॉडबँड इंटरनेटचीही सुविधा आहे. नव्या योजनेत आता महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून प्रत्येक गावात ग्रामपंचायतीच्या कार्यालयासाठी भारत निर्माण राजीव गांधी सेवा केंद्र निर्माण केले जाणार आहे. त्यासाठी आमदार-खासदारांचा स्वेच्छा निधीही वापरता येईल. १० लाखाचा निधी यासाठी मंजूर करण्यात आलेला आहे. त्यामुळे भविष्यात 'आमचे गाव आम्ही कारभारी', 'आमच्या गावातच कारभार', असे चित्र निर्माण व्हायला वेळ लागणार नाही.

**संपर्क : ९४२२०७११६९**

सहकार्याची प्रबल भावना । हेचि शिक्षणाचे मुख्य सूत्र जाणा
सहकार्यावाचोनी शिक्षणा । महत्त्व नाही



# तंटामुक्त शैलीचा अपूर्व अविष्कार

गावोगावी आज क्षुल्लक बाबींवरून हकनाक वाद उद्भवतात. शेताचा धुरा पलीकडे सरकवला म्हणून हाणामारी झाली, अशा बातम्याही आपण वृत्तपत्रांतून वाचतो. अशी भांडणं करणारी मंडळी प्रत्येक गावात आढळतात. हे दुर्जन गावात रोगट हवा फैलवतात. त्यामुळे गावाची नासाडी होते. अशावेळी सत्य कमजोर पडते. तर असत्य शिरजोर होताना दिसते. एकाच गावात राहुन एकमेकांशी भांडण्यापेक्षा परस्परांना सहकार्य केले तर काय हरकत आहे? शेतीच्या कामात धावून जा, कुणाच्या अडीअडचणी भागव, कुणाकडे लक्ष असेल तर त्याच्या कामात पड, गावात साथरोग पसरला तर मदत कर.. अशी चांगली माणसंही गावात असतातच ना ? हाच तर त्यांचा चांगुलपणा असतो. आपल्या गावच्या तंटामुक्त समितीचे सदस्यही असेच सज्जन गृहस्थ असतील.

गावातील सर्वच जण त्यांच्यासारखे वागले तर ? गावकऱ्यांनी अशा सज्जनांचे संरक्षण करावे. दुर्जनांचे दमन करावे. चांगल्याचे नेहमी समर्थन आणि वाईटाचा निषेध करावा. गावातही दुष्प्रवृत्ती असतील तर त्यांचे मनःपरिवर्तन करा. कोळसा काळा असला तरी तो भाजला म्हणजे लालबुंद होतो. त्याप्रमाणे ही माणसे परिवर्तित करा. आपण ज्या गावी जन्म घेतो, त्या गावचे काही देणे लागतो. म्हणून ग्रामसुधारणेसाठी, ग्रामरक्षणासाठी आपण सर्वांनी गंभीर होऊन विचार करावा. गावाला हुशार बनवा. गावात काही अपराध घडत असेल, तर त्याचे निर्दालन करा. सर्वमान्य तडजोड घडवून आणायला हवी. संत महात्म्यांनीसुद्धा हेच सांगितलंय. समता, बंधुभाव आणि मानवतेचाच संदेश त्यांनी दिलाय. तसे वागून गावाने आपल्या उत्तम गुणांच्या श्रेणी वाढवाव्या. गावातील अनिष्ट प्रथा, वाईट चालीरीती बंद कराव्या. ज्यात गावाचे अकल्याण आहे, अशा सर्व गोष्टींना तिलांजली द्यावी. यासाठी पोलीस आणि महसूल प्रशासनाची मदत घ्यावी. यातूनच आपल्या गावाची उन्नती साधणार आहे. तेव्हाच आपले गाव 'स्वर्ग' बनणार आहे. भारतीय संस्कृती ही संपन्न आणि सुदृढ होती. त्याकाळी गाव हा जो घटक होता, तो स्वयंपूर्ण होता. सामाजिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या एकात्म होता. त्याग, परोपकार, इतरांचे कल्याण ही मूल्ये स्वाभाविकच गावातील प्रत्येक घटकामध्ये दिसून येत होती. कालांतराने याव्यवस्थेत बदल वा बिघाड (?) झाल्यामुळे संपूर्ण जीवनव्यवस्थाच बदलली. औद्योगिकीकरण आणि त्याचाच परिणाम म्हणून झालेल्या शहरीकरणामुळे एकत्र कुटुंब पद्धती शिल्लक राहिली नाही. टोकाची व्यक्तिकेंद्रीवृत्ती बळावली. त्यामुळे स्वार्थ आणि स्वार्थामधून अतिरेकी जीवघेणी स्पर्धा प्रत्येकच क्षेत्रामध्ये

**प्रा. गजानन वाघ**




दिसायला लागली. नागरी जीवनाप्रमाणे ग्रामीण जीवनही यामुळे प्रभावित झाले. भरीस भर म्हणून आजच्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत शहरे दिशाभूल झाली, तेथे ग्रामीण क्षेत्रेही हवालदिल झाली. दारिद्र्य, शिक्षणाचा अभाव, शहरीकरणामुळे कमी होत गेलेली पिकाऊ कसदार जमीन, त्यावरील वाढत्या लोकसंख्येचा भार, यामुळे आणि कमालीची स्वार्थीकेंद्री मानवी वृत्ती यामुळे शहरी तसेच ग्रामीण भागात निर्माण झालेली भांडणे, यातून संपूर्ण सामाजिक जीवनच विस्कळित झाले.

हे असे होणे स्वाभाविकच ! कारण आज समाज आपल्या थोर संत परंपरेच्या, समाजसुधारक तसेच राष्ट्रीय पुरुषांच्या शिकवणुकीला विसरला. त्यामुळे भावाभावांमध्ये भांडणे, राजकारण्यांची सत्ताप्राप्तीसाठी अनैतिक मार्गाचा अवलंब करणारी वृत्ती, भ्रष्टाचार इत्यादी गोष्टींनी समाजामध्ये जोर धरला. यावर उपाय म्हणजे आपल्या प्राचीन संस्कृतीनुसार वागणे. संत, समाजसुधारक आणि राष्ट्रीय पुरुषांच्या विचारांचे स्मरण ठेवून त्यानुसार आचरण करणे. देशाचा विकास करायचा असेल तर ग्रामपातळीवर मूलभूत सुधारणा होणे आवश्यक असते. अशाप्रकारचा सारभूत विचार आपल्याला सर्व संत, सुधारकांनी दिला. महात्मा गांधी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, आचार्य विनोबा भावे आदींच्या साहित्यातून हेच संदर्भ सापडतात. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी गाव शुद्धीकरणाची संपूर्ण प्रक्रियाच आपल्या ग्रामगीता या ग्रंथामध्ये मांडून ठेवली आहे. विनोबांनी गावाची संपत्ती ज्या वेगवेगळ्या कारणांनी गावाबाहेर जाते, त्या कारणांचा म्हणजेच लग्न, बाजार आणि भांडणे इत्यादींचा उल्लेख करून गावातील भांडणे कमी करण्याचा वा न करण्याचाच संदेश दिला आहे. महात्मा गांधीजींनीसुद्धा अहिंसात्मक मार्गाने समाजाची पुनर्रचना करून 'रामराज्य' निर्माण करण्याचा संदेश दिला आहे. अखिल भारतीय सर्वोदय मंडळाचे अध्यक्ष डॉ. सुगन बरंठ यांच्याशी अलीकडे वार्तालाप करण्याचा योग आला. विषय होता गावातील भांडणतंट्यांचा. ते म्हणाले, एक माणूस रात्री दारू पिऊन त्याच्या कुटुंबाला शिवीगाळ करत रस्त्याने जातो. पण तो झोप सगळ्यांची बिघडवतो. एखादा शिक्षक शाळेत नीट शिकवत नाही. पण त्याची फळं मात्र सर्व विद्यार्थ्यांना भोगावी लागतात. त्यामुळे सामूहिक साधना महत्त्वाची. गांधीजींनी लिहुन ठेवलंय, 'मी तुम्हाला नवीन काहीही सांगितलेले नाही. सत्य आणि अहिंसा हे पर्वतांएवढे पुरातन आहेत.' महाराष्ट्र शासनाने सर्व राज्यभर युद्धपातळीवर हातामध्ये घेतलेली एक महत्त्वाकांक्षी मोहीम म्हणजे महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम. वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या स्वप्नातील म्हणजेच 'ग्रामगीता' ग्रंथातील आदर्श ग्रामनिर्मितीची अपेक्षापूर्ती डोळ्यांपुढे ठेवून आणि महात्मा गांधींच्या अहिंसात्मक मार्गाने जाऊन आदर्श ग्रामव्यवस्था निर्माण व्हावी, या प्रामाणिक हेतूने राबविण्यात येत असलेली ही मोहीम.

या मोहिमेची गाव पातळीवर यशस्वी अंमलबजावणी व्हावी, म्हणून व्यापक प्रयत्न होणे आवश्यक आहे. या मोहिमेची कास धरून तंटामुक्त समाजनिर्मिती घडवू या ! चला, आपले गाव नंदनवन करू या !

**संपर्क : ९८८१२५९४६६**



**खेडेचि शहराचे जनक । शहर भोक्ते, खेडे उत्पादक**
**शहराकडे न जाता लोक । धावावे उलट खेड्याकडे**

# जीवन आणि जीवदान

**अमृता नीलकंठ पाटील**

दान करण्याची परंपरा भारतीयांना नवीन नाही. रामायण, महाभारत आणि प्रत्येक धर्माच्या धार्मिक शास्त्रात दानाचे महत्त्व काय आहे ते सांगितले आहे. त्यामुळे याचे वेगळे महत्त्व सांगायची गरज नाही.

ऑक्टोबर १ हा दिवस आपण राष्ट्रीय ऐच्छिक रक्तदान दिन म्हणून साजरा करतो. ऑक्टोबर १, १९०० रोजी लँड स्टॅनर यांनी रक्तगटांचा शोध लावला आणि तेव्हापासून एका गटाच्या व्यक्तीचे रक्त त्याच गटाच्या दुसऱ्या व्यक्तीला चालू शकते. रक्त गटाचा शोध हा वैद्यकीय शास्त्रातले मोठे पर्व ठरले. त्यानंतर दुसऱ्या महायुद्धात जखमी सैन्याची रक्ताची गरज भागविण्यासाठी रक्तपेढ्या म्हणजेच Blood Bank ही संज्ञा अस्तित्वात आली.

रक्त हे आपण कोठेही आणि कोणत्याही प्रकारे कृत्रिमरीत्या बनवू शकत नाही. रक्ताचा एकमेव स्रोत म्हणजे मानव शरीर. त्यामुळेच आज रक्ताची गरज भागविण्यासाठी रक्तदानाचे आव्हान केले जात आहे. सुरुवातीला संपूर्ण रक्त द्यायची पद्धत होती, जी अजूनही कित्येक ठिकाणी तशीच चालू आहे. मात्र आज आपण रक्ताचे प्रत्येक घटक वेगळे करून रुग्णाच्या गरजेप्रमाणे रक्त घटक देण्याची सोय उपलब्ध केली आहे.

आज महाराष्ट्रात १४५ रक्त विघटन करणाऱ्या रक्तपेढ्या अस्तिवात आहेत. प्रत्येक जिल्ह्यात कमीत कमी एक ते दोन रक्त विघटन करणाऱ्या रक्तपेढ्या आहेत. त्यामुळे अपघातामुळे, हिमोग्लोबिनच्या कमतरतेमुळे किंवा मलेरियासारख्या रोगाने होणारे मृत्यू आपण टाळू शकतो. थॅलेसेमिया सारख्या रुग्णांना वारंवार रक्ताची गरज पडते. त्यांची गरज आज महाराष्ट्रात सर्वत्र उपलब्ध असणाऱ्या २७२ रक्तपेढ्या भागवत आहेत. अशा रुग्णांना रक्तपेढ्या या मोठे वरदान ठरल्या आहेत. या रक्तपेढ्यांचा उपयोग कोणाचा तरी जीव वाचविण्यासाठी होतो. पण जर कोणी रक्तदान करायला पुढे आलेच नाही तर या रक्तपेढ्या त्यांचे जीवदानाचे कार्य करू शकणार नाहीत.

कदाचित, तुमच्यापैकी काहींना रक्तदानाविषयी किंवा रक्तपेढ्यांविषयी अनेक शंका असतील. त्या दूर करण्यासाठी प्रत्येक रक्तपेढीमध्ये एक जनसंपर्क अधिकारी किंवा समुपदेशक उपलब्ध असतो. त्याचे मुख्य काम रक्तदानाविषयी जागरूकता निर्माण करणे हे आहे. आता तुम्ही म्हणाल ऐच्छिक रक्तदानाचा अट्टाहास का ? याचे उत्तर तुम्हाला देणे गरजेचे आहे. भारतात सन १९८६ मध्ये एच्.आय्.व्ही. (HIV) चा पहिला रुग्ण आढळला. HIV विषाणूचा संसर्ग होण्याचा चारपैकी एक सुलभ मार्ग म्हणजे HIV संसर्गित रक्त रुग्णाला दिले जाते. या आधी पैसे घेऊन रक्त देण्याचा पर्याय उपलब्ध होता, त्यामुळे पैशांसाठी लोक हवं तेव्हा रक्त देत होते आणि अश्या रक्तदात्यांत HIV संसर्गित व्यक्ती असू शकतात. अशा व्यक्तींकडून गोळा केलेल्या रक्तात अनेक आजारांचा संसर्ग आढळून आल्यास ते नष्ट करावे लागते. हे सर्व कामे खर्चिक होऊ शकते. त्यासाठी आज पैसे किंवा कोणतेही आमिष न स्वीकारता जो रक्तदाता रक्तदान करेल, ते रक्त खऱ्या अर्थाने महत्त्वाचे व उपयुक्त ठरेल. यासाठीच ऐच्छिक रक्तदानाची चळवळ सर्वत्र चालविण्यासाठी व रक्तसाठा वाढविण्यासाठी भारतात १ ऑक्टोबर हा ऐच्छिक रक्तदान दिवस म्हणून पाळला जातो.

भारतात राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्था सन १९९२ ला स्थापन झाली. याचा मुख्य उद्देश HIV विषाणूचे संसर्ग नियंत्रणात आणणे व थांबवणे हा आहे. त्यासाठी HIV च्या सर्व मार्गावरून होणाऱ्या संसर्गावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. रक्तदानामुळे HIV च्या संसर्गाचा अंदाज करता येतो. म्हणूनच ऐच्छिक रक्तदानाला प्रोत्साहन देण्यासाठी भारतात १ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर या महिन्यात ऐच्छिक रक्तदानाची चळवळ जोमाने चालवली जाते. ज्यामुळे सुरक्षित रक्तपुरवठ्याची गरज भागवली जाते. आज महाराष्ट्रातील एकूण २७२ रक्तपढ्यांपैकी ७७ रक्तपेढ्यांना राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्था आर्थिक तसेच तांत्रिक अशा दोन्ही स्वरूपाची मदत करते. त्यामुळे आज महाराष्ट्राने सर्व रक्तपेढ्या मिळून २०१०-११ मध्ये १२ लाखांपेक्षा जास्त रक्त पिशव्या गोळा करण्याचा उच्चांक गाठला. ज्यामध्ये ९० टक्के रक्त हे पूर्णतः ऐच्छिक होते. भारतात पश्चिम बंगाल नंतर महाराष्ट्र रक्तसंकलनात दुसऱ्या पातळीवर आहे. आपत्कालीन काळात राज्यात लागणारी रक्ताची गरज भागविण्यासाठी महाराष्ट्रात नागपूर शासकीय महाविद्यालयाच्या रक्तपेढीला मेट्रो ब्लड बँक म्हणून ओळखले जाते. या रक्तपेढीचे फिरते रक्तसंकलन वाहन महाविद्यालय, विविध बस स्टॅन्ड, रेल्वेस्थानक किंवा खेडेगावात जाऊन रक्तदानाविषयी जनजागरूकता आणि ऐच्छिक रक्तदान शिबिर भरवते. ज्यामध्ये ९० टक्के रक्त हे पूर्णतः ऐच्छिक होते. सुरक्षित रक्ताच्या दृष्टीने राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्था आपल्या रक्तपेढ्यांना चांगल्या गुणवतेच्या रक्त पिशव्या व रक्त तपासणी संच पुरवते. त्यामुळे रक्तातून संक्रमित होणाऱ्या रोगाचा प्रसार आपण थांबवू शकतो.

रक्तदान दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, रक्तदानाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी विविध कार्यक्रम राबवते. ज्यामध्ये सर्व स्तरांवरील विद्यार्थी व तरुण वर्गाचा अधिक सहभाग दिसून येतो. आज रक्तदान करण्यासाठी फक्त तरुण वर्गच नाही तर स्त्रियांचा आणि तोही ग्रामीण भागातील स्त्रियांचा पुढाकार दिसून येतो. आज महाराष्ट्रात २५ पेक्षाही जास्त वेळा रक्तदान करणारे कितीतरी रक्तदाते आहेत. त्यांना तर खरोखरच आपण मानाचा मुजरा करायला हवा. शाळेतल्या विद्यार्थ्यांमध्येही रक्तदानाबद्दल जागरूकता या संस्थेकडून करण्यात येते. ज्यामुळे लहान विद्यार्थी त्यांच्या पाल्यांना रक्तदान करायला प्रवृत्त करतात.

आपणही या चळवळीत सहभागी होऊया. आजच निश्चय करू या, माझा प्रत्येक वाढदिवस मी रक्तदान करूनच साजरा करणार. आणि प्रत्येक वाढदिवसाला मी एकाला जीवनदान देणार. यापेक्षा मोठे पुण्य ते काय असेल !


**स्वतः करून रक्तदान,**
**वाचवू शकता दुसऱ्याचे प्राण,**
**थेंबे थेंबे तळे साचे,**
**रक्तदानाने कोणाचे तरी प्राण वाचे,**
**रक्तदान आहे अनमोल,**
**तेव्हा करू नका त्याचे मोल,**
**दानात दान रक्तदान,**
**हे आहे सर्वश्रेष्ठ दान.**

**- (गुणवत्ता व्यवस्थापक)**
महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था

✦✦


माय बापहो !
आपले गावं-रस्ते-घरं साफसुथरे ठेवा.
देवळं, शाळा, नद्या, तलाव स्वच्छ ठेवा.
देवाच्या नावाचा बजार मांडू नोका.
कर्मकांडाच्या उकंड्यावर लोयत पडू नोका.
भुकेल्याले अन्न आन् तहानल्याले पानी द्या.
उघळ्या-नागळ्यायले कपळे आन्
पोरापोरीयले शिक्षन द्या.
आंधळ्या-पांगळ्यायले अधार आन्
पशुपक्षायले अभय द्या.
ह्योच खरी देवपूजा व्हय !
आन् हाच खरा धर्म व्हय !!
गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला
- संत गाडगेबाबा

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MH/MR/South - 210/2012-14
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, April 2012.
Date of Publication : 10th of every Month




# लोकराज्य

खप
पाच
लाख

वाचक
पन्नास
लाख

प्रती / To :

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ

लोकराज्य LOKRAJYA

प्रेषक / From

दिगंबर वा. पालवे
वरिष्ठ साहाय्यक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक प्रमोद त्र्यं. नलावडे, महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी एच. टी. मीडिया लि. प्लॉट नं. ६, टी. टी. सी. एम. आय. डी. सी. इंडस्ट्रियल एरिया, दिघे, ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई - ४०० ७०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : प्रमोद त्र्यं. नलावडे